UNIVERSAL
LIBRARY
OU_192362
UNIVERSAL
LIBRARY

OUP-391-29-4-72—10,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. [illegible]

Accession No. [illegible]

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below.

# काळांतील निवडक निबंध

## भाग दुसरा.

शिवराम महादेव परांजपे

प्रस्तावनालेखक

श्री. शं. नवरे

पुनर्मुद्रण २७ सप्टेंबर १९४६

---

कागदी बांधणी : ३॥ रुपये ] [ कापडी बांधणी : ४ रुपये

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी
६२३।१५ सदाशिव पेठ, पुणें

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे-भाषांतराचे रूपांतराचे वगैरे सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकाकडे आहेत. या पुस्तकांतील उतारे घेणें झाल्यास प्रकाशकाच्या परवानगीशिवाय घेऊं नयेत.

मुद्रक:
न. वि. सरदेशपांडे
आदर्श मुद्रणालय,
३९५।५ सदाशीव, पुणें २

एकंदर चालू महर्गतेमुळें 'काळांतील निवडक निबंधाचीं' पुस्तकें जितक्या किंमतींत द्यावयाची माझी इच्छा होती तितक्या किंमतींत देतां आलीं नाहींत. याकरितां काळांतील निवडक निबंधाचे पहिले भागांत एक सवलतीचें कूपन टाकलें आहे. सवलतीची समग्र माहितीहि त्याच खंडांत दिली आहे. ग्राहकांनीं अवश्य वाटल्यास त्याचा फायदा घ्यावा.

व्यवस्थापक

य. गो. जोशी प्रकाशन, सदाशिव, पुणें.

# अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | ईश्वर विभु आणि नित्य आहे नं. १ ... ... | १ |
| २. | ,, ,, ,, नं. २ ... ... | ६ |
| ३. | ,, ,, ,, नं. ३ ... ... | १२ |
| ४. | बंदुकीच्या दारूची युक्ति कोणी शोधून काढली ? ... | १६ |
| ५. | आंग्लपत्रकाराचें कल्पनामय साम्राज्य ... ... | २२ |
| ६. | नीतिशिक्षणाची शाळा ... ... ... | २७ |
| ७. | काळ्या माणसाचें ओझें ... ... ... | ३३ |
| ८. | विद्येचा उपयोग ... ... ... ... | ३६ |
| ९. | भाषांतराचा हेतु ... ... ... ... | ४५ |
| १०. | हिंदुस्थान आणि ट्रान्सव्हाल ... ... ... | ४८ |
| ११. | पुराणिकाचा खटला का सुटला ? ... ... | ५३ |
| १२. | जमिनीचा सारा जमिनीच्या शिवाय दुसऱ्या उत्पन्नांतून कां द्यावा ? | ५९ |
| १३. | हल्लीच्या लढाईपासून लोकांच्या मनावर होणारे परिणाम ... | ६७ |
| १४. | जुन्या इमारतींचें नव्या राजांनीं काय करावें ? ... | ७३ |
| १५. | रिलीफ कामें काढण्यांतील उद्देश ... ... | ८१ |
| १६. | एक नवीन कारखाना ... ... ... | ८६ |
| १७. | प्रार्थना ... ... ... ... | ९५ |
| १८. | अनाथांवर दया ... ... ... ... | १०३ |
| १९. | सरटिफिकीट ... ... ... ... | १०८ |
| २०. | असल्या उत्सवांची भीति कशाला पाहिजे ? ... | ११३ |
| २१. | इनकमटॅक्स आणि सोशिॲलिझम ... ... | ११८ |

# काळांतील निवडक निबंध

## भाग दुसरा

# निबंध–परिचय

प्रस्तुतचा दुसरा भाग म्हणजे ‘ काळ ’ पत्राच्या दुसऱ्या वर्षातील ( ता. ११ एप्रिल १८९९ ते ३१ मार्च १९०० पर्यंतच्या अवधीतील ) लेख होत. ‘ काळ ’ हें पत्र साप्ताहिक असल्यामुळें या अवधींत प्रसिद्ध झालेल्या एकंदर ५० लेखांपैकीं फक्त २१ निवडक लेखांचा या भागात संग्रह केलेला आहे. ही निवड अर्थातच स्वतः शिवरामपंतांनीं स्वतःच्या मताप्रमाणें केली असावी. एकंदर ५० लेखांपैकीं एवढे लेख त्यांना विशेष महत्त्वाचे आणि वाचकांपुढें कायमचे ठेवण्याच्या योग्यतेचे वाटले. दुसऱ्या कोणीं निवड केली असती तर रुचिवैचित्र्याप्रमाणें या निवडीमध्ये कदाचित् फरक झाला असता आणि न जाणो निबंधांची संख्याहि कमी जास्ती झाली असती.

निबंधांचा क्रम कालानुक्रमानेंच दिला असला पाहिजे. एकाहि निबंधावर प्रसिद्धीची मूळ तारीख दिलेली नाहीं. हे संपादनातील मोठेंच वैगुण्य होय. या आवृत्तीमध्यें तें काढून टाकण्यासाठीं ‘ काळ ’ पत्राच्या जुन्या फाइली शोधण्यांत आल्या. पण प्रयत्न करूनहि दुसऱ्या वर्षाची फाईल उपलब्ध होऊं शकली नाहीं, त्यामुळें मूळ वैगुण्य कायमच ठेवावें लागत आहे.

‘ चित्रमयजगत् ’ सारख्या मासिकांतून शिवरामपंतांचे मागाहून कित्येक सुंदर लेख प्रसिद्ध झालेले आहेत. पण वृत्तपत्रातील लेखांना जितकें प्रासंगिक स्वरूप असतें तितकें मासिकांतील लेखांना असतेंच असें नाहीं. तो तो प्रसंग डोळ्यांपुढें अगदीं ताजा असतांना त्याला अनुलक्षून लिहिलेले लेख वाचकांना जसे समजू शकतात तसें मागाहून कित्येक वर्षांनीं ते लेख वाचणाऱ्या वाचकांना ते समजूं शकतीलच असें नाहीं. पण ‘ काळां ’ तील लेखांचें वैशिष्ट्य हें आहे कीं, प्रसंगाची पार्श्वभूमि फक्त नांवापुरती घेऊन त्यावर लेखकानें आपल्या कल्पनाविलासानें देशभक्तीची प्रेरणा देणारें किंवा आत्मोन्नतीची उत्कट आकांक्षा उत्पन्न करणारें एखादें शाब्दिक चित्र रेखाटावें. ही पार्श्वभूमि अजिबात टाळली असती तर वृत्तपत्रांत तें लिखाण शोभून दिसलें नसतें. शिवाय एखाद्या प्रसंगाचा फायदा घेऊन वाचकांच्या

भावना इष्ट हेतूच्या सिद्धीसाठीं जितक्या उद्दीपित करता येतात तितक्या केवळ तात्त्विक विवेचनानें–तें कितीहि भावनाप्रधान केलें तरी–करतां येत नाहींत. ‘ काळ ’ पत्र अजिबात न काढता त्यातील लेखांत व्यक्त केलेले विचार केवळ तात्त्विक स्वरूपात शिवरामपंतांनीं निबंधरूपानें एखाद्या पुस्तकातून माडले असते तर त्या वेळच्या समाजावर ‘काळा’तील लिखाणा-इतका परिणाम ते करूं शकले असते कीं नाहीं याची शंका आहे. वृत्तपत्र हे शीघ्र आणि नियत प्रचाराचें एक अत्यंत प्रभावी साधन आहे, हें लक्षांत घेऊनच शिवरामपंतांनी त्या साधनाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. या गुणाबरोबरच क्षणभंगुरता हा दोष वृत्तपत्रीय लिखाणाला चिकटत असतो याची त्याना जाणीव नव्हती असें नाहीं. ( वृत्तपत्राच्या आजच्या फापट पसाऱ्यात हा दोष ठळकपणें सर्वांच्याच प्रत्ययाला विशेष येत आहे. ) हा दोष शक्य तितका कमी करण्यासाठीं प्रासंगिक टीकेची भूमि सोडून तत्त्वनिरूपणाच्या आकाशात ते एकदम उड्डाण करीत आणि आपल्या कल्पनेच्या विलासानें उत्पन्न केलेले व साहित्यिक अलंकारानीं सजविलेले सुदर सुंदर देखावे वाचकाच्या डोळ्यासमोर उभे करीत. यामुळे लेखाच्या प्रासंगिक स्वरूपाला स्वाभाविकपणेंच गौणपणा व त्याच्या चिरस्थायित्वाला प्राधान्य प्राप्त झालें. ‘काळा’तील असल्या प्रकारच्या लिखाणाला ‘लेख’ हे नाव न देता शिवरामपंतानींच त्याला ‘ निबंध ’ असें म्हटलें आहे, यावरून त्यांच्या मनोभूमिकेचा बोध होतो. आगरकराचे ‘ केसरी ’ तील आणि ‘सुधारका’तील पुष्कळसें लिखाण हेतु आणि लेखनशैली याच्या दृष्टीनें शिवराम-पंताहून अगदीं निराळें असलें तरी, त्याची घाटणी निबंधासारखीच आहे. म्हणूनच वृत्तपत्राच्या क्षणभगुर सृष्टीमध्यें टिकाव धरून ग्रंथाच्या चिर-सृष्टींत तें स्थानापन्न होऊं शकलें. लो. टिळकांचे केसरींतील लेख प्रसिद्ध झाले आहेत; पण ते लेख म्हणून, निबंध म्हणून नव्हे. त्या लेखाना चिरस्थायी स्वरूप प्राप्त होण्याचें कारण टिळकांना देशातील राजकारणांत मागाहून मिळालेलें मानाचें स्थान आणि त्या लेखांमधून प्रतिबिंबित झालेला हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीचा इतिहास होय.

“ धार्मिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, आणि वाङ्मयीन विषयाची निःपक्षपाताने व निर्भयपणाने पूर्ण चर्चा करणारें साप्ताहिक ” अशी

' काळ ' पत्राची जाहिरात त्याच्या कर्त्यानें आगाऊ केली होती. या वर्णनाच्या कसोटीवर घासून पाहाता प्रस्तुत दुसऱ्या भागातील २१ निबंधामध्यें केवळ वाङ्मयीन असा एकहि निबंध नाहीं. ' बंदुकीच्या दारूची युक्ति कोणीं शोधून काढली ? ' हा एकच निबंध निव्वळ ऐतिहासिक भूमिकेवरून लिहिलेला आढळतो. "बंदुकीच्या दारूची कल्पना युरोपियनांनी शोधून काढली," या त्या काळीं पाश्चात्य लेखकांनीं प्रचलित केलेल्या समजाचें निराकरण या लेखात केलें असून, ' शुक्रनीतिसार ' या ग्रंथातून अनेक संस्कृत उतारे देऊन आमच्यात फार पुरातन काळापासून बंदुकीच्या दारूची कल्पना माहीत होती, हे सिद्ध करण्यात आले आहे. हा लेख अगदींच सोंवळा आहे. म्हणजे शिवरामपंताच्या राजकीय वक्रोक्तीचा विटाळ त्याला यत्किंचित् झालेला दिसत नाहीं. पण हा अपवाद होय.

ज्याना निर्भेळ धार्मिक किंवा सामाजिक म्हणता येईल असा आगरकरी थाटाचा निबंधहि या संग्रहात मिळणार नाहीं. आधीं राजकीय सुधारणा कीं आधीं सामाजिक या वादाची धुमश्चक्री त्या काळीं चाललेली होती. त्यामध्यें शिवरामपंताचा कल टिळकाच्या ' राजकीय ' पक्षाकडे निश्चितपणे होता. प्रचलित परकीय राजवटीविरुद्ध लोकांचे मनांत तीव्र तिरस्कार उत्पन्न करून स्वातंत्र्याच्या लालसेनें त्याचीं मनें भारून टाकणें, हेंच पुढाऱ्याचे आणि वृत्तपत्रकाराचें आज आद्य कर्तव्य आहे. सामाजिक सुधारणेचा ' घरातला ' प्रश्न मागाहून हळूहळू सोडविता येईल, असें मानणारापैकीं शिवरामपंत एक होते. म्हणून त्या वेळच्या समाजसुधारणेची प्रसंगोपात्त थट्टा करून* त्याची लेखणी बहुधा राजकीय विषयांलाच हात घालीत असे.

---

* ' आंग्ल पत्रकाराचें कल्पनामय साम्राज्य ' या प्रस्तुत भागांतील निबंधांतील पुढील उतारा पाहा:—" शिवाय, डोकीं वाढविलेले सुधारक, जानवीं तोडलेले सुधारक, बूट सुधारक, विटाळशी सुधारक, अवसान घातकी सुधारक, स्त्रीशिक्षक सुधारक, विधवा सुधारक, म्हातारपणीं लग्न करणारे सुधारक व थंडे, गरम, कोमट वगैरे सुधारकात ज्या असंख्य जाती झाल्या आहेत त्या सर्वांवर ब्राह्मणत्वाच्या अपराधाबद्दल पूर्ण क्षमा दर्शविण्यात येईल, असा पुष्कळ संभव आहे. प्रार्थना समाज, ब्रह्म समाज, आर्यसमाज वगैरे

एखादा प्रासंगिक धार्मिक किंवा सामाजिक विषय हातांत घेतलाच तर त्याचें पर्यवसान राजकीय असहायतेकडे लोकांचें लक्ष खेंचण्यांत होत असे. तरीहि 'ईश्वर विभु आणि नित्य आहे' या मथळ्याखालचे या संग्रहातील पहिले तीन निबंध सामाजिक समजण्यास हरकत नाहीं. ख्रिस्ती धर्मप्रचारकांकडून हिंदुधर्मावर घेण्यांत येणारे मुख्य आक्षेप कसे फोल आहेत व ते त्यांचे धर्मावरच कसे उलटणारे आहेत, हें दाखवून मिशनऱ्यांच्या चाळ्यांना आपल्या लोकांनीं बळी पडतां कामा नये, हें त्या तीन लेखांतील उद्दिष्ट आहे. ईश्वराचें विभुत्व आणि नित्यत्व या दोन गोष्टी ख्रिस्तीधर्माला खरोखरच मान्य असतील तर येशूख्रिस्ताला मानतील तेवढेच लोक फक्त तरून जातील, हा ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा आग्रह निराधार ठरतो. उलट पक्षीं हें तत्त्व त्या धर्माला संमत नसेल तर विवक्षित स्थळीं व विवक्षित काळींच

---

नानाविध समाजांतील सभासद जरी कोणी जन्मद्वारा ब्राह्मण असले तरी, ते ब्राह्मण नाहींत असेंच ठरविलें जाईल."

'असल्या उत्सवांची भीति कशाला पाहिजे ?' या दुसऱ्या एका निबंधांतील आणखी एक उतारा पाहा—

"पुनर्विवाहाचा प्रघात जारीनें सुरू होऊन हल्लीं जसे पाऊणशें वर्षांचे म्हातारे चवदा वर्षांच्या पोरींशीं लग्नें करतात, त्याप्रमाणें जेव्हां पाऊणशें वर्षांच्या म्हाताऱ्या चवदा वर्षांच्या पोरांशीं पुनर्विवाह लावतील, जेव्हां महारा-चांभारांच्या घरीं ब्राह्मण रोटीचा आणि बेटीचा व्यवहार मनसोक्त करूं लागतील व जेव्हां सुधारकचमूंतील योद्धे सुधारणेचे धवल विजयध्वज घेऊन चोहोंकडे नाचूं लागतील, तेव्हा, म्हणजे सुमारें हजार दोन हजार वर्षांनीं, सुधारक वीर नेमस्त भाषणानीं व मर्जीचा कल पाहून उच्चारलेल्या शब्दांनीं जो शिवाजीचा आणि नानाचा उत्सव करतील त्यात मात्र खरा देशाभिमान, खरी निरपेक्षता, खरें धैर्य, वगैरे गुणांचा विकास व्हावयाचा आहे."

हे दोन्ही उतारे निबंधमालेंतील विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या कुचेष्टेखोर भाषा-पद्धतीची चांगली आठवण करून देतात. निबंधमालेंतील विचारसरणीची आणि भाषापद्धतीची शिवरामपंतांच्या मनावर विद्यार्थिदशेपासून छाप बसलेली होती याचा हा पुरावा धरत. येणार नाहीं काय ?

फक्त असणारा परमेश्वर जगातील सर्व ठिकाणच्या व सर्व काळातील जीवाचें तारण कसें करूं शकणार, या बिनतोड कोटिक्रमानें मिशनरी प्रचाराचें पेंकाट शिवरामपंतांनीं मोडून काढलें आहे. "हिंदु धर्मांत धर्मांतराचें तत्त्व नाहीं याचें कारण तरी हेंच कीं, परमेश्वर सर्वव्यापक आहे, तेव्हा त्याला कोठूनहि हाक मारली तरी ऐकूं जाईल. त्याला अमक्याच धर्माच्या गोटातून हाक मारली पाहिजे असें असण्याचें मुळींच कारण नाहीं. तेव्हा कोणी मनुष्य कोणत्याहि धर्माच्या गोटात का असेना, त्यानें भक्तिपुरस्सर देवाला हाक मारली कीं, देव त्याच्यासाठीं धावत येतो, अशी हिंदुधर्मसंस्थापकाची पूर्ण खात्री असल्यामुळें आपल्या धर्माची स्तुति आणि दुसऱ्याची निंदा हीं नीच कामें त्यांनीं कधीं केली नाहींत; व आपल्या धर्माच्या प्रौढीसाठीं आपल्या परमेश्वराच्या विभुत्वाला त्यानीं कधीं कमीपणा आणला नाहीं." असें लिहून काळकर्त्यांनीं ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या बाटवाबाटवीच्या उद्योगाचा पायाच उखडून टाकला आहे. या तीन लेखांचा समारोप पुढील शब्दांत करण्यांत आला आहे :—"ज्या लोकांचें जें धर्मपुस्तक असेल त्यांतील वचनांवर त्या धर्मांतील लोकांनीं श्रद्धा ठेविली पाहिजे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. पण तुम्ही ( मिशनरी ) दुसऱ्याला बाटविण्यासाठीं म्हणून जेव्हां आपला धर्म पुढें करतां, तेव्हा त्याजवर त्याची एकाएकीं श्रद्धा कशी बसेल ? प्रथमतः तो तुमच्या धर्माचें निरीक्षण तर्कदृष्ट्याच करणार व त्यात जर कांहीं निष्पन्न झालें तर मग तो पुढें तुमच्या धर्मपुस्तकावर श्रद्धा ठेवणार. विचार केल्यावांचून कोठें तरी श्रद्धा ठेवावयाची असेंच असेल तर त्याला त्याचा स्वतःचा धर्म नाहीं काय ? नुसती श्रद्धा ठेवण्यालाच त्याला तुमचा धर्म कशाला पाहिजे व युक्तीच्या आणि तर्कांच्या मार्गानें आपल्याकडे वळवून घेण्यासारखें तत्त्व तर तुमच्या धर्मांत काहीं दिसत नाहीं. तेव्हां असल्या धर्माकडे स्वतः मूर्ख असल्याशिवाय कोणत्या परधर्मीयांची प्रवृत्ति होणार आहे !"

आपापल्या धर्मसंस्थापकाचा अभिमान धरून लोक परमेश्वराची प्रार्थना करतात. पण शेवटीं या सर्व प्रार्थना—त्या कोणत्याहि भाषेंतून केल्या तरी—एकाच परमेश्वराला जाऊन पोहोंचतात, हें सर्व धर्मांतील ऐक्याचें आणि एकेश्वराचें तत्त्व आकाशाच्या भव्य सभामंडपांत परमात्म्याच्या अध्यक्षतेखालीं मरुद्गणांच्या भरलेल्या एका काल्पनिक सभेचा वृत्तांत देऊन 'प्रार्थना'

या निबंधांत सुंदर रीतीनें कथन केलें आहे. तथापि या निबंधाचा खरा रोख निराळाच आहे. त्यावेळीं दक्षिण आफ्रिकेंत बोअर युद्ध चालू होतें. त्या युद्धांत बोअर लोकांचा नाश व्हावा व इंग्रजांचा जय व्हावा म्हणून ब्रिटिशांचे हिंदु, महंमदी, ख्रिस्ती, पारशी, प्रजाजन सरकारी प्रेरणेवरून आपापल्या धर्ममंदिरांत जमून प्रार्थना करीत होते. त्यांची कुचेष्टा करून त्यांची प्रार्थना किती भोंदूपणाची, किती आप्पलपोटेपणाची आणि किती अन्यायाची आहे, हें दाखवून प्रार्थना करणाऱ्या भोळ्या 'राजनिष्ठ' लोकांना शुद्धीवर आणणें हें त्या निबंधाचें उद्दिष्ट आहे. मृत्युलोकांतून वर येणाऱ्या या हजारों प्रार्थना ऐकून वरील सभेंत बसलेला परमेश्वर मरुद्गणांना उद्देशून म्हणतो, "हे लोक या प्रार्थना देवासाठीं करीत नाहींत, तर आपल्या राजासाठीं करीत आहेत; भक्तीनें करीत नाहींत, तर भीतीनें करीत आहेत. ...... त्यांच्या या प्रार्थना पदव्यांसाठीं आहेत. पण देवाच्या घरीं पदव्या कोठच्या? एखाद्या गलबताप्रमाणें वारा लागेल तशी पाठ फिरविणारे हे तोंडपुजे लोक आपल्या तोंडपुजेपणानें जसें राजांना फसवितात तसें ते आपल्या प्रार्थनांनीं देवांनाहि कदाचित् फसवूं पाहात असतील. पण राजांमध्यें आणि देवांमध्यें अंतर आहे हें त्यांनीं लक्षांत बाळगलें पाहिजे. बरें, इंग्रजांचा जय व्हावा अशी हे लोक प्रार्थना करतात, म्हणजे अर्थात् बोअर लोकांचा पराजय होऊन ते मरावे अशी हे प्रार्थना करतात असें होतें. पण त्या बिचाऱ्या बोअर लोकांनीं मरावें अशी प्रार्थना करण्याइतकें त्यांनीं यांचें काय बरें वाईट केलें आहे? ...... मनुष्यानें राजनिष्ठ असलें पाहिजे. "ना विष्णुः पृथिवीपतिः।" हें वचन मींच लिहून ठेविलेलें आहे. पण राजनिष्ठेबरोबरच दुसऱ्याहि कांहीं चांगल्या गोष्टी जगांत वास्तव्य करीत आहेत हें मनुष्यांनीं विसरतां कामा नये."

१८९९ सालीं बोअर युद्ध हा विषय जगांत विशेष दुमदुमत होता. त्यांतील एका पक्षाला इंग्रज असल्यामुळें ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग असलेल्या हिंदुस्थानांत तर तो विषय सर्वतोमुखीं झालेला होता. तेव्हां वृत्तपत्रांतूनहि त्या विषयाला प्राधान्य मिळावें यांत आश्चर्य नाहीं. 'हिंदुस्थान आणि ट्रान्सव्हाल!', 'हल्लींच्या लढाईपासून लोकांच्या मनावर होणारे परिणाम', 'प्रार्थना', "अनाथांवर दया' हे चार निबंध ह्याच

विषयाला वाहिलेले आहेत. पण युद्धाच्या प्रगतीचें समालोचन करण्याच्या उद्देशानें हे लेख लिहिलेले नसून, त्यावरून हिंदी लोकांनीं काय बोध घ्यावा, हें निरानिराळ्या दृष्टिकोनांतून त्यांच्या नजरेस आणण्यांत आलें आहे. पैकीं 'प्रार्थना' निबंधाचा हेतु वर सांगितलाच. "हिंदुस्थान स्वतः इंग्लंडचें गुलाम बनलें आहे, याबद्दल कांहीं बोलताच येत नाहीं. पण जेव्हां या गुलाम राष्ट्राचा दुसरीं राष्ट्रें गुलाम करण्याकडे उपयोग करण्यांत येतो, तेव्हां मात्र तें पाहून दुःखाचे उमाळे येऊन पोटात कालवूं लागतें......आपल्या हतभाग्य देशाचा असा वाईट उपयोग झालेला पाहून कोणाचें अंतःकरण हळहळणार नाहीं!" हा 'हिंदुस्थान आणि ट्रान्सव्हाल' या लेखाचा सूर आहे. "हल्लींच्या लढाईपासून लोकांच्या मनावर होणाऱ्या परिणामा"चें विवरण करतांना 'काळ'कर्ते म्हणतात, "स्वातंत्र्याबद्दलच्या लढाया ह्या जुलुमी राजांना वचकांत ठेवण्यालाहि फार उपयोगी पडतात. असल्या लढाया पाहून जुलमी राजांचा जुलूम जो अव्याहतपणें चाललेला असतो त्याला थोडाबहुत आळा बसतो, व या लढाया गुलामगिरींत सडत पडलेल्या लोकांना उत्तेजन देण्यालाहि कारणीभूत होतात. गुलामगिरींत घोरत पडलेले लोक या लढायांतील तोफांच्या गर्जनेनें जागे होऊन चोहोंकडे पाहूं लागतात, आपण कोठें आहों याचा विचार करूं लागतात, व आपल्यासारखेच दुसरे होते त्यांनीं काय केलें हें त्यांच्या डोळ्यापुढें दिसूं लागतें. त्यामुळें असल्या लढाया ह्या एकप्रकारें नैतिक शिक्षण देणाऱ्या शाळाच आहेत, असें म्हटल्यास हरकत नाहीं." बोअर लोकांनीं आमचें कांहीं एक वाकडें केलें नसतांना केवळ इंग्रज सरकारविषयीं राजनिष्ठा दाखविण्यासाठीं आम्ही त्यांचेशीं लढतों, पण दया आणि राजनिष्ठा हे गुण स्वतंत्र असल्यामुळें रणांगणावर बोअर लोकांशीं नाइलाजानें लढूनहि त्यांत कामास आलेल्या त्यांच्या अनाथ बायकां-मुलांना आर्थिक साहाय्य करणें हिंदुस्थानचें कर्तव्य आहे. "बोअर लोक हे इंग्रजांचे, व इंग्रजांमुळें आमचे शत्रू होत. पण ते मेल्यानंतर त्यांच्या अनाथ विधवा आणि त्यांचीं अनाथ मुलें यांच्याशीं वैर करण्याइतके नीच आम्ही खास नाहीं." हा 'अनाथांवर दया' या लेखाचा विषय आहे. कित्येक वेळीं सरकारलाहि दयेचा पाझर फुटल्यासारखा दिसतो व दुष्काळासारख्या अंतर्गत आपत्तीच्या वेळीं भुकेलेल्या लोकासाठीं रिलीफ कामें काढण्यांत येतात. पण

सामान्य लोकांप्रमाणें दयाबुद्धि जागृत होऊन स्वाभाविक स्फूर्तीनें हीं कामें काढलेलीं नसतात; तर सामुदायिक भुकेपासून चोऱ्यामाऱ्या आणि बंडाळी उपस्थित होऊन राज्याला धोका उत्पन्न होईल तो टाळण्यासाठीं राजे लोकांना पुष्कळ पैसा खर्च करूनहि हीं कामें करावीं लागतात, हा मुद्दा '**रिलीफ कामें काढण्यांतील उद्देश**' या लेखांत विशद करून दाखविला आहे. रिलीफ देणाऱ्या परकीय सरकारबद्दल न जाणो हिन्दी लोकांच्या मनांत कृतज्ञताबुद्धि जागृत होईल व त्या प्रमाणांत पारतंत्र्याबद्दल त्यांच्या अंतःकरणाला पडलेला पीळ उलगडेल म्हणून वस्तुस्थितीचें त्यांना ज्ञान करून देणें शिवरामपंतांना अवश्य वाटलें. तें काम त्यांनीं कोणताहि आडपडदा न ठेवता केलें आहे. " राजा नवीन राज्य जिंकताना न्याय, अन्यायाकडे फारसें पाहात नाहीं. पण राज्य जिंकल्यानंतर तें टिकविण्यासाठीं त्याला न्यायाच्या अदालती उघडाव्या लागतात व त्याच कारणासाठीं रिलीफ कामें उघडण्याचीहि आवश्यकता त्याच्यावर येऊन पडते."

परोपकारबुद्धीनें ब्रिटिश सरकार हिंदी लोकांची खरोखरच काळजी वाहातें तर पराक्रमानें व बुद्धीनें व संपत्तीनें संपन्न असलेल्या या देशाला त्यानें मजुराचा देश करून टाकलें नसतें, हें उपरोधिक भाषेनें '**काळ्या माणसाचें ओझें**' या निबंधांत दाखविलें आहे. गोऱ्या माणसांप्रमाणें काळीं माणसेंहि दूरदूरचे मुलुख अलीकडे पादाक्रांत करूं लागलीं आहेत. पण त्यांत त्यांनीं श्रमविभाग केलेला दिसतो. गोऱ्यांनीं राज्यें करावीं, उद्योगधंदे काढून व्यापार करावा, आणि काळयांनीं कुली म्हणून त्यांचीं मोलमजुरी करावी, ओझीं उचलावीं ! " पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक देश कांहींना कांहीं तरी जिन्नस पिकवित आहे, त्याप्रमाणें आपल्या देशानें कुलींचें पीक काढण्यांत आघाडी मारली आहे ! "

पारतंत्र्याच्या किडीनें सद्गुणांचे वृक्ष हळूहळू पोखरले जाऊन उन्मळून पडतात व त्यांच्या जागीं दुर्गुणांचें विषारी जंगल उगवतें, हें तत्त्व निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळे विषय घेऊन वाचकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न शिवरामपंतांनीं अनेक लेखांतून केलेला आहे. ब्रिटिशांनीं हिंदुस्थानात विद्यादानासाठीं ज्या शाळा काढलेल्या आहेत त्यांच्या बुडाशीं परमार्थापेक्षां त्यांचा स्वार्थच आहे. जितांच्या मनांतील स्वातंत्र्याची उत्कट इच्छा हळूहळू मारून

टाकून जेत्यांच्या विषयीं त्यांच्या मनांत आदर आणि स्नेह उत्पन्न करावयाचा, जेत्यांच्या प्रत्येक गोष्टींत अनुकरण करण्यामध्येंच मोठेपणा आणि आत्मकल्याण आहे ही भावना जितांच्या ठिकाणीं जागृत करावयाची, ही रोमन लोकांनीं उपयोगांत आणलेली राज्य करण्याची एक कला असून, ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत ती गिरवीत आहेत. ( 'विद्येचा उपयोग'–निबंध ८ वा ). इंग्रज राज्यकर्त्यांचे हे हेतु फलद्रुप झाल्याचीं चिन्हें समाजांत सर्वत्र दिसत असल्याचीं वर्णनें वारंवार करून आणि आपल्या देशबांधवाच्या डोळ्यांत अंजन घालून त्यांची दृष्टि साफ करणें हा शिवरामपंतांच्या लेखनाचा मुख्य हेतु प्रारंभापासूनच स्पष्ट दिसूं लागतो. ब्राह्मणांबद्दल अँग्लोइंडियन पत्रकार भीतियुक्त तिरस्काराचे उद्गार काढीत असत. पण चहाडी करण्यांत फुशारकी मारणाऱ्या, मद्याच्या व्यापाराला हस्तेंपरहस्तें मदत करणाऱ्या व क्षुद्र प्रकारच्या समाजसुधारणेंतच रममाण होणाऱ्या ब्राह्मणांना आतां भिण्याचें कारण उरलेलें नाहीं, असें उपरोधिक लिहून शिवरामपंतांनीं आपल्या वेळच्या ब्राह्मण समाजावर कोरडे ओढलेले आहेत. ( निबंध ५ वा. ) आजकाल प्रत्येक मनुष्य स्वतःला नीतिमान् समजतो आणि दुसऱ्या सर्वांची नीति बिघडली असल्याची तक्रार करतो, त्यामुळें 'नीतिशिक्षणाची शाळा' ( निबंध ६ वा ) काढण्याचें योजूनहि एका गृहस्थाना राजे, न्यायाधीश, वकील, दारुडे, इ. पैकीं कोणीच विद्यार्थी त्यांत शिक्षण घेण्यासाठीं येणारा भेटेना, इतकेंच नव्हे तर अशा संस्थेंत शिकविण्याचें काम करणारे शुद्ध आचरणाचे शिक्षक मिळणें कठीण झालें, असें या निबंधांतील काल्पनिक चित्र आहे. मराठी वर्तमानपत्रांतील कांहीं मजकूर भाषांतर करून इंग्रजी पत्रांकडे पाठविण्याचा कांहीं 'राजनिष्ठ' लोकांचा चहाडखोरीचा आणि आगलावी-पणाचा धंदा 'भाषांतराचा हेतु' या निबंधांत उघडकीस आणण्यांत आला आहे. नीतिमान्, सदाचरणी आणि सद्गुणी लोकच राज्यक्रांति करूं शकतात; चोर, दरवडेखोर, लफंगे, व्यसनी, लोक राज्यक्रांति केव्हांहि करूं शकणार नाहींत; जे भाकरी देतील त्यांची चाकरी करावयाची, हें त्यांचें नीतितत्त्व असल्यामुळें स्वदेशभक्तीची उत्कटता त्यांच्या ठिकाणीं कधींहि आढळावयाची नाहीं. यतो धर्मस्ततो जयः ।' हेंच खरें, हें तत्त्व 'पुराणि-काचा सुटला कां सुटला?' या निबंधांतून उपदेशिलें आहे.

ज्याना ‘ आर्थिक ’ म्हणतां येईल असे दोनच निबंध या संग्रहांत आहेत. ते म्हणजे ‘ जमिनीचा सारा जमिनीच्या शिवाय दुसऱ्या उत्पन्नांतून कां द्यावा ? ’ व ‘ इनकमटॅक्स आणि सोशिॲलिझम् ’ हे होत. सारा जमिनीच्या उत्पन्नातूनच द्यावा, इतर उत्पन्नांतून किंवा शिलकेंतून तो देण्यास भाग पाडणें म्हणजे शेतकऱ्यांवर जुलूम करणें होय हें पहिल्या लेखांत सांगितलें असून, दुष्काळासारख्या आपत्तीच्या वेळीं आर्थिक साहाय्य देण्यासाठीं उपयोग व्हावा म्हणून सरकारनें इनकमटॅक्स बसविला आहे; तो श्रीमंताचे पैसे काढून घेऊन गरीबांना देणें व अशा रीतीनें समाजात आर्थिक समता उत्पन्न करणें, या सोशॅलिझमच्या तत्त्वास धरूनच आहे. तथापि दुसऱ्यांच्या पैशावर स्वतःच्या औदार्याची आणि कनवाळू-पणाची फुशारकी न मारतां दुष्काळाच्या कामीं सरकारनें स्वतःहि झीज सोसणें रास्त आहे, हें दुसऱ्या लेखांतील प्रतिपादन आहे.

ब्रिटिशाच्या राजवटींत लोकाना सर्टिफिकीटांचें इतकें वेड लागलें आहे कीं, जन्मभर साहेबाची नोकरी करून शेवटीं त्यानें आपणांस सर्टिफिकीट दिलें नाहीं तर आपला जन्म फुकट गेला म्हणून कित्येक लोक रडत बसतात. या दास्यवृत्तीची ‘ सरटिफिकीट ’ या निबंधांत भरपूर कुचेष्टा केली आहे. “ सरटिफिकीट म्हणजे जन्मभर नोकरी करून पुढे आणखी नोकरी कर-ण्याला निरुपयोगी झालेल्या बैलाच्या पाठीवर त्याच्या धन्यानें मारलेली थापच होय. आणखी दुसऱ्या एका अर्थानेंहि सरटिफिकीट म्हणजे थापच होय; कारण त्यांत तथ्यांश बेताबाताचाच असतो. सर्टिफिकीट हें आपल्या कर्तब-गारीपेक्षा आपल्या गुलामगिरीचेंच अधिक द्योतक आहे....उत्तम गुलाम-गिरीबद्दल तुम्हीं संपादन केलेलीं हीं मानपत्रें तुम्ही आपल्या मुलांबाळांपासून दडवून ठेवा. कारण, नाहीं तर आपला बाप गुलामगिरींत फार वाकबगार आहे असें त्यांना समजून येऊन ते तुम्हांला खचित कमी मान देऊं लाग-तील. ” असें सांगून शिवरामपंत या निबंधांचा शेवट पुढीलप्रमाणें करतातः

“ आपल्या पाणीदार डोळ्यांतील अक्कल आणि आपल्या पीळदार मन-गटांतील जोर हें प्रत्येकाचें खरें सरटिफिकीट होय. तें विसरून साहेबांच्या सहीच्या चिटोरीं तसबिरींत बसविण्यांत काय भूषण आहे ? ”

राहातां राहिले तीन निबंध—

( १ ) एक नवीन कारखाना, ( २ ) असल्या उत्सवांची भीति कशाला पाहिजे ? आणि ( ३ ) जुन्या इमारतींचें नव्या राजांनीं काय करावें ? प्रस्तुत संग्रहातील हे तीन निबंध-त्यांतल्या त्यांत तिसरा-मला विशेष आवडले म्हणून मी त्याना निराळे काढले आहे. ज्या विशिष्ट लेखनशैली-बद्दल शिवरामपंतांना मराठी वाङ्मयांत कायमचें आणि मानाचें स्थान मिळालें आहे, त्या शैलीचा प्रत्यय या लेखांत प्रकर्षाने येतो. पहिल्या लेखांत सभ्य गृहस्थ तयार करणाऱ्या एका कारखान्याचें ( काल्पनिक ) वर्णन आहे. " पूर्वी अशी एक खोटी कल्पना प्रचलित झालेली होती कीं, सभ्यगृहस्थ हा मनुष्य आहे आणि त्याचा सभ्यपणा हा त्याच्या मनावर अवलंबून असतो. पण ही कल्पना हल्लीं बहुतेक लयाला गेलेली आहे. सभ्यपणाचा मनाशीं कांहीं संबंध आहे असें जर हल्लीं कोणी प्रातिपादन करील तर त्याची मूर्खांत गणना झाल्यावाचून रहाणार नाहीं. हल्लीं सभ्यगृहस्थामध्यें मन हा पदार्थ घातलेला असतो, असें कोणीहि मानीत नाहीं. सभ्यगृहस्थाचा सभ्य-पणा हा केवळ त्याच्या बाह्य स्वरूपावर अवलंबून असतो, असा हल्लींचा सिद्धांत आहे. " असें सांगून शिवरामपंत पुढें लिहितात, " मुख्यत्वेंकरून सभ्यगृहस्थ हे न्हावी आणि शिंपी यांच्या कर्तबगारीचें फळ आहे. न्हावी सभ्यगृहस्थाचा चेहरा गुळगुळीत आणि सुंदर करतो आणि शिंपी सभ्य-गृहस्थाच्या अंगच्या सर्व दुर्गुणांवर पांघरूण घालतो.... आज न्हावी आणि शिंपी नसते तर सभ्यगृहस्थ नसते. "

शिवाजी उत्सव, गणेशोत्सव, नानाफडणीसांचा उत्सव, इ. नुकत्याच सुरू झालेल्या ' राष्ट्रीय ' उत्सवानीं त्यावेळीं सरकारचें डोकें उठलें होतें आणि या उत्सवांवर गुप्त पोलिसांच्या द्वारा सरकार पाळत ठेवतें म्हणून कच्च्या दिलाचे सर्वसामान्य लोकहि या उत्सवांत भीतियुक्त मनानें भाग घेत. पण जे लोक हे उत्सव करतात त्यांची मनोवृत्ति पाहातां मुलांच्या भातु-कलीच्या खेळापेक्षां या उत्सवांना महत्त्व देण्यांत अर्थ नाहीं, म्हणून सरका-रनीं किंवा लोकांनीं त्यांत भिण्यासारखे काय आहे ? असा प्रश्न विचारून शिवरामपंतांनीं त्या वेळच्या बोलक्या पण कृतिशून्य लोकांचे झणझणीत कान उपटले आहेत. समाजांत नैराश्याचें, निरुत्साहाचें, आणि स्वाभिमान-शून्यतेचें इतकें दाट धुकें पसरलेलें आहे कीं, असल्या राष्ट्रीय उत्सवांचा

प्रकाश कितीहि उत्पन्न केला तरी लोकांच्या मनावर त्याचा यत्किंचित् परिणाम होणार नाहीं, असें सरकारला सांगत सांगत लोकांना त्यांच्यांतील दोषांचें त्यांनीं ज्ञान करून दिलें आहे. " अशा उत्सवांना लोक दोन्ही कान उघडे ठेऊन जातात. त्यामुळें एका कानांतून जें काहीं आत शिरतें तें दुसऱ्या कानानें पार बाहेर निघून जातें. त्यातील एक थेंबाहि हृदयाच्या बाजूला उतरत नाहीं; कारण दोन्ही कान एकमेकांच्या समोरासमोर असल्यामुळें जवळची वाट टाकून हृदयाकडच्या आडवाटेला कोण कशाला जाईल ? " दुसरें असें कीं, " शिवाजीचा उत्सव करून शिवाजी उत्पन्न होणार नाहीं, किंवा नानाचा उत्सव करून नाना उत्पन्न होणार नाहींत. जो शिवाजीचा आणि नानाचा उत्सव करण्याला प्रवृत्त होतो, तो शिवाजीपेक्षां किंवा नानापेक्षा अर्थात् कमी प्रतीचा असला पाहिजे. शिवाजी उत्पन्न झाला त्यानें कोणत्या शिवाजीचा उत्सव केला होता ? किंवा नानानीं आपल्या पूर्वीच्या कोणत्या नानाचा शतसांवत्सरिक उत्सव केला होता ? शिवाजी आणि नाना यांना त्यांचे उत्सव उत्पन्न करूं शकणार नाहींत व ते उत्पन्न व्हावयाचेच असले तर सरकारचे गुप्त पोलिस त्यांचा प्रतिबंधहि करूं शकणार नाहींत."

जुन्या ऐतिहासिक इमारतींचे जतन करून ठेवण्याचे सरकारचें धोरण त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांच्या तोंडानें जाहीर झाल्यावर त्या बातमीच्या आधारें " **जुन्या इमारतींचें नव्या राजांनीं काय करावें ?** " हा शिवरामपंतांनीं लिहिलेला लेख या संग्रहातील सर्वोत्कृष्ट होय. इतिहासाचें ज्ञान आणि चित्ताची एकाग्रता या साधनसामग्रीनें जुन्या इमारतींकडे पाहिलें म्हणजे त्या आपल्या मूकवाणीनें त्यांनीं पाहिलेल्या गोष्टी भडाभड सांगूं लागतील व मग ऐकणाराच्या बाहूंना स्फुरण चढेल, त्यांना त्वेष येईल, त्यांच्या डोळयांतून पाण्याच्या धारा वाहूं लागतील. " जुन्या इमारती जरी सर्व दगड, विटा आणि चुना यांनीं बनलेल्या असतात, तरी त्याना योग्य मनुष्य भेटला म्हणजे त्यांच्यापाशीं त्या हजारो तोंडांनीं बोलूं लागतात, आणि प्रत्येक दोन दगडाच्या सांध्यामध्यें जणूं काय त्यांना एक एक जीभ फुटते असा भास होतो; व सर्वत्र सामसूम झाल्यानंतर या इमारती आपल्या गतवैभवाबद्दल इतका भयंकर आक्रोश करतात कीं, त्यावेळीं जवळ असणाऱ्या इसमाची छाती अगदीं फाटूनच जाते. अशा रीतीनें या इमारती स्वदेश-

भक्तीचे मनोविकार जागृत करतात, इतकेंच नव्हे, तर कधीं कधी त्या शत्रूला भयानें गर्भगळित करून सोडण्याचेंहि साहस करतात. " सगळींच्या सगळीं राज्यें गिळकृत केल्यावर जुन्या इमारती रक्षण करण्याचा चागुलपणा दाखविणें, हा शुद्ध मानभावीपणा आणि ढोंगीपणा आहे. निर्जीव इमारतीवर दया कसली ! ज्याच्यावर दया करावयाची त्यांच्यावर केली नाहीं, त्यांचीं डोकीं ठेंचलीं, त्यांना जाळलें, पोळलें, आणि त्यांनीं एका ठिकाणीं गोळा केलेल्या दगडांवर आणि विटांवर दयेचा वर्षाव ! तेव्हां असली दया खरी म्हणावी किंवा खोटी म्हणावी ? बाह्यात्कारी हा देखावा उत्पन्न करण्यापेक्षा अशा इमारतींची जाळून रांगोळी करणें फारच उत्तम ! असा वरवर चमत्कारिक दिसणारा निष्कर्ष शेवटीं काढण्यांत आला असला तरी, या उपरोधिक लिहिण्याचा वाचकावर इष्ट परिणाम झाल्यावांचून राहात नाहीं.

प्रस्तुत भागातील २१ निबंधातील विषयांचा धावता परामर्ष घेऊन झालें. पुढें दिलेले मूळ निबंध वाचून ४७।४८ वर्षांनंतरच्या आजच्या वाचकांवर त्यांचा काय परिणाम होईल ? यांत जप्त करण्यासारखें काय होतें ? असे उद्गार प्रथमच त्यांच्या तोंडून निघाल्यावांचून राहाणार नाहींत. आज वृत्तपत्रांतून आणि अन्यत्र देशभक्तिपर किंवा सरकारविषयक टीकापर जें लिखाण लिहिलें जातें त्या मानानें हे लेख खास अधिक कडक नाहींत. पण असें असतांहि ३६ वर्षे ते जप्तीच्या अंधारकोठडींत पडून राहावे, हा परिस्थितीचा दोष आहे. शब्दाचे अर्थ आणि त्या अर्थानें होणारा परिणाम परिस्थितिसापेक्ष असतात. विशिष्ट शब्दांनीं आज होणारा परिणाम कालांतरानें तितक्याच प्रमाणांत होईल, असें नाहीं. गेल्या अर्धशतकांत राष्ट्राची राजकीय प्रगति इतकी झाली आहे कीं, आपल्या मनातल्या राजकीय आकांक्षा कांहींएक आडपडदा न ठेवतां बोलून दाखविण्याचें धैर्य लोकांमध्यें आलें आहे आणि तें निमूटपणें सहन करण्याची सरकारलाहि संवय झाली आहे. सरकारविरुद्ध जरा एखादा कडक शब्द प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वापरला कीं, १२४ अ ( राजद्रोह ) व १५३ अ ( जातीजातींत वैमनस्य पसरविणें ) या कलमाखालीं त्याची लागलीच मानगुटी पकडण्यांत येत असे. पण अलीकडे कित्येक वर्षांत त्या दोन्ही कलमांचे नांवहि ऐकूं येत नाहीं. राष्ट्रानें तीं कलमें पचविलीं असा याचा अर्थ होय. ५० वर्षांपूर्वी ' स्वराज्य ' शब्द ऐकणेंहि

सरकारला दुःसह वाटे. पण आज संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी मान्य करून 'तुमची तुम्ही घटना ठरवा आणि ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेर तुम्हांला पडावयाचें असेल तर त्यालाहि आमची हरकत नाहीं,' असें सांगण्यापर्यंत सरकारची मजल गेलेली आहे. राजकीय परिस्थितीमध्यें इतकें जमीन अस्मानाचें अंतर पडल्यामुळें पूर्वीच्या शब्दांतील भीति नाहींशी झाली आहे. केवळ स्वकीय सरकार आल्यामुळें ही भीति गेली असें नव्हे. नऊ वर्षांपूर्वी आजचेंच स्वकीय सरकार मुंबई प्रांतावर राज्य करीत होतें. पण १० व्या भागाबरोबर प्रस्तुतचा २ रा भाग बंधमुक्त करण्याचें धैर्य त्याला त्यावेळीं झालें नाहीं. राजद्रोहाचें कलम पूर्वीच पचविलें गेलें असलें, तरी हें नवीन स्वकीय सरकार अहिंसेचें आणि जातीजातींतील ऐक्याचें कंकण बांधून सिंहासनावर बसलें आणि त्या चष्म्यांतून सर्व वाङ्मयाकडे पाहूं लागलें. हा दुसरा भाग पुनः पुनः वाचून त्यांत हिंसेला प्रोत्साहन देणारें किंवा मुसलमानांविरुद्ध चिथावणी देणारें एकहि वाक्य मला आढळलें नाहीं, किंबहुना मुसलमान हा शब्द प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या देखील त्यांत क्वचितच आलेला आढळतो. मग या भागाची नऊ वर्षें तरी मुस्कटदाबी करण्याचें पाप स्वकीय सरकारनें का केलें? सरकार, मग तें परकीय असो कीं स्वकीय असो, आंधळें आणि आकसखोर असतें, असें समजावयाचें काय? ३६ वर्षें मागें जाऊन या लेखांकडे पाहिलें तरीहि काळकर्त्यांविषयीं सरकारच्या मनातील आकसावाचून त्याच्या जप्तीची कारणमीमांसा करतां येत नाहीं. हा आकस उत्पन्न करण्यांत मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' सारख्या अँग्लोइंडियन पत्रकारानीं पुढाकार घेतला होताच. पण त्याला 'छू' म्हणून चिथावून देण्यामध्यें आमच्यांतील चुगलखोर लोकांची पुण्याई खर्ची पडलेली होती. भाषांतराचा हेतु, नीतीशिक्षणाच्या शाळा, एक नवीन कारखाना, या निबंधांतून 'काळ'कर्त्यांनीं या चुगलखोरांचें पाप बाहेर काढलें आहेच. त्या वेळची एकंदर नाजूक राजकीय परिस्थिति लक्षांत घेऊन शिवरामपंतानीं वक्रोक्तीच्या गनिमी काव्याचा आपल्या लिखाणांतून सर्रास उपयोग केला. या बाजूकडून छपून चाललेल्या हल्ल्यांपासून आपला बचाव करून 'शत्रू'ची मानगुटी पकडणें, सरकारला कित्येक दिवस कठीण होऊन बसलें. शेवटीं एका लेखाच्या (१५ मे १९०८ तारखेचा) आधारानें

सरकारनें ' काळ 'कर्त्यांना १९ महिने तुरुंगांत घातलें; तरी तेथून ते सुटून बाहेर आले. आणि त्यांचें 'काळां'तील वाङ्मय लोकांमध्यें पसरत राहिलेंच. इतक्यांत प्रेस ॲक्टाचें नवें हत्यार हातांत लाभल्यामुळें पूर्वीच्या आकसामुळें तें ' काळ ' पत्रावर ताबडतोब चालवून तें पत्र बंद होईल अशी व्यवस्था करण्यांत आलीच. पण शिवाय त्या पत्रात प्रसिद्ध झालेल्या लेखांचीं दहाच्या दहा पुस्तकें लेखणीच्या एका फटकाऱ्यानिशीं जप्त करण्यांत आलीं. यांतील किती लेख खरोखर जप्त करण्याच्या लायकीचे आहेत, याचा थोडा विचार केलेला दिसत नाहीं. " देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा देऊन सुद्धां मला जितका धक्का बसला नसता तितका सरकारनें माझा प्रतिप्राण असणारें दहा वर्षांतलें वाङ्मय जप्त करून दिला व हाच माझा तरुणपणचा जिवंत मृत्यु होय. " या उद्‌गारांवरून शिवरामपंतांच्या मनाला ही गोष्ट किती लागली, त्याची कल्पना येईल.

या भागांतील लेख जप्त होण्याच्या लायकीचे नाहींत असें म्हणणें म्हणजे त्यांची योग्यता कमी करणें होय असें अर्थातच नव्हे. " लोकांत दृढमूल व रूढ झालेल्या कित्येक राजकीय कल्पनांच्या उच्छेदनासाठींच काळाचा जन्म आहे, " ही प्रतिज्ञा त्यानें पुरी केली आहे. आंकडेमोड करून आपलें गाऱ्हाणें सरकारला युक्तिवादानें पटवून दिलें म्हणजे आपलें काम झालें, एवढीच त्यावेळीं चळवळीची मर्यादा होती. त्यांतल्या त्यांत जास्ती धिटाईनें लिहिणारें ' केसरी ' पत्र, पण त्यानेंहि आपल्यापुरती विशिष्ट मर्यादा आंखून घेतली होती. वाचकांच्या बुद्धीपेक्षां त्यांच्या भावनेला धक्के देऊन स्वातंत्र्याची भूक त्यांच्यामध्यें उत्पन्न करणें हें ' काळ ' पत्राचें मुख्य कार्य होतें. ' रूसो-जपानी युद्धाच्या बातम्या आणि स्वदेशांतील आपल्या रोजच्या रडकथा ' यांनींच वृत्तपत्रांचे रकाने भरून काढणें त्याला कंटाळवाणें काम वाटे. " आम्ही वर्तमानपत्र लिहितों असें मुळींच नाहीं. आम्ही काय करतों, तर (देशांतील) तीस कोटी प्रसिद्ध न होणारीं वर्तमानपत्रें प्रत्येक आठवड्याला अत्यंत काळजीपूर्वक रीतीनें आम्ही फक्त वाचून पाहातों लोकाचे खरे विचार आम्ही खऱ्या शब्दांनीं लिहितों. . . !"

' काळा 'चे बाकीचे सर्व भाग गडप होऊन एवढा एकच दुसरा भाग उपलब्ध झाला असता तरी त्यावरून कर्त्याचें ब्रीद ओळखण्यास मुळींच

अडचण पडली नसती. तथापि राजकीय असंतोषाची तीव्रता जसजशी वाढत चालली तसतसें लेखणीचें तेज वाढत चाललें. म्हणून या दुसऱ्या भागापेक्षां पुढच्या भागामध्यें त्याच्या वक्रोक्तीचे आणि प्रतिभेचें प्रमाण उत्तरोत्तर अधिक प्रकर्षानें पाहावयास सापडतें.

शिवरामपंताच्या लेखांना जन्मकाळीं जे राजकीय प्रचाराचें स्वरूप होतें तें आज राहिलेलें नाहीं. आज ऐतिहासिक आणि वाङ्मयिन दृष्टीनें त्याना कोणीहि विशेष महत्त्व देईल; कारण काळानें अर्धे शतक पुढें उडी मारली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या उंबरठ्यावर राष्ट्र उभें आहे. त्यावेळीं स्वप्नांतहि नसलेले असे नवीन नवीन राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्न आज पुढें येऊन उभे राहिले आहेत. ते सोडविण्यास या लेखाचा फारच थोडा उपयोग होईल. हें खरें असलें तरी, एके काळीं या लेखानीं तरुणांमध्यें स्वदेशभक्तीची तेजस्वी ज्योत उत्पन्न केली, त्याच्या हृदयातील स्वातंत्र्याच्या सुप्त भावना जागृत केल्या आणि त्यागपूर्वक साहसाचीं कृत्यें करण्यास त्याना प्रवृत्त केलें, म्हणूनच आजचे दिवस उगवले. हें ऋण केव्हांहि विसरतां येणार नाहीं.

वयाच्या ३४ व्या वर्षी ता. २५ मार्च १८९८ रोजीं गुढीपाडव्याच्या सुमुहुर्तावर शिवरामपंतानीं 'काळ' पत्राला जन्म दिला, तो काळ निदान महाराष्ट्रात राजकीय दृष्ट्या अत्यंत नाजूक होता. ता. २२ जानेवारी १८९७ सालीं पुण्यांत रँड आणि आयर्स्ट या साहेबाचे खून झाले होते. पुढें हिंदुस्थानातील पहिला राजद्रोहाचा खटला होऊन टिळक तुरुंगांत गेले. सरकारजवळ पैशाच्या लालचीनें चहाडी केल्याबद्दल द्रविडबंधूंचे खून झाले. चाफेकरबंधूंवर खटले होऊन पुढें ते फाशी गेले. प्लेग आणि दुष्काळ यांनीं लोक हैराण झाले होते. गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट याच्या करड्या कारकीर्दीनें लोकाचीं माथीं भणाणून गेलेलीं होतीं. क्रांतिकारक विचाराचें बीज पेरण्यास ही परिस्थिति फारच नामी आहे हें बरोबर ओळखून, 'कालाय तस्मै नमः।' हा सुचक मंत्र उच्चारून शिवरामपंतानीं लेखणी उचलली. राष्ट्रीय सभेला जन्माला येऊन १३।१४ वर्षे झालीं होतीं. ही राष्ट्रीय सभा शिवरामपंतांच्या भावना उचंबळून सोडू शकली नाही. किंबहुना तिच्याविषयीं त्याच्या मनात तिरस्कारच वागत असे. "हल्लीं पेट्रियट (देशभक्त) हा शब्द आपल्या

इकडे फारच सवंग झाला आहे. एखाद्याच्या अंगांत कितीहि सामाजिक दुर्गुण असूं द्या, त्यानें नॅशनल कॉंग्रेसमध्यें एखादा ठराव आणून भाषण केलें, कीं तो झाला पेट्रिअट ! अशा रीतीनें पेट्रिअट तयार करण्याची गिरणी आज पंधरा वर्षें चालू असल्यामुळें हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यातून सुद्धां पेट्रिअट पसरलेले आढळतात. परंतु इतके पेट्रिअट पैदा झाले आहेत तरी पण दुःखाची गोष्ट ही कीं, पेट्रिऑटिझम, (देशभक्ति) पाहूं गेलें तर मुळींच कोठें आढळत नाहीं. पेट्रिअट म्हणजे कोटाच्या दोन बाजूंच्या खिशांत हात घालून एकदा उजवीकडे आणि एकदा डावीकडे पाहून इंग्रजींत बोलणें एवढाच अर्थ असेल तर दुर्गुणी मनुष्यहि पेट्रिअट होता येण्याला काहीं हरकत नाहीं, हें आम्हांलाहि कबूल आहे." (निबंध ११ वा) या उल्लेखावरून त्या वेळची कॉंग्रेस व तिचे पुढारी यांच्याविषयीं शिवरामपंतांच्या भावना किती तुच्छतेच्या होत्या हें ध्यानांत येईल. या एरंडाच्या गुऱ्हाळावरून तरुण पिढीचे लक्ष दुसरीकडे खेंचून स्वातंत्र्याच्या मूलगामी प्रश्नाचा विचार तिला करावयास लावण्यास ही फार चांगली संधि आलेली आहे, असें शिवरामपंतांना वाटलें. 'असंतोषः श्रियो मूलम्।' या वचनाचें रहस्य त्यांनीं ओळखलें होतें. परिस्थितीच्या तापलेल्या तव्यावर क्रांतिकारक विचाराच्या भाकरी भाजून घेण्याचा सपाटा त्यांनीं सुरू केला. "अन्नाचे व पाण्याचे दुष्काळ सरकार दूर करील. परंतु हिंदुस्थानातील उत्तम विचारांचे दुष्काळ कोणीहि साहेब दूर करूं शकणार नाहीं." अशी मनोमन खात्री पटल्यामुळें शिवरामपंतांनीं हें नवे सकस आणि पौष्टिक अन्न महाराष्ट्रीय तरुणांपुढे ठेवलें. या अन्नावर पोसलेल्या तरुणांनीं पुढें जीं साहसाचीं कृत्यें केलीं तीं अविचाराचीं होतीं, असें म्हणून आजकालचा एखादा अहिंसावीर त्याची जबाबदारी शिवरामपंतांवर टाकूं लागला तर त्याबद्दल त्यांना मुळींच वाईट वाटणार नाहीं. परतंत्र राष्ट्रांतील तरुणांनीं केलेल्या अशा अविचाराच्या धक्क्यांनींच सुप्त राष्ट्रें खडबडून जागीं झाल्याचीं उदाहरणें जोंपर्यंत इतिहासाच्या पानापानांतून आढळतात, तोंपर्यंत कोणाला वाईट वाटेल? पुढे 'सुविचार' सुचावयाला तरी प्रारंभींचा हा 'अविचारच' कारणीभूत झाला कीं नाहीं? १८५७ च्या बंडानंतर राष्ट्रांत सर्वत्र नैराश्याचें दाट पटल पसरलें होतें आणि एकंदर समाज इतका दिङ्मूढ झाला होता कीं, स्वातंत्र्य

या शब्दाची देखील आठवण बुजाली कीं काय असा संशय येऊं लागला होता. राष्ट्रीय सभेतील कंठाळी ठरावांनीं आणि त्यावर होणाऱ्या मर्यादशील आणि राजनिष्ठ भाषणांनीं हा संशय दृढ होत चाललेला होता. अशावेळीं स्वातंत्र्याच्या भावना जनतेमध्यें जागृत करणें हेंच महत्त्वाचें देशकार्य होतें. शिवरामपंतानीं तें केलें. एकदा स्वातंत्र्याच्या भावना जागृत झाल्या म्हणजे पुढील गोष्टी क्रमाक्रमानें होत जातात. या स्वातंत्र्याच्या भावनेचा महिमा शिवरामपंतांनींच या भागात (निबंध १३) वर्णन केला आहे.

" बोअर लोक जेव्हां निजतील तेव्हां स्वातंत्र्य त्याना जागें करील व ते जेव्हां पराभव पावतील तेव्हां स्वातंत्र्य त्यांना फिरून लढण्याला हिंमत देईल. ते खळग्यांत सांपडले असले तरी जी स्वातंत्र्याची टेंकडी त्यांच्या पायाखालीं आहे ती त्यांना उंच जागेवर नेऊन ठेवील. जेव्हां त्यांची अन्नसामग्री सरेल तेव्हां स्वातंत्र्य हें आपल्या आशेवर त्याना उपास काढण्यास समर्थ करील आणि जेव्हां त्यांना पाणी मिळणार नाहीं तेव्हां स्वातंत्र्य हें त्यांना थंडगार करील. "

ता. १ सप्टेंबर १९४६.
' प्रभात ' कचेरी, गिरगांव, मुंबई.

श्रीपाद शंकर नवरे




' काळाचें ' जन्मस्थान
सरदार कानड्यांचा ( कोनकरांचा ) वाडा

# ईश्वर विभु आणि नित्य आहे : : : १

( १ )

हें जें वाक्य आम्हीं वर दिलें आहे ह्यांतील तत्त्व सर्व लोकांना मान्य आहे. एवढेंच वाक्य कोणापुढें ठेविलें तर तो याला हरकत घेणार नाहीं. सर्व धर्मांना हें तत्त्व संमत आहे. इतकेंच नव्हे तर सर्व धर्मांची इमारत याच तत्त्वाच्या पायावर उभारलेली असते. महम्मदी धर्म घ्या, ख्रिस्ती धर्म घ्या, बौद्ध धर्म घ्या, हिंदु धर्म घ्या, किंवा दुसरा कोणताहि धर्म घ्या, त्यामध्यें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें ह्या मताचा अंगीकार केलेला आपल्याला कोठें ना कोठेंतरी आढळून येतोच. आपण एका घरांत बसलेले असलों तर त्याच वेळीं आपल्याला दुसऱ्या घरांत असतां येणार नाहीं. आपण एका वेळीं एका गांवांत असूं, एका शहरांत असूं, एका देशांत असूं, पण ईश्वराला एकाच वेळीं सर्व गावांत, सर्व शहारांत, व सर्व देशात असतां येतें. जरी ईश्वराचें नांव कोणत्याहि ठिकाणच्या खानेसुमारीच्या यादींत दाखल झालेलें नसलें तरी खानेसुमारीच्या रात्रीं तो त्या ठिकाणीं राहात नव्हता असें एकहि ठिकाण कोणाला दाखवितां येणार नाहीं. हीं शास्त्रीय आणि गहन तत्त्वें लोकांच्या मनांत भरवून देण्यासारख्या आपल्या पुराणामध्यें एक दोन गोष्टी फारच उत्तम आहेत. कृष्णाच्या सोळा सहस्र स्त्रिया होत्या. त्यांच्यापैकीं जिच्या जिच्या घरीं नारद जाई तिच्या तिच्या घरीं त्याला श्रीकृष्ण परमात्म्याची मूर्ति दृष्टीस पडे. या लौकिक गोष्टीवरून ईश्वराचें सर्वव्यापकत्व चांगलें व्यक्त होतें. ह्याच मुद्यासंबंधाची दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे प्रल्हादाची होय. तूं नेहमीं नारायण नारायण म्हणून म्हणत असतोस तर तुझा नारायण

आहे कोठें ? असा प्रल्हादाच्या बापानें जेव्हा प्रश्न विचारला तेव्हां अप्रत्यक्ष रीतीनें ईश्वराचें विभुत्व तो कबूल करीत नव्हता, असाच त्याच्या प्रश्नाचा अर्थ होय. प्रल्हादानें उत्तर दिलें कीं, ' तो नारायण जळीं, काष्ठीं, पाषाणीं, सर्व ठिकाणीं भरलेला आहे.' परंतु ह्या त्याच्या नुसत्या शाब्दिक उत्तरानें त्याचें समाधान होईना. ' चक्षुर्वै सत्यम् ' या मताचा तो होता. अंधपरंपरेनें जाऊन खड्ड्यांत पडणारा तो नव्हता. ऑक्सिजन आणि हायड्रोजन यांच्या मिश्रणापासून पाणी उत्पन्न होतें याचा जसा एक्स्पेरिमेंट करून दाखविला जातो तसा ह्या विभुत्वाच्या तत्त्वाचा त्याला प्रत्यक्ष एक्स्पेरिमेंट दिसावयाला पाहिजे होता. म्हणून त्यानें विचारलें, ' जळीं, काष्ठीं, पाषाणीं, नारायण आहे म्हणतोस; तर तो ह्या माझ्या समोरच्या लाकडाच्या खांबांत आहे काय ? ' त्यावर प्रल्हाद म्हणाला, होय, जो सर्वत्र आहे तो ह्या खांबांतहि असला पाहिजे. पण त्याचा बाप पडला प्रत्यक्षवादी. त्याच्या मनाची खात्री कीं, या लाकडाच्या ओंडक्यांत नारायणाला बसावयाला किंवा उभें राहावयाला जागा कोठून असणार ? माझ्या सारख्याच्या घराला वाळवीनें पोखरलेला पोकळ ढोलीचा खांब कसा असेल ? शिवाय त्यानें खांबाच्या सभोंवार फिरून अगदीं बारकाईनें तो खांब तपासला. तेव्हां त्या खांबाला कोठें चीर भोंक कांहीं सुद्धां त्याला दिसलें नाहीं. मग त्यानें तर्क केला कीं, तर मग यांत नारायण शिरला असेल कोठून ? त्याला आत शिरण्याला वाट कोठें आहे ? शिवाय माझ्या राजवाड्यात इतके चौकी पाहारे असतांना नारायण आत आला असेल कसा आणि ह्या खांबात शिरला असेल कोठून ? तर्कशास्त्राच्या नियमाप्रमाणें नारायण तेथें असूं शकणार नाहीं, असें सिद्ध झालें. व त्या तर्कशास्त्राच्या जोरावर त्यानें त्या खांबावर लाथ मारली. पण तेव्हा त्याला असें दिसून आलें कीं, आपलें तर्कशास्त्र चुकलेलें आहे. तर्कशास्त्रानें आपल्याला आयते वेळीं दगा दिला ! मीं या तर्कशास्त्रावर किंवा प्रत्यक्षवादावर भरंवसा न ठेविता जरा आजूबाजूला काय आहे हें पाहिलें असतें तर बरें झालें असतें. सर्व शास्त्राची नजर चुकवून हा नारायण येथें केव्हा दडून बसला होता कोण जाणे ! पण या विचाराचा तेव्हा काय उपयोग ? मी विभु आहें, असें नारायणानें एक्स्पेरिमेंटनें सिद्ध करून दिलें. मग काय उरलें ? साराश, परमेश्वर विश्वव्यापक आहे, विभु आहे, ही गोष्ट सर्वांनीं मान्य केली पाहिजे

ती करितातहि. आता ईश्वर जसा विभु आहे तसाच तो नित्यहि आहे.
ो सतराव्या शतकात होता, एकोणिसाव्यात नाहीं, आणि वीसएकाविसाव्या
ातकांत तर त्याचें नाव सुद्धा कोणाला माहीत असणार नाहीं, असें कधींहि
ःणता यावयाचे नाहीं. तो सर्व शतकात आहेच. तो काल होता, आज
ाहे, व उद्यां असणार याबद्दल बिलकुल शंका नाहीं.

आता ईश्वराचें विभुत्व आणि नित्यत्व या दोन गोष्टी सर्व धर्मांना संमत
ाहेत म्हणून वर सांगितले आहे. परंतु कित्येक धर्मांतील दुसरीं काहीं तत्त्वें
शीं आहेत कीं, त्या तत्त्वाचीं विभुत्व आणि नित्यत्व ह्या दोन तत्त्वाशीं
कवाक्यता होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ आपण ख्रिस्ती धर्म घेऊं. या
र्मांत असें तत्त्व आहे कीं, आपल्या धर्माचा प्रसार करावा. व या तत्त्वा-
माणें वागताना मुमुक्षु जनाना असा उपदेश करितात कीं, ‘ बाबांनो, तुम्ही
ामच्या धर्मांत याल तर तराल, नाहीं तर बुडाल. ’ ‘ पोटासाठीं केलें ढोंग,
थें कैचा पांडुरंग ॥ ’ या तत्त्वाप्रमाणें एक आण्याला एक लेक्चर, या
ाप्रमाणें साठा सापडला कीं, झोडलें लेक्चर ! या रीतीनें उपदेश करणाऱ्या
चाऱ्याना धर्म, धर्मांतील तत्त्वें, आणि एका तत्त्वाचा दुसऱ्याशीं विरोध
ा गोष्टी काय माहीत असणार ? पण त्यांच्यापेक्षा अधिक योग्यतेचे म्हणून
ा कोणी ख्रिस्तीधर्माभिमानी असतील त्याच्या लक्षात ही चूक यावयाला
ाहिजे होती. हे उपदेशक देवाविषयीं अशी कल्पना धरून चालतात कीं,
व हा कोठें तरी एका खोलींत खुर्चीवर बसलेला आहे, आणि ती खोली
ोठें आहे हें आम्हालाच काय तें माहीत आहे. त्या खोलींत जाण्याची
ाट जणूं काय एकच आहे आणि ती वाट बाप्तिस्मा घेणें ही होय. पण
रमेश्वर जर विश्वव्यापक आहे तर मग त्याचेकडे जाण्यासाठीं तुमच्याच
ाटेनें कशाला गेलें पाहिजे ? ज्या वाटेनें जावें त्या वाटेच्या शेवटीं परमेश्वर
ाहेच. असें असून ‘ आमच्याकडे आलास तर दूधभात खाशील, तिकडे
ेलास तर विहिरींत पडशील, ’ अशासारख्या पोरकट वल्गना धर्माच्या
ाबतींत ऐकूं याव्या, याच्यासारखी लज्जास्पद गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं.
हिंदुधर्मांत धर्मांतराचें तत्त्व नाहीं याचें कारण तरि हेंच आहे कीं, परमेश्वर
सर्वव्यापक आहे, तेव्हा त्याला कोठूनहि हांक मारली तरी ऐकूं जाईल.
याला अमक्याच धर्माच्या गोटातून हाक मारली पाहिजे असें असण्याचें

मुळींच कारण नाहीं. तेव्हां कोणी मनुष्य कोणत्याहि धर्माच्या का गोटांत असेना, त्यानें भक्तिपुरःसर देवाला हाक मारली कीं, देव त्याच्यासाठीं धांवत येतो; अशी हिंदुधर्मसंस्थापकाची पूर्ण खात्री असल्यामुळें आपल्या धर्माची स्तुति आणि दुसऱ्याची निंदा हीं नीच कामें त्यांनीं कधीं केलीं नाहींत, व आपल्या धर्माच्या प्रौढीसाठीं आपल्या परमेश्वराच्या विभुत्वाला त्यानीं कधीं कमीपणा आणला नाहीं. पण इतर धर्मांची स्थिति कशी आहे ती पाहा. बाजारांत भाजी घ्यावयाला आपण गेलों म्हणजे तेथें असें होत असतें कीं, एक एकीकडे ओढतो तर दुसरा दुसरीकडे ओढतो. एक भाजीवाला दुसऱ्यास शिव्या देत असतो; त्याच्या मालाला शिळा, कुचका, नासका वगैरे अनेक नावें ठेवीत असतो; व आपल्या मालाची तारीफ करीत असतो. आणि दुसरा भाजीवाला त्याच्या उलट शिवीगाळ करून ओरडत असतो. एखाद्या ठिकाणीं परस्परविरुद्ध अशा धर्मांचे उपदेशक आत्मस्तुति व परनिंदा हीं धार्मिक कृत्यें करीत असतांना पाहिलें म्हणजे वरील भाजीच्या बाजाराची कोणाला आठवण होणार नाहीं ? किंवा अलीकडे आपल्याला लोकल सेल्फ गव्हर्मेंटचा हक्क मिळाल्यापासून मोठमोठ्या शहरांतील इलेक्शनें आपण पाहिलीं आहेत. त्यांत कोणी मतदार आला कीं, प्रत्येक उमेदवार त्याला आपलेकडे ओढण्यासाठीं अतिशय खटपट करीत असतो. त्याप्रमाणें या धर्मांतराचा उपदेश करणाऱ्यांची स्थिति आहे. ज्याच्या देवाला अधिक मतें मिळतील तो देव चांगला, व बाकीचे देव नापास, असें याचें मत आहे कीं काय न कळे ! आपला मोठेपणा बाटणाऱ्या लोकांच्या मतानें मोजला जाईल व आपलें वर्चस्व बाटग्या लोकांच्या मर्जीवर अवलंबून राहील, ही कल्पना देवानें मनुष्य उत्पन्न केला तेव्हां त्याच्या डोक्यांत आली असेल काय ? ख्रिस्ती, मुसलमान, बौद्ध किंवा दुसरे जे कोणी धर्मांतराचे अभिमानी असतील, त्यांनीं आपल्या कृतीनें आपण कोणच्या पेचांत पडत आहोंत याचा विचार केला पाहिजे. एक धर्मांतराचें वेड सोडलें पाहिजे किंवा आमचा आपला ईश्वर अविभु, अव्यापक आहे, असें तरी म्हणण्याला तयार झालें पाहिजे. पण ईश्वराची व्यापकता संकुचित आणि मर्यादित करण्यापेक्षां धर्मांतराचें वेड सोडून दिलें तर काय वाईट ? पण इतका सुविचार आणावयाचा कोठून ? परंतु त्या त्या धर्मांच्या पूर्वीच्या आणि हल्लींच्या प्रवर्तकांना

इतका विचार नाहीं, असेंहि मानतां येत नाहीं. तेव्हां यांत कांहीं तरी ऐहिक हेतु असावा हें उघड दिसतें. ख्रिस्ती धर्म वगैरे नवीन असल्यामुळें त्यांत धर्मांतराचें तत्त्व असणें अगदीं अवश्य आहे. कारण दुसऱ्या धर्मांतील लोक आपल्या धर्मांत ओढण्याचें तत्त्व यांनीं स्वीकारलें नसतें व हिंदुधर्माप्रमाणें हे तटस्थ राहिले असते तर नवीन धर्मांत कोण गेले असते ? नवीन दुकान काढलें म्हणजे गिऱ्हाइकांनीं आपल्याकडे यावें अशी खटपट त्या नवीन दुकानाबरोबर सुरू करावीच लागते. जुन्या स्थाईक दुकानदाराची गोष्ट तशी नसते. तो म्हणतो, माझ्या सचोटीबद्दल जर गिऱ्हाइकाची खात्री असेल तर तो इकडे येईल. तो कोठें कां जाईना. त्याला पाहिजे तो माल मिळाला म्हणजे झालें. परंतु नवीन संस्थांत असला स्थिरपणा आणि उदासीनपणा कधींहि असावयाचा नाहीं. असा उदासीनपणा धरला असता तर ख्रिस्ती धर्मांत एकटा ख्रिस्तच आणि महंमदी धर्मांत एकटा महंमदच होऊन राहिला असता. १९०० वर्षांपूर्वी ख्रिस्तानुयायी कोण होता ? आणि १३०० वर्षांपूर्वी महमदानुयायी कोण होता ? व हल्लीं जे इतके प्रत्येकाचे अनुयायी दिसत आहेत ते निःपक्षपाती उदासीनपणा धरून कसे जमले असते ? सारांश, नवीन धर्मांना मतांतर, धर्मांतर वगैरेची जोड आणि साथ पाहिजेच असते व तशी ती हिंदु धर्माला नाहीं हें त्याच्या पुरातनत्वाचें आणि अनादिसिद्धत्वाचें लक्षण आहे. सारांश ह्या नवीन धर्मांतून विशेष आग्रह, धर्मांतराची विशेष हांव, व ऐहिक दृष्टीकडे विचारांचा विशेष कल, हें फार दिसून येतें. ह्या धर्मांची भिस्त निःपक्षपाती औदासिन्यावर नसून असंमत किंवा संमत, कशा तरी धर्मांतरावर आहे असें दिसतें, हा त्यांच्यांतील एक मोठा दोष आहे. असो. धर्मांतर करविण्याला ज्या ज्या धर्मांत प्राधान्य आहे त्या त्या धर्मांवर बारीक सारीक आतां दाखविलेले आक्षेप येतातच. पण मुख्य आक्षेप हा कीं, आम्ही दाखवूं त्या वाटेनें गेल्याशिवाय तुम्हांला देव भेटावयाचा नाहीं, असें म्हणणें म्हणजे परमेश्वराच्या विभुत्वाचा निषेध करण्यासारखें आहे. तेव्हां धर्मांतर करविण्याचा कारखाना बंद ठेवा, नाहीं-तर देव विश्वव्यापक नाहीं असें तरी कबूल करा, अशा प्रकारच्या अडचणींत हे लोक येऊन पडतात. आतां ते कदाचित् असें म्हणतील कीं, आमचा देव अव्यापकच आहे. असें जर त्यांनीं म्हटलें तर मग तो लोकांना तारतो कसा ?

एका भक्ताला तारण्याच्या कामात तो मुंबईला गुंतला असतां इतक्यांत दुसरा भक्त यॉर्कटाऊनमध्यें मरण पावला तर त्याला हा तारणार कसा? एकच पोहणारा हिंदी महासागरांत बुडत असलेल्या मनुष्याला बाहेर काढीत असता, अटलांटिक महासागरातल्या माणसाला कसा बाहेर काढूं शकेल? तेव्हा असें म्हणणें असमंजसपणाचें होणार आहे. याकरितां देव विभु आहे, हें नाकारतां येत नाहीं. व तें नाकारता येत नाहीं, तर मग धर्मांतर करण्याचें काम आपल्या स्वीकृत मताला बाधक आहे असें कबूल केल्यावाचून दुसरा मार्ग नाहीं. असो येथपर्यंत ईश्वराच्या विभुत्वाच्या दृष्टीनें धर्मांतराचा उपदेश अप्रशस्त आहे हें दाखविलें. पुढील खेपेला ईश्वराच्या नित्यत्वाच्या दृष्टीनें तसला उपदेश अप्रयोजक व गळ्यात धोंगडें आणणारा आहे, हें आम्ही सिद्ध करून दाखवूं.

---

# ईश्वर विभु आणि नित्य आहे : : : २

## (२)

मागील लेखांत ईश्वराच्या विभुत्वाविषयीं विचार झाला. व विभुत्वाच्या दृष्टीनें पाहिलें असतां ख्रिस्ती वगैरे धर्मावर जे दोष उत्पन्न होतात, त्यांचें दिग्दर्शन करण्यांत आलें. आता या लेखांत ईश्वराचें नित्यत्व आणि त्याच्या योगानें इतर धर्मावर येणारे दोष यांचें विवेचन करावयाचें आहे.

ईश्वर नित्य आहे ही गोष्ट सर्वांना कबूल आहे. पण ख्रिस्ती, मुसलमान, वगैरे लोकांचें आचरण पाहिलें तर ईश्वराच्या नित्यत्वाची कल्पना ते अगदीं विसरून गेले असले पाहिजेत असें वाटतें. हे लोक फसवून किंवा बळजबरीनें

दुसऱ्यांना बाटवून आपल्या धर्मांत ओढून घेतात. व कित्येक ख्रिस्ती मिशनऱ्यांचे दीर्घ प्रयत्न पाहून, ' हे खरोखर पारमार्थिक बुद्धीनेंच इतकी मेहनत करीत असले पाहिजेत व म्हणून यांच्या देवाकडे आपण गेलों तर कदाचित् हा भवसागर तरून जाऊं,' असें पुष्कळांना वाटतें. पण यांच्या धर्माचा जरा दूरवर विचार केला तर तेव्हांच असें आढळून येईल कीं, त्या त्या धर्मांतून धर्मांतर करविण्याचें जें तत्त्व आहे त्यांत पारमार्थिकत्वाचा अंश फार थोडा आहे. सर्व धडपड ऐहिक सुखासाठीं आहे. व त्या ऐहिक सुखाच्या भरारींत आपलीं मूळ तत्त्वें काय व आपली कृति काय, इकडे त्यांचें पूर्ण दुर्लक्ष झालेलें आहे पण जेथें त्यांचें दुर्लक्ष झालेलें असेल तेथें बाकीच्यांचेंहि झालेलें असतें असें नाहीं. म्हणून आपल्या दृष्टीनें त्यांची जी चूक होत आहे, ती उजेडांत आणली पाहिजे. व धर्मांतराच्या बाबतींत फसविणारांना आणि फसणारांना दोघांनाहि त्यांच्या कृत्याचें निष्फलत्व दाखवून दिलें पाहिजे.

ख्रिस्ती लोक असा उपदेश करतात कीं, ' तुम्ही आमच्या येशूकडे या, म्हणजे तो तुमच्या पापासाठीं देवाजवळ रदबदली करील. व त्याच्या मध्यस्थीनें तुम्ही मुक्त व्हाल. ' ह्या त्यांच्या मतावर नित्यत्वाच्या दृष्टीनें जे दोष येतात ते आतां दाखवावयाचे. परंतु त्यांच्याकडे वळण्याच्या आधीं जातां जाता जो एक लहानसा मुद्दा मध्यंतरीं उपस्थित होत आहे, त्याजविषयीं थोडासा विचार करूं. असा एक प्रश्न उद्भवतो कीं, मुमुक्षु लोक आणि त्यांना मोक्ष देणारा देव याच्यामध्यें रदबदली करण्यासाठीं येशूची कल्पना जी ख्रिस्ती धर्मात केलेली आढळते ती कशाला ? मोक्ष देणारा आणि घेणारा हे दोघे असले म्हणजे कार्यभाग होत असतांना, आणखी मध्यें तिसऱ्या एका येशूची योजना करणें यांत गौरव आहे. पूर्वी इंग्रज लोक हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांची भाषा नेटिवांना समजत नव्हती. म्हणून नेटिव त्यांच्यापाशीं पृथ्वीवरील मोक्ष म्हणजे थोड्या पगाराची आणि पुष्कळ त्रासाची चाकरी मागण्यासाठीं गेले असतां तेथें कोणी दुभाषा मनुष्य लागत असे. परंतु देवाला सर्व भाषा समजतात. ज्या ज्या भाषेंत मनुष्य किंवा जनावर बोलूं शकेल त्या त्या सर्व भाषा देवाला समजतात, याबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. पण देवाला निरनिराळ्या भाषा समजत नाहींत व म्हणून त्याला कोणी

नसल्यामुळें ते पाहिजे तें अनन्वित कृत्य करण्याला तयार होतील. तेव्हां कोणत्याहि बाजूनें विचार करून पाहिलें तर वकिलाची कल्पना विसंगतच आहे, असें सिद्ध होतें. शिवाय एखादा अधिकारलुब्ध व पक्षपाती राजा आपल्या काकाला, मामाला बिनकामाच्या पण मोठ्या हुद्द्याच्या जागा देतो, तशातलीच एक मध्यस्थाची जागा देवानें आपल्या मुलाला दिली, अशीहि कल्पना करता येत नाहीं. कारण असें करणें म्हणजे मानवी मनोधर्मांचे आरोप त्या निष्काम, निष्क्रिय, आणि निरहंकार परमेश्वरावर लादण्यासारखें होणार आहे. तेव्हा येशूख्रिस्त आणि त्याची मध्यस्थी हीं जीं तत्त्वें ख्रिस्ती धर्मांत आहेत तीं युक्तीच्या दृष्टीनें योग्य आहेत असें दिसत नाहीं. पण यावर कोणी अशी शंका काढील कीं, तुमच्या युक्तिवादाला ती कल्पना जुळत नाही, पण आमच्या धर्मशास्त्रांत तर ती सांगितलेली आहे; तेव्हां आता तिची वाट काय लावावयाची ? ज्या अर्थी दुसरी कांहीं वाट लावता येत नाहीं, त्या अर्थी ती कल्पना बायबलांत सांगितली आहे तशीच खरी मानल्यावाचून दुसरें गत्यंतरच नाहीं. पण हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण येशूची गोष्ट जी सांगितली आहे तीमध्येंच सर्व बायबलाचें तात्पर्य आहे असे नाहीं. तर ती गोष्ट म्हणजे एक अर्थवाद आहे, व अर्थवादवाक्यांचें पर्यवसान तीं ज्याना अनुलक्षून अर्थवादात्मक असतील त्यांच्या स्तुतींत होत असतें. अनेक प्रकारच्या अर्थवादात्मक गोष्टी सांगून लोकांच्या मनांत परमेश्वराबद्दल भक्ति उत्पन्न करण्याचा शास्त्रांचा उद्देश असतो. तो न समजून त्या गोष्टी म्हणजे शास्त्रातील सर्वस्व होय अशी कल्पना करणें, हें अगदीं चुकीचे आहे. 'परमेश्वर इतका मोटा दयाळु आणि भक्तजनांवर कृपा करणारा आहे कीं, भक्ततारणासाठीं तो आपल्या मुलाला देखील मृत्यूच्या तावडींत देण्याला तयार झाला; तेव्हां अशा परमेश्वराला तुम्ही भजा,' असें मनावर ठसविण्यासाठीं ही येशूची गोष्ट लिहिली आहे. येशूच्या mediation ( मध्यस्थी ) वाचून गति नाहीं, हें या गोष्टींतील तात्पर्य नव्हे. आपल्या हातात कोणीं श्रीफळ दिलें तर तें देणाराचा हेतु वरवर जें दिसतें तें आपण खावें असा नसतो, तर त्या देणगीचें तात्पर्य आणि खरें स्वारस्य बाहेरच्या अर्थवादाच्या आंत असतें, हें मनुष्याला समजलें पाहिजे. पण फिरून कोणी ख्रिस्तधर्माभिमानी असा एक पूर्वपक्ष पुढें आणील कीं, हें तुमचें अर्थवादा-

विपर्यीचें म्हणणें खरें असेल. पण यथाश्रुत अर्थाप्रमाणे येशू हा मोक्षदाता आणि मुमुक्षु यांच्या दरम्यानचा मध्यस्थ, असेंच मानण्याला काय प्रतिबंध आहे? कारण तुम्हीहि साधुसमागमानें मुमुक्षूला परमेश्वर भेटतो, असे प्रतिपादन करीत असता. श्रीशुकाचार्यांच्या समागमानें परीक्षित राजा तरला, वसिष्ठाच्या अनुग्रहानें कल्मापपाद राजा उद्धरला, इत्यादि अनेक गोष्टी तुमच्यामध्येंहि नाहींत काय? यावर आमचें असे उत्तर आहे कीं, तुम्ही म्हणता येथवर तुमची आमची एकवाक्यता आहे. व साधुपुरुषाच्या समागमानें मुक्ति प्राप्त होते एवढेच जर तुमचें मत असेल, तर मग तुमच्या आमच्यात मुळींच विरोध नाही. पण तुम्ही तसें मानीत नाहीं. फक्त येशूच्याच समागमानें मोक्षप्राप्ति होऊं शकते, दुसऱ्या कशानेंहि होऊं शकत नाहीं, दुसरीं द्वारें म्हणजे नरकाचीं साधनें आहेत, असें तुम्ही प्रतिपादन करतां. जर साधुसमागमानें मोक्ष आहे तर मग तो कोणत्याहि साधूच्या समागमानें लब्ध होऊं शकेल. त्याला अमुकच साधु लागतो असा तुमचा आग्रह का असावा? साधूंना पूज्य मानण्याचा जेव्हां प्रश्न येतो तेव्हां इतरांप्रमाणें तुमच्या येशूलाहि आम्ही एक साधुपुरुष म्हणून पूज्य मानतों. परंतु त्याच्याच जोडीच्या इतर साधुपुरुषांना तुम्ही मात्र मुळींच पूज्य मानीत नाहीं, हा तुमचा अनुदारपणा नव्हे काय? व येशू हा एक साधुपुरुष आहे म्हणून त्याच्या समागमानें मोक्षप्राप्ति होते, एवढेंच जर तुमचें मत असेल तर मग दुसऱ्या साधुपुरुषांचा उपमर्द करून एखाद्या दुकानदाराप्रमाणें सारीं गिऱ्हाइकें तुम्ही आपल्याकडेच ओढण्याचा प्रयत्न कां करतां? उदरंभरि वैद्याप्रमाणें 'त्याचे औषधानें गुण येणार नाहीं, तुम्ही माझ्या दवाखान्यांत या,' अशा प्रकारच्या वल्गना तुम्हीं कां कराव्या? ज्या साधुपुरुषाच्या नांवानें तुम्ही हें कर्म करतां त्याला या तुमच्या कृत्यानें बरें वाटत असेल काय? ही तुमची कृति त्याच्या साधुत्वाला कमीपणा आणणारी नाहीं काय? एखाद्या जॉइंट स्टॉक कंपनीला आपलें भांडवल वाढविण्याला एजंट लागतात, तसे साधुपुरुषांची प्रतिष्ठा वाढविण्याला तुमच्यासारखे एजंट लागतात, अशी तुमची कल्पना आहे काय? असेल तर ती चुकीची आहे हें तुम्हांला कबूल केलें पाहिजे. तेव्हां इतराप्रमाणें येशू हा एक साधुपुरुष ही कल्पना आम्हालाहि मान्य आहे. पण तुम्हीं असें मानलें तर तुमच्या धर्माचा सिद्धांत सुटतो; व न मानलें तर असमंजसपणा

पदरीं घ्यावा लागतो. याप्रमाणें तुमच्या मताला दोहोंकडून अडचण येते. आणखी एक असा दोष येतो कीं, तुम्ही येशूला देवाचा मुलगा म्हणतां. पण हें म्हणणेंहि युक्तिबाह्य आहे. आम्हां मूर्तिपूजकांना नांवें ठेवून तुम्ही आपला देव निराकार, निर्गुण आहे असें स्थापन करतां, आणि त्याच वेळीं तुम्ही असें म्हणतां कीं, आमच्या देवाला मुलगा आहे; हें जमावें कसें ? पुत्रोत्पादनाला साकारत्व, सगुणत्व हे धर्म अवश्य पाहिजेत. ते धर्म जर तुमच्या देवांत नसतील तर पुत्रोत्पत्ति असंभाव्य आहे; व असतील तर आम्हां मूर्तिपूजकांना हंसण्याचें तुम्हाला कारण नाहीं. व ईश्वर साकार व सगुण तुम्हीं मानला म्हणजे त्याबरोबर नश्वरत्व हा धर्महि त्या तुमच्या ईश्वरावर येऊन बसूं लागेल. अशा प्रकारच्या या अनेक दोषपरंपरा तुमच्या त्या येशूच्या कल्पनेमुळें तुमच्या मतावर येऊं लागतात. यासाठीं देव आणि मुमुक्षु यांच्यामध्यें कोणी तिऱ्हाईत अवश्य लागतो, या मतावर कोणाचाहि विश्वास बसणें शक्य नाहीं. व हें मत कोणत्याहि विचारी परधर्मीय माणसाच्या आदराला पात्र होण्यासारखें नाहीं, हें सिद्ध झालें. आतां नित्यत्वाच्या दृष्टीनें उत्पन्न होणाऱ्या दोषांचें स्पष्टीकरण पुढील अंकीं करूं.

---

# ईश्वर विभु आणि नित्य आहे : : : ३

## (३)

या विषयाचा विचार करीत असतांना ख्रिस्ती धर्मावर उद्भवणाऱ्या कांहीं दोषाचें दिग्दर्शन मागील दोन लेखांत केलें आहे. आतां ईश्वर नित्य आहे असें मानलें म्हणजे ख्रिस्ती धर्मावर कोणकोणते आक्षेप येऊं शकतात याचा आपण विचार करूं. ख्रिस्ती धर्मांत असा एक सिद्धांत आहे कीं,

येशू ख्रिस्त हा आपल्या मध्यस्थीनें सर्व मनुष्यांना तारतो. पण हा सिद्धांत खरा मानला म्हणजे ख्रिस्ती धर्मावर अनेक दोष येऊं लागतात. येशू ख्रिस्त हा एक मनुष्यच होता, हें ख्रिस्ती लोकहि नाकबूल करीत नाहींत. व या मुद्याविषयीं जर उभयपक्षांची एकवाक्यता आहे तर आम्ही असें विचारतों कीं, येशू ख्रिस्ताच्या पूर्वी दुसरे कोणी मनुष्य जगांत होते किंवा नाहीं? जर होते असें तुम्ही म्हणाल, तर मग त्यांना भवनदीच्या पार उतरून नेण्याला त्या वेळीं कोण नावाडी होता? येशूशिवाय तारण करणारा दुसरा कोणी नाहीं, असा तुमचा सिद्धांत असल्यामुळें तुम्हांला असेंच म्हटलें पाहिजे कीं, येशूच्या पूर्वीचे सर्व लोक नरकांतच जाणार. व धर्माभिमानाच्या आवेशांत तुम्ही कदाचित् मागच्या त्या सर्व लोकांना नरकांत ढकलण्यालाहि तयार व्हाल. परंतु मग कोणकोणाला नरकांत जावें लागेल याची तुम्हांला कल्पना आहे काय? ग्रीस, सीरिया, ईजिप्त, येथील जे मोठमोठे साधुपुरुष आणि तत्त्ववेत्ते होऊन गेले त्यांना तुमच्या मताप्रमाणें नरकांतच जावें लागणार. गौतमबुद्ध आणि बौद्ध धर्मांतील इतर सत्पुरुष यांचीहि तुम्ही तीच वाट लावणार. व वेदकालीन ऋषि आणि इतर महात्मे यानाहि तुमच्या मताप्रमाणें तुम्हांला दुसरी गति देतां येत नाहीं. सॉक्रेतीस, शाक्यमुनी किंवा वामदेव यांच्या अंगीं त्यांना नरकप्राप्ति करून देणारा असा कोणता बरें दुर्गुण तुम्ही दाखवूं शकाल? व त्यांच्या अंगीं कोणताहि दुर्गुण नसेल तर मग ते नरकांत कोणच्या कारणानें पडूं शकतील? ख्रिस्ताच्या आधीं जन्मास येणें हा त्यांचा गुन्हा होता काय? आणि या गुन्ह्याबद्दल त्यांना अक्षय्य नरक, इतकी भयंकर शिक्षा देण्याइतका अविचारी आणि अन्यायी तुमचा धर्म आहे काय? आणि तुमच्या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांना असली भयंकर शिक्षा देण्याला जो देव म्हणून आहे, मग तो कोणाचाहि असो, तो कधीं तरी तयार होईल काय? सॉक्रेतीस किंवा बुद्ध हे नरकांत जाणार आणि एखाद्या महारानें तुमच्या धर्माची दीक्षा घेतली म्हणजे तो सायुज्य पदाला जाऊन पोंचणार अशीं जीं हीं तुमचीं मतें तीं किती वेडगळपणाचीं आणि मूर्खपणाचीं आहेत, हें तुमचें तुम्हांला समजत नाहीं काय? सर्व जग अंधळे आणि तुम्हांला मात्र डोळे, अशा समजुतीनें तुम्ही हीं अप्रयोजक मतें बाजारांतील चव्हाट्यावर शिकवीत असतां काय? असल्या अप्रबुद्धांच्या

बरोबर स्वर्गास जाण्यापेक्षां सॉक्रेतीसासारख्यांच्या बरोबर नरकांत जाणेंहि बरें, असें कोणालाहि वाटणार नाहीं काय? ह्या सर्व गोष्टींवरून असें सिद्ध होतें कीं, तुमच्या बाजूला 'बाबावाक्यं प्रमाणम्' याशिवाय दुसरी कांहीं बळकटी नाहीं. व युक्तिवादानें पाहिलें असतां तुमच्या या मतात कांहींच हंशील नाहीं. तेव्हा वर दर्शविल्याप्रमाणें अनेक दोषांनीं टाकाऊ म्हणून ठरलेल्या तुमच्या या मताचा कोण अंगीकार करील? अशा अनेक अडचणी येतात म्हणून तुमचा पक्ष मुळींच ग्राह्य नाहीं, असें म्हणणें प्राप्त होतें. येशूच्या आधीं जगात लोक होते अशी कल्पना गृहीत धरून वरील दोष दाखविलेले आहेत. आता या सर्व अडचणींतून निसटून जाण्यासाठीं तुम्ही कदाचित् असें म्हणण्याला तयार व्हाल कीं, येशू खिस्ताच्या पूर्वी या जगात कोणाहि मनुष्याचें अस्तित्व नव्हतें. परंतु तसें म्हणूनहि चालणार नाहीं. कारण अनादि कालापासून चालत आलेला आणि अनंत कालापर्यंत चालू राहाणारा इतिहास हा तुमच्या म्हणण्यातील असत्यपणा बाहेर काढण्याला तयार आहे. येशू खिस्ताच्या पूर्वी मनुष्यें या जगात निर्माण झालेलीं होतीं, हें इतिहासावरून स्पष्ट होत आहे. व तें खोटें म्हणून तुम्हाला कधींहि ठरविता येणार नाहीं. तेव्हां येशूच्या पूर्वी माणसें होतीं असें तुम्हाला म्हणतां येत नाहीं आणि नव्हती असेंहि म्हणता येत नाहीं, अशा विलक्षण अडचणींत तुमच्या धर्मानें तुम्हाला आणून कोंडलें आहे. यावरून तुमच्या धर्मांत किती असमंजसपणा भरलेला आहे, हें व्यक्त होत आहे.

तुमच्या मतानें मोक्षाचें सरटिफिकीट देण्याचें ऑफिस केव्हांपासून सुरू झालें, याच्या बद्दलचा हा विचार झाला. आता त्या ऑफीसचे पांच केव्हां वाजतात ह्या विषयीं आपण विचार करूं. तुमच्या धर्मांत असें तत्त्व आहे कीं, कालगतीनें केव्हां तरी एकदा न्यायाचा दिवस येणार आहे; त्या दिवशीं देव एक तुतारी वाजवील; त्या तुतारीचा आवाज थडग्यात पुरून टेवलेले मेलेले लोक ऐकतील; तो आवाज ऐकून ते उठतील; व सर्वजण देवाच्या पुढें जाऊन उभे राहतील; नंतर देव त्यांचे न्याय अन्याय पाहील आणि कृतकर्मानुरोधानें ज्याला त्याला बक्षीस किंवा शिक्षा देऊन देव आपल्या ऑफिसचा दरवाजा बंद करून टाकील. या सिद्धांतात परधर्मीयांना हास्यास्पद वाटण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत. देवानें वाजविलेली तुतारी मेलेली माणसें कशीं ऐकूं शकतील? हल्लीं

आपण असें पाहतों कीं, कित्येक थडग्याच्यावर मोठमोठें दगड घातलेले असतात, त्याजवर माती ढकललेली असते, व कित्येक ठिकाणीं झाडें उगवलेलीं असतात. हें सर्व आपल्या अंगावरचें वजन दूर काढून टाकून थडग्यातील माणसाना बाहेर कसें येता येईल ? सूक्ष्म लिंगदेह अशा रीतीचीं स्थलांतरें करूं शकतात, असें आमच्या वेदाताचेहि मत आहे. परंतु हीं सर्व कृत्यें स्थूल देहानींच होतात व निर्जीव झालेला स्थूल देहच फिरून सजीव होतो, असा तुमचा सिद्धात आहे. त्यामुळें तुमच्या मताला वरील विरोध उत्पन्न होतो. शिवाय न्यायाच्या अखेरच्या दिवशीं एकदां शिक्षा दिली म्हणजे ती त्यानें अनंत कालपर्यंत भोगीत बसावयाची कीं काय ? गुन्ह्याच्या मानानें शिक्षेच्या अवधींत कमीजास्तपणा असणें हें जें न्यायीपणाचें पहिलें लक्षण तें तुमच्या देवाच्या ठिकाणीं मुळींच दिसत नाहीं. असो. हे बारीक-सारीक दोष झाले. परंतु तुमच्या या सिद्धातावर मुख्य दोष येतो तो असा कीं, ईश्वर जर नित्य आहे असें तुम्ही मानता तर त्याच्या अंगातील गुणधर्म एकदम मध्येंच बंद कसे पडतील. एखादा अम्मलदार पाच वाजले म्हणजे आपली कचेरी बंद करून घरीं जावयास निघतो, व एक मिनिट उशिरानें कोणी अर्जदार आल्यास, "बस, बस, आता नाहीं, आतां कचेरी बंद झाली," असें म्हणतो. तशासारखी देवाची गोष्ट नाहीं. देवाच्या अंगांत सृष्टि उत्पन्न करण्याची शक्ति आहे असें जर तुम्ही मानता, व देव नित्य आहे असें जर तुम्ही मानता, तर मग त्याच्या ठिकाणची ती नित्यशक्ति 'जज्जमेंट डे' च्या नंतरच कां बंद पडावी ? शिवाय ती शक्ति नित्य आहे तर देवानें अमुक एका विवक्षित काळीं सृष्टि उत्पन्न केली किंवा ॲडॅमला आणि ईव्हला उत्पन्न केलें हें जें तुमचें म्हणणें आहे तें जुळत नाहीं. कारण ती शक्ति जर नित्य आहे तर तुम्ही म्हणता त्या काळाच्या पूर्वींहि आणि जज्जमेंटडेच्या नंतरहि देवाच्या हातून सृष्टि होत असली पाहिजे. नाहींतर देवाची शक्ति अनित्य आहे आणि त्यामुळें देवहि अनित्य आहे, असें तरी तुम्हांला कबूल केलें पाहिजे. पण देव अनित्य आहे असें म्हणणें म्हणजेहि ईश्वराच्या नित्यत्वाविषयींच्या आपल्या सिद्धांताविरुद्ध जाण्याचा अनिष्ट प्रसंग आपल्यावर ओढून घेण्यासारखें आहे. तेव्हां कोणत्याहि बाजूनें या खिस्ती धर्मांतील तत्त्वाचा विचार करून पाहिला तरी तीं तत्त्वें अगदींच लटपटीत,

युक्तिबाह्य आणि विसंगत आहेत असें ठरतें. आतां याजवर कोणी ख्रिस्त-धर्माभिमानी असें म्हणेल कीं, हीं तत्त्वें ईश्वरानें आपल्या पुस्तकांत सांगितलीं आहेत म्हणून तीं पूज्य मानलीं पाहिजेत, व त्यांजवर श्रद्धा ठेविली पाहिजे. यावर आमचें एवढेंच उत्तर आहे कीं, ज्या लोकांचें जें धर्मपुस्तक असेल त्यांतील वचनांवर त्या धर्मातील लोकांनीं श्रद्धा ठेविली पाहिजे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. पण तुम्ही दुसऱ्याला बाटविण्यासाठीं म्हणून जेव्हां आपला धर्म पुढें करतां, तेव्हां त्याजवर त्याची एकाएकीं श्रद्धा कशी बसेल ? प्रथमतः तो तुमच्या धर्माचें निरीक्षण तर्कदृष्ट्याच करणार व त्यांत जर कांहीं निष्पन्न झालें तर मग तो पुढें तुमच्या धर्मपुस्तकावर श्रद्धा ठेवणार. विचार केल्या-वांचून कोठें तरी श्रद्धा ठेवावयाची असेंच असेल तर त्याला त्याचा स्वतःचा धर्म नाहीं काय ? नुस्ती श्रद्धा ठेवण्यालाच त्याला तुमचा धर्म कशाला पाहिजे ? व युक्तीच्या आणि तर्काच्या मार्गानें आपल्याकडे वळवून घेण्यासारखें तत्त्व तर तुमच्या धर्मांत कांहीं दिसत नाहीं. तेव्हां असल्या धर्माकडे स्वतः मूर्ख असल्याशिवाय कोणत्या परधर्मीयाची प्रवृत्ति होणार आहे !

---

# बंदुकीच्या दारूची युक्ति कोणीं शोधून काढली? : : : ४

वरील मथळ्यांत जो प्रश्न विचारलेला आहे त्याचें उत्तर कसें द्यावें ह्याविषयीं आपल्याला काय शिकविलेलें आहे ? हल्लीं आबालवृद्धांना असें माहीत करून देवविलें आहे कीं, बंदुकीच्या दारूची कल्पना युरोपियनांनीं शोधून काढली. जी गोष्ट पूर्वी अस्तित्वांत नसेल ती नवीन आपल्या कल्पनेनें तयार करणें अशा अर्थी 'शोधून काढणें' हा शब्द आपण

उपयोगात आणीत असतो. त्या अर्थाच्या अनुरोधानें पाहिलें असता बंदुकीच्या दारूचें जनकत्व युरोपियनांना देता येईल किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. युरोपिनांनींच ही कल्पना काढली असें आज जग मानीत आहे व ज्याप्रमाणें सर्वच ज्ञानरूपी नदीचा ओघ हल्लीं पश्चिमेकडील पर्वताच्या शिखरावरून निघून पूर्वेकडील समुद्राकडे वाहात येत आहे, त्याप्रमाणें या बंदुकीच्या दारूच्या कल्पनेचा उगमहि प्रथमतः युरोप खंडात झाला असावा आणि मग तेथून ती कल्पना पूर्वेकडे पसरली असावी अशी लोकाची कल्पना होणें अगदीं साहजिक आहे. प्रामाणिक युरोपियन इतिहासकारानाहि ही युक्ति केव्हा आणि कोणी काढली हें चांगलेसे माहीत नाहीं. तरी पण सामान्य लोकाची हल्लीं अशी समजूत आहे कीं, या युक्तीचा प्रादुर्भाव युरोपखंडात चवदाव्या शतकाच्या सुमारास झाला. तुर्क लोकानीं कॉन्स्टॅन्टिनोपल शहर ख्रिस्ती लोकापासून आपल्या ताब्यात घेतलें होतें. तें त्याजपासून परत मिळविण्याला आपण काहीं तरी नवीन उपाय शोधून काढला पाहिजे, अशा इच्छेनें त्या उद्योगाला लागलेल्या काहीं ख्रिस्ती लोकानीं ही दारूची युक्ति काढली, असें एक सर्वसाधारण मत हल्लीं प्रचलित आहे. सर्व घरभेदेपणा काय तो आपल्या देशातच भरलेला आहे व या बाबतींत आपल्याला जर काहीं चांगला धडा शिकावयाचा असेल तर तो आपण ख्रिस्ती लोकांपासून शिकला पाहिजे, असा एक सामान्य लोकापवाद नेहमीं आपल्या ऐकण्यांत येत असतो. परंतु या घरभेदेपणाचें बीज ख्रिस्ती लोकातहि होतें, हें बंदुकीच्या दारूची कल्पना बाहेर कशी प्रसृत झाली, याच्या हकीकतीवरून कोणाच्याहि चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. ख्रिस्ती लोकाना या दारूची युक्ति पहिल्यानें कळली व त्या युक्तीचा उपयोग तुर्कांचे हातून कॉन्स्टॅन्टिनोपल शहर सोडवून घेण्यासाठीं करावयाचा होता. परंतु ख्रिस्ती लोकामध्यें सुद्धा कोणी घरभेद्या निघाला. त्यानें ती युक्ति टर्कीच्या सुलतानाला सांगितली आणि अशा योगानें या युक्तीचा प्रसार होत होत इतका झाला आहे कीं, आता तिचा उपयोग स्वहितसाधनासाठीं करून घेत नाहीं, असें युरोपामध्यें एकहि राष्ट्र नाहीं. साराश, चवदाव्या शतकापासून युरोपातील लोक या युक्तीचा उपयोग करूं लागले. आणि तेव्हाच त्यानीं ही कल्पना नवीन शोधून काढली, असा

अज्ञजनसमूहाचा समज झालेला आहे. परंतु हा समज बरोबर नाहीं. फार प्राचीनकाळीं ग्रीसमध्यें ही कल्पना लोकांना माहीत होती, अशाबद्दल आधार आहे. परंतु हिंदुस्थानसंबंधीं विचार करतांना या युक्तीविषयीं पुष्कळच पुरावा उपलब्ध होतो.

राजकीय नीतीवरती संस्कृतमध्यें अनेक ग्रंथ आहेत. त्यापैकीं एका ग्रंथांत या कल्पनेविषयींची इतकी सविस्तर माहिती दिलेली आहे कीं, हिंदुस्थानांतील पूर्वींचे लोक बंदुकीच्या दारूचा उपयोग करीत असतील किंवा नाहीं अशाबद्दल शुष्क अनुमानें करीत बसण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. तेव्हा या प्रश्नासंबंधीं त्या ग्रंथात जे ठळक पुरावे आहेत त्यापैकींच काहींचे उतारे आम्ही आपल्या वाचकाकरिता येथें देतों. सदर नीतिग्रंथात आयुधाचे दोन प्रकार कल्पिलेले आहेत. एक अस्त्र आणि दुसरें शस्त्र. मंत्र, यंत्र, किंवा अग्नि याच्या योगानें जें दूर फेकता येते तें अस्त्र होय. व तरवार भाला इत्यादिक हीं शस्त्रें होत. ( अस्यते क्षिप्यते यत्तु मन्त्रयन्त्राग्निभिश्च तत्। अस्त्रं तदन्यतः शस्त्रमसिकुन्तादिकं च तत्॥ ) आता वर जें अस्त्र म्हणून सांगितलें आहे तें दोन प्रकारचें असतें. एक नालिक, आणि दुसरें मांत्रिक. ( अस्त्रं तु द्विविधं ज्ञेयं नालिकं मान्त्रिकं तथा। ) मांत्रिक अस्त्र म्हणजे मंत्र-सामर्थ्यानें फेकता येण्यासारखें आयुध होय. ब्रह्मास्त्र, वरुणास्त्र, वायव्यास्त्र, इत्यादिक हीं या मांत्रिक अस्त्राचीं उदाहरणें होत. व नालिक अस्त्र म्हणजे नलिकेच्या योगानें जें शत्रूच्या अंगावर फेकतां येतें तें होय. बंदुका, तोफा, वगैरे हीं या नालिक अस्त्राचीं उदाहरणें होत. हें नालिक अस्त्र लहान आणि मोठें अशा दोन प्रकारचें असतें. ( नालिकं द्विविधं ज्ञेयं बृहत्क्षुद्रविभेदतः। ) वरील श्लोकांत वर्णिलेलें क्षुद्रनालिक म्हणजे हल्लींची बंदुक होय, व बृहन्नालिक म्हणजे हल्लींची तोफ होय. यापैकी क्षुद्र नालिकेचें वर्णन सदर ग्रंथात अशा रीतीनें केलें आहे कीं, त्याच्या मुळाशीं एक छिद्र असतें, त्याची एकंदर लांबी पाच विती असते, त्याच्या मुळाशीं व अग्राशीं हल्लीं आपण ज्याला माशी असें म्हणतो तो तिलबिंदु असतो. यंत्राच्या आघातानें, म्हणजे हल्लीं आपण ज्याला चाप म्हणतो त्याचा आघात झाल्याच्या योगानें त्यामधून अग्नि निघतो. व त्याच्या कान्ह्यावर दगडाचें पीठ ठेविलेलें असतें. ( तिर्यगूर्ध्वच्छिद्रमूलं नालं पंचवितस्तिकम्। मूलाग्रयोर्लक्ष्यभेदितिलबिंदुयुतं

सदा ॥ यंत्रघाताग्निकृद् ग्रावचूर्णधृक्कर्णमूलकम् । ) आता बृहन्नालिकाविषयीं त्यातच वर्णन आहे तें येणेंप्रमाणे. बृहन्नालिक हे एखाद्या लाकडाच्या बुंध्याचें तयार केलेलें असते. तें गाड्यावर घालून न्यावें लागतें व त्याच्या मुळाशीं जी एक कळ असते ती फिरविली म्हणजे आपल्या लक्ष्यावर बरोबर नेम धरता येतो. ( मूलकीलभ्रमाल्लक्ष्यसमसंधानभाजि यत् । बृहन्नालिकसंज्ञं तत् काष्ठबुध्नविनिर्मितम् ॥ प्रवाह्यं शकटाद्यैस्तु सुयुक्तं विजयावहम् । ) वरील श्लोकांवरून असे दिसतें कीं, काहीं बृहन्नालिक अस्त्र लाकडाचीं केलेलीं असलीं पाहिजेत. परंतु काहीं श्लोकानंतर पुढे त्याच ग्रंथात असें वर्णन केलेलें आहे कीं, हें नालास्त्र लोखंडाचे किंवा दुसऱ्या एखाद्या धातूचें केलेलें असे. कारण तें धातूचें असलें तर तें पुसून नेहमीं स्वच्छ ठेवावें असें सांगितलें आहे. ( लोहसारमयं वापि नालास्त्रं त्वन्यधातुजम् । नित्यसम्मार्जन-स्वच्छमस्त्रपातिभिरावृतम् ॥ ) या नालिकास्त्राच्या उपयोगाविषयीं आणखी असें सांगितलें आहे कीं, हें नालास्त्र आधीं पुसून शुद्ध करावे, नंतर त्यात दारू भरावी, मग ती एका दंडानें आत खेंचावी, नंतर गोळा घालावा, मग कान्ह्यावर दारू ठेवावी, आणि त्या दारूला अग्नि देऊन तो गोळा आपल्या लक्ष्यावर फेकावा. ( नालास्त्रं शोधयेदादौ दद्यात्तत्राग्निचूर्णकम् । निवेशयेच्च दंडेन नालमूले यथा दृढम् ॥ ततः सुगोलकं दद्यात् ततः कर्णेऽग्निचूर्णकम् । कर्णचूर्णाग्निदानेन गोलं लक्ष्ये निपातयेत् ॥ ) इतकें विस्तृत वर्णन ज्या अर्थीं या नालास्त्राविषयीं दिलेलें आहे त्या अर्थीं हल्लींची बंदुकाची आणि तोफांची जी पद्धत प्रचारात आहे तीच अनेक वर्षांपूर्वीं आपल्या इकडेहि प्रचारांत होती असें म्हणावे लागतें. व यावरून आपल्या इकडे दारूची कल्पना युरोपियन लोकानीं आपल्याला सांगण्याच्या आधीं पूर्णपणें अवगत होती हें उघड होत आहे. परंतु दारूच्या कल्पनेच्या अस्तित्वाविषयीं असलें अनुमानहि नको आहे. कारण या ग्रंथात या नालिकास्त्राचे वर्णन केलेलें आहे, त्यातच प्रत्यक्ष दारू कशी करावी ह्याच्याबद्दलहि माहिती सांगितली आहे. सोरा पाच पल, गंधक एक पल, व रुई किंवा एरंड याचा कोळसा एक पल, या प्रमाणानें हीं तीन द्रव्यें घेऊन त्याचें चूर्ण करून एरंडाच्या, किंवा लसणीच्या रसानें त्याला पुटें देऊन तें उन्हात वाळवावें, म्हणजे रेतीसारखें हें अग्निचूर्ण तयार होतें. ( सुवर्चिलवणात् पंच पलानि गंधकात् पलम् । अंतर्धूमविपक्का-

कैस्नुह्याग्रगारतः पलम् ।। शुद्धात् संग्राह्य संचूर्ण्य संमील्य प्रपुटेद्रसैः । स्नुह्यर्काणां रसोनस्य शोषयेदातपेन च ।। पिष्ट्वा शर्करवच्चैतदग्निचूर्णं भवेत् खलु । ) त्याचप्रमाणें गोळ्यांविषयींहि वर्णन केलेलें आढळतें. ( गोलो लोहमयो गर्भगुटिकः केवलोपि वा । ) याचप्रमाणें आणखी निरनिराळया प्रकारची दारू कशी तयार करावी याविषयींहि माहिती सदर ग्रंथांत दिलेली आहे. कोळसा, गंधक सोरा, शिला (?), हरताळ, शिसें, हिंगूळ, लोहचूर्ण ( बीड ), कापूर, लाख, नीळ, आणि सर्जरस हीं द्रव्यें कमी अधिक प्रमाणानें घेऊन जिचा चांदण्यासारखा उजेड पडेल अशा प्रकारची, म्हणजे कदाचित् चंद्राज्योतीची वगैरे दारू कशी करावयाची, हें त्या कलेंतील निष्णात लोकांना त्यावेळीं माहीत होतें. ( अंगारस्यैव गंधस्य सुवर्चिलवणस्य च । शिलाया हरितालस्य तथा सीसमलस्य च ।। हिंगुलस्य तथा कान्तरजसः कर्पुरस्य च । जतोर्नील्याश्च सरलनिर्यासस्य तथैव च ।। समन्यूनाधिकैरंशैराग्निचूर्णान्यनेकशः । कल्पयंति च तद्विद्याश्चन्द्रिकाभादिमंति च ।। ) या विषयाबद्दलची इतकी बारीक आणि सविस्तर हकीकत आपल्या इकडील पूर्वीच्या ग्रंथातून सांपडत असल्यामुळें ही विद्या आपल्याकडे फार प्राचीन काळापासून विद्यमान आहे, ही गोष्ट अगदीं उघड होत आहे. तेव्हा आम्ही बंदुकीच्या दारूची कल्पना नवीन शोधून काढली अशी जी कित्येक युरोपियनांची घमेंड आहे ती किती हास्यास्पद आणि अज्ञानमूलक आहे, हें यावरून दिसत आहे. चीन व अरबस्थान या देशातून ही विद्या माहीत होती अशाबद्दल पूर्वीच्या इतिहासातून पुष्कळ उल्लेख सांपडतात. पण कित्येकाचें असें म्हणणें आहे कीं, एशियातील लोकांना सोरा आणि कोळसा एके ठिकाणीं केला असतां अग्नि उत्पन्न होतो, बार होतो, एवढयाच गोष्टी माहीत होत्या. परंतु दारूच्या वेगाच्या योगानें शत्रूच्या अंगावर गोळा फेंकण्याची कल्पना एशियांतील लोकांना माहीत नव्हती. पण ही कल्पना सुद्धां निराधार होय, असेंच म्हणावें लागतें. कारण आपल्या संस्कृत ग्रंथातून बंदुका, गोळे व तोफा यांचें जर प्रत्यक्ष वर्णन आढळतें तर मग वरील कल्पनेला आधार कोठून मिळणार ! आता संस्कृत ग्रंथांतील दारूबद्दल हा एक मुद्दा आहे कीं, त्यातील वजनें बरोबर असतील कीं नाहीं ? वजनांबद्दलच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, निरनिराळया वेळीं निरनिराळीं वजनें उपयोगात असत. १८ : ३ : २ असें

प्रमाण पूर्वी कोठें कोठें असे. हल्लीं ७५ : १५ : १० किंवा ७५ : १२·५ किंवा ७४ : १६ : १० यापैकीं कोणतीं तरी वजनें इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, अमेरिका, या देशातून चालू आहेत. परंतु वर दिलेलीं आपलीं वजनें याहून जराशीं भिन्न दिसतात. त्याचें प्रमाण ५ : १ : १ किंवा ७५ : १५ : १५ असें पडतें. हें प्रमाण अधिक चांगलें आहे किंवा कसें, याचा अनुभव घेऊन काय तें ठरविणें, हें रसायनशास्त्र-वेत्त्यांचें काम आहे. आता यासंबंधानें विचार करण्यासारखा शेवटचा मुद्दा म्हटला म्हणजे वर ज्या ग्रंथातून आम्हीं उतारे दिले आहेत तो ग्रंथ किती जुना आहे हा होय. शुक्रनीतिसार हा ग्रंथ कधीं लिहिला गेला याबद्दल कोणी अजून काहीं नियमित सिद्धांत ठरविलेला नाहीं. तरी पण तो ग्रंथ फार जुना असला पाहिजे. महाभारतात नीतिग्रंथाविषयीं वर्णन चाललें असतां त्यांत शुक्रनीतीचें दिग्दर्शन केलेले आहे. आणि त्याच नीतीचें हें सार असल्यामुळें हा ग्रंथ ख्रिस्ती लोकांचें नाव सुरू होण्याच्या पूर्वी अनेक वर्षे अस्तित्वांत आलेला असला पाहिजे, असें सकृद्दर्शनीं तरी अनुमान निघतें. सध्यां शुक्रनीतिसाराचा शक ठरविण्याचा प्रश्न नाहीं. म्हणून त्याबद्दलचा सामान्य काल सांगून व बंदुकीच्या दारूची कल्पना आमच्यात फार पुरातन काळा-पासून माहीत होती हें स्पष्टपणें सिद्ध करून देऊन, आम्ही या विषयाची रजा घेतों.

# आंग्ल पत्रकारांचें कल्पनामय साम्राज्य : ४

● यांत उल्लेखिलेला संप हा जी. आय्. पी. मधील तारमास्तराचा संप. हा ६-५-१८९९ रोजीं झाला. त्यावेळीं या खात्यांत हलक्या जागांवर बरेच ब्राह्मण नोकर होते.

There seems to be Anglo-Indians, who think that the Brahmin is their inveterate enemy, and that they can not enjoy their life in India, unless every Brahmin is deported to the Andamans or is massacred whole-sale, if that were in their power. *Hindu*.

ब्राह्मण थोड्या बहुत प्रमाणानें फार दिवसापासून अप्रिय झालेले आहेत. परंतु तारमास्तराच्या संपापासून त्याजबद्दलची अप्रियता फारच वाढली आहे. व कित्येक आंग्ल बंधूंच्या लिहिण्याच्या झोकावरून असा भास होतो कीं, सार्वजनिक शांतता, सुधारणेचा प्रसार, पाश्चात्यविद्याकलाभिवर्धन, व्यापाराभिवृद्धि, मनुष्यप्रेम, राष्ट्रीय प्रगति, इत्यादि परमेश्वरीय गोष्टी इंडियांत सुयंत्रितपणें चालण्यासाठीं ब्राह्मण कोठेंहि नसतील तर फार बरें होईल, असेंहि कित्येकांना कदाचित् वाटत असेल. वरील दिव्य, महनीय, स्पृहणीय, आदरणीय, आणि अवश्यापेक्षणीय गोष्टीच्या प्रसाराला आपल्या हातून जर यत्किंचित् प्रतिबंध होत आहे असें ब्राह्मणांना दिसून आलें, तरी सुद्धां त्यांना अत्यंत दुःख झाल्यावाचून राहणार नाहीं. आणि आपल्या हातून अशा सत्कार्याला विघ्न येण्यापेक्षा आपल्यालाच मरण येणें काय वाईट, असें कोणच्या राजभक्त आणि देशभक्त ब्राह्मणाला वाटणार नाहीं? पण असें वाटण्याचें कारण नाहीं. कारण अशा रीतीचा हा जो ब्राह्मणांच्या विपर्योचा

उल्लेख केलेला आहे तो केवळ कांहीं इंग्रजी वर्तमानकर्त्यांनीं केलेला आहे. पण इंग्रजी वर्तमानपत्रकर्ते म्हणजे इंग्रजी राज्यकर्ते नव्हेत. आपल्या मलिका माआझमा महाराणीसाहेब यांना सर्व जातींतील लोक सारखेच आहेत. त्यांच्या ठिकाणीं किंवा त्यांच्या कायद्याच्या ठिकाणीं जातिभेद बिलकूल नाहीं. म्हणून असल्या लिहिण्यानें आपण नामशेष होऊं, अशी ब्राह्मणाना भीति वाटण्याचें कारण नाहीं. जर इंग्रजी पत्रकर्ते हेच राज्यकर्ते असते, व जर त्यांच्या पत्रांतील लेख हेच गव्हरनरच्या कौन्सिलांतील ठराव असते तर मात्र ब्राह्मणाना येथून नाहींसें होणें जरूर पडलें असतें. तरी पण वर्तमानपत्रकारांच्या कारकीर्दीत सुद्धां सरसकट सर्व ब्राह्मणावर तसा प्रसंग खात्रीनें येणार नाहीं. ब्राह्मणातहि जिवंत राहण्याला योग्य अशीं कित्येक माणसें सांपडतील, यांत बिल्कूल शंका नाहीं.

सध्याचा प्रश्न मुख्यत्वेंकरून मुंबई इलाख्यातील ब्राह्मणांसंबंधाचा आहे. व लोकसंख्येच्या कोष्टकावरून पाहिलें तर या इलाख्यातील ब्राह्मणांची संख्या सुमारें १० लक्ष आहे. परंतु या दहा लक्ष ब्राह्मणापैकीं सर्वच प्रगतीला प्रतिबंध करणारे आहेत असें नाहीं. गुजराथी ब्राह्मणांचा वर्ग अगदीं निरुपद्रवी आहे. व त्या वर्गांतील बहुतेक लोक इतके अज्ञानी आहेत कीं, त्यांना निःशंकपणें जिवंत राहूं देण्याला कोणतीच हरकत नाहीं. मुख्य लुच्चे ब्राह्मण म्हटले म्हणजे दक्षणी, कोंकणस्थ वगैरे होत. या ब्राह्मणांची संख्या सुमारें सात लाख होईल. तेव्हां आंग्ल पत्रकाराच्या ट्रायम्व्हरेटला मुख्यत्वेंकरून या संख्येचा काय निकाल लावावा या प्रश्नाचा विचार करावा लागणार आहे. परंतु बोटांत कांटा बोंचला असला तर काटा तेवढा काढावयाचा, सर्वच बोट तोडून टाकावयाचें नाहीं, हा शहाणपणाचा न्याय सर्वांना कबूल आहे. म्हणून या सात लक्षापैकीं अनाथ अबलांना अवश्य जिवंत राहण्याची मोकळीक देण्याला कोणी कांकूं करील असें वाटत नाहीं. तेव्हां सात लक्ष ब्राह्मणांतून स्त्रियाची संख्या अवश्य वजा घातली पाहिजे. ब्राह्मणांत साधारणपणें असें प्रमाण आढळतें कीं, एक हजार पुरुष असले तर त्यांच्याबरोबर सरासरी ९१० स्त्रिया असतात. या प्रमाणाच्या अनुरोधानें पाहिलें पाहिलें असतां सामान्यपणें सात लाखांपैकीं साडेतीन लाख स्त्रिया जिवंत राहण्यास कांहीं हरकत नाहीं. वृद्ध स्त्रिया तर अगदींच निरुपद्रवी असतात. तेव्हां

त्याच्याबद्दल मुळींच कोणाला रदबदली करावी लागणार नाहीं. वादाचा प्रश्न काय तो गरोदर स्त्रियाबद्दल उरणार. कारण त्या स्त्रिया म्हणून जिवत राहू देण्याला एका बाजूनें काही हरकत नाहीं. पण त्यांच्या गर्भांतून जर पुढें पुत्र जन्मास आला तर काय करावयाचें ? कारण तो विद्यार्थिदशेंत आला कीं त्याचें स्वरूप भयंकर आणि भीतिप्रद होणार. तेव्हां पुल्लिंगी विद्यार्थी उत्पन्न करणाऱ्या गरोदर स्त्रियाना जराशी भीतिच आहे. परंतु हा प्रश्न बराच गौण आहे. पण अशा रीतीनें बायकानाच फक्त जिवंत राहूं दिलें म्हणजे त्यापासून एक अतिशय मोठा फायदा होणार आहे. समाजशास्त्राचे उन्नतिकारक एक्स्पेरिमेंट करून पाहाण्याला हे केवढे तरी एक मोठें शेत अनायासें तयार होणार आहे. व जी सुधारणा शेकडों वर्षांनीहि शक्य झाली नसती ती एका क्षणात घडून येईल. जातिभेदभंग, पुनर्विवाहाभिवृद्धि, केशवपनाभाव, स्त्रीशिक्षणप्रसार, सावळ्या ओवळ्याच्या बंडाचा बीमोड, वगैरे अनेक प्रकारच्या सुधारणा त्या शेतांत पिकविता येतील. असा हा अतर्क्य फायदा होणार आहे. असो. याप्रमाणें स्त्रीवर्ग वजा जाता बाकी सुमारें साडेचार लाख ब्राह्मण राहतात. पण स्त्रीवर्ग आणि पुरुषवर्ग हा जो विभाग खानेसुमारीच्या कोष्टकातून केलेला असतो, तो त्या त्या वर्गांच्या नैसर्गिक चिन्हाना अनुलक्षून केलेला असतो. परंतु राजकीय बाबतींत विचार केला तर पुरुषवर्गाच्या कोष्टकातील बरेच आकडे स्त्रीवर्गाच्या कोष्टकांत घालावे लागतील. व त्या योगाने वर साडेतीन लाख म्हणून जी स्त्रियांची संख्या दिली आहे ती पुष्कळ वाढल्यावाचून राहणार नाही. परंतु या गोष्टीचा सध्या विचार करून स्त्रीवर्गाची अशा रीतीनें वाढणारी संख्या कायम ठरविणें शक्य नाहीं. म्हणून वरील संख्याच सध्यापुरती कायम समजून चाललें पाहिजे.

एवढा वेळपर्यंत प्राचीन महर्षींनी ज्या अर्थानें ब्राह्मण या शब्दाचा उपयोग केलेला आहे त्या अर्थाच्या अनुरोधाने विचार झाला. पण अर्वाचीन महर्षींच्या मतानुरोधानें ब्राह्मण याचे ब्राह्मण आणि भट असे दोन विभाग आहेत. या शब्दाच्या व्याख्या आणि त्यांची व्यापकता अर्वाचीन महर्षींनीं आपल्या स्मृतीच्या शेडयूलमधून अनेक वेळा प्रसिद्ध केल्या आहेत. त्या व्याख्येप्रमाणे जे कोणी ब्राह्मण असतील त्याना आनंदानें नांदूं देण्याला

कोणताहि प्रत्यवाय नाहीं. या महर्षींच्या अर्थाप्रमाणे जे आज नको आहेत, ते भट नको आहेत, ब्राह्मण नको आहेत असें नव्हे. पण ह्या ब्राह्मण शब्दाचा हा अर्थ अजून यावा तसा प्रचारात आला नाही. त्यामुळे पुष्कळांच्या समजात चूक उत्पन्न होण्याचा संभव आहे. म्हणून फक्त त्या मताचा येथें उल्लेख करून देऊन नेहमींच्या ब्राह्मण शब्दाच्या अर्थाच्या अनुरोधानेंच अवशिष्ट मुद्याच्या विवेचनाकडे वळणें बरें. आंग्ल पत्रकर्त्यांच्या युटोपिया नामक राजधानींत वर निर्दिष्ट केलेल्या ब्राह्मणाशिवाय आणखी सोनार-ब्राह्मण, शेणवी ब्राह्मण, ख्रिस्ती ब्राह्मण, बाटलेले ब्राह्मण, पतित ब्राह्मण, बिस्किट-ब्राह्मण, बाटली-ब्राह्मण वगैरे असंख्य लहान लहान जातीच्या ब्राह्मणाना निर्धास्तपणे वास्तव्य करण्याला परवानगी मिळाल्यावाचून राहणार नाहीं. आणखी एक ब्राह्मणांपैकीं असा वर्ग आहे कीं, त्यालाहि निर्भयपणाचें सर्टिफिकेट अवश्य मिळालें पाहिजे. चहाडी हा दुर्गुण म्हणून कोणत्या नीतिशास्त्रकाराने ठरविला असेल तो असो. बहुतकरून 'च' हें पहिलें अक्षर दोन्ही ठिकाणीं सारखें जमल्याबरोबर कोणीं तरी मूर्खानें चोरी आणि चहाडी यांची एका सूत्रात योजना केली असावी. पण चहाडीसारखा समाजाला उपयोगी पडणारा दुसरा एखादा सद्गुण असेल किंवा नाही, याविषयीं जबरदस्त शंका आहे. कोणत्याहि राष्ट्राने कितीहि पोलिसचे शिपाई ठेविले तरी पोलिसचा शिपाई प्रत्येक गल्लीत आणि प्रत्येक मनुष्याच्या मनात जाऊं शकत नाहीं. पण जेथ पोलिसला जाता येत नाहीं तेथें चहाडीला जातां येतें. व जें पोलिसला उघडकीस आणतां येत नाहीं तें चहाडी आणूं शकते. तेव्हां दुर्गुण पकडण्याच्या कामीं मदत करण्याच्या गुणामुळे चहाडी हा एक उत्तम सद्गुण मानणें अवश्य आहे. समाजांतील काय आणि व्यक्तींतील काय, दोष उघडकीस आणून चहाडी या सद्गुणानें दोषांवरहि आजपर्यंत अनेक उपकार केलेले आहेत. तेव्हां अशा सद्गुणाचें एकनिष्ठेनें सेवन करणारे जे कोणी चहाडीखोर ब्राह्मण सत्पुरुष असतील त्याना सदर राजधानींत निःशंकपणें संचार करावयाला सांपडेल. इतकेंच नव्हे, तर त्यांना तेथें मानमरातबहि मिळेल.

काहीं ब्राह्मणांत संप करणें, सभा भरविणें, वगैरे दोष आहेतच. पण तेहि एकवेळ क्षम्य झाले असते. ते जर अन्य तऱ्हेनें राष्ट्राचें कांहीं हित

करून देते तर मग त्याच्या या अवगुणाकडे काना डोळा करण्याला हरकत नव्हती. ब्राह्मणांमध्येहि असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांच्या अंगच्या कांहीं सद्गुणांच्या योगानें देशाच्या किफायतींत भर पडते. देशांतील मद्याच्या व्यापाराला हस्तें परहस्तें मदत केल्यास उत्पन्नाचें मान वाढतें; म्हणून कित्येक ब्रह्मबंधु या व्यापाराच्या अभिवृद्धिप्रीत्यर्थ रात्रंदिवस झटत आहेत, व त्यापासून परिणामीं देशाचा आयात व्यापार वाढल्यावाचून कधींहि राहणार नाहीं. तेव्हां आपल्या शरिराचीहि पर्वा न बाळगतां स्वदेशासाठीं जे ब्रह्मबंधु झटतात त्यांना (ते आईबापाच्या दोषामुळें ब्राह्मण असले तरी) माफीचीं सर्टीफिकिटें अवश्य देण्यांत येतील. शिवाय, डोकीं वाढविलेले सुधारक, जानवीं तोडलेले सुधारक, बूटसुधारक, विटाळशी-सुधारक, अन्नमानघातकी सुधारक, स्त्रीशिक्षक-सुधारक, विधवासुधारक, म्हातारपणीं लग्न करणारे सुधारक, व थंडे, गरम-कोमट वगैरे सुधारकांत ज्या असंख्य जाती झाल्या आहेत, त्या सर्वांवर ब्राह्मणत्वाच्या अपराधाबद्दल पूर्ण क्षमा दर्शविण्यात येईल असा पुष्कळ संभव आहे. प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज, आर्यसमाज, वगैरे नानाविध समाजांतील सभासद जरी कोणी जन्मद्वारा ब्राह्मण असले तरी या युरोपियन कायद्याच्या दृष्टीनें ते ब्राह्मण नाहींत असेंच ठरविलें जाईल. लग्नमुंजीच्या अपरिहार्य अडचणीसाठीं प्रायश्चित्त घेऊन जरी कोणी ब्राह्मणांत गेले असले तरी त्यांची इच्छा असल्यास त्यांना विशेष ठराव करून ब्राह्मण शब्दाच्या व्याख्येंतून अवश्य दूर करतां येईल. संध्या करीत नाहीं, ओवळ्यानें जेवावयाला बसतों, एवढ्यावरूनच जर कोणी लुच्चा ब्राह्मणांतून निसटूं पहात असेल तर त्याला मात्र तसें करूं देण्यांत येणार नाहीं. कारण मग सगळेच ब्राह्मण अशा रीतीनें पळून जाऊं लागतील. पण ब्राह्मण विद्यार्थ्याला मात्र अशा रीतीनेंहि पळून जातां यावयाचें नाहीं. कारण त्याच्यावर फार बारीक नजर ठेवण्यांत येईल. व त्याजवर कधींहि क्षमा दाखविण्यात येणार नाहीं.

पण ही सर्व स्थिति आंग्ल पत्रकाराचें राज्य सुरू होईल तेव्हां. परंतु हें तर राणीसरकारचें राज्य आहे. तेव्हां या कल्पनासृष्टीचा आणखी विस्तार कशाला पाहिजे? ब्राह्मणाच्या विषयीं कोणाच्या मनांत कांहीं कुकल्पना आल्या असल्यास त्यांनीं त्या चुकीच्या म्हणून टाकून देणें हेंच योग्य आहे.

# नीतिशिक्षणाची शाळा : : : ६

एका गृहस्थाच्या मनांत वरील प्रकारची शाळा स्थापन करण्याचें पुष्कळ दिवस घोळत आहे. व तो हेतु सिद्धीस कशा रीतीनें नेतां येईल याविषयीं चर्चा करण्यासाठीं व लोकमत काय आहे हें जाणण्यासाठीं त्यानें पुष्कळ मोठमोठ्या लोकांच्या गांठी घेतल्या आहेत. परंतु कित्येक थोर गृहस्थाशीं झालेल्या त्याच्या वादविवादाची जी हकीकत तो सांगतो त्यावरून त्याचें मत त्यांना मुळींच पसंत पडत नाहीं असें दिसतें. व त्याच्या डोक्यातील शाळेची कल्पना इतराना पसंत न पडण्याला कारणेंहि आहेत. कारण त्याची कल्पना हल्लींच्या मन्वंतराप्रमाणें बहुतेक वेडगळपणाचीच आहे असें म्हटलें तरी चालेल. त्याच्या डोक्यांतील पहिला वेडगळपणा हा होय: तो म्हणतो कीं, नीतिशिक्षणाची शाळा मी स्थापन करण्याच्या विचारात आहें, ती जर सुदैवानें स्थापन झाली तर त्या शाळेंतील पहिला विद्यार्थी मी होईन. हें त्याचे वाक्य ऐकून हल्लींच्या मोठ्या लोकापैकीं कोण बरें त्याच्या मूर्खपणाला हंसल्यावांचून राहणार आहे? दुसऱ्याना एखादी गोष्ट शिकविण्यासाठीं आजपर्यंत पुष्कळानीं शाळा घातल्या आहेत. पण स्वतः एखादी गोष्ट शिकण्यासाठीं शाळा स्थापन करावयाची, ही कल्पनासुद्धां कोणाच्या डोक्यात शिरूं शकत नाहीं. व हल्लीं प्रत्येक जण जो तो आपल्याला पूर्णपणें नीतिमान समजतो आहे; व दुसऱ्या सर्वांची मात्र नीति अत्यंत शोचनीय रीतीनें बिघडलेली आहे असें ज्याला त्याला वाटत आहे; माझ्या स्वतःच्या नीतींत काहीं कमतरपणा आहे असें आतांशा कोणालाहि वाटत नाहीं. तेव्हा अशा स्थितींत नीतिशिक्षणाची शाळा स्थापन करूं इच्छिणारा मनुष्यच जर मी त्यांतील पहिला विद्यार्थी होईन असे म्हणूं लागेल तर अशा माणसाची मूर्खांत गणना केल्यावांचून हल्लीं कोणी तरी राहील काय? हल्लींच्या शहाण-

पणाच्या आणि मोठेपणाच्या लक्षणाचा आपल्यावर समन्वय व्हावा अशी ज्याची इच्छा असेल त्यानें आपली स्वतःची नीति अगदीं शाबूद आहे, असें गृहीत धरून चाललें पाहिजे. पण आमचे हे सदर गृहस्थ भोळे आणि भावडे असल्यामुळे त्याना स्वदोषगोपनाची हातोटी साधत नाहीं. त्यामुळें त्यांच्या पदरीं वर निर्दिष्ट केलेला वेडगळपणा आलेला आहे.

या गृहस्थांचा दुसरा वेडगळपणा असा आहे कीं :—अल्पवयी मुलांची स्वाभाविकपणेंच सद्गुणाकडे प्रवृत्ति असते, परतु जगांतील आवश्यकतेमुळें व वाईट उदाहरणाच्या अनुकरणामुळे लोक जसजसे वृद्ध होत जातात तसतशी त्यांची नीति भ्रष्ट होत जाते; तेव्हा या नवीन स्थापन करावयाच्या शाळेंत मुख्यत्वेंकरून वयात आलेल्या व वयातीत झालेल्या लोकाचाच समावेश केला पाहिजे, असें यांचे मत आहे. शाळा म्हणजे लहान मुलांची अशी आजची साधारणपणें समजूत. पण या गृहस्थांची पाहावी तों कांहीं निराळीच कल्पना ! जेथें टोप्या घातलेलीं पोरें बसावयाचीं तेथे पागोटीं घातलेले थोर नेऊन बसविले, जेथें गुळगुळीत गालाचीं लहान मुलेंच फक्त बसावयाचीं तेथें ब्रशच्या उपादानकारणाजोगत्या दाढ्यामिश्या वाढलेले खरखरीत तोंडाचे लोक नेऊन बसविले, तर हें विलक्षण स्थित्यंतर होणार नाहीं काय ? वरील तत्त्वाप्रमाणें आपल्याला या शाळेंत जावें लागेल असें वाटून सर्व वृद्ध लोक या कल्पनेच्या विरुद्ध आहेत. त्यांना हल्लीं असें वाटत आहे कीं, जे कांहीं शिकावयाचें आहे तें तरुणानीं शिकावयाचें आहे, वृद्धांनीं कांहीं शिकता कामा नये; जर वृद्धालाहि कांहीं शिकावयाचें असलें तर मग तो वृद्ध कसला ? असें याना वाटत आहे. म्हणून ते असें साफ सांगतात कीं, कोणीं जर शाळा घातली तर आम्ही त्या शाळेंत प्राण गेला तरी येणार नाहीं. आम्ही जे एवढी खटपट करून वृद्ध झालों आहो ते दुसऱ्यांची नीति सुधारावी म्हणून, आपली सुधारून घेण्यासाठीं नव्हे. अशी स्थिति असल्यामुळें या नीतिशिक्षणाच्या संस्थेला वृद्ध माणसांचा उदार आश्रय मिळावयाची मुळींच आशा नाहींशी झालेली आहे. व पांढऱ्या केसांचीं सर्व माणसें या गृहस्थावर अतिशय रागावलेलीं आहेत. ते एवढें मात्र कबूल करतात कीं, आम्ही आपल्या मुलाना तुमच्या या नीतिशिक्षणाच्या शाळेंत पाठवूं, पण स्वतः येण्याचें ते कांहीं केल्यानें कबूल करीत नाहींत.

या शाळेच्या कल्पनेचा खल वरील गृहस्थानीं बराच केलेला आहे. तरी पण त्यात मुलाची संख्या किती होईल याचा त्यांना अजून अंदाज करतां येत नाही. त्यांच्या मतानें किती तरी लोक या शाळेंत येण्याला योग्य आहेत. पण 'तुम्ही या शाळेंत याल काहो ?' असें त्यानीं कोणाला विचारलें तर लहान मुलांशिवाय एक सुद्धां कबूल होत नाहीं, व काहीं काहीं मोठे लोक यानीं असें विचारून आपला अपमान केला असें समजून, त्यांना सपशेल शिव्या देऊं लागतात. त्यामुळें याची बरीच निराशा झाली आहे. व विद्यार्थ्यांची संख्या किती होईल याचा अदमास त्याना काहीं एक बांधता येईनासा झाला आहे. त्यामुळें त्याच्या डोक्यात एकदा अशी एक कल्पना आली कीं, "कोणी तरी वजनदार गृहस्थाकडे जाऊन पहिल्या प्रथम त्यांना असें सागावयाचें कीं, 'मी तुम्हांला नीतिशिक्षणाच्या शाळेत या म्हणून सांगण्याकरिता आलों नाहीं.' इतकें आश्वासन दिलें म्हणजे ते निर्भयपणानें आणि रागावल्यावाचून माझ्यापाशीं बोलूं लागतील. मग मी त्याना पुढें असें सागेन कीं, तुमच्या खेरीज इतराची नीति सुधारण्याच्या कामीं मी खटपट करीत आहें. असें सागितलें म्हणजे ते अगदीं खूप होतील. मग त्याना असें सागावयाचें कीं, मी नीतिशिक्षणाची एक शाळा काढणार आहे. पण ज्याला विचारावें तो लहान मुलगा नसेल तर, मी साफ येणार नाहीं म्हणून जाबसाल देतो. तरी या शाळेंत सर्वांनीं गेलेंच पाहिजे असा सरकारांतून सक्तीचा हुकूम सुटण्याची आपण कांहीं तरी तजवीज करावी." ही कल्पना त्याच्या मनात येऊन ते एका गृहस्थाकडे गेलेहि होते. पण त्या गृहस्थाचें असें मत पडलें कीं, नीतिशिक्षणाच्या शाळेंत गेलेंच पाहिजे अशी सक्ती सरकारहि सर्वावर करूं शकणार नाहीं. फार झालें तर लहान मुलांच्याबद्दल असा नियम करता येईल. पण आमच्या या गृहस्थाचा लहान मलांपेक्षा मोठ्या माणसावरच विशेप कटाक्ष असल्यामुळें त्यांची तृप्तता न होऊन ते दुसरीकडून काहीं खटपट चालवीत आहेत.

पण एकंदरींत या शाळेंत विद्यार्थ्यांची संख्या खूपच जंगी होईल अशी या गृहस्थांची पूर्ण खात्री आहे. व गरीब लोकापेक्षां पैसेवाल्यातच त्याच्या मतानें नीतिशिक्षणाची अधिक आवश्यकता असल्यामुळें श्रीमंत विद्यार्थ्यांपासून पुष्कळ फी मिळून शाळा सुयंत्रितपणें चालण्यास मुळींच हरकत

पडणार नाहीं असें ते म्हणतात. शाळेंत सर्व प्रकारच्या वरिष्ठ लोकांना घेऊन त्याच्या दर्जाप्रमाणें त्याची व्यवस्था ठेवण्याचा या गृहस्थाचा मानस आहे. प्रथमतः या शाळेंत जितके राजे येतील तितके आणण्याचा याचा प्रयत्न आहे. पण त्याची अशी अट आहे कीं, हे सर्व फक्त नेटिव राजेच असले पाहिजेत; फार झालें तर एशिया खंडातील राजे चालतील किंवा आफ्रिका खंडातील मुसलमान आणि निग्रो राजे चालतील. पण युरोपांतील राजावर या शाळेची सांवलीसुद्धा पडतां कामा नये. कारण ते स्वतःच फार नीतिमान् आहेत. व या शाळेंत येणारे सर्व राजे नीतिभ्रष्ट असणार. तेव्हा ह्या नीतिभ्रष्ट राजांच्या संसर्गानें त्या युरोपांतील नीतिमान् राजाची कदाचित् नीति बिघडेल व आज नीतिदेवाला युरोपियन राजाच्या तरी अंगीं राहण्याला जी सुदैवानें जागा आहे तीहि मग उरणार नाहीं; व आज जी तेथें नीति नादत आहे ती नाहींशी झाली तर मग जगांत नीति कोठेंच राहणार नाहीं. अशी या गृहस्थांना भीति वाटत असल्यामुळें युरोपातील टर्की खेरीज करून कोणत्याहि राजाला या शाळेंत घेण्याला ते खुषी नाहींत. स्टीव्हन्स साहेबानीं एका नेटिव राजाच्या नातेवाईकाला descendent of a hundred bandits ( शेंकडों पिढ्यांच्या दरवडेखोराचा वंशज ) असें म्हटलें आहे. त्याप्रमाणेंच या आमच्या गृहस्थाचें राजाविषयीं मत आहे. मात्र युरोपातील राजे या सामान्य नियमाला अपवाद आहेत असें ते म्हणतात, पण नेटिव राजेच मात्र शेंकडों पिढ्यांच्या दरवडेखोराचे वंशज कां, आणि युरोपियन राजे तसे कां नाहींत, याचें युरोपियनाप्रमाणेंच आमच्या या गृहस्थाना कारण काहीं एक सांगता येत येत नाहीं. या गृहस्थाचा असा विचार आहे कीं, राजे लोकाना या शाळेंत सर्वांपेक्षा अधिक वेळपर्यंत ठेवावें व त्याना अतिशय कडक रीतीनें नीति-शिक्षण द्यावें. कारण त्याच्या मतानें ते मुळात नीतीच्या झऱ्याचें पाणी गढूळ करितात, आणि मग अर्थातच प्रजेला गढूळ पाणी प्यावें लागतें.

या गृहस्थांचा परदेशांत जाऊन आलेल्या शिष्ट मनुष्याशीं एकदा वाद झाला. त्यात या गृहस्थाचें असें म्हणणें होतें की, काहीं युरोपियन या शाळेंत येण्याला योग्य आहेत. पण त्यांच्या प्रतिपक्ष्याचें असें म्हणणें पडलें कीं, त्यांच्या सामाजिक संस्थाच अशा काहीं सुरेख रीतीनें रचिलेल्या आहेत कीं, त्या संस्थातून वाढलेला मनुष्य नीतिमानच झाला पाहिजे असें त्यांचें मत

पडलें खरें. तरी पण या गृहस्थाचें अजून असें मत आहे कीं, लांच खाणारे, लोकावर जुलूम करणारे, स्त्रियांवर बलात्कार करणारे, आपोआप बंदुक उडल्यामुळें मनुष्यवध करणारे, वगैरे जर कोणी असले तर त्याना या शाळेंत घातल्यापासून पुष्कळ फायदा होणार आहे.

नीति आणि न्याय याच्यात फार निकट संबंध आहे असें या गृस्थांचें मत असल्यामुळें न्यायखात्यांतील सर्व लहान मोठ्या अधिकाऱ्यानीं या शाळेंत कांहीं दिवस घालविलेले असावे असें यांना वाटत होतें. व म्हणून याविषयीं सल्ला घेण्याकरिता ते एका मोठ्या वकिलाकडे गेले. हल्लीं खोटे दस्तैवज तयार होतात, खोटे साक्षीदार पुढें येतात, एकच न्याय तीन कोर्टांत तीन प्रकारचा होतो, एकानें खोटें केलें म्हणजे दुसरा करण्याला प्रवृत्त होतो, लहानापासून मोठ्यापर्यंत क्षुल्लक कामाला चेरीमेरी द्यावी लागते, कोर्टाच्या भवचक्रात सांपडून रावाचे रंक होतात, तेव्हां या सर्व गोष्टी बंद होण्याला उत्तम उपाय म्हटला म्हणजे तुम्हीं सर्वांनीं आमच्या नीतिशिक्षणाच्या शाळेंत काहीं दिवस येत जावें हा होय, असें त्यांनीं सुचाविलें. त्याबरोबर वकील साहेबांनीं आपल्या कायद्यातील कलम शोधून काढून त्याना सांगितलें कीं, तुम्ही येथून मुकाट्यानें चालते व्हा, नाहीं तर बेकायदेशीर रीतीनें आमच्या घरात शिरल्याबद्दल किंवा आमचा वेळ मोडून पैशाचें नुकसान केल्याबद्दल तुमच्यावर आम्हीदावा करूं. हें उत्तर ऐकून तो गृहस्थ किंचित् निराश होऊन तेथून घाबरुन निघून आला.

नंतर कोणी एक न्यायाधीश गुप्त रीतीने लाच घेतात अशी खात्रीलायक कुणकुण ऐकल्यावरून हे गृहस्थ एक दिवस त्याच्या भेटीला गेले. तेव्हा त्यानीं विचारिलें, तुमची कांहीं फिर्याद आमच्याकडे आहे कीं काय? तेव्हा ते गृहस्थ म्हणाले, 'होय, माझी अशी फिर्याद आहे कीं, आपण कांहीं दिवस आमच्या नीतिशिक्षणाच्या शाळेंत येऊन राहा, म्हणजे लोकाना न्याय महाग पडणार नाहीं.' हे शब्द त्यांच्या तोंडून निघालेनाहींत तोंच न्यायाधीशांनीं आपल्या शिपायाला हांक मारून सांगितलें कीं, याला गचाडी मारून घालवून दे. व शेवटीं म्हणाले कीं, मी ज्याना अपराधी म्हणून ठरविलें आहे त्याना पाहिजे असेल तर नीतिशिक्षणाच्या शाळेंत खुशाल घेऊन जा. पण मला तुम्ही तेथें बोलावतां याचा अर्थ काय ?

इतकी मानखंडना झाली तरी ह्या गृहस्थानीं आपला उद्योग सोडला नाहीं. एक दिवस रात्रीचे घरी येत असता रस्त्याच्या बाजूला पडलेले कोणी एक गृहस्थ त्यांना सापडले. त्यांना उठवून गाडीत घालून आपल्या घरीं घेऊन आले. व असें वाटलें कीं, हे गृहस्थ आपल्या शाळेत खास येतील. कारण यांचा अपराध आपण प्रत्यक्ष पकडलेला आहे. पण ते शुद्धीवर आल्याबरोबर म्हणाले, 'काय मला तूं नीतिशिक्षणाच्या शाळेंत बोलावतोस ! मुअर, मी तर नीतींत परिपूर्ण झालो आहे,' असे म्हणून तो त्या गृहस्थाच्या हातून निसटून एका कलालाच्या दुकानीं जाऊन दडून बसला. समक्ष भेटींत अतिप्रसंग होतो व अमर्यादा होते म्हणून या गृहस्थानीं एका राजाला नीतिशिक्षणाच्या शाळेंत येण्याविषयीं विनंति दाखल अर्ज लिहिला होता. त्याचे उत्तर आलें त्यात असें होतें की, 'राजा दुसऱ्या लोकांना जिंकून त्यांच्या जमिनी वगैरे घेतो, ते सर्व नीतिमूलकच असतें. त्याच्याबद्दल तुम्हाला मुळीच काळजी नको. आता सावकार वगैरे पुष्कळ भामटे लोक गरीब प्रजेला नाडून त्यांच्या जमिनी उपटतात ती मात्र अनीति आहे. सबब सावकार लोक जितके तुमच्या शाळेंत येऊं शकतील तितक्यांना आणण्याचा तुम्ही प्रयत्न चालू ठेवा. तुमच्या शाळेला मदत म्हणून आम्ही काहीं द्रव्य देऊं.' या उत्तरानें विद्यार्थी नाहींत, पण द्रव्य तरी निदान मिळेल, म्हणून आनंद मानून ते गृहस्थ खूप झाले.

अशारीतीनें ते अनेक स्थळीं खटपट करून दमले. कोणी मोठ्या लोकांपैकीं आपल्या शाळेंत येऊं इच्छित नाहींत असें जरी त्याच्या नजरेस आलें आहे, तरी मुख्यत्वेंकरून नीतिशिक्षणाच्या शाळेंत यानाच आणिले पाहिजे हा आपला आग्रह ते सोडीत नाहींत. लहान वयाचे सर्व विद्यार्थी मात्र याच्या शाळेंत येण्याला अगदीं एका पायावर तयार आहेत, परंतु या शाळेंत शिक्षकाचें काम कोणाला द्यावें याबद्दल हे गृहस्थ मोठ्या अडचणींत पडलेले आहेत. विद्याग्रहातील अनुभविक लोक मागून घ्यावे म्हणून कोणीं सूचना केली होती. पण तसें केलें तर मुलांना बिझिक खेळण्याचा नाद लागेल अशी भीति त्यांना वाटत आहे. स्वतःच्या आचरणानें शुद्ध असा शिक्षक मिळण्यासाठीं एक बक्षिस लावण्याचा त्यांचा विचार आहे. पाहावें पुढें काय होतें ते.

---

# काळ्या माणसाचें ओझें : : : ७

रुडियार्ड किप्लिंग या नावाच्या एका प्रसिद्ध आधुनिक अमेरिकन कवीनें White man's burden (पांढऱ्या माणसाचें ओझें) या नावाचें एक काव्य केलेलें आहे. त्यांतील भावार्थ असा आहे कीं, गोरे लोक हे एकामागून एक याप्रमाणें मुलूख काबीज करून घेत आहेत. आज हा प्रांत घेतला तर उद्यां तें राज्य बळकाविलें. असा त्यांचा क्रम सुरू आहे. जिकडे पाहावें तिकडे गोरे लोक पसरलेले आहेत. व जगाचा असा एकहि भाग नाहीं कीं, जेथें या लोकांचा संचार झाला नाहीं. पण किप्लिंग कवि म्हणतात, नुसता राज्याचा विस्तार चोहोंकडे केला म्हणजे गोऱ्या लोकाचें कर्तव्यकर्म संपलें असें नाहीं. तर गोऱ्या लोकांच्या डोक्यावर याच्यापेक्षा फार मोठें ओझें आहे. त्यांचें कर्तव्यकर्म याच्यापेक्षां फार महत्त्वाचें आहे. ते ज्या ज्या ठिकाणच्या लोकांना जिंकतील त्या त्या ठिकाणच्या लोकाना त्यानीं सुशिक्षित केलें पाहिजे, त्याना उत्तम धर्माचें, म्हणजे अर्थात् खिस्ती धर्माचें ज्ञान दिलें पाहिजे, व अर्वाचीन शोध आणि सुधारणा याच्या योगानें त्याची लोकयात्रा सुखमय करून सोडली पाहिजे. पण कर्तव्यकर्म हें कोणाला चुकलें नाहीं. सर्वांच्या पाठीस तें सारखेंच लागलेलें आहे. ओझें म्हटलें म्हणजे तें पांढऱ्या माणसाच्याच डोक्यावर आहे असें नाहीं; तें काळ्या माणसाच्याहि डोक्यावर असलेंच पाहिजे, व तें तसें आहेहि. मात्र त्यात श्रमविभागाच्या तत्त्वाचा पूर्ण विचार होणें अत्यंत अवश्य आहे. सर्वजण एकच काम करूं लागतील तर सगळा घोटाळा उडून गेल्यावाचून कधींहि राहणार नाहीं. काहींनीं सैंपाक केला पाहिजे व काहींनीं जेवणाचें काम केलें पाहिजे. सर्वच सैंपाक करूं लागतील तर मग जेवणार कोण ? आणि सर्वच जर जेवणाचें काम करण्याला बस-

तील तर मग सैंपाक तरी कोण करणार ? सारांश, सैंपाक आणि जेवण ह्या दोन जगांतील कर्तव्य गोष्टी आहेत; व ज्याच्या कपाळीं जेवण्याचें येईल त्यानें निमूटपणें जेवलें पाहिजे, व ज्याच्या कपाळीं सैंपाक करण्याचें येईल त्यानें निमूटपणें केला पाहिजे. ही जशी आपल्या घरकृत्यांतील स्थिति आहे तशीच बहुतेक अंशीं या जगाच्या व्यवहारांत ईश्वराच्या घरची स्थिति आहे. तेव्हां या जगांत सर्व ओझ्याचा भार पांढऱ्या लोकांच्याच डोक्यावर आहे असें मानून, काळ्या माणसानें आनंदित होऊं नये. या जगांत आपणहि कांहीं ओझें उचललें पाहिजे, ही गोष्ट काळ्या माणसाच्या लक्षांत आली पाहिजे. गोरे लोक ज्याप्रमाणें निरनिराळ्या देशांतून संचार करीत आहेत त्याप्रमाणेंच काळे लोकहि हल्लीं देशोधडीस लागलेले आहेत. व गोऱ्या माणसांप्रमाणेंच काळीं माणसेंहि दूरदूरचे मुलूख अलीकडे पादाक्रांत करूं लागले आहेत. अशा स्थितींत ओझ्याचा वांटा दोघांनीं सारखा उचलला पाहिजे. म्हणून सर्व जगाला शास्त्रीय शोध, विद्या, नीति, धर्म, वगैरेंचें ज्ञान करून देण्याचें ओझें गोऱ्या माणसानें उचललें आहे अशा वेळीं काळ्या माणसानेंहि आपलें ओझें उचलण्याला पुढें सरसा- वलें पाहिजे. व काळ्या माणसाचें ओझेंहि थोडें थोडकें किंवा कमी वजनदार आहे असें नाहीं. कित्येक प्रसंगीं तर यानें चार पांच मणपर्यंतहि वजनदार ओझीं उचलण्याला तयार असलें पाहिजे. जे जे म्हणून मोठ्या लोकांचे बोजे असतील ते ते उठविण्याला काळ्या माणसानें तत्पर असलें पाहिजे. शिवाय त्याच्या डोक्यावर करांचें ओझें आहेच. हल्लीं काळीं माणसें आसाम वगैरे प्रांतांतून पुष्कळ गेलीं आहेत. पण तेथें गेल्यानें त्यांचें कर्तव्यकर्म संपलें असें त्यांनीं समजूं नये. तेथें जितके कावाडकष्ट करावे लागतील, तितके करून आणि प्रसंग पडल्यास रात्रंदिवसही खपून त्यांनीं आपल्या धन्याला पुष्कळ चहा पिकवून दिला पाहिजे. मोरिशसकडे पुष्कळ काळीं माणसें गेलीं आहेत. व हल्लीं जर्मनी, आस्ट्रिया, वगैरे देशांतील साखरेवर मुद्दाम जकात बसविण्यांत आली आहे, तर अशा वेळीं मोरिशस- मधील काळ्या लोकांनीं फार मेहनत घेऊन रगड साखर आपल्या इंग्रजी धन्यासाठीं शुद्ध करून दिली पाहिजे. त्याचप्रमाणें नाताळ, जोहेन्सबर्ग, ट्रान्सवाल वगैरे ठिकाणींहि पुष्कळ काळीं माणसें गेलीं आहेत व जात

आहेत. त्या सर्वांनीं जेथें राहावयाला कोणी सांगेल तेथें मुकाट्यानें राहून खाणी उकरण्याचा सपाटा लावावा, व आंतून जे सोन्याचे कण किंवा हिरे निघतील ते आपल्या धन्यापाशीं नेऊन द्यावे. जेथें हवा वाईट असेल, जेथें पाणी नसेल, जेथें चिगर नांवाचे किडे माणसांप्रमाणें माणसांच्या शरीराला पीडा देत असतील, अशा ठिकाणींहि न डगमगतां जाऊन जें काम असेल तें काळया माणसानीं करून दिलें पाहिजे. शिवाय जगाच्या ज्या ज्या भागात मजूर लोकाची जरूर लागेल तेथें तेथें कुलींचा पुरवठा करण्याची सर्वस्वी जबाबदारी या काळया माणसाच्या देशावर आहे हें विसरतां कामा नये. व चागला माल परदेशीं पाठविण्यास ज्याप्रमाणें इतर देश झटत आहेत त्याप्रमाणेंच आपणहि येथें चागले कुली पैदा करून परमुलुखीं पाठविले पाहिजेत. या पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक देश काहीं ना कांहीं तरी जिन्नस विकवीत आहे, त्याप्रमाणेंच आपल्या देशानें कुलींचें पीक काढण्यात आघाडी मारली आहे व अलीकडे या जिनसांच्या वागणीच्या वागणी भरून आसामकडे रवाना होत असतात, आणि आपला माल आसामांत ओतून रिकाम्या वागणी परत आल्या म्हणजे नवीन माल त्यांना ताबडतोब भरतां यावा म्हणून बंगाल इलाख्यात ठिकाठिकाणीं हा माल सांठवून ठेवण्यासाठीं मोटमोठ्या कोठ्या, वखारी, डिपो, वगैरे तयार करण्यांत आलेले आहेत. त्याचप्रमाणें आनंदाची गोष्ट ही आहे कीं, मुंबई, मद्रास, वगैरे बंदरांतूनहि या मालाच्या आगबोटीच्या आगबोटी भरून झांझिबार मोरिशस, गिनी, नाताळ वगैरे ठिकाणीं पाठविण्यात येत आहेत. हा माल टिकाबू असून स्वस्त पडतो, म्हणून याला मागणी उत्तरोत्तर फार येण्याचा संभव आहे. म्हणून जितक्या कुलींची मागणी येईल तितका पुरवठा काळया माणसांनीं करण्याचें ओझें त्याच्यावर येऊन पडलें आहे. त्यातून पार पडण्याची शक्ति सर्वशक्तिमान् परमेश्वर त्याना देवो.

---

# विद्येचा उपयोग : : : : ८

● १८९७ च्या बावटळीमुळें हिंदुस्थानातील युरोपियन अंमलदारांचीं डोकीं फिरून गेलीं; त्यापैकीं जाइल्स हे एक होते. १८९९ सालीं प्रसिद्ध झालेल्या एतद्देशीय भाषेंतल्या ग्रंथांवर त्यांनीं आपला अहवाल सादर केला. त्याच्या पोरकट विधानाचा केसरीनेंहि चांगला समाचार घेतला. असें शिक्षण द्यावें कीं, त्यानें फक्त राजनिष्ठेचाच फैलाव होईल; डायरेक्टरानें तयार केलेल्या बोळ्यांतील दुधाशिवाय दुसरें दूधच प्यावयास मिळूं नये—अशीं त्यांचीं मतें व शिफारस होती.

हिंदुस्थानांतील लोकांना शिक्षण द्यावें किंवा न द्यावें, आणि तें द्यावयाचें असल्यास कोणत्या प्रकारचें द्यावें याविषयीं वाटाघाट चालली असतां इ. स. १८३८ या सालीं सर चार्लस एडवर्ड ट्रेव्हेलियन यानीं या विषयावर आपले अतिशय सुंदर विचार प्रसिद्ध केलेले आहेत. ते जुने झालेले असले तरी ते नव्यासारखे शोभण्याला हरकत नाहीं. ते इ. स. १८३८ सालीं लिहिले काय आणि इ. स. १८९८ सालीं लिहिले काय सारखेच. कोणत्याहि वर्षाला ते नवेच आहेत. आणि कितीहि वर्षे लोटलीं तरी तीं त्या विचारांवर जरेची छाया आणण्याला कधींहि समर्थ होणार नाहींत. म्हणून ते हृदयंगम आणि बोधप्रद विचार आम्ही आपल्या वाचकांपुढें मांडतों.

ट्रेव्हेलियन साहेब म्हणतात कीं, हिंदुस्थानांतील लोकांना शिक्षण द्यावें किंवा नाहीं यासंबंधानें आपण जे इंग्रज लोक हिंदुस्थानावर राज्य करीत आहों त्यांचें कर्तव्यकर्म काय आहे याबद्दल कोणामध्यें मतभेद असण्याचें

कारणच नाहीं. तरी पण कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांना शिक्षण देणें हें कदाचित् आपलें कर्तव्यकर्म असेल, पण त्यांत आपला फायदा मात्र खास नाहीं. कारण ते सुशिक्षित झाले म्हणजे त्यांना आपली गरज राहणार नाहीं. आणि त्याना ज्ञान देणें म्हणजे त्यांच्या अंगात एक प्रकारचें सामर्थ्य उत्पन्न करण्यासारखें आहे. आणि त्या सामर्थ्याचा पहिला उपयोग ते आपल्या विरुद्ध केल्यावांचून कधींहि सोडणार नाहींत. परंतु ट्रेव्हेलीयन साहेबाचें या आक्षेपावर असें म्हणणें आहे कीं, या बाबतींत आपलें कर्तव्यकर्म आणि आपलें नफानुकसान या परस्परांत जर विरोध येत असेल तर त्यापैकीं कोणाचें अवलंबन करावयाचें हें प्रत्येक सुज्ञ माणसाला, प्रत्येक प्रामाणिक इंग्लिश मनुष्याला पूर्णपणें समजत आहे. राज्य करण्यातील मुख्य हेतु कोणता हें इंग्लिश लोकांना इंग्लंडांतील अनुभवावरून पक्कें समजून चुकलें आहे. तेव्हां जर आपल्याला हिंदुस्थानावर राज्य करावयाचें असेल तर तें हिंदुस्थानातील लोकांच्या कल्याणासाठींच केलें पाहिजे. कांहीं थोड्याशा निग्रोंना गुलामगिरींतून सोडविण्यासाठीं ज्या राष्ट्रानें इतके भगीरथ प्रयत्न केले त्याच राष्ट्रानें—आमच्या इंग्लंडनें—हिंदुस्थानातील लोकांपासून उकळलेल्या कराच्या पैशाच्या जोरावर चालविलेल्या राज्यधोरणाच्या साधनानें हिंदुस्थानांतील कोट्यावधि लोकांना अज्ञानाच्या बंदिवासांत ठेवण्याला उद्युक्त व्हावें, हें पाहून कोणाच्याहि अंगावर शहारे आल्यावांचून राहणार नाहींत. हिंदुस्थानावर आमचें राज्य दहाशें वर्षें टिको किंवा दहा वर्षें टिको, परंतु हिंदुस्थानासंबंधानें आमचें जें कर्तव्यकर्म आहे तेंच आम्ही करूं. आमची सत्ता कोणत्या साधनानें किती दिवस अधिक टिकेल हा विचार मुख्य नव्हे, तर हिंदुस्थान आपल्या हातांत जोंपर्यंत ठेवण्याची ईश्वराची मर्जी आहे तोंपर्यंत आपण तेथील राज्यकारभार बरोबर करतों आहों किंवा नाहीं इकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. परंतु या ठिकाणीं आपलें कर्तव्यकर्म आणि कल्याण यांच्यामध्यें विरोधच उत्पन्न होत नाहीं.

हिंदु लोकांना शिक्षण देण्याचें कर्तव्यकर्म आपण केलें म्हणजे त्यांतच आपलें कल्याण कसें होणार आहे हें पुढील विवेचनावरून लक्षांत येण्यासारखें आहे. आपण हिंदु लोकांना इंग्रजीचें शिक्षण दिलें तर त्यापासून

त्यांच्या व आपल्या मधील संबंध दृढ झाल्यावांचून कधींहि राहणार नाहीं. आपल्या इंग्रजी भाषेंतील ग्रंथसमूह वाचून त्यातील रीतीभातींची हिंदुविद्यार्थ्यांना पूर्ण गोडी लागली म्हणजे इंग्रज हे परकीय लोक आहेत हा विचार त्यांच्या मनातसुद्धां येईनासा होतो. आपल्यापैकीं मोठ्या लोकाविषयीं आपण जितक्या अभिमानानें बोलतों तितक्याच अभिमानाने तेहि पण बोलू लागतात. जें आपल्याला शिक्षण तेंच त्यांना शिक्षण, ज्यांत आपलें कल्याण त्यांतच त्यांचें कल्याण, व जे आपले व्यवसाय तेच त्याचे व्यवसाय, अशी स्थिति करून सोडली म्हणजे त्याच्यांत हिंदुत्वापेक्षा इंग्रजीपणाचाच जास्त संचार होईल. रोमनें जे प्रांत जिंकले होते त्याचीहि रोमनें अशीच स्थिति केलेली होती. त्यामुळें गॉल, इटालियन, वगैरे लोक पक्के रोमन बनले होते. आपण आज इंग्लिश आहों. पण हे तरी आपण कशानें झालो ? तर नेहमीं इंग्लिश लोकांत बसण्याउठण्यानें, बोलण्याचालण्यानें आणि इंग्लिश लोकांच्या आचाराविचाराचे अनुकरण केल्यानें. जर आपण अशा रीतीनें इंग्लिश बनतों तर हिंदुहि त्याच रीतीनें इंग्लिश कां बनणार नाहींत ? हिंदु लोक नेहमीं आपले इंग्रजी ग्रंथ वाचीत आहेत. त्यामुळें त्यांचा आपल्याबद्दल उत्तम ग्रह झालाच पाहिजे. शिवाय हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं आम्ही आपल्या राज्यकारभारांत किती खटपट करीत असतों हें आपण त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिलें म्हणजे आपल्या कामाला अडथळा न करतां उलट ते आपल्याला साह्यच करूं लागतील, व साहसाचे उपाय योजण्याला ते कधींहि प्रवृत्त होणार नाहींत. कारण त्याची जी वास्तविक अडचण असेल ती दूर करण्याला आम्ही कधींहि कांकूं करीत नाहीं, अशी सहवासाच्या योगानें त्यांची खात्री झालेली असेल. जे लबाड आणि वाईट राजे असतात ते मात्र आपल्या प्रजेच्या अज्ञानानें आपला फायदा करून घेतात. परंतु आपली गोष्ट तशी नाहीं.

पण याशिवाय आणखीहि एक निराळा विचार आहे. आपली स्थिति सुधारावी ही इच्छा प्रत्येकाच्या मनांत आहे व आपलें राष्ट्र उन्नतीला यावें आणि त्याची इभ्रत वाढावी ही इच्छा प्रत्येक समाजाला असणारच. व ह्या इच्छेमुळेंच जगांतील सर्व मोठमोठ्या घडामोडी होत आहेत. तेव्हां ही जी एक मनुष्याच्या मनांत अद्भुत शक्ति आहे तिचा जर आपण आपल्या

फायद्याकडे उपयोग करून घेतला नाहीं तर तिचा उपयोग आपल्या नाशासाठीं झाल्यावांचून कधींहि राहणार नाहीं. कारण ती शक्ति कधीं स्वस्थ असावयाची नाहीं. नेटिव लोकांच्या पूर्वीच्या स्वातंत्र्याविषयींचेच विचार जर आपण त्यांच्या मनात नेहमीं घोळूं दिले, तर इंग्लिशांना येथून पार हाकून देणें हाच काय तो आपली स्थिति सुधारण्याला रामबाण उपाय आहे असें त्यांना वाटेल. जुन्या पद्धतीचा नेटिव देशाभिमानी म्हटला म्हणजे त्याच्या विचाराची धांव याच्या पलीकडे जावयाचीच नाहीं. परंतु त्याच्या विचाराला जर कांहीं नवीन दिशा लावून द्यावयाची असेल तर ती युरोपियन शिक्षणावांचून कधींहि लावून देतां यावयाची नाहीं. आपल्या शाळांतून वाढलेल्या तरुण नेटिव लोकांना त्याचे वाडवडील पूर्वी ज्या रानटी आणि जुलुमी राज्यपद्धतीनें गांजले जात होते त्या राज्यपद्धतीचा अगदीं किळस येतो. व आतां आपण आपल्या राष्ट्रीय संस्था इंग्रजाच्या धर्तीवर सुधारीत नेऊं असें त्यांना वाटत असतें. त्यासाठीं आमचा तिटकारा न करतां ते आमच्यांत मिसळूं लागतात. व त्यांचें संरक्षण आणि कल्याण जें काय व्हावयाचें तें आमच्या हातून होणार असा त्याचा ग्रह बनून जातो. आम्ही जसें वागतों तसें आपण वागावें ही त्यांची मग अतिशय मोठी महत्त्वाकांक्षा होऊन बसते. आणि इंग्रजांच्या कृपेच्या छत्राखालीं आपल्या देशबांधवाची स्थिति क्रमाक्रमानें आपण सुधारूं अशी आशा त्यांच्या मनांत खेळूं लागते. अशा रीतीनें इंग्रजांना हाकलून लावण्याची कल्पना जी त्यांच्या डोक्यांत रात्रंदिवस घोळत राहिली असती ती नाहींशी होते; इतकेंच नव्हे तर, आत्मोन्नतीची त्यांच्या डोक्यांत अशी एकहि कल्पना कधीं शिरत नाहींशी होते कीं, जिच्या योगानें परिणामीं इंग्लिश लोकांशीं असलेल्या नेटिवाच्या संबंधाचा फांसा अधिक घट्ट बसत नाहीं. या उपायानें अशी स्थिति येऊन पोंचते कीं, स्वतःच्या उन्नतीसाठीं ते जी जी म्हणून कल्पना काढतील त्या त्या बाबतींत त्यांना इंग्लिशांची विद्या आणि संरक्षण यांजवर अवलंबून राहावें लागतें व फिरून आपलें जुनें राज्य स्थापित झालें तर मग आपले प्रिय संकल्प शेवटास जाणार नाहींत व आपल्या स्वतःच्या शरीराला कदाचित् अपाय होईल, अशी त्यांना भीति वाटत असते.

इंग्लंड आणि हिंदुस्थान हे देश एकमेकांपासून इतके दूर आहेत कीं,

त्यांच्यामध्यें हल्लीं जडलेला संबंध चिरकाल टिकेल हें मुळींच संभवनीय नाहीं. आपण राज्यकारभागाचें धोरण कसेंहि ठेविलें तरी केव्हां तरी नेटिव लोक आपली स्वतंत्रता अखेरीस परत मिळविणार हें खास. व त्या युक्तीनें आपणाला प्रतिबंध करता येणें शक्य नाहीं. हिंदु लोकांनीं आपलें स्वातंत्र्य मिळविण्याचे दोन मार्ग आहेत: एक राज्यक्रांतीचा आणि दुसरा सुधारणेचा. राज्यक्रांतीचा मार्ग आकस्मिक आणि अघोर आहे. परंतु सुधारणेचा मार्ग शांततेचा आहे व त्याचें आक्रमण हळूहळू करावयाचें असतें. पहिल्या उपायानें इंग्रज आणि नेटिव यांच्या मनांत अतिशय बेबनाव होईल. परंतु दुसऱ्या उपायानें दोघांच्या मधील सख्य दिवसेंदिवस वाढत जाईल.

तेव्हां आतां या वरील दोन मार्गांपैकीं नेटिवांना पहिल्या मार्गाचें अवलंबन करूं न देता त्यांची दुसऱ्या मार्गाकडे प्रवृत्ति करण्यासाठीं युरोपियन लोकांच्या धर्तीवर सुधारणा करून घेण्याकडे त्यांचें मन आपण लाविलें पाहिजे. असें केलें म्हणजे जुन्या इंडियन पद्धतीवर आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची त्यांची इच्छा नाहींशी होईल. त्या योगानें आकस्मिक राज्यक्रांतीची भीति उरणार नाहीं. आणि मग आपला हिंदुस्थानाशीं जडलेला संबंध खात्रीनें पुष्कळ दिवस टिकेल. मराठ्यांचें किंवा मुसलमानाचें जुलमी राज्य एका महिन्यांत स्थापन करता येईल. परंतु युरोपियन पद्धतीप्रमाणें स्वराज्य चालविण्याच्या कामांत लोकांनीं निष्णात होण्याला शंभर वर्षें तरी पुरतील किंवा नाहीं याची शंकाच आहे. तेव्हां अशा प्रकारचें राज्य-कारभाराचें शिक्षण मिळून एखादें राष्ट्र तयार होण्याला अवश्य पुष्कळ काळ लोटला पाहिजे. तेव्हां हे शिक्षणाचें काम राष्ट्रांत चालू आहे, तोंपर्यंत आपल्याला कोणत्याहि प्रकारची भीति नाहीं. आपणच नेटिव लोकांना उन्नतावस्थेला नेण्याकरितां झटत आहों असें नेटिवांनीं पाहिलें म्हणजे अर्थात् ते आपणाविरुद्ध उठणार नाहींत. आणि राष्ट्रांतील एकंदर उत्साहबुद्धीचा युरोपियन शिक्षण मिळण्याच्या कामीं आणि युरोपियन संस्था आपल्या देशांत लोकप्रिय करण्याच्या कामीं शांतपणें आणि पूर्णपणें व्यय होऊं लागेल. व युरोपियन धर्तीवर आपल्या राष्ट्राला उन्नत करावयाच्या कामीं आपल्याला इंग्रजाचें संरक्षण अवश्य पाहिजे आहे, हें त्यांच्या मनांत बाणलेलें असलें म्हणजे सुशिक्षित लोकांचा वर्ग साहजिकपणेंच आपल्या बाजला येऊन मिळेल.

व ते आतांहि येऊन मिळत आहेत. ज्यांचीं मतें इंग्रजी धर्तीवर बनलेलीं आहेत त्यांना जितकी आपली आवश्यकता आहे तितकी आपल्या प्रजेपैकीं दुसऱ्या कोणत्याहि वर्गाला नाहीं. अगदीं निवळ नेटिव राज्य झालें तर त्यांत त्यांचें नुकसान आहे. मध्यंतरींच जर नेटिव राज्य स्थापन झालें, तर त्या-पासून त्यांना प्रत्येक बाबतींत भीति आहे. त्याना इंग्रजी पद्धतीचें शिक्षण मिळालेलें आहे एवढ्यावरून लोक त्यांचा छळ करूं लागतील. त्यांच्या स्वतंत्रतेच्या कल्पना, वाङ्मय आणि शास्त्र याविषयीं त्यांचे उद्योग, आणि इंग्रजी राज्य असतांना ‘ ही सुधारणा करूं, ती सुधारणा करूं.’ अशा प्रकारच्या त्यांच्या मनांत असलेल्या आशा, या सर्व गोष्टी एकदम लयाला जातील. या रीतीचें शिक्षण मिळालेल्या लोकाचा वर्ग हल्लीं (१८३८) फार लहान आहे, हें खरें. परंतु निरनिराळ्या पाठशाळांतून दरसाल तयार होत असलेल्या लोकांची भर यांत पडत असल्यामुळें कांहीं वर्षांनीं अशा मताच्या लोकांची संख्या पुष्कळ वाढेल. आणि मग त्याच्या वृद्धिंगत झालेल्या ज्ञानाच्या मानानें त्यांना नवीन नवीन राजकीय संस्थातील हक्क आपण दिले पाहिजेत.

अशा रीतीनें शांतपणानें आणि क्रमाक्रमानें लोकाच्या विचाराची दिशा अगदीं बदलून जाईल. या मार्गाचें अवलंबन केलें असतां नेटिवांच्यांत आणि आपल्यांत वाद किंवा तंटा कधींहि उपस्थित होणार नाहीं; व स्वतंत्रतेचा योग्य उपयोग कसा करावा हें नेटिवांना समजूं लागलें म्हणजे मग त्यांच्या हातांत स्वतंत्रता देण्याला कोणतीहि हरकत पडणार नाहीं. आपण त्यांना स्वतंत्रता दिली म्हणजे मग ते आपली प्रजा म्हणून त्यांच्या-पासून आपल्याला फायदा होणार नाहीं हें खरें. पण जरी ते आपली प्रजा नसले तरी ते आपले उत्तम दोस्त होतील व आपल्या दोस्तांपासूनहि आपला फायदा आहेच. हल्लीं राज्यकारभाराची जी पद्धत आहे, तेच्या योगानें कांहीं विवक्षित कुटुंबाचा फायदा होत आहे. परंतु कच्चा माल उत्पन्न करण्याच्या कामीं साऱ्या जगांत पहिल्या नंबरचा देश जो हिंदुस्थान, आणि त्या कच्च्या मालाचा पक्का माल बनविण्याच्या कामांत साऱ्या जगांत पहिल्या नंबरचा देश जो इंग्लंड, या दोन्ही देशांच्यामध्यें व्यापारसंबंधानें कायमचें ऐक्य राहिलें तर आपल्या राष्ट्राच्या सामर्थ्याचा आणि वैभवाचा

तो एक अतिशय दृढ पाया होईल यांत शंका नाहीं. अशा रीतीनें गोष्टी घडून आल्या तर हिंदुस्थान इंग्लंडपासून निराळें झालें असें कोणालाहि वाटण्याचें कारण नाहीं. जित आणि जेते असा जो हल्लींचा क्षणभंगुर संबंध त्यांच्या आणि आपल्यामध्ये आहे तो हळू हळू नाहींसा होऊन पुष्कळ दिवस टिकणारा आणि पुष्कळ फायदा करून देणारा असा मित्रत्वाचा संबंध त्याच्या व आपल्यामध्यें उत्पन्न होईल. सुख आणि स्वतंत्रता म्हणजे काय असतात हें आपण त्याना शिकविलें, व आपली विद्या आणि आपल्या राजकीय संस्था याचें शिक्षण आपण त्याना दिलें, तर हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य ही इंग्रज लोकाच्या परोपकारबुद्धीची एक मोठी साक्षच होऊन राहील. आणि आपण उदार शिक्षण आणि उदात्त राजकीय धोरण याचें अवलंबन केल्याबद्दल हिंदुस्थानातील लोक आपल्यावर प्रीति करतील. व त्याच्या आणि आपल्या देशाच्या दरम्यान व्यापारसंबंधीं दळणवळण कायमचें चालू राहील. हेंच आपल्या श्रमाचें फळ होय.

या पद्धतीचे अवलंबन करणें ही एक नवीनच तऱ्हा आहे असें कोणाला वाटेल. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. पूर्वी रोमन लोकानींहि याच मार्गाचें अवलंबन केलें होतें. रोमनलोकानी युरोपखंडातील सर्व राष्ट्रामध्यें सुधारणेचा फैलाव केला आणि अशा रीतीनें इतर लोकाना त्यानीं प्रत्यक्ष रोमन लोकच करून सोडलें. त्यामुळें साहजिकपणेंच त्या लोकाची रोमन राज्यावर भक्ति जडली. रोमन लोक हे आपण जिंकलेल्या लोकाना रोमन ग्रंथकाराचे ग्रंथ आणि रोमन शिल्पकाराचें शिल्पशास्त्र शिकवीत असत. आणि जे रोमन विजयी योद्धे असत त्यांच्याशीं युद्ध करून त्यांचा पराभव करण्याची इच्छा कोणाला होऊं नये या हेतूनें 'हे पहा आमचे योद्धे कसे शूर आहेत! याच्यासारखे तुम्ही व्हा,' इत्यादि विचार ते नेहमीं इतर लोकाचे मनात भरवून देत असत. रोमन लोक ज्याप्रमाणें लढाईत शूर होते त्याप्रमाणें ते शांततेच्या काळात शहाणेहि होते. म्हणून लढाईत शौर्यानें ते जे मुलूख संपादन करीत ते त्याच्या शांततेतील शहाणपणाच्या योगानें त्याच्याकडे चिरकाल चालत असत. आणि जरी रोमन लोकाच्या हातून नवीन मुलुख संपादन करताना युद्धाच्या प्रसंगीं अनेक अघोर कर्मे होत असत, तरीहि शांततेच्या वेळचे अनेक फायदे पाहून लोक पूर्वीचीं अघोर कर्मे सहज विसरून जात.

इटाली, स्पेन, आफ्रिका आणि गॉल येथील लोकांची महत्त्वाकांक्षा, रोमन लोकांचें अनुकरण करावें आणि त्यांना जे हक्क आहेत ते आपण संपादन करावे, याशिवाय दुसरी नव्हती. आणि रोमन लोक व त्यानीं जिंकलेला मुलुख यांनीं मिळून मोठें थोरलें बनलेलें जें रोमन साम्राज्य तें अखेरीस जेव्हां मोडून त्याचे तुकडे तुकडे झाले, तेव्हा आतील बंड आणि फितुरी यांनीं त्या साम्राज्याचा नाश झाला नाहीं, तर बाहेरच्या काहीं आकस्मिक कारणांनीं तें लयाला गेलें. आणि त्यावेळीं रोमन लोकांच्या नाशाबरोबरच रोमन राष्ट्रातील जिंकलेल्या लोकाचाहि पूर्णपणें नाश झाला. पूर्वी एका काळीं आपला रोमन लोकांशीं जसा संबंध होता तसा आपल्याशीं हिंदुलोकांचा संबंध जडण्याचा संभव आहे. टॅसिटसच्या इतिहासावरून असें कळतें कीं, ब्रिटनमधील पुढारी लोकांच्या मुलाना रोमन वाङ्मय आणि शास्त्र यांसंबंधी शिक्षण देण्याची, आणि रोमन लोकाच्या सुधारलेल्या चालीरीतींची त्यांना गोडी लावून देण्याची कल्पना जुलियस अग्रिकोला यानें काढिली. व त्याच्या युक्तीला किती यश आलें हें आपल्याला माहीत आहेच. कारण रोमन लोकाशीं शत्रुत्वानें वागण्याचें सोडून देऊन ब्रिटनमधील लोक त्याचे मोठे विश्वासू मित्र बनले. आणि त्यांच्या पूर्वजानीं रोमन लोकांच्या स्वाऱ्यांना जितका प्रतिबंध केला होता, त्याच्याहून अधिक जोराची खटपट त्यांनीं रोमन लोकांचें राज्य आपल्यावर राहावें म्हणून केली. आतां रोमन लोकापेक्षां आपल्यापाशीं किती तरी अधिक साधनें आहेत, असें असून त्यांचा जर आपण उपयोग करून घेतला नाहीं, तर तें बरोबर होणार नाहीं. व आपल्याला अवेळींच हिंदुस्थानातून जाण्याचा प्रसंग आला तर त्यांत हिंदुस्थानचें अतिशय मोठें नुकसान आहे, असें जर आपण हिंदुस्थानांतील लोकांच्या मनावर बिंबवून ठेवूं शकलों नाहीं, तर ती आपल्याला खरोखर मोठ्या शरमेची गोष्ट आहे. पुढील काळच्या लोकांना असें म्हणण्याला आपण जागा ठेवतां कामा नये कीं, रोमन लोकांचें साम्राज्य नष्ट झाल्यामुळें ब्रिटनच्या लोकांनीं दुःखाचे सुस्कारे टाकले हें जरी खरें असलें, तरी हिंदुस्थानांतील लोक जे दुःखाचे सुस्कारे टाकीत आहेत ते ब्रिटिश साम्राज्य लयाला न जातां अजून टिकलें आहे अशासाठीं होत.

वर नमूद केलेले हे विचार केवळ काल्पनिक आहेत असें कोणाला वाटेल, परंतु तसें नाहीं. तर प्रत्यक्ष अवलोकनानें व अनुभवानें वरील विचारांची

सत्यता माझ्या मनावर ठसलेली आहे. मी हिंदुस्थानांतील निरानिराळ्या भागांत कित्येक वर्षे काढलीं आहेत. आणि जेथें जेथें मी गेलों तेथें तेथें माझ्या असें प्रत्योत्पत्तीस आलें कीं, आमचा अम्मल हिंदुस्थानात नवीनच स्थापन झालेला असल्यामुळें आणि नेटिव लोकांच्या विचाराची दिशा बदलण्याविषयीं आम्हीं कांहींच प्रयत्न केलेला नसल्यामुळें राष्ट्रांतील सर्व लोकांच्या विचाराचें धोरण सदासर्वदा एकाच मार्गाकडे जात आहे. जे लोक पाहावे ते—मग ते उच्च वर्णाचे असोत, किंवा कनिष्ठ वर्णाचे असते, श्रीमंत असोत किंवा गरीब असोत—त्या सर्वांना असें वाटत असे कीं, आपल्या देशाची राजकीय स्थिति सुधारण्याला काय तो एकच मार्ग आहे. वरच्या प्रतीच्या लोकांना आपलें पूर्वीचे वर्चस्व आपल्याला बहुतकरून पुन्हा लवकरच प्राप्त होईल अशी नेहमीं आशा लागलेली असे. आणि आपलें नेटिव राज्य फिरून स्थापन झालें म्हणजे संपत्ति आणि लौकिक यांचे दरवाजे पुन्हा एकदा आपल्याला खुले होतील असें खालच्या प्रतीच्या लोकाना वाटत होतें. आपल्या राष्ट्राची खालावत चाललेली स्थिति सुधारण्यासाठीं इंग्लिशाना येथून एकदम हाकून लावण्याशिवाय दुसरा काहीं मार्ग संभवनीय आहे ही कल्पना शहाण्यासुरत्या आणि इंग्लिशाविषयीं मनात प्रेमभाव बाळगिणाऱ्या नेटिवांच्यासुद्धां कधीं डोक्यात येत नसे. नंतर मी काहीं वर्षेपर्यंत बंगाल इलाख्यात राहावयास गेलों होतों. परंतु तेथील सुशिक्षित नेटिव लोकाच्या मनांत जे विचार घोळत होते ते कांहीं एका निराळ्याच तऱ्हेचे होते. इंग्लिश लोकाचे गळे कापण्याची कल्पना त्यांच्या डोक्यांत क्वचित्च घोळत असे. यांची सारी महत्त्वाकांक्षा म्हटली म्हणजे इंग्रजांच्या खुर्चीला खुर्ची लावून आपण जूरीमध्ये केव्हा बसूं आणि आपण मॅजिस्ट्रेट केव्हा होऊं, ही होती. पंजाबांतील लढाईचें काय होईल आणि नेपाळात राज्यकारस्थान काय चाललें आहे, असल्या भानगडींत ते मुळींच पडत नसत. तर त्यानीं आपल्या-आपल्यामध्यें वाग्विवाद करणाऱ्या मंडळ्या स्थापन केल्या होत्या. आणि या ठिकाणीं ते इंग्रजी भाषेमध्यें वक्तृत्व करीत, आणि छापण्याची कला व भाषणस्वातंत्र्य यांच्या योगानें आपले किती फायदे झाले आहेत याविषयीं ते चर्चा करीत बसत. त्यांच्यात जे म्हणून अतिशय उत्सुक होते त्याच्याहि आशेची धांव फारशी लांब जात नसे. राष्ट्राच्या प्रतिनिधींची एक सभा स्थापन करण्याचा हक्क आपल्याला कधींकाळीं प्राप्त झाला म्हणजे आपल्या

आशा शिखराला जाऊन पोहोंचल्या असें त्याना वाटे. आणि ही सर्व सुधारणा इंग्रज सरकारच्या मदतीनें आणि संरक्षणानेच आपल्याला करता येईल असें ते मानीत. आणि कदाचित् दुर्दैवानें फिरून मुसलमानी राज्य किंवा दुसरें एखादें नेटिव राज्य स्थापन झालें, तर आपले हे सर्व हेतु मुळींच सिद्धीस जाऊं शकणार नाहींत अशी त्याना भीति वाटे. आतां एवढें मात्र खरें आहे कीं, वर सांगितलेल्या देशोन्नतीच्या दोन मार्गांपैकीं लोकानीं कोणत्याहि मार्गाचें अवलंबन केलें तरी त्याच्या योगानें अखेरीस इंग्रजी अंमल लयाला जाणार हें खास. परंतु दोहोंमध्ये फरक हा आहे कीं, पहिल्या मार्गाचें लोकानीं अवलंब केलें तर इंग्रजी राज्याचा समूळ उच्छेद हीच त्याची पहिली पायरी होय. परंतु लोक दुसऱ्या मार्गानें गेले तर आपलें राज्य त्यांच्यावर पुष्कळ दिवस टिकेल आणि ते आपलें राज्य चालविण्याला योग्य झाले म्हणजे हळूंहळूं त्याचें राज्य त्यांच्या हवालीं करण्यास आपल्याला ठीक पडेल.

---

## भाषांतराचा हेतु : : : : १

● जिकडे तिकडे राजद्रोह फैलावला आहे. त्यांच्या प्रवर्तकाविरुद्ध मोहीम काढली पाहिजे असा प्रचार त्या काळात आपलींच माणसे करीत असत. अंमलदार लोकात बडेजाव व्हावा एवढीच त्यांची अपेक्षा. वर्तमानपत्रांतील लेखाचीं भाषांतरें करून तीं सरकारला व अँग्लो-इंडियन पत्राना मोफत पुरविण्याचे या लोकानी कारखानेच घातले होते.

अलीकडे पुणे आणि मुंबई या ठिकाणीं एक ट्रँ लेटर्सचें ऑफिस निघालें आहे. रिपोर्टर ऑफ् धि नेटिव प्रेसचें ऑफिस किंः प्रेस कमिटोचें

ऑफिस यामध्यें ज्या प्रकारचें काम चालतें त्याच प्रकारचें बहुतेक अंशीं काम या नवीन ऑफिसांत चालतें. मात्र फरक एवढाच आहे कीं, वरील दोन ऑफिसें सरकारचीं आहेत. व ट्रॅन्स्लेटर्सचें ऑफिस हें खासगी आहे. तरी पण विद्वत्तेचा विचार कर्तव्य असेल तर सरकारी ऑफिसांतील नोकरां· इतकेच विद्वान् लोक या खासगी ऑफिसातहि आहेत. कदाचित् कांहीं कांहीं लोक तर त्याच्याहून अधिक विद्वत्तेचेहि यांत सांपडणें अशक्य नाहीं. सरकारी ऑफिसांतील लोकाना सरकारी पगार मिळतो. पण या ऑफिसातील लोक पदरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजत असतात. सरकारी भाषांतरकर्त्यांना म्हातारपणीं पेन्शन मिळतें. पण यांना तसें कांहीं मिळत नाहीं. यांच्या या सत्कृत्याबद्दल लोक यांना काय दुवा देतील तेंच काय तें याचें पेन्शन. सरकारनें आपल्या ऑफिसला चागल्या इमारती बांधून दिल्या आहेत. पण या ऑफिसाला अजून चागलीशी जागा मिळाली नाहीं. आज यांच्या घरीं तर उद्यां त्याच्या बंगल्यावर, अशी या ऑफिसाची जागेमुळें फार तारांबळ उडते. तसेंच या ऑफिसची वेळहि जरा आडनीडच पडते. सरकारी ऑफिसची वेळ म्हटली म्हणजे ११ पासून ५ पर्यंतची असते. परंतु तीचा वेळ या ऑफिसला लागू पडत नाहीं. कारण यातील बहुतेक लोकाचा ११ पासून ५ पर्यंतचा वेळ उजळमाथ्यानें करण्यासारखीं उदरनिर्वाहाचीं जीं कामें करावयाचीं असतात तीं करण्यांत खर्च होतो. त्यामुळें त्याना भाषांतरें करण्याला रात्रीशिवाय दुसरा वेळ नाहीं. या ऑफिसापैकीं काहीं रिकाम-टेकड्या लोकांना दिवसाचाहि वेळ असतो. पण त्यांना भाषातरें करण्याची अक्कल नसते. त्यामुळें हें ऑफिस बहुधा रात्रीचेंच भरविण्यांत येत असतें. यांतील प्रमुख लोक भाषांतर करावें किंवा न करावें, केल्यास कोणत्या पत्रांतील कोणत्या लेखाचें करावें, व केल्यानंतर तें कोणत्या इंग्रजी पत्राकडे पाठवावें, वगैरे गोष्टी ठरवून देतात. नंतर भाषातर तयार होतें. तेथें जे काहीं प्रतिष्ठित ह असतात त्यांना आपल्या हातून कांहीं तरी देशसेवा घडावी असें वाटत असतें. परंतु त्यांच्या डोक्यांत तितकी बुद्धि नसते. म्हणून यथाशक्ति देश-सेवा करण्याच्या हेतूनें कोणी दौतींत शाई भरतो, कोणी टीपकागद पुढें करतो, कोणी लखोटा चिकटवितो, कोणी भाषांतर लिहून त्रासलेल्या डोक्याला शांत करण्यासाठीं ... नीं तोंडांत धरलेली विडी काडी काढून

पेटवून देतो, व कोणी लखोटा पोस्टांत नेऊन टाकतो. अशा रीतीनें श्रम-विभागाच्या जोरावर या ऑफिसांतील काम पार पाडण्यांत येतें. हें स्वतःच्या खर्चानें खाजवून खरूज काढण्याचें ऑफिस अज्ञान लोकांना कदाचित् पसंत पडणार नाहीं, सबब त्याच्याविषयीं लोकाच्या मनांत अनुकूल ग्रह उत्पन्न करण्यासाठीं वर्तमानपत्रातून या सत्कार्याच्या मंडनासाठीं लेख येणें फार जरूर वांटल्यावरून काहीं वर्तमानपत्रांची मदत या ऑफिसानें घेतलेली आहे. वरिष्ठ प्रतीच्या लोकाना या कृत्याचें महत्त्व आणि याची अवश्यकता कळलेली असते, परंतु कनिष्ठ लोकाना याची किंमत कळलेली नसते. म्हणून कनिष्ठ लोकांत प्रसार होण्यासाठीं ह्या मताच्या प्रतिपादनार्थ मुद्दाम कनिष्ठ पत्रें निवडून घेण्यांत आलेलीं आहेत. त्या एक दोन पत्रांतून असा युक्तिवाद प्रतिपादित केलेला आढळतो कीं, आम्ही भाषांतर करतों यात गैर तें काय ? जो मजकूर वर्तमानपत्रांतून सर्वांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध झालेला असतो त्याचें भाषांतर इंग्रजींत करून साहेब लोकांना कळविलें तर त्यांत आम्हीं काय घोडें मारलें, असें ते विचारतात. सामान्यजनसमूहाचें याच्या विरुद्ध इतकेंच म्हणणें आहे कीं, वर्तमानपत्रांतील लेख प्रसिद्धीकरि-ताच असतात हें खरें. तरी पण त्याचें भाषांतर करण्याचें तुमचें काम नसतांना तुम्ही तें आपल्या अंगावर घेता, यामुळें तुम्ही चहाडी करता असें होतें. व लोक तुम्हाला जीं नांवें ठेवितात तीं भाषांतर करण्याबद्दल नव्हेत, तर चहाडी करण्याबद्दल होत. भाषांतर करणें जरी चांगलें असलें तरी चहाडी करणें चांगलें नाहीं, असें कित्येक अडाणी लोकांचें मत आहे. पण वरील आक्षेप काढतांना आमच्या मतें हे लोक एक गोष्ट विसरतात ती ही कीं,सरकारला कोणत्याहि गुन्ह्याबद्दल बातमी देणें म्हणजे चहाडी करणें नव्हे, तर ते प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे; तो सद्गुण आहे, दुर्गुण नव्हे; यावर अडाणी मताचे लोक ताबडतोब असें उत्तर देतात कीं, ही गोष्ट आम्हाला अगदीं कबूल आहे. अशा बुद्धीनें आम्ही स्वतःहि प्रत्येक गुन्ह्याची वर्दी सरकारला देण्याला तयार आहों. पण या ट्रॅन्स्लेटर्सच्या ऑफिसांमधील कारकुनांचा तो उद्देश नसतो. ते स्पष्ट असें म्हणतात कीं, काहीं वर्तमानपत्रकार लोकसमाजापुढें आमच्या मताची टर उडवितात, तर त्याच्याबद्दल इंग्रजी समाजापुढें आणि सरकारपुढें त्या पत्र-कारांचा आम्ही बदलौकिक केल्यावाचून कधीं राहणार नाहीं. अशी बुद्धि

जेथें भाषांतर करण्याच्या मुळाशीं आहे तेथें ती राजनिष्ठा म्हणावी कीं येन-केन प्रकारेण सूड घेण्याची प्रबल इच्छा म्हणावी ? व अशा लोकांची राज-निष्ठेसाठीं तारीफ करावी किंवा हलकटपणासाठीं निर्भत्सना करावी ? असे वर्मी धरून अडाणी लोकानीं प्रश्न विचारले म्हणजे मनुष्य निरुत्तर होतो. व ते लोक आणखी असेंहि सुचवितात कीं, या लोकांच्या पोटांतील हेतु खासगी द्वेषाचा असल्यामुळें एखादे वेळीं नसतीं खोटीं विधानें करून हे लोक सरकारला भलतीकडेच वाहवून नेतील; तरी सरकारनें या आपल्या बाह्यात्कारी मित्रावर आणि आगंतुक मदतगारावर किती विश्वास ठेवावा याचा विचार करणें जरूर आहे.

---

## हिंदुस्थान आणि ट्रान्सव्हाल : : १०

सर्व कुत्र्यांत पारध्यापाशीं जे कुत्रे असतात ते फार वाईट. कारण त्यांनीं आपली स्वतःची मान पारध्याच्या साखळदंडात अडकविलेली असते ती असतेच, आणि शिवाय रानातील दुसऱ्याहि श्वापदाच्या माना पारध्याच्या हातात आणून देण्याला ते साधनीभूत होतात. तसेंच सर्व प्राण्यात ज्याचें मांस मासे मारणारे लोक आपल्या गळाच्या टोकाला लावितात तो फार वाईट. कारण तो आपण स्वतः मरतो तो मरतोच आणि पुन्हा आपल्या मांसाच्या योगानें पाण्यात स्वैर विहार करणाऱ्या माशांचा प्राण घेण्याला तो कारणीभूत होतो. आणि दुर्दैवानें हिंदुस्थानालाहि आज हीच स्थिति प्राप्त झाली आहे. पारध्याच्या हातांतील कुत्रा, गळाला ज्याचें मास टोचलें जातें तो प्राणी, व आजच्या स्थितींत हिंदुस्थान देश यांच्यांत फारसा फरक

नाहीं. जें पातक त्या कुत्र्याच्या किंवा प्राण्याच्या हातून होतें, तेंच हिंदुस्थानच्या हातून आजपर्यंत कित्येक वेळा झालें आहे व याच्यापुढें अनेक वेळां होण्याचा संभव आहे.

हिंदुस्थान देश हा इंग्लंडचा अंकित झालेला आहे. पण या गोष्टीबद्दल आतां वाईट वाटण्याचें कारण राहिलें नाहीं. ज्याप्रमाणें व्यक्तीला प्रारब्ध असतें त्याप्रमाणेच तें राष्ट्रालाहि असते. व ज्याच्या त्याच्या प्रारब्धाप्रमाणें ज्याला त्याला फळ भोगावें लागतें. आता हिंदुस्थानदेश स्वतः परतंत्र होऊनच स्वस्थ राहिला असता, तर वरील वेदांतातील तत्त्वानुसार खेद मानण्याचें फारसें कारण नव्हतें. आपण बुडणारा मनुष्य दुसऱ्यालाहि आपल्या बरोबर बुडवीत असतो. एखादी दुर्दैवी स्त्री प्रथमतः वेश्या होते. पण जी प्रथमतः वेश्या होते ती पुढे हळू हळू कुट्टिनी बनते; आणि तेव्हा मात्र ती असह्य, अक्षम्य आणि भयंकर होते. आपलें पातिव्रत्य जिला वाटेल ती स्त्री झुगारून देण्याला हल्लींच्या नीतीप्रमाणें अधिकृत असेल. पण ती जेव्हां आपल्या स्वतःच्या पातिव्रत्याच्या चिंधड्या करून दुसऱ्या स्त्रियाच्या पवित्रतेची माती करून टाकण्याला प्रवृत्त होते, तेव्हा मात्र तिच्या कृतीबद्दल कोणालाहि खेद वाटल्यावाचून राहाणार नाहीं. हिंदुस्थान स्वतः इंग्लंडचें गुलाम बनलें आहे याबद्दल काहीं बोलताच येत नाहीं. पण जेव्हां या गुलाम राष्ट्राचा दुसरीं राष्ट्र गुलाम करण्याकडे उपयोग करण्यांत येतो, तेव्हां मात्र तें पाहून दुःखाचे उमाळे येऊन पोटात कालवूं लागतें. हिंदुस्थानानें आपलें स्वातंत्र्य दवडिलें आहे, आणि आज जें ट्रान्सव्हालचें राज्य अंशतः स्वतंत्र आहे त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याच्या कामीं तें इंग्लंडचें एक बलाढ्य आणि उत्तम असें साधन झालें आहे. हिंदुस्थान आपण परतंत्र झाले आहे, आणि दुसऱ्यांना आपल्यासारखें परतंत्र करीत आहे. आपल्या हतभाग्य देशाचा असा वाईट उपयोग झालेला पाहून कोणाचें अंतःकरण हळहळणार नाहीं !

जगातील स्वतंत्र राष्ट्राकडे पाहिलें तर काहीं एक निराळ्याच प्रकारचा देखावा दृष्टीस पडतो. कोणतेंहि राष्ट्र आपल्या स्वतंत्रतेसाठीं लढूं लागलें तर इतर स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांना मोठा आनंद होतो. व ते त्यांना साह्य करण्यासाठीं हजारों कोसांवरून धांवत येतात. १७७५ सालच्या सुमारास

इंग्लिशांच्या जाचांतून सुटण्यासाठीं अमेरिका धडपडत होती, तेव्हां स्वतंत्र फ्रेंच राष्ट्रांतील कांहीं लोक अमेरिकेला मदत करण्यासाठीं फ्रान्समधून अमेरिकेंत आले. अठराव्या शतकाच्या अखेरीस जेव्हां सोळाव्या लुईच्या जुलुमाला आळा घालण्यासाठीं सर्व फ्रान्स देश उठला, तेव्हां इंग्लंड व अमेरिका या स्वतंत्र राष्ट्रांतील असंख्य लोक स्वतंत्रतेसाठीं झगडणाऱ्या फ्रेंचांना पाठबळ देण्यासाठीं पुढें आले. १८२१ नंतर ग्रीस देश टर्कीच्या सुलतानाविरुद्ध उठला, तेव्हां ग्रीस देश आपल्या स्वतंत्रतेसाठीं लढतो आहे असें पाहून, युरोपखंडांतील बऱ्याच स्वतंत्र देशांतील धाडशी लोकांनीं त्या युद्धासाठीं कंबरा बांधल्या होत्या. परंतु या जुन्या गोष्टी कशाला? नुकतेंच क्यूबा बेट स्पेनच्या जुलुमांतून स्वतंत्र होण्यासाठीं हातपाय हालवूं लागलें होतें, तेव्हां त्याला मदत करण्यासाठीं अमेरिका पुढें आली. स्वतंत्रतेसाठीं लढणाऱ्या पक्षाला मदत केल्याचें पुण्य ज्या भाग्यवंतानीं आपल्या पदरीं बांधलें आहे अशा राष्ट्रांचीं आणि लोकांचीं उदाहरणें इतिहासांत विपुल सांपडतील. सारांश, जे स्वतंत्र असतात त्यांना स्वतंत्रता मिळविण्याच्या कामीं दुसऱ्यांना मदत करण्याचा योग येतो. परंतु जे गुलाम असतात त्यांच्या कपाळीं दुसऱ्यांना गुलाम करण्याचेंच काम येतें. हिंदुस्थानानें आजपर्यंत अशीं दुसऱ्यांना गुलाम करण्याचीं कामें अनेक वेळ केलीं आहेत. पण अगदीं ताजीं उदाहरणेंच द्यावयाचीं म्हटलीं तरी ह्या तीन वर्षांत तीन उदाहरणें घडलेलीं आपल्या डोळ्यासमोर आहेत. या हिंदुस्थानानें—या हिंदुस्थानच्या पैशानें—या हिंदुस्थानच्या सैन्यानें—सौडनमधल्या दरवेशांना व सरहद्दीपलीकडील आफ्रिडींना गुलाम बनवून टाकलें आहे. व ट्रान्सव्हालमधील बोअर लोकांना गुलाम करण्यासाठीं हें आज मित्तीला धूम ठोकीत आहे. सौडनमधल्या दरवेशांनीं हिंदुस्थानाचें काय केलें होतें? सरहद्दीवरच्या आफ्रिडी वगैरे अनेक मुसलमान जातींनीं हिंदुस्थानाचें काय केलें होतें? आणि आज ट्रान्सव्हालमधील बोअर लोकांनीं तरी हिंदुस्थानाचें काय केलें आहे, कीं ज्यासाठीं हिंदुस्थानानें त्यांना गुलाम बनवावें? बोअर लोकांपासून ट्रान्सव्हालमध्यें जाऊन राहिलेल्या हिंदूंना त्रास होत आहे हें खरें. पण या क्षणीं जो शिपाई मुंबईस आगबोटीवर पाय ठेवीत आहे, तो ट्रान्सव्हालमधील हिंदूंना दुःखमुक्त करण्यासाठीं ठेवीत आहे काय? नाहीं. आणखी शंभर

लढाया झाल्या तरी तेथील हिंदु ' निगर 'चें दुःख कायम तें कायमच राहणार. हिंदूंना दुःखमुक्त करण्यासाठीं लढाई व्हावी इतकें त्या हिंदूंचें भाग्य कोठें आहे ?

हिंदुस्थानचे पैसे खर्च होतात म्हणून हिंदुस्थानचें सैन्य बाहेर लढाईला पाठविण्याची पद्धत निंद्य होय, असें कित्येक लोकाचें म्हणणें असतें. पण पैशाची मोठीशी बाबद नाहीं. पैसे मिळतील व खर्च होतील. पण हिंदुस्थान इतरांना गुलाम करण्याच्या कामीं मदत करतें, ही गोष्ट मात्र कायम राहील. हिंदुस्थानांत एकंदर लाख दोन लाख सैन्य असतें. या अवाढव्य सैन्याचा इंग्लंडचें प्रधानमंडळ एखादें वेळीं आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल तसा उपयोग करील. तो त्याना करतां येऊं नये म्हणून ब्रिटिश पार्लमेंटनें असा ठराव केलेला आहे कीं, हिंदुस्थानचें सैन्य पार्लमेंटच्या संमतीशिवाय बाहेर पाठवूं नये. व स्वाकीमच्या स्वारीनंतर पार्लमेंटमध्यें जो वादविवाद झाला त्यातहि अखेरीस हेंच तत्त्व कबूल करण्यात आलेलें आहे. परंतु हल्लींहि पार्लमेंटच्या परवानगीवाचूनच हिंदुस्थानचें सैन्य हिंदुस्थानबाहेर पाठविलें जात आहे, हें फार वाईट. एकाच सत्तेखालीं गुलामाची संख्या अतिशय वाढणें, ह्यापासून इतर स्वतंत्र सत्ताना मोठें भय असतें. कारण गुलामाची संख्या अतिशय झाली तर त्यांना सीझर किंवा नेपोलियनसारखा कोण जबरदस्त केव्हां बगलेंत मारून कोणाच्या स्वतंत्रतेचा केव्हा नाश करील याचा काहीं नेम नसतो. आणि या बाबतींत स्वतंत्र लोकानाहि गुलामांची भीति बाळगावी लागते. रशिया मध्य एशिआतील मुलूख काबीज करतो, किंवा फ्रेंच सौडनमध्यें लटपट करूं बघतात, त्या वेळी इंग्लंडासारखीं इतर राष्ट्रं त्याना प्रतिबंध करतात यातील बीज तरी हेंच आहे कीं, त्यांच्या ताब्यातील गुलामाची संख्या अतिशय वाढली तर ते आपल्या स्वतंत्रतेचा वाटेल तेव्हां चुराडा करूं शकतील. स्वतंत्र राष्ट्रें कितीहि वाढलीं तरी त्याची फारशी भीति नसते. कारण तीं आपल्या स्वतःच्या अकलेनें विचार करून मग कोणती तरी बरी वाईट गोष्ट करण्याला प्रवृत्त होतात. पण गुलामांना स्वतःकरितां विचार करण्याची कधींच परवानगी नसते. त्यांचा धनी त्याच्याकरिता विचार करतो. व त्याला वाटलें कीं लढाई करावयाची, कीं त्याच्या तोंडून शब्द निघाल्या-बरोबर लाखों गुलाम आपल्या तरवारींना पॉलिश देऊं लागतात. त्यांना

'कां?' हा प्रश्न कधीं माहीत नसतो. पण असले लोक फार भयंकर. विस्तवावर पाय पडला तरच तो भाजतो, आणि सापाला ढका लागला तर तो चावतो. पण गुलाम मनुष्य हा विस्तव आणि साप याहूनहि अधिक घातक आहे. याला दररोज जो पायाखालीं तुडवितो त्याच्या पायाला श्रम झाले असतील म्हणून त्यांना हा कुरवाळतो. पण ज्याचा याच्यावर कधींहि पाय पडला नाहीं त्याला हा जाळतो, आणि ज्यानें याला कधींहि ढका लाविला नाहीं त्याला हा चावतो.

बोअर आणि आऊटलँडर याच्यामध्यें हल्लींचा लढा आहे. म्हणून बोअरशीं लढण्याकरितां आऊटलँडर आला तर त्यांत बोअरला कांहीं आश्चर्य वाटणार नाहीं. पण जेव्हा रत्नागिरीचे कोंकण्ये, लाहोरचे शीख आणि आग्र्याचे पुरभय्ये दरबानच्या बंदरांत उतरतांना बोअर लोक पाहातील, तेव्हां ते आपल्या मनांत चकित झाल्यावांचून राहणार नाहींत. ते म्हणतील, हे कोण, हे येथें कशाकरिता आले आहेत, याचें आम्हीं काय केलें आहे कीं, ज्यासाठीं हे आम्हाला मारण्याकरितां येथें आले आहेत, किंवा यानीं तरी आमचें काय केलें आहे कीं ज्यासाठीं आम्हीं या निरपराधी प्राण्यांचा जीव घ्यावा? हे प्रश्न प्रथमतः त्याच्या मनांत येतील. पण हिंदुस्थानची स्थिति त्याच्या ध्यानात आल्याबरोबर ह्या सर्व प्रश्नाचा त्यांच्या मनात उलगडा होईल. व त्यांना असें कळून येईल कीं, आपला मूळ वाद जरी एकट्या आऊटलँडरपाशीं आहे तरी आपल्यापाशीं लढण्याला इंग्लिशांच्या ताब्यांतील सर्व गुलाम गोळा होऊन आपला चुराडा करण्याला मागें पुढें पाहाणार नाहींत.

हे एका पक्षाचे विचार झाले. पण इंपीरिअॅलिस्ट लोकांचा म्हणून दुसरा एक पक्ष आहे. त्याचें असें म्हणणें कीं, आपल्या साम्राज्याच्या हितासाठीं त्यांतील सर्व पोटभागानीं त्याला मदत करणें जरूर आहे. या त्यांच्या मतांत कांहीं तथ्य आहे. व त्यालाच अनुसरून ऑस्ट्रेलियानें इंग्लंडला मदत करण्याचें मनांत आणलें आहे. त्याप्रमाणें विचारपूर्वक जर हिंदुस्थानहि तयार होईल तर तें चांगलेंच. पण हिंदुस्थानच्या लोकांना विचार करून मत देण्याचा अधिकार न देतां त्यांच्या संमतीवांचून त्यांचें सैन्य घेऊन जाणें हें मात्र अगदीं गैरशिस्त आहे.

## पुराणिकाचा खटला कां सुटला? : : ११

● पुराणिक हा प्रतापगडच्या देवीच्या देवळांतील पुजारी. त्याच्यावर गुन्हा शाबीत होत नाहीं असा असेसरांनीं अभिप्राय दिला. तरी साताऱ्याच्या असिस्टंट सेशन जज्जांनीं आरोपीला १८ महिन्यांची शिक्षा दिली. मात्र वरिष्ठ कोर्टात आरोपी निर्दोषी ठरला. पुराणिकावरील तोहमतीच्या आधारावर पोलिसांना टिळकांवर अगर त्यांच्यासारख्या पुढाऱ्यावर बिलामत आणावयाची होती. पण त्यांचा तो डाव फसला.

सातारा जिल्ह्यांतील प्रतापगडावरील देवीच्या देवळातील एका पुराणिकानें काहीं मांग वगैरे लोक जमवून रा. टिळक व नातू याना बंधमुक्त करून व खजिने लुटून इंग्रजी राज्याची उलथापालथ करण्याचा घाट घातला आहे व त्याबद्दल त्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी बातमी पोलिसला कळल्यावरून त्यानें पुराणिकाला पकडून त्याजवर खटला केला होता; परंतु तो अपिलामध्यें सुटला, वगैरे बातमी या पूर्वीच पुष्कळांना कळून चुकली असेल. परंतु ' पुराणिकाचा खटला का सुटला ? ' हा प्रश्न फार थोड्यानीं आपल्या मनाला विचारला असेल. ब्रिटिश राज्याची क्रांति करूं पाहणारा मनुष्य बिनशिक्षेवाचून सुटावा याबद्दल कोणालाहि आश्चर्य वाटणें, अगदीं साहजिक आहे. व त्यामुळें या लेखाच्या मथळयावर दिलेल्या प्रश्नाविषयींच्या विवेचनात प्रत्येकाचें लक्ष गुंतून जाणे, हेंहि अगदीं साहजिक आहे.

वरील प्रश्नाचें उत्तर शोधून काढण्याचे आधीं पुराणिक यांनीं कोणत्या प्रकारच्या लोकांच्या साहाय्यानें आपला इष्ट हेतु सिद्धीस नेण्याची योजना केली होती, या गोष्टीकडे लक्ष देणें जरूरीचे आहे. पुराणिकानें ज्या लोकांवर आपली मदार ठेविली होती ते मांग होते हें सर्वांस माहित आहे. महार,

मांग, रामोशी, वगैरे लोक सामान्यतः कशा प्रकारचे असतात, याबद्दल आपल्या इकडील कोणालाहि विशेष सांगितलें पाहिजे असें नाहीं. इंग्रजी अमदानींत पोलिसच्या करड्या बंदोबस्तामुळें व साहेबलोकांच्या हाताखालील बटलरच्या, गाडीवाल्याच्या वगैरे चाकऱ्या त्यास अलीकडे बऱ्याच मिळूं लागून त्याचा निर्वाह होण्याचीं राजरोस साधनें त्यांस प्राप्त झाल्यामुळें, त्यांचा चोरीचा, दरवड्याचा आणि गळेकापूपणाचा धंदा अलीकडे कांहींसा बंद पडला आहे. परंतु या लोकांपैकीं कांहींचें पिढीजाद काम म्हटलें म्हणजे चोरीचें होय. यांच्या आईबापांनीं आमरणांत चोरीचाच धंदा करून पुढें आपल्या मुलानाहि तोच धंदा शिकविलेला असतो. अशा लोकांच्या मदतीनें अनावश्यक, अप्रस्तुत, आणि म्हणूनच गर्हणीय अशीं राज्यक्रांतीसारखीं कामें करूं पाहणें, हें कितपत श्रेयस्कर होईल याची कल्पना कोणालाहि सहज होण्यासारखी आहे. चोरी हा एक समाजातील अतिशय नीच दुर्गुण म्हणून सर्व जणांनीं मानलेला आहे. त्या दुर्गुणांत जे पहिल्या नंबरचे प्रवीण त्याच्या हातून राज्यक्रांतीसारखें महत्कृत्य कधी तरी होऊं शकेल काय! चोरांच्या हातून जर साम्राज्यक्रांत्या झाल्या असत्या तर राज्यक्रांति करणाराचे लोक जे आज पोवाडे गात आहेत ते त्यानीं कधींच गाइले नसते. सामान्य दृष्ट्या राज्यक्रांतीसारख्या उदात्त, प्रगल्भ आणि प्रशंसनीय गोष्टी चोरांच्या हातून कधींहि व्हावयाच्या नाहींत. क्रांति ही फार पवित्र वस्तु आहे. तिच्या भोंवतीं सर्व सद्गुणांचा सदोदित अतिशय कडक पाहारा असतो. ते तिला कोणत्याहि दुर्गुणाचा विटाळ होऊं देत नाहींत. राज्यक्रांति, स्वतंत्रता, दास्यविमोचन इत्यादि स्तुत्य गोष्टी परमेश्वराला प्रिय आहेत; आणि चोरी, चहाडी, लांडी लबाडी, इत्यादि निंद्य दुर्गुण सैतानाला प्रिय आहेत. निर्मळ, निष्कलंक आणि निर्दोष अशी स्वतंत्रता मिळविण्यांत जो आपला देह झिजवितो त्याच्यासाठीं स्वर्गाचे दरवाजे उघडतात. आणि चोरी, दरवडे, लूटफाट वगैरे गोष्टींत आपला जीव धोक्यांत घालणारांचें आदरातिथ्य करण्यासाठीं नरकांतील अग्निकुंडें वाट पाहात असतात. स्वातंत्र्याची प्रगति होत असलेली पाहून सूर्य, चन्द्र आणि आकाशांतील सर्व लहान मोठे स्वतंत्रताप्रिय तारे हे आनंदित होत असतात. आणि चोरी, दरवडे व खून यांना पाहून मध्यरात्रीचा काळाकुट्ट काळोख देखील भयानें थरथर कांपत

असतो. स्वराज्य, स्वतंत्रता, क्रांति, इत्यादि हेतूनें लढणाऱ्या शिपायाच्या अंगाला लढाईच्या श्रमानें आलेला घाम पुसून काढण्यासाठीं स्वैरसंचारी वायु त्याच्या अंगावर मंद मंद गतीनें आपल्या मंजुळ लहरी फेंकीत असतो. परंतु तोच वायु चोऱ्या करणाऱ्याच्या दुष्कृत्यानें जणूं काय संतापून जाऊन मोठमोठीं वादळें उत्पन्न करतो आणि आकाशांतील ढगांना एकमेकांवर आदळून त्यांजपासून वीज उत्पन्न करून तिच्या योगानें चोरांच्या आणि दरवडे-खोरांच्या डोक्यांच्या तो चिंधड्यान् चिंधड्या उडवून टाकतो. राज्यक्रांति आणि चोरी ह्यांच्यामध्यें इतका विरोध असताना दुसरीच्या साह्यानें पहिली गोष्ट घडवून आणणें कधीं तरी शक्य होईल काय ? क्रांतीची आणि स्वदेश-भक्तीची कल्पना फार उदात्त आहे. त्या गोष्टी पाहिजे त्याच्या हातून घडून येतील अशी कल्पना करणें अगदीं चुकीचें आहे.

हल्लीं पेट्रिअट ( देशभक्त ) हा शब्द आपल्या इकडे फार सवंग झाला आहे. एखाद्याच्या अंगात कितीहि सामाजिक दुर्गुण असूं द्या, त्यानें नॅशनल कॉंग्रेसमध्यें एखादा ठराव आणून भाषण केलें, कीं तो झाला पेट्रिअट ! अशा रीतीनें पेट्रिअट तयार करण्याची गिरणी आज पंधरा वर्षे चालू असल्या-मुळें हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यातून सुद्धां पेट्रिअट पसरलेले आढळतात. परंतु इतके पेट्रिअट पैदा झाले आहेत तरी पण दुःखाची गोष्ट ही कीं, पेट्रि-ऑटिझम ( देशभक्ति ) पाहूं गेलें तर मुळींच कोठें आढळत नाहीं. या सगळ्याचें मुख्य कारण हें आहे कीं, सद्गुणावांचून कोणतेंहि सत्कृत्य आणि महत्कृत्य होणें नाहीं. पुष्काळांची अशी समजूत झालेली दिसते कीं, स्वदेश-भक्तीला सद्गुणांची आवश्यकता आहेच असें नाहीं, व खासगी वर्तनाच्या दृष्टीनें दुर्गुणी असलेला मनुष्यहि उत्तम पेट्रिअट होण्याला काय हरकत आहे? पेट्रिअट म्हणजे कोटाच्या दोन बाजूंच्या खिशांत दोन हात घालून एकदां उजवीकडे आणि एकदां डावीकडे पाहून इंग्रजींत बोलणें एवढाच अर्थ असेल, तर दुर्गुणी मनुष्यालाहि पेट्रिअट होतां येण्याला कांहीं हरकत नाहीं, हें आम्हांलाहि कबूल आहे. परंतु ह्याच्यापेक्षां पेट्रिअट शब्दांत जोंपर्यंत अधिक अर्थ आहे, तोंपर्यंत असले लोक पेट्रिअट कसे होणार, हें एका परमेश्वरालाच ठाऊक. खासगी सामाजिक दुर्गुण अनेक पेट्रिअट मंडळींमध्यें अनेक अस-तात. त्यापैकीं उदाहरणार्थ आपण व्यभिचार हा दुर्गुण घेऊं. परस्त्रीगमन

जिच्यावर नाहीं, अशा वस्तूचा दुसऱ्याच्या न कळत अपहार करणें म्हणजे चोरी करणें होय; अशा दृष्टीनें पाहिलें तर परस्त्रीसंसर्गानें दूषित झालेला पेट्रिअट हा चोर ठरतो. आणि जर तो चोर आहे तर राष्ट्राच्या हिताहिताच्या गोष्टीचा विचार चालला असतां तेथें बसण्याचा त्याला काय अधिकार आहे ? त्याची जागा दुसरीकडे आहे. शिवाय आणखीहि एका बाजूनें या गोष्टीचा विचार करता येण्यासारखा आहे. पेट्रिअट म्हटला म्हणजे आपल्या देशातील पुरुष कुलीन, आणि त्यामुळें पराक्रमी, असे निपजावे अशी त्याची इच्छा असली पाहिजे. परंतु हा व्यभिचारी पेट्रिअट आपल्या दुर्वर्तनानें राष्ट्रांतील कमअस्सल लोकांच्या संख्येंत अधिकच भर पाडीत असतो. ' परपुरुषैर्जनिताः परांगनासु ' असले अकरा माशाचे लोक तयार करणारा हा मनुष्य पेट्रिअटच काय ? याला पेट्रिअट कसें म्हणता येईल ? सारांश सद्गुणाच्या जोरावांचून महत्कृत्य कधींहि होणें नाहीं, हा सिद्धांत कोणीं विसरता कामा नये.

दुर्गुणी माणसाच्या हातून कोणतेंहि महत्कृत्य तडीस जावयाचें नाहीं. या गोष्टीकडे दुर्लक्ष्य केल्याचीं वर काहीं उदाहरणें दिलीं आहेत. सुमारें वीस वर्षांपूर्वी, लोक असे म्हणतात, रा. वासुदेव बळवंत फडके यानीं काहींसा पुराणिकासारखाच उद्देश मनात धरून पुराणिकानीं ज्या लोकांचें साह्य घेतलें त्याच्या सारख्याच लोकांचें साह्य घेऊन प्रयत्न चालविला होता. वासुदेव बळवंत याच्या अनुयायी मंडळींत रामोशाचा अतिशय भरणा होता असे त्या वेळचे लोक सांगतात. पण रामोशाच्या हातून कधींहि चांगली गोष्ट व्हावयाची नाही. रामोशी हा दरवडे घालण्यात शूर असेल, परंतु तो सत्कृत्य करण्यातहि शूर आहे असे त्यानें आज आपल्या कृतीनें जगाला कधीहि दाखविलेलें नाहीं. असल्या लोकाच्या मनात द्रव्याभिलाषाची इच्छा मुख्य असते. व उदात्त विचारांची कल्पना त्यांच्या मनात मुळींच नसते असे म्हटलें तरी चालेल. फकिऱ्या मांग, जरीचा फेटा दिला म्हणजे पुराणिकाच्या बाजूला सामील होतो, पण दुसऱ्या कोणीं अधिक किंमतीची एखादी वस्तु त्याला दिली म्हणजे तोच फकिऱ्या पुराणिकाच्या उलट पक्षाला फितुर होतो. वासुदेव बळवंतच्या हाताखालीं रामोशाना दरवडे घालण्याची आणि खजिने लुटण्याची कल्पना फारच पसंत वाटली असेल.

पण त्याच्या पलीकडे त्याच्या मनांत काय होतें ? सद्गुणाचा एक लेश तरी त्यांच्या मनांत होता काय ? सद्गुणी मनुष्य द्रव्यलाभासारख्या एखाद्या क्षुद्र फायद्यासाठीं आपल्या सद्गुणाच्या मार्गापासून एक पाऊलभरहि ढळावयाचा नाही. रामोशी आणि मांग पैशाच्या आशेनें किंवा शिक्षेच्या भीतीनें पाहिजे तसें बोलण्याला आणि चालण्याला प्रवृत्त होतील. सद्गुणी आणि प्रामाणिक मनुष्याला आपल्या सद्गुणापेक्षा आणि आपल्या प्रामाणिकपणापेक्षां इतर कशाचीहि आशा किंवा भीति नसते. त्याला पैशाच्या राशींत पुरून ठेवा किंवा त्याला उभा जाळा, त्याचे जे सत्य तेंच सदोदित कायम राहणार व अशाच लोकाच्या हातून इतिहासातील मोठमोठीं कृत्यें झालेलीं आहेत. चोरांनीं दरवडे घातले असतील आणि मागांनीं गळे कापले असतील. पण त्यानीं क्रांति घडवून आणिली, किंवा स्वातंत्र्य संपादन केले, असें एक तरी उदाहरण इतिहासात सापडेल काय ?

वर दिलेल्या प्रकारच्या चुका होण्याला कदाचित् हल्लीं प्रचलित करण्यात आलेला एक विशिष्ट गैरसमज कारणीभूत झालेला असण्याचा संभव आहे. कांहीं इंग्रजी इतिहासकारानीं शिवाजीबद्दल असें लिहून ठेविलें आहे कीं, शिवाजी हा दरवडेखोर, लुटारू, आणि पुंडाई माजविणारा असा होता. असल्या अप्रबुद्ध विचारानीं अप्रबुद्ध मनाच्या लोकावर असा अनिष्ट ग्रह उत्पन्न होतो कीं, स्वराज्यसंस्थापनेसारखीं महत्कृत्ये दरवडेखोरांसारख्या दुर्गुणी मनुष्याच्या हातून होऊं शकतात. परतु दुर्गुणापासून महत्कृत्यें होतात असें शिकविणारे इतिहासकार, मग ते कोणीहि असोत, मनुष्यजातीचे शत्रु होत. कारण कीं ते दुर्गुणांची महती गाऊन सद्गुणाची किंमत कमी करतात. शिवाजीबद्दलचें वरील मत चुकीचे आहे हें सागण्याची आज मित्तीला मुळींच जरूरी उरलेली नाहीं. शिवाजी दरवडेखोर नव्हता इतकेंच नाहीं, तर त्याच्या हाताखालील लोकहि कोणी दरवडेखोर नव्हते. आपल्या हातानें शेत नागरून आपलें पोट भरणारे, व आपल्या धर्मावर श्रद्धा ठेवणारे, आणि आपल्या देवाला भिणारे असे सद्गुणी आणि प्रामाणिक मावळे लोक शिवाजीच्या चाकरीस होते. रशियन झारच्या विरुद्ध गेल्या शतकात लढणारे पोलंडमधील शेतकरी जितके प्रामाणिक होते, किंवा हल्लीं नेटलमध्यें लढत असलेले ट्रान्सव्हालचे बोअर शेतकरी जितके प्रामाणिक आहेत म्हणून खुद्द इंग्लिश

लोकहि मानतात, तितके प्रामाणिक विजापुरच्या आणि दिल्लीच्या बादशहा-विरुद्ध लढणारे मावळांतील शेतकरी होते. जर ते प्रामाणिक आणि सद्गुणी नसते तर त्याच्या हाताला यश कधींच आलें नसतें. ' यतो धर्मस्ततो जयः।' हें वाक्य महाभारतात लिहिलें गेलें तेव्हांपासून आपल्यांत महाभारत टिकेल तोंपर्यंत तें कधींहि खोटें व्हावयाचें नाहीं. आता असें असूनहि शिवाजीबद्दल खोटे विचार प्रकट केल्यामुळें दरवडे घालून एखादें महत्कृत्य करण्याची महत्त्वाकांक्षा जर कोणाच्या मनात उद्भवली असली, तर त्याबद्दल इंग्रजी इतिहासकारच जबाबदार आहेत.

मांग, रामोशी, भिल्ल, कोळी, असल्या प्रकारच्या लोकांना कधीं कधीं चांगल्या सुव्यवस्थित आणि प्रशसनीय अशा राज्यांतून चाकरीस ठेविलेलें आढळतें, हें खरं. पण याचे कारण असें कीं, सुरळित रीतीनें चालू झालेल्या राज्याच्या गाड्यात असले बदमाष लोक खपूं शकतात. इमारतीच्या डोक्यावर मातीचीं कौलें असलीं तरी चालतात. परंतु तिच्या पायाशीं हातोड्याचे घाव घातले तरी न फुटणारे असे दगडच पाहिजेत. कोणत्याहि कृत्याच्या पायाशीं सद्गुणच पाहिजे. सद्गुणावाचून इतर पायावर उभारलेली इमारत केव्हांना केव्हा तरी घडघडल्यावाचून कधींहि राहाणार नाहीं.

फकिऱ्या मांगाच्या हातून राज्यक्रांति व्हावयाची नाहीं ही गोष्ट पुराणिकाच्या लक्षांत आली नाहीं ती नाहींच; पण असल्या गोष्टीचा आरोप फकिऱ्या मांग आणि पुराणिक याच्यावर लादणें यात एक प्रकारची उपहास्यता उत्पन्न होत आहे, ही गोष्ट पोलीसच्याहि ध्यानांत आली नाहीं. पुराणिकाच्या खटल्यांत डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट पासून तों तहत अगदीं शेवटच्या पोलिस शिपायापर्येत सर्वांच्या हातुन चुका झाल्याचें सिद्ध झालें आहे; परंतु त्या सर्वांत मुख्य चूक ही कीं, कोणावर कोणता आरोप ठेवावा याबद्दलच्या तारतम्याचा जितका उपयोग व्हावयास पाहिजे होता तितका झाला नाहीं. मांग वगैरे लोकांच्या हातून असल्या गोष्टी होणें किती अशक्य आहे याचा तात्त्विक विचार आपण वर केलाच आहे. तेव्हा सकृद्दर्शनीं असंभाव्य दिसणारा असा आरोप प्रथम ठेवून नंतर तो हळूहळू काढून घेणें, ही गोष्ट कोणासहि मोठी भूषणास्पद नाहीं. एखाद्या फितूर झालेल्या बदमाषानें काहीं तरी कबूलीजबाब दिला म्हणजे त्यावरून शक्य, अशक्य, असे भलतेच आरोप ठेवण्याच्या तयारीस लागण्याच्या

आधीं एकंदर परिस्थिति, आरोपाची शक्याशक्यता, आरोपींची मानसिक स्थिति, वगैरे गोष्टींचा विचार करणें फार जरूर आहे. या वर झालेल्या चुकीमुळें पुराणिकावरील खटला अजिबात सुटला, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. वाघाला कोंडण्यासाठीं जो रुंद अंतराच्या गजांचा सांपळा केलेला असतो त्याचा जर उंदीरघुशींना कोंडण्याकडे उपयोग केला, तर त्यांतून त्या उंदीरघुशी पळून गेल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें ?

---

# जमिनीचा सारा जमिनीच्याशिवाय दुसऱ्या उत्पन्नांतून कां द्यावा ? : १२

पाऊस चांगला पडला आणि पिकें चांगलीं आलीं, म्हणजे जमिनीचा सारा सरकारच्या खजिन्यात बिनबोभाट जमा होत असतो, हा अनुभव सर्वांना आहे. परंतु पाऊस हा फार चंचल स्वभावाचा आणि अस्थिर मनाचा असल्यामुळें लोकांचीं शेतें पिकवून देण्याचें जें काम परमेश्वरानें त्याच्याकडे सोंपविलें आहे, त्या कामांत त्याच्याकडून निदान हिंदुस्थानासंबंधानें तरी वारंवार कसूर होत असते पण त्याच्या कसुरीचा आणि निष्काळजीपणाचा परिणाम शेतकऱ्यांना फार भोगावा लागतो. पावसावांचून शेतें आणि शेतकऱ्यांचीं तोंडें सारखींच वाळून जातात. पाऊस पडला नाहीं म्हणजे शेतांतील निःसत्त्व धान्यच तेजहीन आणि पांढरें होतें असें नाहीं, तर त्याबरोबरच शेतकऱ्यांचे डोळेहि पांढरे होतात. अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे, आपल्या इकडील लोकांची फारच धांदल उडून जाते गरिबापासून तों श्रीमंतापर्यंत सर्वांनाच काळजी उत्पन्न होते. आपला प्रपंच कसा भागेल,

पुढल्या वर्षाचे आपण दिवस कसे पाहूं, या दुष्काळात आपला निभाव कसा लागेल, अशा अनेक प्रकारच्या विवंचना लोकाच्या काळजातील रक्ताचा एक एक थेंब दररोज शोषून घेत असतात. पण या विवंचना जरी काळजांतील रक्त पिणाऱ्या असल्या, तरी अलीकडे प्राप्त होत चाललेल्या कंगाल स्थितीच्या नेहमीच्या संवयीमुळें त्या विवंचना लोकाना सहन करण्यासारख्या असतात. परंतु सर्वांत असह्य अशी जी विवंचना लोकाना येऊन पडते ती सरकार साऱ्याची होय. कारण आज जेवावयाला अन्न नसलें तर उद्या जेऊं, असें लोकांनी म्हटलें तरी एक वेळ चालतें. परतु सरकार साऱ्याचे पैसे आज नसले उद्या देऊं, असें म्हणून कधीं चालावयाचें नाहीं. घरात खावयाला असो वा नसो. शेतात पीक आठ आणे आलेलें असो किंवा सहा आणे आलेलें असो, शेतांतून झालेले थोडेसें उत्पन्न सरकारच्या भरीस घातल्यानंतर गरीब कुळाना मागे खावयाला उरत असो वा नसो, सरकार सारा हा दिलाच पाहिजे. लोकाच्या शेतांतील खळ्यावर धान्याचे ढीग पडलेले असोत किंवा नसोत, हप्त्याचे वेळ प्रत्येक तालुक्यांतील ट्रेझरी क्लार्कच्या पुढें रुपयाचे ढीग पडलेच पाहिजेत. शेतकऱ्याचीं पोतीं धान्यानें भरलेलीं असोत किंवा रिकामीं असोत, पण सरकारचीं पोतीं रुपयानीं भरलीच पाहिजेत. लोकाच्या कोठारांतून आणि पेवांतून दाणे शिल्लक असोत किंवा नसोत, पण सरकारचे खजिने आणि बँका या वाहून जाईपर्यंत भरलेल्या असल्याच पाहिजेत. अशी सामान्यतः स्थिति असल्यामुळे सरकार देण्याची धास्ती ही दुष्काळाच्या दिवसात लोकाच्या काळजांतील किती रक्त आटवीत असेल ह्याची कल्पना करणें कठीण आहे.

अशा रीतीनें लोक चोहोंकडून गांजून गेल्यामुळें त्यांच्या मनांत संकट-समयीं भलभलतेच कुतर्क येऊं लागतात, व त्यापैकींच वर दिलेला प्रश्न हा एक होय. अनावृष्टीनें, अतिवृष्टीनें, टोळधाडीनें किंवा इतर काहीं कारणानें पिकाचें नुकसान झालें म्हणजे ' शेतात जर पीकच आलें नाहीं तर शेताचा सारा आम्ही कोठून द्यावा ? ' असे सर्व लोक आपआपल्या मनात म्हणूं लागतात. पण हीच गोष्ट सारा वसूल करणाऱ्या सरकारी अंमलदारापुढें काढली म्हणजे ते याजवर असें उत्तर देतात कीं, शेतात पीक आलें नसलें तरी घरच्या दुसऱ्या पैशातून तुम्हीं जमिनीचा सारा दिला पाहिजे. सारा

म्हणजे दुसऱ्याचें ज्याच्यावर स्वामित्व आहे, निदान आपलें तरी स्वामित्व देणाऱ्या कुळाचें सरकार ऐपतदार कुळें आणि बिनऐपतदार कुळें असे दोन विभाग करतें. व कितीहि नापिक झालें असलें तरी ऐपतदार कुळाकडून सरकार आपला सारा पै न् पै वसूल करून घेतें. व तहकुबी किंवा सूट देण्याचें ठरल्यास बिनऐपतदार कुळाना वर्षाच्या अखेरीस कांहीं थोडीशी सूट देण्यांत येते. अशी स्थिति पाहून हा निव्वळ अन्याय आणि जुलूम होत आहे असें कोणालाहि वाटल्यावाचून राहणार नाहीं. कारण सकृद्दर्शनी हें उघड दिसतें कीं, जमिनीचा सारा हा जमिनीच्या उत्पन्नांतूनच दिला जावा, याचा भार इतर उत्पन्नांवर पडूं नये. प्राप्तीचा कर हा प्राप्तीच्या रकमेंतूनच भागला पाहिजे, आणि घरपट्टी ही घराच्या भाड्याच्या उत्पन्नांतूनच भागली पाहिजे, हें जितकें स्वाभाविक आणि सयुक्तिक आहे, तितकेंच जमिनीचा सारा जमिनीच्या उत्पन्नांतून भागला पाहिजे हें आहे. ज्याचा त्याच्यांतून खर्च भागला नाहीं तर अशानें अव्यवस्था उत्पन्न होईल, हें उघड आहे. शेताचें देणें शेताच्या उत्पन्नांतून भागलें नाहीं तर तो द्या शिल्केमधून, प्राप्तीवरील कर प्राप्तीमधून भागला नाहीं तर तो द्या शिल्केंमधून, किंवा घरपट्टीचा आकार घराच्या भाड्यांतून भागला नाहीं तर तो द्या शिल्केमधून, अशा रीतीनें व्यवहार चालू लागल्यास लोकाचीं दिवाळीं निघण्याला मुळींच उशीर लागणार नाहीं. शेतात उत्पन्न झालें नाहीं तर लोकानीं शेतसारा आपल्या शिलकी पैशातून द्यावा असें सरकारचे अधिकारी लोकाना सागतात. आतां जो न्याय लोकांना लागू तोच न्याय सरकारालाहि लागू असणें अगदीं रास्त आहे. व त्याप्रमाणें पाहिलें असता शेतात पीक आलें नाहीं तरी शिल्कींतून शेतसारा देण्याविषयीं जसें सरकार लोकाना सांगतें, त्याप्रमाणेंच जमिनीचा महसूल जर एकंदरींत कमी वसूल झाला, तर कमी आलेले पैसे सरकारनें आपल्या शिल्केंतून खर्च करावे असें अर्थात् प्राप्त होतें पण वस्तुस्थितीशीं या तत्त्वाचा मुळींच मेळ नाहीं. जें सरकार दुसऱ्यांना आपल्या शिल्केंतून तूट भरून काढण्यास सांगतें तें आपल्या स्वतःच्या शिल्केंतून आपल्या रेव्हिन्यूची दुष्काळाच्या सालांतील तूट भरून काढण्यास अमात्रें तितकें तयार नसतें. कारण तें तसें तयार असतें तर हल्लीं जी शेंभेसाठीं नांवाची सूट देण्यांत येते त्यापेक्षा जास्त सूट गरीब लोकांना खास देण्यांत आली असती.

जमीन ही सरकारनें लढाई करून जिंकून घेतलेली आहे, म्हणून त्याबद्दल जिंकलेल्या लोकांनीं जिंकलेल्या जमीनीबद्दल जिंकणाऱ्या सरकारला कांहीं दिलें पाहिजे, हें निर्विवाद आहे. पण सरकारनें जे जे कर बसविले आहेत, त्या त्या करांच्या मुळाशीं कांहीं तरी उत्पन्नाची बाब असते. जमिनींत धान्य पिकतें म्हणून सरकारनें जमिनीवर सारा बसविला आहे. आणि जमिनींत धान्य पिकतें म्हणूनच आपण तिजवर सरकारनें बसविलेला सारा सरकारला देतों. खडकाळ जमिनीवर सरकार सारा बसवीतहि नाहीं आणि तसल्या जमिनीबद्दल आपण सरकारला सारा देतहि नाहीं. याचें कारण उघड आहे कीं, खडकाळ जमिनींत पीक येत नाहीं. व अशा अर्थानें पाहिलें तर मऊ आणि काळी जमीनसुद्धा अवर्षणाच्या दिवसांत खडकाळ जमिनीच्याच बरोबरीची होते. अशा खडकाळ जमिनीबद्दल सरकारनें लोकाजवळ सारा मागावा हें मोठें आश्चर्य आहे. आपण अशी एक कल्पना करूं कीं, कोणी एका राजानें हजार एकर जमीन लढाईत जिंकली. तीपैकीं पांचशें एकर खडकाळ म्हणजे नापीक व बाकीची पाचशें एकर सुपीक आहे. आतां एखादे वर्षी पाऊस न पडून सुपीक जमिनींतहि कांहीं एक पीक आलें नाहीं तर त्या वर्षापुरती ती पांचशें एकर सुपीक जमीनहि खडकाळ जमीन आहे असेंच म्हटलें पाहिजे. व त्या वर्षापुरती आपण हजार एकर खडकाळच जमीन जिंकली, असें म्हणून त्या राजानें स्वस्थ बसावयास नको काय? त्यानें जिंकलेल्या पाचशें खडकाळ एकरांबद्दल त्यानें आजपर्यंत कोणापाशीं सारा मागितला होता? ज्या ईश्वरानें या जिंकणाऱ्या राजाच्या मुलुखांतील पाचशें एकर जमीन कायमचीच खडकाळ करून टाकिली आहे, त्यानेंच अमुक एका विशिष्ट वर्षी त्याच्या राज्यांतील सगळी हजार एकर जमीन अवर्षणानें खडकाळ करून सोडली तर त्याचा हात कोण धरणार आहे? तेव्हां या राजाच्या तिजोरींत तूट पाडण्याच्या उद्देशानें कोणीं गुन्हा केला असल्यास तो देवानें केला आहे, मनुष्यानें केला नाहीं. मग देवावरचा राग माणसावर काय म्हणून काढावा? अवर्षणामुळें एक वर्षपर्यंतच खडकाळ झालेल्या पांचशें एकर जमिनीचा सारा जर तो राजा सक्तीनें लोकांपासून वसूल करील तर बाकीच्या कायमच्या खडकाळ अशा पांचशें एकर जमिनीचाहि सारा लोकांपासून ठोकून घेण्याला त्याला काय हरकत आहे? कारण पहिली गोष्ट

करण्यांत जितका न्याय त्याच्यापेक्षा कांहीं कमी न्याय दुसरींत आहे, असें नाहीं. परंतु जोंपर्यंत त्या कायमच्या खडकाळ पाचशें एकरांचा सारा कोणी घेत नाहीं, तोंपर्यंत एक वर्षच खडकाळ बनलेल्या पाचशें एकराबद्दल सारा घेणेंहि कधीं रास्त होणार नाहीं.

याप्रमाणें न्यायानें पाहिलें तर जेथें पीक नाहीं तेथें सरकार सारा नसावा. पण सारा वसूल करणारे अधिकारी लोकाना काय सांगत असतात? ते म्हणतात, ‘ जमिनीच्या पिकातून यंदा पैसा उत्पन्न झाला नसला म्हणून काय झालें? तुमच्या घरात तर पैसा आहे ना? त्यामधून तुम्ही सरकार सारा द्यावा!’ परंतु यावर लोकाचा प्रश्न असा येतो कीं, ‘ आमच्या जमिनींत पीक आलें आहे म्हणून तुम्ही जमिनीचा सारा मागता, किंवा आमच्यापाशीं शिल्केंत पुष्कळ पैसे आहेत म्हणून तुम्ही जमिनीचा सारा मागतां?’ नापिकाच्या सालीं, जमिनींत पीक आलें आहे म्हणून आम्ही जमिनीचा सारा मागतों, असें मुळींच म्हणता यावयाचें नाहीं. तेव्हा अर्थात् असें प्राप्त होतें कीं, ‘ तुमच्यापाशीं पैसे आहेत म्हणून आम्ही मागतों.’ परंतु हा हक्क फारसा न्यायाचा आणि वाजवी नाहीं. एखाद्या वाटसरूला काळोखात आडवाटेला अडवून ‘ तुझ्यापाशीं पैसे आहेत, म्हणून ते तूं मला दे,’ असें एखादा वाटमाऱ्या चोर म्हणेल तर म्हणो. परंतु न्यायानें आणि सचोटीनें वागणाऱ्या इसमाला असें कधींहि म्हणता येणार नाहीं. दुष्काळाच्या दिवसांत कितीहि नापीक झालें असलें तरी ऐपतदार कुळाकडून भरपूर सारा वसूल करून घ्यावा अशी सरकारनें तजवीज केलेली असते. परंतु ऐपतदार लोकावर हा एक प्रकारचा जुलूम आहे. जर ऐपतदार कुळाना जमिनींतून कांहीं मिळालें नाहीं तर जमिनीच्या साऱ्याबद्दल त्यांनीं तरी सरकारला कोठून द्यावें? त्याच्या शिल्केंत पुष्कळ पैसे असले तर सरकारनें त्याजपाशीं पाहिजे असल्यास दुष्काळाला मदत म्हणून पैसे मागावें, व त्यांनींहि ते द्यावे. परंतु जमिनीचा सारा म्हणून तो ऐपतदारांच्या ऐपतींतून, त्यांच्या जमिनीच्या उत्पन्नांतून नव्हे, घेणें हें कितपत रास्त होईल, हें ठरविणें मोठें कठीण आहे. शिवाय हेंच तत्त्व धरून सरकार चाललें तर सरकारवर आणखी एक आक्षेप येतो. दुष्काळांत गरीब लोकांना सरकार जी सूट व तहकुबी देतें ती त्यांच्या गरिबीबद्दल दया येऊन देतें अशी सामान्य समजूत आहे. परंतु ही समजूत वरील तत्त्वावरून अगदीं

खोटी ठरते. गरीब लोकांच्या शिलकेंत जर पैसे असते, तर सरकारनें त्यांजपासूनहि सारा वसूल करून घेण्याला कधीं कमी केलें नसतें. गरीबांपाशीं कांहीं नाहींच म्हणून निरुपायामुळें, दयेमुळे नव्हे, सरकार त्याना सूट किंवा तहकुबी देतें असें उघड होतें. आणि हेंच खरें असलें पाहिजे. कारण गरिबाच्या शेतात धान्य पिकले नाहीं या तत्त्वावर जर त्याला सारा माफ केला असेल, तर त्याच तत्त्वावर ज्या श्रीमंताच्या शेतात धान्य पिकलें नाहीं त्यालाहि सारा माफ करणें हें जरूर आहे. परंतु तसें तर कधींच होत नाहीं. साराश दुष्काळांत जिकडे तिकडे नापीक झालेले असतें, तेव्हा सरकार ज्याच्यापासून घेतां येईल त्याच्यापासून आपला पैसा घेतें; गरीबापाशीं पैसा नसतो म्हणून घेत नाहीं, आणि श्रीमंतापाशीं असतो म्हणून घेतें.

जें सरकार आकडेशास्त्रात पराकाष्ठेचें निष्णात आहे, त्यांनीं अवर्षणाच्या सालीं आपल्या राज्यात किती जमीन अगदीं ओसाड गेलेली आहे, याबद्दलचे आकडे मिळवूं नयेत, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. असे आकडे प्रसिद्ध होतील, तर त्यावरून आपले हातून लोकावर किती जुलूम होत आहे, हें सरकारच्या सहज लक्षात येणार आहे. उदाहरणार्थ, आपण असा एखादा तालुका घेतला कीं ज्यामध्यें पाचशें बिघे जमीन अगदीं ओसाड गेलेली आहे; तर एवढया बिघ्याचा सारा हा त्या तालुक्यातील लोकाच्या छातीवर सरकारची एक धोंडच आहे, असें खुद्द सरकारलाहि वाटल्यावाचून राहणार नाहीं. सबब ओसाड गेलेल्या जमिनींचे आकडे सरकार प्रसिद्ध करील तर फार उत्तम होईल.

ज्या शेतात मुळींच पीक आले नाहीं त्या शेताबद्दल मुळींच सारा देणें पडूं नये, या तत्त्वाबद्दल वरील विवेचनावरून वाद राहाणार नाहीं, हें उघड आहे. परंतु काहीं जमिनी ओसाड गेलेल्या असल्या तरी बाकीच्यांत थोड्याबहुत प्रमाणानें पीक आलेलें असतें; व ज्याप्रमाणें पीक आलेलें असेल त्या प्रमाणानें सरकारनें सारा घेतल्यास त्यात बिलकूल गैरशिस्त नाहीं. पूर्वीच्या राजांची अशीच वहिवाट असे. पूर्वी उत्पन्नाची अभावणी करून त्या मानानें सरकारला काय द्यावें आणि कुळानें काय घ्यावें हें ठरविण्यांत येत असे, व ही अभावणीची पद्धत काहीं ठिकाणीं अजूनहि चालू आहे. परंतु इंग्रजसरकारनीं ही अभावणीची चाल मोडून टाकल्यामुळें दुष्काळांत गरीब लोकांना फार

त्रास पडतो. अनियमित साऱ्याची पद्धत चालू असलेल्या वेळीं पुष्कळ पिकलें म्हणजे पुष्कळ द्यावें लागत असे, हें खरें. पण पुष्कळ पिकलें तर त्यामधून सरकाराला देऊनहि कुळांला बाकीहि पुष्कळ उरत असे, आणि उरली नाहीं तरी पुष्कळ पिकल्यावर पुष्कळ देण्याचें कुळाना फारसें संकट पडत नसे. परंतु हल्लींच्या कायम धाऱ्याच्या पद्धतींत शेत ओसाड गेलें असलें तरी भर सारा देणें भाग पडतें. पण तो कुळें देतात कोठून ?

यावर सरकार तर्फेच्या पक्षाभिमान्याकडून असा आक्षेप घेण्यात येतो कीं, कायम धाऱ्याची पद्धत अशाच धोरणावर अंमलात आणलेली आहे कीं, कांहीं नियमित रकमेपेक्षा उत्तम पीक आलें तरी सरकारनें जास्त घेऊं नये व वाईट पीक आलें तरी कुळानें कमी देऊं नये; ज्या सालीं शेतात पीक येणार नाहीं त्यासाठीं मागील उत्तम पिकाच्या सालाच्या उत्पन्नातून साचवून ठेविलेल्या पैशामधून शेतकऱ्यानीं शेतसारा द्यावा. हा युक्तिवाद सकृद्दर्शनीं फार चांगला दिसतो, परंतु ज्याला आपल्या इकडच्या शेतकऱ्यांची आणि सामान्य ऐपतदार मनुष्याची स्थिति माहीत आहे, त्याला ह्यांतील अशक्यता तेव्हांच कळून येईल. सामान्य लोकाचा संचय फारच तुटपुंजीचा असतो. व त्याच्यावर लग्नें-कार्यें, देवधेव वगैरेच्या मागण्या वरच्यावर येऊन तो अगदीं कोरडा पडलेला असतो. ही लोकाची स्थिति स्वतःच्या अनुभवावरून सरकारच्या ध्यानात येण्यासारखी आहे. मुद्दाम दुष्काळासाठीं म्हणून लोकावर इन्‌कमटॅक्स बसवून सरकारनें आपल्याजवळ कोट्यावधि रुपयाचा संचय केलेला असतो, तरी दुष्काळ आला म्हणजे सरकारची धांदल उडावयाची ती उडतेच. व अशीच स्थिति गरीबाची होते. तेव्हा दरसाल अनेक कराच्या रूपानें कोट्यावधि रुपये गोळा करणाऱ्या सरकारपाशीं जर अवर्षणामुळें ओढवणाऱ्या संकटाला तोंड देण्यापुरता पैसा शिल्लक मापडत नाहीं, ( कारण वर्गण्या गोळा कराव्या लागतात, ) तर मग गरीब बिचाऱ्या शेतकरी आणि सामान्य वर्गांतील लोकापाशीं शिल्लक पैसा कोठून बरें मिळणार ?

आतां कदाचित् असें म्हणण्यात येईल कीं, दुष्काळ हें संकट सर्वांवरच आलेलें असते, यासाठीं सर्व कर देणारानीं जर अशा तक्रारी पुढें आणून कर देण्याचें नाकारिलें व त्यांचें म्हणणें कबूल करून सरकारानें त्यांस सारा

माफ केला, तर सरकारचें गाडें कसें चालावें ? तें तर चाललें पाहिजे. म्हणून सर्वांनीं या सामान्य हितासाठीं योग्य ती मदत केलीच पाहिजे, हें म्हणणें खरें आहे. पण राज्याचें गाडें चालणें हें जर सार्वजनिक हिताचें असलेंच तर तें मोठमोठ्या पगारदार अंमलदारांच्याहि हिताचें असलेंच पाहिजे. तेव्हां जर महिन्याचे पाच रुपयेहि न कमविणाऱ्या शेतकऱ्यांपासून सार्वजनिक हितासाठीं त्याचा वसूल करण्यांत येतो, तर त्याच सार्वजनिक हितासाठीं पाच हजारांच्याहि वर दरमहा पगार मिळविणारापासून त्यांचा वांटा वसूल करून घ्यावयास नको काय ? पण तो कोठें वसूल केला जात आहे ?

असो. हे लोकाच्या बाजूचे विचार झाले. परंतु या प्रश्नाला सरकारची बाजू आहे. सरकारला मोठें लष्कर बाळगावें लागतें, हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानच्या बाहेर सरकारला लढाया कराव्या लागतात, राशियन स्वारीची भीति नाहींशी करण्यासाठीं सरहद्दीवर किल्ले बांधावे लागतात, पौंडाच्या भावात फरक पडल्यास विलायतेंतील पेनशनराना आणि हिंदुस्थानांतील नोकराना एक्सचेंज कॉम्पेन्सेशन द्यावें लागतें. व याशिवायहि त्यांच्या पाठीमागे अनेक खर्च आहेत. या सर्व गोष्टींकडे लक्ष दिलें तर दुष्काळ निवारणासाठीं लोकानीं इन्कमटॅक्स, भरपूर सारा, आणि खासगी रीतीनें गोळा केलेल्या वर्गण्या, आणि श्रीमंत गृहस्थानीं मरतेवेळीं दिलेल्या देणग्या, हीं सर्व सरकारच्या स्वाधीन करणें अतिशय जरूरीचें आहे.

# हल्लींच्या लढाईपासून लोकांच्या मनावर होणारे परिणाम : : : १३

लढाई म्हटली म्हणजे तेथें दोन पक्ष आलेच. ते दोन पक्ष कधीं समानबल असतात आणि कधीं त्यांतील एक पक्ष न्यूनबल आणि दुसरा अधिक बल असा असतो. फ्रान्स आणि जर्मनी यांची काहीं वर्षांपूर्वी लढाई झाली, तें पहिल्या प्रकारच्या लढाईचें उदाहरण होय. परंतु हॉलंडनें स्पेनशीं, ग्रीसनें टर्कीशीं, आणि युनायटेड स्टेट्सनीं इंग्लंडशीं ज्या लढाया चालविल्या होत्या त्या सर्वांकडे पाहिलें तर तीं दुसऱ्या प्रकारच्या लढाईचीं उदाहरणें होत. व हल्लीं ट्रान्सव्हालनें इंग्लंडशीं जी लढाई चालविली आहे तीहि याच वर्गापैकीं होय. ट्रान्सव्हालच्या लोकसत्तात्मक राज्याची लहानशी हद्द आणि इंग्लंडच्या साम्राज्याचा अफाट विस्तार, ट्रान्सव्हालची स्वकष्टार्जित अल्पस्वल्प संपत्ति आणि हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, कॅनडा वगैरे देशांतून आणिलेल्या सोन्याचे इंग्लंडमध्यें पडलेले ढीग, स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं आणि आपल्या बायकामुलांच्या आणि घरादाराच्या संरक्षणासाठीं स्वतःच लढणारे बोअर लोक आणि इंग्लंडचा मान कायम राहावा व इंग्लंडचें साम्राज्य विस्तृत व्हावें म्हणून इंग्लंडसाठीं लढण्याला तयार झालेले आयरिश लोक, हिंदुस्थानच्या पलटणी, ऑस्ट्रेलियन लष्कर, आणि त्या सर्वांवरील इंग्लिश ऑफिसर, या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे ट्रान्सव्हाल हें न्यूनबल आहे, हें सहज लक्षांत येणार आहे.

मनुष्यस्वभावांत असा एक विलक्षण धर्म आहे कीं, त्याच्या योगानें दुर्बल पक्षाबद्दल प्रत्येक मनुष्याच्या मनाला दयेचा पाझर फुटतो. रांगण्यापेक्षां चालणें चांगलें. परंतु चालणाऱ्या मनुष्यापेक्षां रांगणाऱ्या मुलाचीच आपल्याला अधिक दया येते. या दृष्टीनें पाहिलें तर ट्रान्सव्हालचा पक्ष दुर्बल

असल्यामुळें लोकाची दया आणि सहानुभूति याचा ओघ ट्रान्सव्हालकडेच वळला पाहिजे. व ईश्वरानें बनविलेल्या मनुष्यस्वभावावर अनेक ऐहिक विचाराचें वर्चस्व बसून मनुष्यस्वभावात फेरबदल झाला नसता, तर सर्व लोकांची सहानुभूति खरोखरच ट्रान्सव्हालला मिळाली असती, व दुर्बल पक्षाकडेच सर्व लोकाच्या मनानें धाव घेतली असती. परंतु असें असूनहि काहीं लोक सबळ पक्षाकडे जाऊन मिळतात. पण त्यांत अनेकाचीं अनेक कारणें असतात. हल्लीं जे अनेक लोक ट्रान्सव्हालला मदत न करता इंग्लंड-च्याच पक्षानें लढत आहेत त्यांना ट्रान्सव्हालच्या दुर्बळ पक्षाची दया येत नाहीं असें नाहीं. तर दया येत असूनहि त्याना ट्रान्सव्हालच्या विरुद्ध लढावें लागत आहे. आयर्लंड इंग्लंडच्या बाजूनें लढत आहे, कारण इंग्लंडच्या कचाट्यातून आयर्लंडला आपली सुटका करून घेता येत नाहीं. ऑस्ट्रेलियानें आपलें सैन्य इंग्लंडच्या मदतीला पाठविलें आहे. कारण इंग्लंडच्या साम्राज्याची वाढ तीच आपली वाढ अशी त्याची समज आहे. हिंदुस्थानातील लष्कर ट्रान्सव्हालमध्यें पाठविण्यात आलें आहे, कारण इंग्लिशाच्या ठिकाणीं राजनिष्ठा दाखविणें हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे, असें हिंदुस्थानच्या लोकाना वाटत आहे. याशिवाय कोणी पदव्या मिळविण्यासाठी, कोणी तोंडपुजेपणा करण्यासाठीं, तर कोणी मर्जी संपादण्यासाठीं इंग्रजाना मदत करण्याच्या कामीं पुढें येत आहेत. परंतु हे सर्व ऐहिक लाभाचे खेळ आहेत. खरी दयेची स्फूर्ति ईश्वराच्या आणि सृष्टीच्या नियमाप्रमाणें दुर्बळपक्षाबद्दलच झाली पाहिजे. हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, वगैरे मुलूख इंग्लंडला आज प्रत्यक्ष मदत करीत आहेत, परंतु त्याखेरीजकरून जगातील इतर राष्ट्रें सध्या तटस्थ वृत्ति धारण करून केवळ मजा पाहात बसलीं आहेत. परंतु त्याच्या मनांत दुर्बल पक्षाबद्दल दया उत्पन्न होत नाहीं म्हणून तीं मजा पाहात बसलीं आहेत असें नव्हे, तर परस्पर राष्ट्रामधील तहांच्या अनुरोधानें पाहिलें असतां, अशा लढाईत त्यांना मध्यें पडता येत नाहीं म्हणून तीं स्वस्थ बसलीं आहेत. सारांश सबळ पक्षावर कोणी कोणत्याहि हेतूनें प्रीति दाखवित असो, परंतु जो मनुष्य म्हणून आहे त्याच्या मनांत दुर्बलपक्षाबद्दल दया उत्पन्न झालीच पाहिजे. तेव्हां या दृष्टीनें पाहिलें तर सर्व जगातील लोकांची सहानुभूति आणि दया हीं बोअर लोक लढत असता त्यांच्या पाठीमागें आहेत.

ट्रान्सव्हालच्या बाजूला आणखी एक मोठी शक्ति आहे. तिचें विवरण आपण थोडक्यांत करूं. लढाईतील कोणता पक्ष कोणत्या हेतूनें लढत आहे, या गोष्टीविषयींचा प्रश्न जो तो आपल्या मनाशीं विचारीत असतो. आणि त्या प्रश्नाच्या उत्तराचा लोकांच्या मनावर फार परिणाम होतो. इंग्लंड ट्रान्सव्हालशीं कां लढत आहे ? तर ट्रान्सव्हालनें आपलें वर्चस्व कबूल करावें म्हणून. आणि ट्रान्सव्हाल इंग्लंडशीं कां लढत आहे ? तर आपल्या लोकसत्तात्मक राज्याचें स्वातंत्र्य कायम राहावें म्हणून. अशी जर स्थिति आहे, तर लोकाचीं मनें स्वाभाविकपणेंच वर्चस्वाचा पक्ष सोडून स्वातंत्र्याच्या पक्षाला येऊन मिळाल्यावाचून कधींहि राहाणार नाहींत. कारण सामान्य लोकाना स्वातंत्र्य जितकें प्रिय असतें तितकें वर्चस्व नाहीं. कां कीं, स्वातंत्र्य ही पुष्कळांना उपभोग घेतां येण्यासारखी वस्तु आहे. परंतु वर्चस्व ही तशी नाहीं. तिच्या उपभोगाचा लाभ कांहीं विवक्षित व्यक्तींना मात्र घेता येतो. एखादा एक कोटी वस्तीचा मुलूख आपण उदाहरणार्थ घेतला, आणि त्यावर कोणा एका राजाचें वर्चस्व स्थापित झालें अशी कल्पना केली, तर एक कोट लोकांचें स्वातंत्र्य गेलें म्हणून तितके लोक दुःखी झाले, आणि एकाला वर्चस्व मिळालें म्हणून एकटा प्राणी काय तो आनंदित झाला पण तीच अशी कल्पना केली कीं, त्या राजाचें वर्चस्व नाहींसें झालें आणि एक कोटी लोकांना स्वातंत्र्य मिळालें, तर एकटा प्राणी फार झालें तर आपलें वर्चस्व गेलें म्हणून रडत बसेल, परंतु कोट्यावधि लोक आपल्याला स्वातंत्र्य मिळालें म्हणून आनंदानें नाचूं लागतील. सारांश, सर्वस्व मिळालें तर एखादा प्राणी आनंदित होतो, परंतु स्वातंत्र्य मिळालें म्हणजे कोट्यावधि माणसांच्या पोटांत आनंदाचे उमाळे मावेनासे होतात. याकरितां वर्चस्वापेक्षां स्वातंत्र्य हें लोकाना नेहमीं प्रिय असणारच. वर्चस्व हें आपलपोटेपणाचें आहे, आणि स्वातंत्र्य हें सार्वजनिक हिताचें आहे. वर्चस्वाचें दुसरें नांव जुलूम हें आहे, आणि स्वातंत्र्य म्हणजे न्याय होय. वर्चस्व हें लोभी मनुष्य तरवारीच्या जोरानें दुसऱ्यापासून बुचाडून घेतो, पण स्वातंत्र्य देवानें मनुष्याला दिलेलें आहे. तेव्हां वर्चस्व आणि स्वातंत्र्य यांच्यामध्यें इतका फरक असल्यामुळें स्वातंत्र्याच्या बाजूकडे लोकमताचा कल नेहमीं असलाच पाहिजे. आणि ज्या मानानें लोकांना स्वातंत्र्य प्रिय आहे,

त्याच मानानें स्वातंत्र्याकरितां लढणारे लोकहि प्रिय झालेच पाहिजेत. अमुक अमुक लोक स्वातंत्र्यासाठीं लढत आहेत, असें ऐकिल्याबरोबर प्रत्येकाच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू येतात, प्रत्येकाच्या बाहूंमध्यें वीर्य स्फुरण पावूं लागतें, आणि स्वातंत्र्याकरितां लढणाऱ्या लोकांना यश यावें अशी इच्छा प्रत्येकाच्या मनांत उत्पन्न होते. स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या राष्ट्राला सर्व लोक मान देतात आणि वर्चस्वासाठीं धडपडणाऱ्या राष्ट्राचा सर्व लोक तिटकारा करितात. खुद्द इंग्लंड हे एके वेळीं स्वातंत्र्यासाठीं लढणारें राष्ट्र होतें. परंतु हल्लीं तें वर्चस्वासाठीं धडपडत आहे. पहिल्या चार्लसच्या किंवा दुसऱ्या जेम्सच्या वेळीं इंग्लंडनें आपलें स्वातंत्र्य कायम राखण्याचें उदात्त काम हातीं धरलें होतें. त्या वेळेला इंग्लंड हें सर्व लोकांच्या प्रीतीला पात्र झालेलें होतें. परंतु हल्लीं इंग्लंड आपलें स्वातंत्र्य कायम राखण्यासाठीं लढत नाहीं, तर दुसऱ्याचें हिरावून घेण्यासाठीं लढत आहे. त्यामुळें सामान्यतः इंग्लंड हें लोकांच्या अप्रीतीला आणि ट्रान्सव्हाल हें प्रीतीला पात्र झाल्यास फारसें नवल नाहीं. हल्लीं इंग्लंडची इतर राष्ट्रांना भीति वाटत असेल, परंतु हिंदुस्थान व दुसरे कांहीं देश खेरीज करून इतरांची त्याजवर हल्लींच्या लढाईच्या बाबतींत प्रीति असेल किंवा नाहीं, याची शंकाच आहे. फार काय, खुद्द इंग्लंडमध्येंहि असे कित्येक लोक आहेत कीं, ज्यांना इंग्लंडची हल्लींची ट्रान्सव्हालसंबंधाची वर्तणूक मुळींच आवडत नाहीं. तेव्हां इंग्लंड हें स्वातंत्र्याकरितां लढत नाहीं, तर वर्चस्वासाठीं लढत आहे, ही गोष्ट इंग्लंडच्या पक्षाला कमजोरपणा आणणारी आणि ट्रान्सव्हालच्या पक्षाला दुजोरा देणारी आहे. इंग्लंडचें सैन्य शूर असेल, जनरल ग्याटिकरचा पराभव होऊन सहाशें इंग्लिश लोक कैद झाले तरी इंग्लिश शिपायांची हिंमत खचली नसेल, व इतरहि अनेक गोष्टी इंग्लिशांना अनुकूल असतील, पण त्यांना स्वातंत्र्याचा पाठिंबा नाहीं. आतां तीच बोअर लोकांची स्थिति पाहा. त्यांचा पक्ष दुर्बल आहे म्हणून स्वाभाविक रीतीनें उत्पन्न होणारी दया आणि सहानुभूति हीं त्यांच्या पक्षाला मिळण्याचा संभव आहे बोअर लोकांच्या तोफा इंग्लिशांच्या तोफांइतक्या चांगल्या नसल्या तरी त्यांच्यापाशीं स्वातंत्र्य ही जी एक तोफ आहे, ती इतकी उत्तम आहे कीं, तिचा पल्ला किती दूरवर जाईल आणि तिचा धूर कितीजणांच्या डोळ्यांतून पाणी काढील,

याचा अंदाज करणें कठीण आहे. बोअर लोक जेव्हां निजतील तेव्हां स्वातंत्र्य त्यांना जागें करील, व ते जेव्हां पराभव पावतील तेव्हां स्वातंत्र्य त्यांना फिरून लढण्याला हिंमत देईल. ते खळग्यांत सापडले असले तरी जी स्वातंत्र्याची टेंकडी त्यांच्या पायाखालीं आहे, ती त्यांना उंच जागेवर नेऊन ठेवील. जेव्हां त्यांची अन्नसामग्री सरेल तेव्हां स्वातंत्र्य हें आपल्या आशेवर त्यांना उपास काढण्याला समर्थ करील. आणि जेव्हां त्यांना पाणी मिळणार नाहीं तेव्हां स्वातंत्र्य हें त्यांना थंडगार करील. सारांश, लोकांची दया आणि सहानुभूति व त्यांची स्वतःची स्वातंत्र्याची इच्छा हीं सर्व बोअर लोकांच्या बाजूनें लढत आहेत. तेव्हां बोअर लोकांना बाकी कांहीं गोष्टी प्रतिकूल असल्या तरी निदान या गोष्टी अनुकूल आहेत यात शंका नाहीं.

पक्ष दुर्बळ आणि तरी पण त्या पक्षाला स्वातंत्र्याची हौस या दोन गोष्टींचा परिणाम लोकांच्या मनावर कसा होतो, हें वर दाखविलेंच आहे. लोकांच्या मनांत दया आणि सहानुभूति उत्पन्न होण्याला वर दिलेल्या दोन कारणांचा अतिशय उपयोग होतो. परंतु असल्या लढायाचा आणखीहि एक उपयोग आहे. ट्रान्सव्हाल हल्लीं इंग्लंडपाशीं जी लढाई लढत आहे तिच्यापासून लोकांच्या मनावर एक फारच चांगला परिणाम होण्याचा संभव आहे. स्वातंत्र्यासाठीं लढाया फार विरळा होतात. कोणत्याहि मुलुखाचें स्वातंत्र्य हरण करणारे राजे बहुधा फार बलाढ्य असतात. त्यामुळें गुलामगिरींत कुजत पडलेल्या लोकांना त्यांच्या विरुद्ध स्वातंत्र्याचें निशाण उभें करण्याला फार कठीण जातें. परंतु जेव्हां असे प्रसंग येतात, तेव्हां ते फार बोधप्रद होतात. अशा प्रकारचीं अगदीं अलीकडील उदाहरणें म्हटलीं म्हणजे दोन होत. एक क्यूबा बेटाचें आणि दुसरें ट्रान्सव्हालच्या लोकसत्तात्मक राज्याचें. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत केव्हां तरी असल्या लढाया होणें फारच जरूर आहे. पूर्वी कित्येक लोक गुलामगिरींतून निघून स्वतंत्र झाल्याच्या गोष्टी आपण इतिहासांतून वाचतों. परंतु त्या इतिहासांतील हजार गोष्टी आणि आपल्या काळीं चालू असलेल्या एखाद्या लढाईची एक प्रत्यक्ष हकीकत ह्यांची कधींहि बरोबरी व्हावयाची नाहीं. इतिहासांतील गोष्टी वाचून त्यांवर गुलामगिरींत राहण्याला सवकलेले लोक असा आक्षेप काढतात कीं, त्यावेळची स्थिति निराळी होती, म्हणून त्यावेळीं जें शक्य होतें तें आतां शक्य

असेलच असें नाहीं. व या त्याच्या आक्षेपात काहीं तथ्य असेल असें पुष्कळाना वाटत असते. परंतु क्यूबा किंवा ट्रान्सव्हाल याच्या स्वातंत्र्याच्या लढाईविषयींची हकीकत प्रत्यक्ष वर्तमानपत्रांतून वाचीत असताना असल्या आक्षेपाना मुळींच जागा उरत नाहीं. कारण आक्षेप घेणारा जी गोष्ट अशक्य म्हणून म्हणणार ती क्युबन लोक आणि बोअर लोक शक्य करून दाखवीत असतात. स्वातंत्र्याबद्दलच्या लढाया ह्या जुलुमी राजांना वचकांत ठेवण्यालाहि फार उपयोगी पडतात. असल्या लढाया पाहून जुलुमी राजांचा जुलूम जो अव्याहतपणें चाललेला असतो त्याला थोडाबहूत आळा बसतो. व या लढाया गुलामगिरींत सडत पडलेल्या लोकांना उत्तेजन देण्यालाहि कारणीभूत होतात. गुलामगिरींत घोरत पडलेले लोक या लढायांतील तोफांच्या गर्जनेनें जागे होऊन चोहोंकडे पाहूं लागतात, आपण कोठें आहों याचा विचार करूं लागतात, व आपल्यासारखेंच दुसरे होते त्यानीं काय केलें, हें त्याच्या डोळ्यांपुढें दिसूं लागतें. त्यामुळें असल्या लढाया ह्या एक प्रकारें नैतिक शिक्षण देणाऱ्या शाळाच आहेत, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

असो. लोकांच्या मनावर जे परिणाम होण्याचा संभव आहे म्हणून वर सांगितलें आहे ते परिणाम काहीं विशिष्ट नैसर्गिक कारणांपासून उत्पन्न होणारे आहेत. परंतु त्याच्या विरुद्ध परिणाम उत्पन्न करणारीं काहीं अधिक बलवत्तर अशीं कृत्रिम कारणें आहेत. त्याच्यामुळें वर सांगितलेल्या परिणामांपैकीं सर्वांच्या मानेवर सर्वच परिणाम सारखे होतात असें नाहीं. नैसर्गिक कारणांपेक्षा कृत्रिम कारणाचा मनावर प्रसंगविशेषीं अधिक दाब असतो. आणि त्यामुळें आम्हां हिंदुस्थानवासी लोकांना असेंच वाटत आहे कीं, इंग्लिश लोक कोणत्याहि हेतूनें लढाई करीत असोत, त्याची चौकशी करण्याचें कारण नाहीं; ते आपले राजे आहेत आणि आपण त्यांची प्रजा आहों. तेव्हां आपण त्यांच्या संबंधानें पूर्ण राजनिष्ठा दाखवून सकाळ संध्याकाळ त्यांचेंच अभीष्टचिंतन केलें पाहिजे. ही राजनिष्ठेची कल्पना आमच्या मनांत फार प्रबळ असल्यामुळें तिच्यापुढें नैसर्गिक कारणाचा कधींहि जोर चालावयाचा नाहीं, हें अगदीं उघड आहे. व म्हणून त्या राजनिष्ठेच्या जोरामुळें आणि आपल्या साम्राज्याच्या अभिमानामुळें हिंदुस्थानवासियाच्या मनांत जी सहानुभूति उत्पन्न होते ती इंग्लंडसाठींच होते, ट्रान्सव्हालसाठीं होत नाहीं.

आणि म्हणूनच आम्ही हिंदुस्थानचे लोक आपलें सैन्य दक्षिण आफ्रिकेंत इंग्लिशाच्या मदतीला पाठवितों, आणि इंग्लिशांना जय मिळो म्हणून आम्ही देवापाशीं प्रार्थना करितों, हें कोणीहि विसरतां कामा नये.

---

# जुन्या इमारतींचें नव्या राजांनीं काय करावें? : : : : १४

● पुरातन वस्तूंचें संरक्षण व संशोधन करणारें सरकारी खातें कर्झनच्या प्रेरणेनेंच स्थापन झालें.

थोड्या दिवसांपूर्वी कर्झनसाहेब उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करीत असतां त्यांनीं एके प्रसंगीं असें बोलून दाखविलें होतें कीं, तुमच्या देशांतील ज्या भव्य आणि उत्कृष्ट इमारती आहेत त्या जशाच्या तशाच राखण्याविषयीं मी काळजी घेईन. कर्झनसाहेब हे स्वभावतःच फार सज्जन माणूस आहेत. आणि इमारतींच्या बाबतींतच काय, पण इतरहि अनेक बाबतींत त्यांनीं आपला चांगुलपणा आणि गुणज्ञपणा आजपर्यंतच्या थोडक्याशा अवधींत पुष्कळ वेळां व्यक्त करून दाखविला आहे. व कर्झनसाहेबासारखे सगळे साहेब लोक असते तर हिंदुस्थानच्याच काय, पण सर्व जगाच्या इतिहासांत पुष्कळ फरक पडला असता. पण खुद्द कर्झनसाहेबांनीं त्याच भाषणांत कबूल केलें आहे कीं, याच्यापूर्वी काहीं लोकांकडून अविचारानें पुष्कळ इमारतींची नासधूस झाली आहे.

कर्झनसाहेबांच्या वर प्रदर्शित केलेल्या भाषणांतील मुद्द्यांवरून असें उघड होतें कीं, जुन्या इमारतींचें नव्या राजांनीं काय करावें या प्रश्नाला दोन बाजू आहेत. कित्येकांच्या मतानें जुन्या इमारतींचा नाश करून टाकावा हें योग्य आहे. व दुसऱ्या कित्येकांचें मत असें आहे कीं, त्या जशाच्या तशाच कायम राखाव्या. या दोन मतापैकीं कोणतें अधिक सयुक्तिक आहे, याचा आपण थोडक्यांत विचार करूं.

जेव्हां एखादा राजा दुसऱ्या राजाला जिंकून त्याचा देश आपल्या स्वाधीन करून घेतो, तेव्हां तो बाकीच्या सर्व वस्तूंची कांहीं तरी वाट लावूं शकतो. जुना राजा असतो, त्याला फांशीं देतां येतें, एखाद्या किल्ल्यांत कैदेंत ठेवितां येतें, किंवा चार पैशांचें विष देऊन त्याला मारून टाकितां येतें. जुना प्रधान असला तर त्याला नवा प्रधान करता येतें किंवा अंधार कोठडींत कोंडून ठेविता येतें. तसेंच जुने सरदार असतात त्यापैकीं कोणाला फितूर करून घेतां येतें, कोणाला लाच देता येतो किंवा निदान त्या सर्वांना हद्दपार तरी करतां येतें. अशा रीतीनें प्रत्येक जुन्या वस्तूची नवीन राजाला कांहीं तरी विल्हेवाट लाविता येतें. परंतु जुनी इमारत ही एक अशी चमत्कारिक वस्तु आहे कीं, तिचें काय करावें याविषयीं पुष्कळ नवीन राजांना मोठें गूढ पडतें. जुन्या राजांचे राजवाडे, किल्ले वगैरे इमारती पाहून 'याचें आतां मी काय करूं?' ह्याबद्दलची काळजी नवीन राजाला रात्रीं स्वस्थ झोंप लागूं देत नसेल. या इमारतींना विष देऊन ठार करितां येत नाहीं, यांना अंधारकोठडींत कोंडून ठेवितां येत नाहीं, याना फितुर करता येत नाहीं, किंवा यांना हद्दपार करतां येत नाहीं! तर मग मी याचें करूं तरी काय, असल्या विचारांनीं वैतागून गेलेले नवे राजे कांहीं थोडे थोडके नसतील!

पण येथें कोणी अशी शंका काढील कीं, बिचाऱ्या जुन्या इमारतीसंबंधानें इतकें वैतागून जाण्याचें राजाना काय कारण आहे? त्यांनीं असा काय अपराध केला आहे? परंतु याजवर उत्तर असें आहे कीं, नवीन राजे या जुन्या इमारतींसंबंधानें इतके वैतागून जातात, तें अगदीं योग्य आहे. कारण त्या इमारती तसाच अपराध करीत असतात. नव्या राजाच्या मनुस्मृतींत राजद्रोहाइतका मोठा अपराध दुसरा कोणता असणार? आणि त्या राजद्रोहाचा अपराध या इमारतींच्या हातून क्षणोक्षणीं घडत असतो. आणि त्यांत विशेष

वाईट तें हें असतें कीं, एखाद्या मनुष्यानें राजद्रोहाचा अपराध केला तर त्याला जशी शिक्षा देतां येतें तशी या इमारतींना देतां येत नाहीं. आधीं कायद्यांतील राजद्रोहाचें कलमच त्यांना लागूं पडत नाहीं. कारण त्या इमारती निर्जीव असल्यामुळें त्या शब्दानें, खुणेनें, किंवा कृतीनें राजद्रोह उत्पन्न करतात असें कायद्याच्या दृष्टीनें ठरूं शकत नाहीं. आणि तसें ठरलें अशी कल्पना केली, तरी त्या कलमाखालीं सांगितलेल्या शिक्षांची अंमलबजावणी या इमारतींवर करतां येत नाहीं. मनुष्याला तुरुंगांत टाकणें फार सोपें. पण या इमारतींना तुरुंगांत टाकावयाचें म्हणजे माणसाप्रमाणें या आपण होऊन तुरुंगांत चालत जाणाऱ्या नसल्यामुळें तुरुंगाच्या भिंती यांच्या भोंवतीं आणून उभाराव्या तेव्हां या तुरुंगात पडल्या असें होणार ! पण असल्या तुरुंगाच्या योगानें एखाद्या मिथ्याराजद्रोही देशभक्ताप्रमाणें यांना उलटी अधिकच शोभा आणि बळकटी मात्र येईल. तेव्हां अशा प्रकारानें शिक्षेची भीति ज्याला कधीं शिवत नाहीं अशा प्रकारचा राजद्रोह या इमारती राजरोसपणें करीत असतात. त्यामुळें तर त्यांचें स्वरूप नवीन राजांना फारच भयंकर भासूं लागतें. नवीन राजा नवीन मुलुखांत जो घुसलेला असतो तो इतक्या अन्यायानें घुसलेला असतो कीं, त्यामुळें त्याचें मन अतिशयच साशंक झालेलें असतें. तो इतक्या लोकांचीं डोकीं तुडवून आपल्या नवीन सिंहासनाजवळ आलेला असतो कीं, आपल्या बाजूला एकहि डोकें स्वामिभक्तीनें युक्त असण्याची त्याला आशा नसते. ‘ माझें खरें आहे, आणि म्हणून त्याला भीति नाहीं, ’ असला उदात्त निर्भयपणा त्याच्या स्वप्नींहि नसतो. त्याचें सारें आयुष्य संशयानें ग्रस्त झालेलें असतें. कोणी कांहीं कुजबुजला कीं, याला वाटलेंच कीं तो आपल्याबद्दलच कांहीं बोलत असला पाहिजे. त्याला वायूच्या चलबिचलींत राजद्रोह आणि ढगांच्या उलाढालींत बंडें दिसूं लागतात. कारण ज्यानें खाल्लेलें असतें त्याला खवखवतहि असतेंच. अशा रीतीनें संशयरूपी मद्य प्यालेल्या मर्कटांना दंश करणारे उत्तम वृश्चिक म्हटले म्हणजे त्यांचे गुप्त हेर होत. हे गुप्त हेर जरी मनुष्यांच्या कृतींतील राजद्रोह पकडूं शकले, तरी या इमारतींचा राजद्रोह पकडण्याच्या कामीं त्यांचें कसब अगदीं व्यर्थ होतें. संशयी राजांच्या संशयाला या इमारतीहि पात्र होतात, व लोकांना पूर्वीच्या राजाबद्दल या

इमारती काय काय गोष्टी सांगत असतील कोण जाणें, अशी भीति सदोदित त्यांच्या मनाला खात असते. परंतु त्या काय काय गुप्त गोष्टी सांगतात, त्या लोकांचीं मनें कशा रीतीनें खवळून टाकितात, आणि त्या स्वदेशाबद्दल भक्ति आणि जुलमी राजाबद्दल द्वेषबुद्धि कशी जागृत करतात, हें पाहण्यासाठीं जरी त्याजवर आपल्या गुप्त हेराचा त्या राजानें प्रयोग करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याची स्वतःची आणि त्याच्या गुप्त हेरांची पूर्ण निराशा झाल्यावांचून कधींहि राहात नाहीं. सारांश, या जुन्या इमारतींतून अशा कांहीं विलक्षण ज्वाळा निघत असतात कीं, त्या नवीन राजाचें काळीज प्रत्यहीं होरपळून काढीत असतात; परंतु त्यांतील एखादी लहानशी ढिणगीदेखील त्या राजाच्या जिवलग गुप्तहेरांना विझविता येत नाहीं.

वाचकहो, जुन्या इमारतींच्या या अद्भुत शक्तीचा अनुभव तुम्हांला कधीं आला आहे काय ? रात्रीच्या अंधुक चांदण्यात एखाद्या भयंकर अरण्यात ओसाड किल्ल्याचे भयाण बुरुज जर तुम्ही कधीं पाहिले असतील, किंवा मावळणाऱ्या सूर्याच्या किरणांमुळें चकचकणारें असें एखाद्या मोडकळीस आलेल्या राजवाड्याचें सोनेरी शिखर जर तुम्ही कधीं पाहिलें असेल, तर त्या किल्ल्यानें किंवा राजवाड्यानें तुमचे मनोविकार प्रक्षुब्ध केल्यावांचून तुम्हांस कधीं सोडलें नसेल, यांत अगदीं संशय नको. पुष्कळ लोकांची अशी तक्रार असते कीं, या जुन्या इमारती आमच्याशीं एक अक्षरसुद्धा बोलत नाहींत. पण मित्रहो, त्याचा स्वभावच असा आहे. सद्गुणी स्त्रियांप्रमाणें त्याहि भलत्याशीं कधीं बोलत नसतात. तुम्ही इतिहास वाचल्यावांचून त्यांच्याशीं बोलावयाला जाल, तर त्या तुमच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहणार नाहींत. तुमचें मन इतर गोष्टींत व्यग्र झालेलें आहे असें त्यांना कळलें, तर त्या आपलें रहस्यनिवेदन तुमच्यापाशीं कधींहि करणार नाहींत इतिहासज्ञान आणि चित्ताची एकाग्रता हीं साधनें घेऊन तुम्ही त्यांच्या जवळ जा, म्हणजे त्या आपलें हितगुज तुम्हांला सांगतील. मग किल्ल्याचा एखादा पडका बुरूजहि तुमच्या बाहूंत स्फुरण उत्पन्न करील, एखादें कारंजें तुमच्या डोळ्यांतून पाणी काढील, व एखादें भुयार तुमच्या अंगावर शहारे आणील. या जुन्या इमारती जरी सर्व दगड, विटा आणि चुना यांनीं बनलेल्या असतात, तरी त्यांना योग्य मनुष्य भेटला म्हणजे

त्याच्यापाशीं त्या हजारों तोंडानीं बोलूं लागतात, आणि प्रत्येक दोन दगडांच्या सांध्यामध्यें जणूं काय एक एक जीभ त्याना फुटते असा भास होतो, व सर्वत्र सामसुम झाल्यानंतर या इमारती आपल्या गत वैभवाबद्दल इतका भयंकर आक्रोश करतात कीं, त्यावेळीं जवळ असणाऱ्या इसमाची छाती अगदीं फाटूनच जाते. अशा रीतीनें या इमारती स्वदेशभक्तीचे मनोविकार जागृत करतात इतकेंच नव्हे, तर कधीं कधीं त्या आपल्या शत्रूला भयानें गर्भगळित करून सोडण्याचेंहि साहस करतात. मध्यरात्रीच्या काळोखांत एखाद्या किल्ल्याच्या दिल्लीदरवाजासमोर कोणी शिपाई फितूर होऊन शत्रूसाठीं त्या किल्ल्याच्या रखवालीचें काम करीत असला, तर त्याला त्या किल्ल्याचे पूर्वीचे खरे मालक त्या काळोखात दिसूं लागतात, आणि मीं जें हें अधमपणाचें आणि फितुरीचें काम पत्करिलें आहे त्या माझ्या अपराधाबद्दल या दरवाजाच्या कमानीचे दगड माझ्या डोक्यावर कोसळून पडतील कीं काय, अशा भीतीनें तो दरवाजापासून दूर दूर पळूं लागतो. सारांश, पाहणाराचें मन तल्लीन झालेलें असलें म्हणजे या जुन्या इमारतींतील प्रत्येक दगड आणि प्रत्येक वीट ही पूर्वीचा सर्व वृत्तात प्रत्यक्षवत् भासवितात व त्यामुळें पूर्वीच्या वैभवाविषयीं पाहणाराच्या मनात अतिशय उत्सुकता उत्पन्न होते.

पूर्वीच्या विषयीं उत्सुकता आणि हल्लींच्या विषयीं द्वेष याच्यात फारसें अंतर नसल्यामुळें जुन्या इमारती नवीन राजाच्या विरुद्ध राजद्रोह उत्पन्न करण्याला पुष्कळ अंशीं कारणीभूत होतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. व जर त्या राजद्रोह उत्पन्न करतात तर त्याना त्यांच्या अपराधानुरूप शासन मिळणें हें जरूर आहे. आतां या इमारतींना शासन म्हटलें म्हणजे त्या जाळणें किंवा पाडून टाकणें हें होय. व ही शिक्षा जुन्या इमारतींवर आजपर्यंत शेंकडों राजानीं बजाविली आहे. नवीन राजाच्या त्वेषानें त्यांचा नाश केला नसता तर आज नव्या इमारतींना बांधण्याला जागा नाहीं, इतका जुन्या इमारतींनीं पृथ्वीचा पृष्ठभाग झाकून टाकिला असता. या मातीच्या आणि चुन्याच्या इमारती जाळण्याला काहीं हरकत ाहे असेंहि कोणाला वाटण्याचें कारण नाहीं. भव्य इमारत, अतोनात ख , अपरिमित मानवी श्रम, इत्यादि गोष्टींबद्दलची कींव साधारण लोकां । येवो. पण नवीन राजाना त्यांची कींव येण्याचें कांहीं कारण नाहीं. ः पल्या इमारती फार

उत्तम झाल्या तर संगमरवरी दगडांच्या असतात. पण मयासूर या नांवाच्या एका दैत्यानें एक लोखंडाचें, दुसरें रुप्याचें आणि तिसरें सोन्याचें, अशीं तीन नगरें बांधिलीं होतीं. परंतु शंकरानें तीं तिन्हीं धातुमय नगरें-त्यांतील मातीचीं आणि विटकराचीं घरें नव्हेत-जाळून भस्म केलीं. ही पुराणांतरीची गोष्ट होय. पण हिचें अनुकरण पुराणावर विश्वास ठेवणारे आणि न ठेवणारे असे दोघेहि सारख्याच रीतीनें करीत आहेत. औरंगजेबानें हिंदूंचीं अनेक देवळें पाडिलीं आणि इंग्रजांनीं हिंदूंचे अनेक किल्ले जायबंदी करून टाकिले. हीं सर्व वरील प्रकाराचींच उदाहरणें आहेत. या बाबतींत इंग्लिशांचें अगदीं ताजें उदाहरण म्हटलें म्हणजे ५७ सालीं झांशीच्या किल्ल्याची आणि शहराची त्यांनीं जी वाट लाविली ते होय. वास्तविक पाहतां असेच प्रकार अन्यत्रहि व्हावयास पाहिजे होते. म्हणजे तें नवीन राजांनाहि बरें आणि खुद्द त्या इमारतींनाहि बरें. नवीन राजाना बरें कां हें वर सांगितलेंच आहे. आतां इमारतींना कां बरें याचें कारण असें कीं, त्याचा मालक नाश पावल्यानंतर त्यांनीं कायम असून काय करावयाचें आहे? पाठीमागें जगून दुसऱ्याच्या ताब्यांत रांड होऊन राहण्यापेक्षां आपल्या धन्याबरोबर आपलें दहन करून घेणें हें जसें सतींना तसेंच इमारतींनाहि एक प्रकारें भूषणास्पद आहे. माझा राजा अमुक ठिकाणीं बसत असे, अमुक ठिकाणीं निजत असे, या ठिकाणीं त्याचा खजिना असे, आणि त्या ठिकाणीं त्याचा त्याचा जनाना असे. या सर्व गोष्टी एखाद्या फितुरी बदमाषाप्रमाणें सर्व जगाला सांगण्यासाठीं एखाद्या राजवाड्यानें तीन चारशें वर्षें जीवंत राहण्या-पेक्षां आपल्या धन्याबरोबरच तोहि जमिनीत गाडला गेला असता तर काय वाईट झालें असतें? आग्र्याच्या किल्ल्यांतील अकबराच्या ज्या राजवाड्यांत हवेंतील पक्ष्यांनासुद्धां जाण्याची बंदी, त्या ठिकाणी जर आतां एक रुपया दिला तर पाहिजे त्याला खुद्द अकबराच्या राण्या जेथें जलविहार करीत असत तेथें जावयास सांपडतें, पुण्याच्या ज्या शुक्रवारच्या वाड्यांत अत्तराचे दिवे जळत असत त्या ठिकाणीं जर शहर म्युनिसिपालिटींतील भंग्यांच्या नांवनिशीचीं बुकें ठेविलीं जात आहेत, तर अशी मानहानि सहन करण्यापेक्षां त्या त्या इमारती त्या त्या वेळींच आपल्या यजमानाबरोबर लयाला गेल्या असत्या तर काय वाईट झालें असतें? ज्या किल्ल्याच्या तटावर एका

राजाच्या यशाची नौबद दुमदुमत होती त्या किल्ल्यानें दुसऱ्याचें निशाण आपल्यावर फडकूं देण्याचे ऐवजीं त्याचे तट आणि बुरूज हे कोसळून पडून त्याच्या भिंती जमिनदोस्त झाल्या तर त्यांत वाईट तें काय ? आपलीं बायकामुलें शत्रूंच्या हातीं लागूं नयेत ही जशी रजपुताची इच्छा होती, तशीच आपले किल्ले आणि वाडे हेहि शत्रूंच्या हातीं लागूं नयेत अशी त्याची इच्छा असे. आणि म्हणूनच ते आपल्या बायकामुलांना, किल्ल्यांना व वाड्यांना एकाच वेळीं अग्नीच्या स्वाधीन करीत असत.

याप्रमाणें नव्या राजाच्या आणि जुन्या इमारतींच्या दोघांच्याहि फायद्याच्या दृष्टीनें पाहिलें असतां, जुन्या इमारतींचा नाश व्हावा हेंच उचित आहे. तरी पण नवीन राजांच्या लोभामुळें इमारतींनाहि कधीं कधीं अनुचित उपयोगाला प्राप्त व्हावें लागतें. कोठें राजवाड्याचें तुरुंग केले जातात, कोठें मशिदीच्या जागेंत कागदाचे रुमाल सांठविले जातात, कोठें विलासाकरितां तयार केलेल्या महालांतून बड्या अधिकाऱ्यांना राहण्याला जागा दिली जाते, कोठें निमाज पढण्याच्या जागा येणाऱ्या जाणाऱ्या लोकांस राहण्यास दिल्या जातात, कोठें गोपुरातून प्रार्थनेच्या जागा केल्या जातात, आणि कोठें देवळांतून शाळा आणि कचेऱ्या भरविल्या जातात. नवीन राजाचें जुन्या इमारतींविषयीं फारसें प्रेम असत नाहीं, परंतु त्याला तरी आपल्या कचेऱ्या वगैरे ठेवण्यासाठीं कांहीं इमारती पाहिजेच असतात. त्या नवीन पैसे खर्च करून बांधण्यापेक्षा जुन्या इमारतींतच त्याची सोय करणें अधिक फायदेशीर वाटून, नवीन राजे जुन्या इमारतींचा उपयोग करून घेण्याला प्रवृत्त होतात. परंतु त्यांत त्याचें परिणामीं नुकसानच होतें. जुन्या राजवाड्यांतील शाळेंत मुलगा शिकावयास गेला तर प्रथमतः त्याचें लक्ष अभ्यासापेक्षां त्या राजवाड्याकडेच अधिक गुंग होऊन जातें. हा राजवाडा कोणीं बांधला, तो बांधणारा आतां कोठें आहे, हल्लीं वाडा कोणाच्या स्वाधीन आहे, आणि तो त्याच्याकडे कसा आला, हे प्रश्न तो मुलगा त्या शाळेंत अधिक उत्सुकतेनें आपल्या मनाला विचारीत असतो. जुन्या राजवाड्यांतील एखाद्या कचेरींत पैसे भरण्यासाठीं कोणी कुणबी येतो, पण तो तेथें येऊन जें कांहीं देतो त्याच्यापेक्षां तो तेथून पुष्कळ अधिक बाहेर नेतो, यांत शंका नाहीं. त्या कुणब्याच्या मनावर त्याच्या झोपडींत जो प्रकाश कधींच पडला नव्हता तो हा राजवाडा

पाहून त्याच्या मनावर एकदम पडतो. व नंतर तेथील प्रत्येक गुळगुळी दगड त्याच्या पायाला बोचूं लागतो आणि तेथील प्रत्येक दूरची भिं त्याच्या छातीवर आदळूं लागते. आणि त्याचें येथील खासगी काम समाधान कारक झालें असलें तरी तो कुणबी त्या राजवाड्याच्या दरवाज्यातून दुःखाचे सुस्कारे टाकीत आणि डोळ्यांत आसवें आणीत बाहेर पडतो. असे अने दुरुपयोग होण्याची भीति असते. म्हणून जुन्या इमारतींचा उपयो करून घेण्याच्या भानगडींत न पडता त्या जाळाव्या आणि पाडाव्य हाच उत्तम मार्ग होय. आतां असें केलें तर कदाचित् लोक नवीन राजाल जुलुमी राजा म्हणतील. पण त्यानें ह्या दोषाला का भ्यावें? नवीन राज्य बळकाविणें हा कांहीं जुलूम नव्हे, आणि जुन्या इमारती जाळणें हा मात्र जुलूम आहे, असें कोणाला तरी मनःपूर्वक वाटत असेल काय? मग हा वृथ लपंडाव पाहिजे कशाला?

कित्येक लोक या बाबतींत दयेचें एक कारण पुढें आणीत असतात पण त्यातहि मानभावीपणाचा आणि ढोंगीपणाचा पुष्कळ अंश आहे. निर्जी इमारतींवर दया कसली? ज्याच्यावर दया करावयाची त्यांच्यावर केली नाहीं त्यांचीं डोकीं ठेंचलीं, त्याना जाळलें, पोळलें, आणि त्यानीं एका ठिकाणीं गोळा केलेल्या दगडावर आणि विटांवर दयेचा वर्षाव! तेव्हां असली दय खरी म्हणावी किंवा खोटी म्हणावी? तेव्हां दयेचें पांघरूण घेऊन जुन्य इमारती आपल्या उपयोगासाठीं, नव्हे तर लोकाच्या खुशामतीसाठीं, आपण राखीत आहों, असें बाह्यात्कारी दाखविण्यापेक्षा त्याची जाळून रांगोळी करणें फार उत्तम.

आता जुन्या इमारतींची नवीन राजाना सदोदित सारखीच भीति असते असें नव्हे. युधिष्ठिराचा जयस्तंभ, किंवा बौद्ध राजाचीं डोंगरातील कोरींव लेणीं, यांची आजकालच्या राजांना भीति बाळगण्याचें कारण नाहीं. काल-मानाप्रमाणें ही भीति उत्तरोत्तर कमी होत जाते. आणि यामुळेंच वॉरन हेस्टिंग्जला किंवा लॉर्ड कॉर्नवालिसला जे उद्गार काढितां आले नसते, ते आज आपल्या लोकप्रिय कर्झनसाहेबाना निर्धास्तपणें काढतां आलें आहेत. १७८४ मध्यें जर कर्झनसाहेब हिंदुस्थानचे व्हाईसरॉय असते, तर त्यांनीं असे उद्गार काढिले नसते. यावरून कर्झनसाहेबांच्या उद्गारापासून वरील

सिद्धांताला कोणत्याहि रीतीनें बाध येतो असें मुळींच नाहीं, हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे.

---

# रिलीफ कामें काढण्यांतील उद्देश : : १५

कोणतेंहि कृत्य करावयाचें ठरलेलें असलें म्हणजे ते का करावें असा त्याबद्दल साहजिक प्रश्न उत्पन्न होतो. असल्या प्रश्नासंबंधानें इंग्रजी तत्त्ववेत्त्यामध्यें दोन पक्ष आहेत. एका पक्षाचें म्हणणे असें आहे कीं, अमुक एक गोष्ट स्वभावतःच सर्व मनुष्याना करावीशी वाटते, व मनुष्याची सदसाद्विवेकबुद्धि ती गोष्ट करण्याला त्याला प्रवृत्त करते, म्हणून आपण ती गोष्ट करतों. आणि दुसऱ्या पक्षाचें असें म्हणणें आहे की, ती गोष्ट करण्यापासून आपला कांहीं तरी फायदा होणार आहे असें वाटून, आपण ती गोष्ट करण्याला तयार होतों. खरें बोलण्याकडे मनाची स्वाभाविकच प्रवृत्ति होते, व खरें बोलणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, अशी मनुष्याला साहजिक स्फूर्ति होते, म्हणून मनुष्य खरें बोलतो, असें पहिल्या पक्षाच्या म्हणण्यातील तात्पर्य होय. आणि एकंदरींत सारासार विचार करून पाहतां, खोटें बोलण्यापेक्षां खरें बोलण्यापासून अधिक फायदा होतो, असें अनुभवावरून आढळून आलें असल्याकारणानें मनुष्याची अधिक फायद्यासाठीं खरें बोलण्याकडे प्रवृत्ति होते, असा दुसऱ्या पक्षाच्या म्हणण्यांतील अभिप्राय होय.

हे दोन्ही पक्ष आपल्या इकडील शास्त्रांतहि मधून मधून उपलब्ध होतात. मीमांसा, धर्मशास्त्र, वगैरेसंबंधींच्या ग्रंथांतून अमुक कर्म अदृष्टफल आहे, व

अमुक दृष्टफल आहे, असे उल्लेख आढळतात. म्हणजे त्या कर्माचें फल अदृष्ट आहे तरी पण ज्या अर्थी शास्त्रानें तें सांगितलें आहे त्या अर्थी तें केलेंच पाहिजे, व दुसऱ्या एका कर्माचें फल काय होणार हें दिसत आहे म्हणून त्या फलासाठीं तें कर्म केलें पाहिजे, असे दोन पक्ष आपल्यातहि आहेत. परंतु आपल्यामध्यें दृष्टफलवादी (Utilitarian) लोकाच्या मतांचा प्रसार कधींच फारसा झालेला नाहीं. कर्मापासून प्राप्त होणाऱ्या फलाची इच्छा मनात न धरिता तें आपलें कर्तव्यकर्म आहे म्हणून तें करावयाचें, अशा भावार्थाचा 'अनाश्रितः कर्मफलम्' इत्यादि भगवद्गीतेंतील वचनातून जो उपदेश केलेला आढळतो, त्याचेंच प्राबल्य हिंदु लोकांच्या मनावर जास्त आहे, असें त्याच्या धार्मिक व लौकिक आचरणावरून अगदीं स्पष्ट होतें. परतु पाश्चात्य लोकामध्यें दृष्टफलवादी मंडळींचा भरणा विशेष, व याच मताच्या अनुरोधानें त्यांचीं बहुतेक कृत्यें घडत असतात, असें वेळोवेळीं आपणांस दिसून येतें.

रिलीफ कामें काढण्यांतील मूळचे हेतु काय असावेत या प्रश्नाविषयीं चर्चा करताना वरील विचार लक्षांत बाळगणें जरूर आहे. अन्नावांचून लोक उपाशी मरूं लागले तर त्याना अन्न देऊन त्याचे प्राण वाचवावेत, अशी स्वाभाविक इच्छा मनुष्याच्या मनांत उत्पन्न होते. व त्याप्रमाणे तो गरिबांना अन्नदानहि करतो. परंतु गरीबाना अन्न दिल्यापासून मी मोठा धार्मिक आहें अशी माझी लोकात प्रख्याति होईल, लोक माझी स्तुति गातील, व ईश्वर अस्तित्वात असेल तर त्याच्या घरीं मला पुण्य लागेल, इत्यादि अन्नदानापासून होणारे फायदेहि कित्येकाना दिसतात. आणि त्यामुळें ते गरीबांना अन्न वांटतात. किंवा तिसरा असाहि एक वर्ग मानिता येईल कीं, ज्याच्या मनांत वरील दोन्ही प्रकारचे विचार एकदम येऊन ते गरीबाना अन्न देण्याला प्रवृत्त होतात. परंतु हे सामान्य लोकांच्या नीतीचे नियम होत. हे राजाच्या नीतीशीं कितपत जुळतील ह्याची शंकाच आहे. उदाहरणार्थ, हल्लींचीं रिलीफ कामें काढण्याविषयीं आपल्या सरकारची प्रवृत्ति कां होते याचा आपण विचार करूं लागल्यास, सरकारच्या मनांत तसें करण्याबद्दल स्वाभाविक स्फूर्ति (Intuition) होते असें आपल्याला कधींहि म्हणतां येणार नाहीं. कारण हल्लीं जसें आपलें सरकार आहे तसें सरकार घेतल्यास त्यांच्या ठिकाणीं आधीं मन

या वस्तूचाच जर पूर्ण अभाव असतो, तर मग तेथें मनातील स्वाभाविक स्फूर्ति तरी कोठून संभवणार ? पूर्वीचे आपले राजे म्हटले म्हणजे स्वतंत्र एक एक व्यक्ति असत. त्यामुळें त्याच्या मनांत स्वाभाविक स्फूर्ति उत्पन्न होणें शक्य होतें. परंतु हल्लींचें आपलें सरकार म्हटलें म्हणजे एक व्हाईसरॉय आणि त्यांचे दहा पाच कौन्सिलर मिळून झालेलें असतें. अशा या अनेक व्यक्ती मिळून बनलेलें जें एक सरकार, त्या सरकारचें एक निराळें मन कोठें प्रसिद्ध आहे काय ? व जर दहा पाच असामी मिळून बनलेल्या सरकारचें एक निराळें मन म्हणून प्रसिद्ध नाहीं, तर मग त्या मनांत उत्पन्न होणारी स्वाभाविक स्फूर्ति तरी कोठून संभवणार ? पण याशिवाय प्रत्यक्ष प्रमाणानेंहि असें उघड सिद्ध होत आहे कीं, सरकार रिलीफचीं कामें काढण्याला स्वाभाविक स्फूर्तीनें प्रवृत्त होत नाहीं. आपण असें पाहातों कीं, दुष्काळाच्या कायद्यात रिलीफ कामें काढावीं असें कलम असल्यामुळें सरकार तीं कामें काढतें. आतां कायदा जो केलेला असतो तो स्वाभाविक स्फूर्तीनें केलेला असतो, असें कधींहि म्हणता यावयाचें नाहीं. अमुक केल्यापासून तोटा आहे आणि अमुक केल्यापासून फायदा आहे, म्हणून अमुक करूं नये आणि अमुक करावें, अशा पद्धतीच्या विचारानें कायदेकौन्सिलचे मेंबर कायदा तयार करीत असतात. तेव्हा असल्या कायद्यात सांगितलेलीं रिलीफ कामें काढण्याचें कृत्य अर्थात् सहेतुक आणि काहीं तरी फलाच्या आकांक्षेनेंच सांगितलेलें असें असलें पाहिजे. 'दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे । देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥' अशा प्रकारचें रिलीफ कामावरील अन्नदान खात्रीनें नव्हे, हें ह्यावरून उघड होत आहे. तेव्हा कोणत्याहि फलाची आकांक्षा मनांत न धरिता सरकार रिलीफ कामावर खर्च करीत आहे, असें कोणालाहि म्हणतां यावयाचें नाहीं, हें सिद्ध झालें.

आतां जर सरकारच्या मनांत फलाची आकांक्षा आहे तर ती कोणत्या फलाची आकांक्षा असली पाहिजे, हा प्रश्न आपणापुढें येतो. पण येथें कोणी अशी शंका काढील कीं, ज्या सरकारनें बदरीकेदारपासून रामेश्वरपर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथपर्यंत सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केलें आहे, त्या सरकारला आणखी कोणत्या फलाची आकांक्षा असूं शकणार आहे ? पण ही शंका काढणारांना राजांच्या काळजावर ज्या काळज्या रात्रंदिवस चोंची मारीत असतात,

त्याची मुळीच कल्पना नसावी असें दिसते. राज्य मिळालें नाहीं तोंपर्यंत तें मिळेल कसें आणि मिळाल्यानंतर ते टिकेल कसें, या चिंता राजाच्या मनाला ( त्याचें राज्य जाऊन तो निश्चित होईपर्यंत ) कधींहि सोडीत नाहींत. तेव्हा राज्यपदाधिरूढ लोकांनाहि ज्याची आकांक्षा करावी लागते अशी काहीं फळें आहेत. राजानीं राज्य संपादन केल्यानंतरहि तें कायम राहण्यासाठीं त्यांना कित्येक गोष्टी कराव्या लागतात. राजा नवीन राज्य जिंकताना न्याय अन्यायाकडे फारसे पाहात नाहीं. पण राज्य जिंकल्यानंतर तें टिकविण्यासाठीं त्याला न्यायाच्या अदालती उघडाव्या लागतात. व त्याच कारणासाठीं रिलीफ कामें उघडण्याचीहि आवश्यकता त्याच्यावर येऊन पडते.

राज्यावर जसे बाहेरून शत्रु येतात तसे आतूनहि ते उत्पन्न होतात. त्या आंतील शत्रूंपैकीं भूक हा एक अतिशय भयंकर शत्रु आहे. प्रत्येकाला भूक लागते. पण तिचें समाधान करण्याचें साधन बहुतेकापाशीं ज्या दिवसात असतें त्या दिवसांत तिचें भयंकर स्वरूप दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. परंतु दुष्काळाच्या वेळी त्या सुसरीचे दात किती तीक्ष्ण आहेत याचा अनुभव येऊं लागतो. प्रत्येकाची भूक निरनिराळी घेतली तर ती इतकी भयंकर नसते. परंतु शेंकडो, हजारों, किंबहुना, लाखों बुभुक्षित लोकाची भूक एकत्र करून पाहिली तर ती अत्यंत उग्र, असह्य, आणि भयप्रद अशी भासल्यावाचून कधींहि राहणार नाहीं. ही समष्टिरूप क्षुधादेवता अशा वेळीं फारच भेसूर स्वरूप धारण करते. डोळे खोल गेलेले, गालफडें बसलेलीं, दाताच्या कवळ्या बाहेर आलेल्या, झिंज्या अस्ताव्यस्त सोडलेल्या, पोटाला भाकाळ्या पडलेल्या, पाठीचीं हाडें बाहेर निघालेलीं, नखें वाढलेली, कंबर वांकलेली, हातपायाच्या काड्या झालेल्या, पावलें रक्तबंबाळ झालेलीं, सर्वांगावर वाकळा पांघरलेल्या, गळयात झोळी घातलेली, आणि हातात फुटकें खापर किंवा घडकी करवंटी घेतलेली, असें अक्राळविक्राळ स्वरूप धारण करून ही समष्टिरूपी क्षुधादेवता जिकडे तिकडे सैरावैरा धावूं लागते. व ती वखवखलेली देवता आपल्यापुढें जें येईल तें भक्षिण्यासाठीं आपला जबडा पसरून हें खाऊं कां तें खाऊं, असें करीत जेव्हां श्रीमंतांच्या दारावर धक्के मारूं लागते, तेव्हां तिला पाहून कोणाची पाचावर धारण बसणार नाहीं ? व कोणाच्या अंगावर शहारे उभे राहाणार नाहीत ? ही क्षुधादेवता आता मला

खाऊन टाकील की काय, अशी भीति प्रत्येक श्रीमंताच्या मनाला वाटूं लागते; व ज्याअर्थी राजा हा सर्व श्रीमतातील श्रीमंत त्याअर्थी या क्षुधा-देवीची त्याला सर्वात अतिशय धास्ती येऊन पडते. आणि हिच्या तावडींतून आता मी कसा सुटतों, या विचारानें अंतर्यामी थरथर कापत तो तिच्या शातवनार्थ तिच्या घशात कोट्यावधि रुपये ओतण्याला तयार होतो. प्रत्येक गरीबाची भूक त्याच्या झोपडीच्या पडक्या भिंतींच्या आंत आहे तोपर्यंत ठीक आहे. पण सर्व गरीबाची भूक रस्त्यावर येऊन उभी राहिली आणि ओरडूं लागली, म्हणजे मात्र ती काय करील आणि काय न करील, याचा नेम नाहीं. राज्यावर आलेलें परचक्र पुरेल, पण राज्यात उत्पन्न झालेली भूक पुरवणार नाहीं. शत्रूच्या सैन्याला अन्नसामग्री ज्या प्रमाणानें ज्यास्त, त्या प्रमाणानें तें सैन्य ज्यास्त भयकर. परंतु भुकेची गोष्ट त्याच्या अगदीं उलट आहे. कारण भुकेला अन्नसामग्री ज्या प्रमाणानें कमी त्या प्रमाणानें ती अधिक भयंकर होते. पाण्याने सर्व अग्नि विझतात, परतु वडवाग्नि हा पाण्यानें न विझता उलट वृद्धिंगतच होतो; त्याचप्रमाणेच अन्न-सामग्रीच्या कमतरपणामुळे जरी सर्वांचा जोर कमी होतो, तरी या क्षुधारूपी रिपूला त्यामुळे कमजोरपणा न येता, उलट त्याचा जोर अधिकच वृद्धिंगत होतो. असा हा विलक्षण प्रकारचा रिपु उत्पन्न झाला म्हणजे, तो प्रथमतः मुख्य किल्ल्याच्या बाहेरच्या बुरुजाच्या रागावर हल्ले करतो, व एक एक बुरुज हस्तगत करीत करीत तो अखेरीस मुख्य किल्ल्यापुढं मोरचे बाधून उभा राहतो. भिकारी लोक भीक मागून पोट भरेनासें झालें म्हणजे साधारण श्रीमंताचीं घरें फोडूं लागतात, व तेवढ्यानेहि पोट जळत नाहीं असें झालें म्हणजे, ते बड्या श्रीमंताचे किल्ले फोडूं लागतात. अशा रीतीनें भुकेपासून राज्यात चोऱ्यामाऱ्या आणि बंडाळ्या उपस्थित होऊं लागतात. व त्याचा जर योग्य बंदोबस्त केला नाहीं, तर यापासून अखेरीस राज्याला धोका येण्याचा संभव असतो. म्हणून स्वसंरक्षणासाठींच राजाना या क्षुधादेवीची तृप्ति करावी लागते, व हें एक राजाचें कर्तव्यकर्म होऊन बसतें. ज्याप्रमाणें परशत्रूपासून आपल्या राज्याचें रक्षण करण्यासाठीं राजाला लष्करी खात्याकडे काहीं खर्च करावा लागतो, त्याप्रमाणेंच या क्षुधारूपी शत्रूपासून आपल्या राज्याचें रक्षण

करण्यासाठीं त्यानें गरीब लोकांना अन्न देण्याच्या कामीं कांहीं पैसे खर्च करणें जरूर असतें. त्यांत तो कांहीं परोपकार करतो किंवा लोकांवर दया करतो अशी मुळींच गोष्ट नाहीं. त्यानें कितीहि पैसे खर्च केले तरी ते स्वार्थासाठींच होत, परार्थासाठीं नव्हेत, हें अगदीं उघड आहे.

वरील सामान्य विवेचनावरून हें लक्षांत येईलच कीं, रिलीफ कामें काढण्यात आपले सरकारहि ज्या फलाची आकांक्षा करीत असतें, तें फल म्हटलें म्हणजे स्वराज्यसंरक्षण हें होय. व दुर्भिक्षासारख्या संकटसमयीं चोऱ्या-माऱ्या आणि बंडाळी यांजपासून स्वराज्यसंरक्षण नीट रीतीनें व्हावें, या उद्देशानें रिलीफसारखी कामें काढलेली असलीं पाहिजेत. अन्नासाठीं हापापलेलीं जिवत भुतें आपल्या राजधानीच्या रस्तोरस्तीं आणि गल्लोगल्लीं भटकण्यापेक्षा, चुकारपणा करीत आणि गमतच का होईना, रिलीफ कामावर एकत्र कोंडून राहिलीं तरी त्यात फायदा आहे, ही गोष्ट कोणाच्याहि ध्यानात आल्यावाचून राहणार नाहीं.

---

# एक नवीन कारखाना : : : : १६

एका बातमीपत्रांतील पुढील मजकूर वाचकांस मनोरंजक वाटल्यावाचून राहणार नाहीं, असें समजून, तोच आज आम्ही आपल्या वाचकांपुढें मांडीत आहों.

“++++++++ मला तें मुळींच खरें वाटेना. मी आपल्या मित्राच्या बोलण्यावर कधींच अविश्वास केला नव्हता. पण या कारखान्याच्या बाबतींत तो अगदीं निव्वळ थाप मारतो आहे, असें मला वाटलें. कांहीं केल्यानें

माझी खात्री होईना. तेव्हां रामभाऊ मला म्हणाले, "असें कशाला पाहिजे? तुम्ही प्रत्यक्ष तेथें जाऊन पाहा म्हणजे झालें." ही गोष्ट मला पसंत पडली आणि मी तो कारखाना पाहण्यासाठीं लागलाच निघालों.

रामभाऊंनीं सांगितलेल्या खुणेप्रमाणें शोध करीत करीत मी सदर बाजारातून चाललों असतां, एकाएकीं एक विस्तीर्ण आणि भव्य साईनबोर्ड (पाटी) माझ्या दृष्टीस पडला. त्याच्यावर सभ्य गृहस्थ तयार करण्याचा कारखाना अशी अक्षरें कोरलेलीं होतीं. तीं पाहून रामभाऊंनीं थाप मारली नाहीं, एवढी माझी खात्री झाली; पण ही पाटी लावणारे कारखानेवाले सभ्य गृहस्थ तयार करून देण्याविषयींची थाप मारीत नाहींत, याबद्दल माझी खात्री होईना. तरी पण एकाएकीं त्या कारखानेवाल्याची काहीं लबाडी असावी, असें मानण्याचेंहि मला धैर्य होईना. त्या साईनबोर्डकडे पाहून मी आश्चर्य-चकित झालों आणि आपल्या मनात म्हटलें, "काय? ह्या विसाव्या शतकात सभ्य गृहस्थ करण्याचीं देखील यंत्रें निघालीं आहेत काय?" पण हे शक्य कसें होईल, याबद्दल फिरून मनाला शंका वाटण्यास सुरुवात झाली त्या शंकेचें समाधान सभ्य गृहस्थ तयार करण्याची यांत्रिकरचना आपण प्रत्यक्ष डोळयानें पाहिल्यावाचून व्हावयाचें नाहीं, असें समजून, मीं कारखान्यात जाण्याचा निश्चय केला.

कारखान्याच्या दरवाज्याशीं जातों तों मला एका खाजगी संत्र्यानें मज्जाव केला; तेव्हां रुप्याच्या एका वर्तुळाकृति लहानशा तुकड्यावर आपल्या राणी सरकारचें कोरलेलें एक चित्र माझ्यापाशीं होतें तें मीं त्याला नजर केलें. त्याचा त्यानें अतिशय राजनिष्ठेने आणि स्वामिभक्तीनें स्वीकार केला. व मज्जाव करते वेळीं रुंद केलेली छाती किंचित् आकुंचित करून तो मला म्हणाला, "येथें सभ्य गृहस्थ कसा बनविला जातो त्याची कृति पाहून ती कदाचित् कोणी बाहेर फोडील, म्हणून पाहिजे त्याला आंत जाण्याची परवानगी नसते. याच कारखान्यांत तयार होऊन गेलेले एक सभ्य गृहस्थ ++ नंबरच्या बंगल्यात राहतात. त्यांची चिठ्ठी आणल्यावांचून कोणाला आंत सोडण्याचा हुकूम नाहीं. पण तुम्ही आंत जा. काहीं हरकत नाहीं." सभ्य गृहस्थ बनविण्याच्या कारखान्याच्या दारावर असलेल्या ह्या सभ्य गृहस्थाचें वर्तन पाहून मला फार आश्चर्य वाटलें!

मीं आत जाऊन पाहिलें तेव्हां त्या कारखान्याचा अवाढव्यपणा पाहून तर मी अगदीं थक्क झालों. कारखान्याचें काम फारच विस्तीर्ण होतें. त्याच्या दोन बाजूला दोन मोठाले दरवाजे होते. एकांतून कच्चा माल कारखान्यात येत असे. व तेथील कृतीनें त्याचा सभ्य गृहस्थ बनला म्हणजे तो गाडींत घालून दुसऱ्या दरवाज्यानें बाहेर पाठविण्यात येत असे. कापसाचीं बोंडें सुताच्या गिरणींतील यंत्रात गेलीं म्हणजे त्याचें जसें सूत होऊन बाहेर पडतें, त्याप्रमाणें मी जर एखाद्या यंत्रात सापडलों, तर सभ्य गृहस्थ होऊनच बाहेर पडेन, अशी मला फार भीति वाटत होती. म्हणून मी बाहेरून बाहेरूनच प्रेक्षण करीत होतों. इतक्यात त्या कंपनीचा मुख्य म्यानेजर कोठे आसपास होता, त्याची नजर माझ्यावर गेली, तेव्हा तो धावत मजजवळ येऊन म्हणाला, " काय, तात्या, तुम्हाला जटल्मन् व्हावयाचें आहे काय ? " या प्रश्नाचें मी उत्तर देणार, इतक्यात कच्च्या मालाचे बोजे उचलून कारखान्यांत नेऊन टाकण्याचें काम ज्याच्याकडे होतें असे चार पांच कुली माझ्याजवळ येऊन मला उचलूं लागले. आता हे मला कोठल्या तरी एंजिनमध्यें नेऊन घालणार हे खास, आणि आता सभ्य गृहस्थ होण्याचें आपल्या कपाळचें कांहीं केल्यानें चुकत नाहीं, असे वाटून मी अगदीं गयावया करूं लागलों, व त्या म्यानेजरच्या पाया पडून त्याला म्हटलें कीं, " मी सभ्य गृहस्थ होण्यासाठीं आलो नाहीं, मला उचलून नेऊं पाहाणाऱ्या या सभ्य गृहस्थाच्या हातून जर आपण माझी सुटका कराल तर आपले मजवर फार आभार होतील." तो म्यानेजर सभ्य गृहस्थ होता. पण तो त्या कारखान्यात तयार झालेला नव्हता. तो घरगुती रीतीनें तयार झालेला होता. म्हणून त्याला माझी करुणा आली, व त्यानें माझ्याभोंवतीं जमलेल्या घाटी हमालांना दुसऱ्या कामाला जावयास सांगितले. नंतर मीं म्यानेजर साहेबास सांगितलें कीं, " मी स्वतः सभ्य गृहस्थ व्हावयास आलों नाहीं, परंतु दुसरे लोक येथें सभ्य गृहस्थ कसे बनविण्यात येतात त्याची कृति जर पाहावयास मिळेल तर ती पाहण्यासाठीं मी येथें आलों आहें." म्यानेजर म्हणाले, " चला या माझ्या-बरोबर. मी तुम्हाला सर्व गिरणी दाखवितों."

असें बोलून आम्ही दोघे चालूं लागलों. म्यानेजरसाहेब फारच मोकळ्या मनाचे दिसले. म्हणून मी त्यांस आपल्या शंका स्पष्टपणें विचारण्याची सुरुवात केली. " माझी पहिली शंका अशी आहे कीं," मी विचारलें, " यांत्रिक

सामर्थ्यानें सभ्य गृहस्थ कसा तयार करतां येईल?" "कां बरें?" ते म्हणाले, "ऑक्सिजन आणि हैड्रोजन यांच्यापासून पाणी होतें असें आपल्याला कळल्यावर, पाणी तयार करतां यावयाचें नाहीं काय? साबणाचे किंवा सोडावॉटरचे घटकावयव काय आहेत हे कळलें म्हणजे ज्याप्रमाणें त्याचे कारखाने काढतां येतात, त्याप्रमाणें सभ्य गृहस्थाचे घटकावयव कळल्यानंतर सभ्य गृहस्थ तयार करण्याचा कारखाना काढतां येणें का शक्य नाहीं? कोणताहि माल उत्तम प्रकारचा तयार होण्याला त्यात घटकद्रव्यें कोणकोणतीं असावीं आणि तीं कोणत्या प्रमाणाने असावीं, हें कळणें फार जरूरीचें आहे. व सभ्य गृहस्थ तयार करण्याच्या बाबतींत तर या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावें लागतें. व हें फार खर्चाचें काम आहे. ज्या ज्या संस्थातून सभ्य गृहस्थाचा उपयोग करण्यात येतो त्या त्या सर्व ठिकाणी जाऊन सभ्य गृहस्थाच्या अंगीं काय काय गुण असतात, हे बारकाईनें पाहून त्यावरून आम्हीं हल्लींची ही कृति ठरविली आहे. क्लबात आणि सभात, घरीं आणि कचेरींत, वादविवादाच्या बैठकीत आणि व्याख्यानाच्या ठिकाणीं, मित्रमंडळींत आणि परकीय लोकांत, वेश्यागृहात आणि कलालाच्या दुकानांत, नाटकगृहात आणि दरबारात, घरच्या मेजवान्यांत आणि वेटिंगरूममधील उपहारात, अशा अनेक प्रसंगीं अनेक सभ्य गृहस्थाच्या अंगचे जे गुण आढळून येतात, त्यावरून उत्तम रसायनशास्त्रवेत्त्यांच्याकडून सभ्य गृहस्थामधील घटकावयव काय काय असावेत हें ठरवून घेऊन, नंतर आम्हीं हा कारखाना काढला आहे. आम्हीं सुमारें तीस केमिस्टस् मुद्दाम या कामाकरिता पन्नास वर्षे कामावर लाविले होते. त्यांनीं पुष्कळ एक्सपेरिमेंटस् करून पाहिले. पहिल्यापहिल्यानें तर त्यानीं जे सभ्य गृहस्थ तयार केले होते, तो माल लोकांच्या अगदींच पसंतीस उतरेना. पुढें त्या केमिस्टस्ना असें आढळून आलें कीं, सभ्य गृहस्थ तयार करण्याचा राधा करतांना त्यांत स्वाभिमानाचा अर्क जास्त टाकला जातो, त्यामुळें भट्टी बिघडते. ही चूक लक्षात येऊन आमच्या रसायनशास्त्रवेत्त्यांनीं त्याप्रमाणें दुरुस्ती केली. तरी पण जो माल तयार होई, त्यांत एक प्रकारचा चिवटपणा आणि कठिणपणा राहात असे; त्यामुळें आमच्या गिरणींतील सभ्य गृहस्थांचा खप मुंबईसारख्या मोठमोठ्या व्यापाराच्या शहरीं मुळींच होत नसे. तेव्हां अतिशय मऊ सभ्य गृहस्थ बनविण्याकडे आमचें सारें लक्ष लागलें. व पुढें

गाम्ही कापूस, शेण, चिंध्या, पेंढा, लांकडाचा भूस, या द्रव्यांपासून आपला ।भ्य गृहस्थ तयार करूं लागलों. तेव्हां आमचा माल बाजारात जरासा पसंत डूं लागला. व त्याचा थोडा जास्ती खपहि होऊं लागला. त्यांतहि उत्तरोत्तर गामच्या रसायनशास्त्राच्या गुरुजींनीं सुधारणा करून आज मित्तीला आमचा गरखाना इतक्या उदयाला आणून सोडला आहे कीं, आमच्या येथल्या ।ारखा जंटलमन दुसऱ्या कोठेंच तयार होत नाहीं. एवढा वेळपर्यंत मीं ।ागितलेले शोध हे सभ्य गृहस्थाच्या अंतस्थ रचनेबद्दल होत. परंतु त्याच्या ।ाह्य स्वरूपातहि अलीकडे आम्हीं पुष्कळ सुधारणा केल्या आहेत. पूर्वी नशी एक खोटी कल्पना प्रचलित झालेली होती कीं, सभ्य गृहस्थ हा मनुष्य गाहे आणि त्याचा सभ्यपणा हा त्याच्या मनावर अवलंबून असतो. पण ही कल्पना .ल्लीं बहुतेक लयाला गेलेली आहे. आणि सभ्यपणाचा मनाशीं कांहीं संबंध गाहे असें जर हल्लीं कोणी प्रतिपादन करील, तर त्याची मूर्खांत गणना गाल्यावाचून राहाणार नाहीं. हल्लीं सभ्य गृहस्थामध्यें मन हा पदार्थ घातलेला मसतो, असें कोणीहि मानीत नाहीं. सभ्य गृहस्थाचा हा सभ्यपणा केवळ त्याच्या ।ाह्य स्वरूपावर अवलंबून असतो, असा हल्लींचा सिद्धांत आहे. आणि या सेद्धातावरच आम्हीं सभ्य मनुष्य तयार करण्याची रीत बसविलेली आहे."

या लांबलचक उत्तरानें माझें फारसें समाधान झालें नाहीं. तरी पण दुसऱ्या शंकाचें समाधान करून घेण्याची मला विशेष उत्कंठा असल्यामुळे गीं म्यानेजर साहेबांस पुन्हां असें विचारिलें कीं, "तुमच्या कारखान्याला कच्च्या मालाचा पुरवठा कसा होतो? कागदाच्या गिरणीला गवत, पेंढा व फाटके कागद लागतात. कांचेच्या कारखान्याला फुटक्या काचा गोळा कराव्या लागतात. व साखरेच्या कारखान्यासाठीं गुरांचीं हाडकें वेंचावीं लागतात. त्याप्रमाणें तुमच्या कारखान्यात जो कच्चा माल लागतो, तो तुम्ही कोठून पैदा करतां?" यावर म्यानेजरनीं उत्तर दिलें कीं, "कच्चा माल गोळा करण्यासाठीं आम्हाला मुळींच बाहेर जावें लागत नाहीं. येथें आपल्या पायानें चालत आलेला कच्चा माल रोजच्या रोज तयार होऊन बाहेर कसा पडेल, याचीच आम्हांला काळजी असते. इतकें पुष्कळ काम नेहमीं आमच्याकडे कसें येतें याचें कारण मीं तुम्हाला सांगतों. अलीकडे सरकारनें आपल्या पैशाच्या पिशवीचा गळा

अतिशय दाबून धरला आहे, आणि किताबाच्या पिशवीचा दोरा अतिशय ढिला सोडला आहे; त्यामुळें सरकारपासून लोकाना फुकट पदव्या मात्र मिळतात, परंतु त्या पदव्यांची खरी योग्यता राखण्याला लागणारे पैसे सरकारांतून मिळत नाहींत. त्यामुळें ज्याला ज्याला म्हणून पदवी मिळते, मग ती कितीका क्षुल्लक असेना, त्याला त्याला कोरडा दिखाऊ भपका करावा असें वाटतें. शिवाय आज चार वर्षें हिंदुस्थानात प्लेग असल्यामुळें प्लेगच्या वेळीं युरोपियन अधिकाऱ्यांना पगार वांटून सरकारचे पैसे खर्च झाल्यामुळें, सरकारनें नेटिवांना बऱ्याच पदव्या दिल्या आहेत. शिवाय अशी एक गोष्ट आहे कीं, सरकारचा स्वतःच्या कर्तबगारीवर फार थोडा भरंवसा असल्यामुळें कीं काय कोण जाणें, अलीकडे सरकारची जरा कोणी तरफदारी केली कीं त्याला पदवी मिळाली म्हणून समजावेंच. सरकार दुसऱ्याच्या पाठबळासाठीं आणि स्तुतीसाठीं इतकें भुकेलेलें पूर्वीं कधींच नव्हतें. त्यामुळें अलीकडे पदव्या फार सवंग झाल्या आहेत. व त्या बहुधा अयोग्य मनुष्यांच्याच वांट्याला येत आहेत. ज्याच्या अंगांत मोठेपणाचे कांहीं देखील गुण नसतात, पण ज्यांनी एखादे वेळीं सहज कोठें एखादी गुप्त गोष्ट कोणाच्या कानांत सांगितली असेल, किंवा सरकारच्या वतीनें एखादें पुस्तक लिहिलें असेल, किंवा प्लेगमध्यें सरकारचें फुकट, आणि लोकांचें विकत, काम केलें असेल, ते एखादे दिवशीं अंथरुणातून उठून जागे होऊन पाहातात तों त्यांना असें आढळून येतें कीं, त्याच्यापैकी कोणी रावबहादूर झाले आहेत, कोणी ऑनरेबल झाले आहेत, कोणी जे. पी. झाले आहेत, कोणी खानबहादूर झाले आहेत. अशा प्रकारें अयोग्य माणसांवर एकदम या पदव्यांचा बोजा येऊन पडला म्हणजे, ते अगदीं भांबावून जातात. व आतां आपल्याला सभ्य गृहस्थ झालें पाहिजे असें त्यांस वाटूं लागतें. व ते सभ्य गृहस्थ होण्यासाठीं आमच्या कारखान्यांत येतात. तेव्हां हिंदुस्थानात प्लेग आहे, इनॉक्युलेशन हा जोपर्यंत त्याचा उपाय म्हणून मानला जात आहे, व त्यामुळें जोंपर्यंत गचाळ आणि अयोग्य लोकांना पैशाच्याऐवजीं पदव्या मिळत आहेत, तोंपर्यंत तरी निदान आमच्या गिरणीला कच्चा मालाचा तोटा पडणार नाहीं, अशी समजूत आहे. मात्र सरकारच्या हस्तें आमच्या या कारखान्याला उत्तेजन मिळत आहे, ही गोष्ट तुम्ही बाहेर फोडूं

नको. नाहीं तर पैशाच्या अडचणींत सांपडलेले सरकार आमच्या या कारखान्यावर एखादी नवीन 'ड्यूटी' मात्र बसवील. शिवाय आमच्या गिऱ्हाईकांचा आणखी एक वर्ग आहे. कोणाला कलेक्टरला भेटावयाचें असते, कोणाला कमिशनरकडे जावयाचें असतें, कोणाला कौन्सिलरची गांठ घ्यावयाची असते, कोणाला लेव्हीला जावयाचें असतें, किंवा कोणाला बॉलचें बोलावणें असते. अशीं हजारचीं हजार कामें असतात. व या नेटिवांना सभ्य गृहस्थाच्या चालीरीती माहित नसल्यामुळें ते सर्व येथें येतात."

अशा रीतीनें बोलत चाललों असता, आम्ही एका मोठ्या दालनामध्ये आलों. तेथें कमींत कमी सात आठशें शिंपी काम करीत असलेले मीं पाहिले. तें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. व सभ्य गृहस्थ तयार करण्याच्या कारखान्यात शिंप्याचें काय काम, आणि काम असलेंच तरी इतके शिंपी कशाला, म्हणून मीं मॅनेजरसाहेबांना प्रश्न विचारला. तेव्हां ते म्हणाले, "वः ! हाच तर आमच्या कारखान्यातील मुख्य भाग ! हा एक भाग आणि या शिवाय दुसरा एक भाग आहे, हे दोन भाग काय ते आमच्या कारखान्यांत मुख्य." असें म्हणून त्यांनीं मला माडीवरील एका भव्य दिवाणखान्यात नेलें. तेथें चारी बाजूंनीं आरसे लाविलेले होते. व त्या दिवाणखान्यात ज्या खुर्च्या मांडलेल्या होत्या त्यापैकीं कांहींवर कित्येक न्हावी बसलेले होते. त्यांच्याकडे बोट दाखवून मॅनेजर म्हणाले, "हे पाहिलेत ! या कारागिरांच्या हातून सभ्य गृहस्थ बनला जातो व बाकी राहिलेला भाग तुम्ही नुकत्याच पाहिलेल्या शिंप्याकडून पुरा केला जातो. किरकोळ कामासाठीं दुसऱ्या कारागिरांची गरज लागते. पण मुख्यत्वेंकरून सभ्य गृहस्थ हे न्हावी आणि शिंपी यांच्या कर्तबगारीचें फळ आहे. न्हावी सभ्य गृहस्थाचा चेहरा गुळगुळीत आणि सुंदर करतो, आणि शिंपी सभ्य गृहस्थाच्या अंगच्या सर्व दुर्गुणांवर पांघरूण घालतो. अहाहा ! देवाचे आपल्यावर किती उपकार आहेत कीं, त्यानें न्हावी आणि शिंपी ह्या दोन जिनसा निर्माण केल्या आहेत ! आज न्हावी आणि शिंपी नसते तर सभ्य गृहस्थ नसते ! आणि जेथें सभ्य गृहस्थ नाहींत तें शहर कसलें ? किंवा राष्ट्र कसलें ? जगांत न्हावी आणि शिंपी नसते तर जगाची काय भयंकर स्थिति झाली असती ! सगळ्यांच्या दाढीमिशा वाढलेल्या आणि सगळे उघड्या अंगानें फिरणारे अशी स्थिति झाली असती !"

हें आमचें बोलणें चाललें आहे इतक्यात, कांहीं हमालांनीं एक खटारा भरून कच्चा माल आणल्याची वर्दी म्यानेजरास दिली. ती पोंचतांच ते व मी खालीं आलों. खटाऱ्यामध्यें सभ्य गृहस्थ होण्यासाठीं आलेले बरेच लोक एकावर एक आडवे तिडवे घातलेले होते. व घोटाळा होऊं नये म्हणून प्रत्येकजण कां सभ्य गृहस्थ होत आहे, याबद्दल प्रत्येकाच्या गळ्यांत एकेक चिठ्ठी अडकविलेली होती. या चिठ्याचा उपयोग, म्यानेजरनें मला असें सांगितलें, न्हाव्याच्या डिपार्टमेंटमध्यें फारसा होत नाही; कारण तेथें सगळ्याची सारखीच हजामत करावयाची असते. परंतु शिंप्यांच्या दालनांत यांची फार जरूर लागते ! कारण रावसाहेब झाल्यामुळें जर कोणी सभ्य गृहस्थ होण्यास आला असेल तर त्याचा पोशाख निराळा, रावबहादूर झाल्यामुळें आला असेल तर त्याचा पोशाख निराळा, हायकोर्टाचा वकील म्हणून आला असेल तर त्याचा पोशाख निराळा, डॉक्टर म्हणून आला असेल तर पोशाख निराळा, जज्ज असेल तर पोशाख निराळा, आणि व्यापारी असेल तर पोशाख निराळा. सगळी खुबी काय ती पोशाखात आहे.

अशा रीतीनें म्यानेजरचें भाषण ऐकून सभ्य गृहस्थ करण्याच्या कृतींबद्दल मला बरीच कल्पना आली. व नंतर आम्ही दोघेजण जिकडून माल तयार होऊन बाहेर पडतो त्या दरवाज्याकडे गेलों. सभ्य गृहस्थ तयार करण्याला अथपासून इतिपर्यंत लागणारें यच्चयावत् सामान म्यानेजरनीं आपल्या कांपाऊंडमध्यें आणून ठेविलें होतें. बुटाचीं दुकानें, घड्याळाचीं दुकानें, हातरुमाल व त्याच्यावर शिंपडावयाचीं विलायती अत्तरें, हातांत धरावयाच्या छड्या, गळ्यांतील कॉलर व डोळ्यावरील चष्मे, या सर्वांचीं दुकानें, उत्तम ब्रँडीचीं दुकानें, फस्टक्लास भाड्याच्या गाड्या, व त्या गाड्यांवर पुढें पाठीमागें बसणारे लिव्हरी घातलेले भाड्याचे नोकर, या सर्व जिनसांचे कारखाने पाहात पाहात आम्ही दरवाजापाशीं येऊन पोंचलों. त्यावेळीं एक सभ्य गृहस्थ पूर्णपणें तयार होऊन गाडींत घालून बाहेर पाठविण्यांत येत होता त्याच्यांत कांहीं तरी कमतरपणा राहिला आहे, असें म्यानेजरच्या नजरेस येऊन त्यांनीं ती गाडी थांबविली. व त्या सभ्य गृहस्थाला तपासून पाहातां, म्यानेजरना असें दिसून आलें कीं, त्याच्यामध्यें खरेपणा, निस्पृहीपणा, स्पष्टवक्तेपणा, स्वाभिमान, स्वदेशभक्ति, इत्यादि पुष्कळच दोष राहिले होते. ते त्यांनीं त्याच्या

कानांत फुंकर घालून सर्व बाहेर काढले, आणि मग त्याची गाडी जाऊं दिली. गाडी गेल्यावर म्यानेजर आपल्याशीं पुटपुटले, "मूर्ख बेटा, ही घाण डोक्यांत घेऊन हा कमिशनर साहेबाकडे चाकरी मागण्यासाठीं जात होता ! अशानें याला जागा मिळेल काय ?" असें म्हणत त्याच्या डोक्यांतून काढलेला खरेपणा, निस्पृहीपणा वगैरे जिन्नसाच्या म्यानेजर साहेब पुड्या करूं लागले. तेव्हां मीं त्याना विचारिलें, याचा तुम्ही काय उपयोग करतां ? तेव्हां ते म्हणाले, हे जिन्नस आमच्या कारखान्यांत मुळींच लागत नाहींत. याचा खप गरिबगुरीब लोकात मात्र होतो.

यानंतर म्यानेजरनीं मला त्या कारखान्यातील औषधिसंग्रहालयांत नेलें. व तेथें त्यानीं मला कित्येक चमत्कारिक औषधि दाखविल्या. स्तुतिपाठाच्या गोळयाची एक बाटली दाखवून मला ते म्हणाले, यातील एक गोळी तोंडात धरून जर कोणी सभ्य गृहस्थ साहेबाकडे जाईल, तर संबंध एक तासभर साहेबांची स्तुति करूनहि आपल्याला थकवा आला आहे असें त्याला वाटावयाचें नाहीं. व त्या गोळयाचा खप स्मारकाची वगैरे धामधुम कोठें चालली असली तर त्या वेळीं अतिशय होतो, असें त्यांनीं मला सांगितलें.

असेच आणखीहि कित्येक चमत्कार त्यांनीं मला सांगितले व दाखविले. परंतु यांत्रिक पद्धतीवर सभ्य गृहस्थ बनवितां येणें शक्य आहे या चमत्काराबद्दलचें मला सर्वांत आतिशय आश्चर्य वाटलें. व या नवीन शोधानें थक्क होऊन म्यानेजरसाहेबांची रजा घेऊन मी आपल्या घराकडे येण्यासाठीं निघालों.

नुकतीच एक अतिशय महत्त्वाची सभा भरली होती. व त्या सभेच्या महत्त्वाच्या मानानें तिच्यातील सभासदहि मोठे दिव्य व विलक्षण पुरुष होते. या सभेच्या अधिवेशनासाठीं आकाशरूपी भव्य मंडपाची योजना करण्यांत आली होती. चारी बाजूंनीं इंद्रधनुष्याच्या कमानी लावल्या असल्यामुळें त्या मंडपाला अतिशय शोभा आली होती. आकाशांतून उडत असताना मध्येंच थकल्यामुळें विश्रांति घेण्याकरितां काळ्याभोर ढगांवर बसलेल्या पक्ष्यांनीं त्याच्यावर चंचुप्रहार केल्यामुळें त्यांच्यामधून कारंजाच्या ज्या सहस्रावधि धारा मोठ्या सोसाट्यानें उंच उडत होत्या, त्यांच्या योगानें त्या मंडपाच्या सभोंवतालचा प्रदेश अतिशय थंडगार झालेला होता. त्या मंडपाच्या सभोंवार व मधून मधून नक्षत्ररूपी मोत्याच्या झालरी लटकावून दिलेल्या असल्यामुळें त्या मंडपाला विशेषच प्रेक्षणीयता प्राप्त झालेली होती. विजेच्या प्रकाशानें तो सर्व मंडप प्रज्वलित केलेला होता. अत्यंत मृदु अशा पांढऱ्या शुभ्र ढगांच्या गाद्या सर्व सभामंडपभर पसरलेल्या होत्या. मध्यभागीं गारांच्या लहान लहान तुकड्यांनीं एक उंच सिंहासन बनविलेलें होतें, व त्याच्यावर विजेचें तेज प्रतिबिंबित झालेलें असल्यामुळें तें सिंहासन मोठमोठ्या हिऱ्यांचेंच केलेलें आहे कीं काय, असा भास होत होता. त्या मुख्य सिंहासनाच्या दोन बाजूला अशाच प्रकारच्या लहान लहान आसनांच्या दोन रांगा तयार केलेल्या होत्या.

त्या सभामंडपांतील व्यवस्था ठेवण्याचें काम व कोणाचीं पत्रें, निरोप वगैरे आल्यास तो ज्याचा त्याजपाशीं पोंचविण्याचें काम मरुद्गणाकडे होतें. सभा भरण्याला अवकाश होता, म्हणून कांहीं मरुद्गण आपलें मनोरंजन करण्यासाठीं इकडे तिकडे फिरत होते. त्यांतील दोघेजण फिरतां फिरतां

एका ढगाच्या अगदीं टोंकाशीं आले. तेथें तो ढग संपून तेथून खालीं अतिशय खोल कडा तुटलेला होता. मनुष्यांनीं तेथून खालतीं पाहिलें असतें तर त्याना भोंवळ आल्यावाचून खात्रीनें राहिली नसती. त्या ढगाच्या टोंकावरून निर्धास्तपणें खालीं पाय सोडून ते दोघे मरुद्गण तेथें एकमेकाशीं बोलत बसले. त्यावेळीं तेथून एका बाजूला आपली पृथ्वी दिसत होती. तिच्याकडे त्या दोघाचें सहज लक्ष गेलें. तेव्हा तेथील प्रदेशाचें निरीक्षण करताना त्याच्या असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं, अनेक ठिकाणीं अनेक लोक परमेश्वराची प्रार्थना करण्यात निमग्न झालेले आहेत. तें पाहून त्यातील एक मरुद्गण सद्गदित अंतःकरणानें म्हणाला, " अहाहा ! हे लोक मोठे पुण्यवान् आहेत ! याची प्रौढी काय वर्णावी ! परमेश्वराची प्रार्थना करण्यात हे किती तरी निमग्न झाले आहेत पाहा. हे इतके पुण्यवान् असून याना परमेश्वरानें अजून मृत्युलोकात कसें ठेविलें आहे कोण जाणे. कोणी गुडघे टेकीत आहेत. डोळे मिटीत आहेत, कोणी नाक घाशीत आहेत व कोणी हात जोडीत आहेत ! अहाहा ! काय ही ह्यांची भक्ति आणि काय हा ह्याचा भाविकपणा ! अलिकडे जगात नास्तिक लोक फार झाले आहेत, अशी कोणीं येथे कंडी उठविली आहे, पण ती अगदी खोटी असली पाहिजे. इतके घट्ट डोळे मिटून धरणारे लोक जर नास्तिक असतील तर मग भाविक कोणाला म्हणावयाचें, हें निदान मला तरी समजत नाहीं. मला तर हे लोक अतिशय श्रद्धाळु, धार्मिक, दयाळु, आणि विरक्त असे दिसत आहेत ! " याच्यावर त्याचा सोबती काहीं बोलणार, इतक्यात तिसरा एक मरुद्गण त्याच्याजवळ येऊन म्हणाला, " वा ! अजून तुम्ही येथेंच आहा काय ? तिकडे सभेला सुरुवात झाली हें तुम्हांला माहित नाहीं कसें ? " हें ऐकून ते दोघेहि घाबरून उठले आणि सर्वजण सभामंडपाकडे अतिशय त्वरेनें चालते झाले.

सभेला आधींच सुरुवात झालेली होती. तेथें फार मंडळी नव्हती. निवडक निवडक मंडळीच जमली होती. व त्यांतल्या त्यांतहि प्रमुख म्हटले तर ख्रिस्त महंमद, झोरॲस्टर, वगैरे होते. अध्यक्षस्थान परमात्म्यानें स्वीकारिलेलें होतें. व वर सांगितलेली प्रमुख मंडळी अध्यक्षाच्या कानाशीं लागून कांहीं गुप्त खलबतें करण्याचे कामांत गुंतलेली होती. व त्यांचें मन विचारांत अगदीं गढून गेलें होतें, असें दिसत होतें. इतक्यांत एकाएकीं तेथें मोठा

गोंगाट ऐकूं येऊं लागला. व वाढतां वाढता त्याचा कलकलाट अतिशयच वाढला. त्या सभेंत एकमेकांच्या शेजारीं बसलेल्या मंडळींचें सुद्धां एकमेकांना बोलणें ऐकूं येईनासें झालें. परमात्मा आणि वर सांगितलेली इतर मंडळी जो कांहीं एकांत करीत होते त्याला व्यत्यय आला. परमात्मा स्तब्ध बसला. खिस्ताची मुद्रा त्रासलेली दिसली. आणि महंमद तर आपल्या विचारांत व्यत्यय आला म्हणून रागानें लाल झाला. व त्यानें मरुद्गणाना विचारलें, "ही कटकट कोणीं चालविली आहे ?" मरुद्गणांनीं तपास काढून अशी बातमी आणिली कीं, हल्लीं पृथ्वीवर ब्रिटिश आणि बोअर या दोघांमध्यें जी लढाई चालली आहे तिच्यामध्यें ब्रिटिश लोकांना जय मिळावा म्हणून पृथ्वीवरील काहीं लोक आपल्याकडे प्रार्थना करीत आहेत. "हे कोण जातीचे लोक आहेत ?" असा महंमदानें प्रश्न केल्यावरून मरुद्गणापैकीं एकजण म्हणाला, "महाराज, तें कांहीं आम्हांला ओळखत नाहीं. पण त्यांच्या बाह्य स्वरूपावरून ते तुमच्यासारखे दिसत आहेत. तेव्हां तुम्ही प्रत्यक्ष त्याना पाहिलें तर ते कोण जातीचे आहेत हें तुम्हांला कदाचित् कळेल." असें करण्याविषयीं खिस्तानेंहि शिफारस केल्यावरून महंमदानें ज्या ढगाच्या भोंकांतून तो गोंगाट वर येत होता त्यांतून डोकावून खालीं पाहिलें. पण कांहीं वेळानें वर डोकें काढून महंमद म्हणाला, "बाह्य स्वरूपावरून हे काहींसे माझ्यासारखे दिसतात खरे. पण हे प्रार्थना करीत आहेत किंवा कोणाला शिव्या देत आहेत, हें मला काहींच कळत नाहीं. कारण हे लोक हा गोंगाट कोणत्या भाषेंत करीत असतील तो करोत, ते अरबी भाषेंत बोलत नाहींत हें खास. खिस्त महाराज, तुम्ही तरी जरा यांत डोकें घालून पहा बरें." त्याप्रमाणें खिस्तानें डोकें घालून पाहिलें. व त्या भोंकांतून मान वर काढल्यानंतर खिस्त म्हणाला, "काय ! अजून दोन हजार वर्षें पुरीं झालीं नाहींत तों जगातील भाषेंत इतका फरक पडावा काय ? यांच्या या कलकलाटांत यहुदी किंवा लाटिन भाषेचें एक अक्षर सुद्धां दिसत नाहीं. जगांतील लोक आपल्या भाषा इतक्या लवकर बदलूं लागले तर मग आमच्यासारख्या, त्यांनीं मानलेल्या देवांना, निरनिराळ्या भाषांच्या डिक्शनऱ्यांचीं पन्नास कपाटें सुद्धां पुरावयाचीं नाहींत.

बॅबिलोनचा टॉवर उभारण्याच्या पूर्वी सगळ्या लोकांची एक भाषा होती. ती वेळ देवांना मोठी सोईस्कर होती. युनिव्हर्सिटींतल्या विद्यार्थ्यांप्रमाणें देवांनींहि दोन दोन तीन तीन भाषा शिकाव्या म्हणजे याचा अर्थ काय ? आपल्याला कांहीं ह्या गोंगाटांतील शब्द उकलत नाहींत. झोरोॲस्टर महाराज, तुम्ही तरी पाहा बरें, ही तुमच्या लोकांची प्रार्थना आहे काय ?" "आमच्या लोकांची प्रार्थना ! आणि ती इतक्या उशीरानें !" झोरोॲस्टर तिरस्कार-युक्त मुद्रेनें म्हणाला, "माझे लोक या कामांत इतके मागें कधींच राहावयाचे नाहींत. लढाई सुरू झाल्याबरोबर पहिली प्रार्थना माझ्या लोकांची आहे. लढाई सुरू झाल्यापासून चार महिन्यांनीं प्रार्थना करण्याची आठवण होण्या-इतकें राजनिष्ठेच्या टापटिपीचें अज्ञान माझ्या लोकांत मुळींच नाहीं. हे मूर्ख आणि आळशी लोक तुमच्यापैकींच कोणाचे तरी असले पाहिजेत. ते तुमचे तुम्हीच ओळखून घ्या." हीं सगळीं संभाषणें ऐकून परमात्म्याला किंचित् हंसूं आलें व तो या सर्व घोटाळ्यांचें निराकरण होण्यासाठीं आपल्या भाषणाला सुरुवात करण्याच्या बेतांत होता.

इतक्यांत एक मरुद्गण हातांत लखोटा घेऊन सभामंडपांत आला. व त्याजवरील पत्ता वाचीत वाचीत म्हणाला, "येथें एकेश्वर या नांवाचा देव कोण आहे बुवा ? येथें तर कोणी नाहीं." असें म्हणून त्यानें तो लखोटा अध्यक्षाखेरीज करून इतर सर्वजणांना दाखविला, व हा तुमचा आहे काय म्हणून विचारिलें. परंतु त्या लखोट्याचा धनी कोठेंहि सांपडेना. तेव्हां ख्रिस्त म्हणाला, "अरे तो लखोटा फिरून एकदां माझ्याकडे आण पाहूं." असें म्हणून तो लखोटा त्याच्या हातांतून घेऊन ख्रिस्त आपल्याशीं म्हणाला, "यांत आहे तरी काय हें मला आधीं पाहूं द्या." असें म्हणून त्यानें त्या लखोट्यांतील मजकूर पाहिला व नंतर तो म्हणाला, "हं ! हें एक प्रार्थनापत्रच आहे. व इंग्रजांना जय मिळावा म्हणून यांत प्रार्थना केली आहे. यातील प्रार्थनेच्या झोंकावरून असें दिसतें कीं, ही माझ्याच लोकांची प्रार्थना असावी; इतकी हुबेहुब ही वठली आहे. शिवाय ही प्रार्थना डोळे मिटून केलेली असली पाहिजे. कारण त्याशिवाय या प्रार्थनेंत इतक्या चुका कशा झाल्या असत्या ? तेव्हां हा लखोटा माझाच असेल काय ? पण माझें नांव एकेश्वर कोठें आहे ? नांवाशिवाय बाकी सर्व माझ्याशीं जुळतें.

तेव्हां मला वाटतें माझ्यासारखा कोणी तरी तोतया देव या लोकांना फसवीत असला पाहिजे यांत संशय नाहीं." असें म्हणून संतापानें तो लखोटा खालीं खिस्तानें फेंकला. तेव्हां परमात्मा तो लखोटा उचलून घेत असलेल्या मरुद्गणाला म्हणाला, "तुम्हांला सर्वांना मी एकदांच सांगून ठेवितों कीं, कोणत्याहि देवाच्या नावानें लखोटे आले तरी ते मला पोंचले म्हणजे ते त्या त्या देवांना पोंचल्यासारखेच आहेत. एकेश्वर मीच, खिस्त मीच, महंमद मीच, झोरोॲस्टर मीच, सर्व कांहीं मीच आहें. माझ्या व्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं. कोणाची प्रार्थना कोणत्याहि भाषेंत असो, मला ती समजते. मला आरबी येतें, यहुदी येतें, लॅटिन येतें, व फारशीहि येतें. आजपर्यंत लोक ज्या ज्या भाषा बोलले व यापुढें बोलतील त्या सर्व भाषा मला समजतात. मला समजत नाहीं असें कांहींहि नाहीं."

अशा रीतीनें परमात्म्याचें भाषण चाललें असतां, एक मरुद्गण सभामंडपांत येऊन महंमदाकडे वळून म्हणाला, "महाराज, आतांच्या आतां चमत्कार झाला कीं, माझ्या पायाखालचा ढग एकाएकीं डळमळूं लागला, व त्याचें कारण काय म्हणून मी इकडे तिकडे पाहूं लागलों तों माझ्या पायाजवळच त्या ढगाला एक मोठें भोंक पडलें, व त्यांतून एक प्रार्थना एकदम वर घुसली. या प्रार्थना कोणाकडून येतात हें कळण्याला येथें बरीच पंचाईत पडते. हें मीं नुकतेंच पाहिलें होतें, म्हणून ती प्रार्थना वर पाठविणाराना मीं तेथल्या तेथेंच विचारिलें कीं, ही प्रार्थना कोणाची आहे? तेव्हां ते म्हणाले, ही मुसलमानांनीं केलेली महंमदाची प्रार्थना आहे. तेव्हां महंमदमहाराज, ती आपण येऊन ऐकावी." नंतर त्या ढगांतील भोंकाजवळ जाऊन महंमद कान लावून ती प्रार्थना ऐकूं लागला. इतक्यांत दुसरा एक मरुद्गण धांवत येऊन महंमदाला म्हणाला, "महाराज, मी उभा होतों तेथील ढगाला भोंक पडून त्यांतून एक प्रार्थना आपल्याकडे येत आहे. ती ऐकावयाला आपण चला." याचें बोलणें संपलें नाहीं तों आणखी दहा पंधरा मरुद्गण धापा टाकीत व महंमद कोठें आहे, असें विचारीत तेथें आले व महंमदाला पाहून सांगूं लागले कीं, "महाराज, आमच्या जवळच्या ढगाची तर शुद्ध चाळण झाली आहे. त्याला इतकीं बारीक भोकें पडत चाललीं आहेत कीं, त्यांतून आतां किती प्रार्थना वर येत आहेत याचा आम्हांला कांहीं देखील

अंदाज लागत नाहीं. तेव्हां आपण तेथें चलावें." या एकावर एक बातम्या आलेल्या ऐकून महंमद अगदीं गांगरून गेला आणि म्हणाला, "इतक्या प्रार्थना एकदम आल्या तर त्या ऐकावयाच्या तरी कशा? देवांना किती कान असतात म्हणून या लोकांना वाटतें कोण जाणे!"

ही धांदल उडालेली पाहून परमात्म्यानें महंमदाला हांक मारून सांगितलें, "तू स्वस्थ आपल्या जाग्यावर येऊन बैस. एका वेळीं दहा पंधराच काय, पण लक्षावधि प्रार्थना जरी आल्या तरी त्या ऐकण्याला मी समर्थ आहें; आपल्याला प्रार्थनाच पाहिजे आहेत, पण त्या आहेत कोठें? प्रार्थना करणारे लोक हल्लीं इतके दुर्मिळ झाले आहेत कीं—"

ज्या मरुद्गणानें पृथ्वीवर चाललेल्या प्रार्थना नुकत्याच पाहिल्याचें वर सांगितलें आहे. त्याच्यानें परमात्म्याचें वरील भाषण ऐकवेना, व म्हणून तो मध्येंच म्हणाला, "महाराज, आपल्याविरुद्ध बोलण्याचा माझा अधिकार नाहीं, पण मी पृथ्वीवरील देखावा नुकताच पाहिलेला असल्यामुळें माझ्यानें बोलल्यावाचून राहावत नाहीं. महाराज, जेथें जेथें देऊळ, मशीद, अग्यारी किंवा चर्च म्हणून आहे, तेथें तेथें हल्लीं अनेक लोक जमून आपली प्रार्थना करीत आहेत. त्यांच्यासारखे पुण्यवान्, पवित्र आणि दयाळु लोक दुसरे कोठेंहि नसतील." "काय! या लोकांना तूं पुण्यवान्, पवित्र आणि दयाळु म्हणतोस!" परमात्मा म्हणाला, "या पृथ्वीवरील लोकांचें खरें स्वरूप तुम्हांला कळावयास पाहिजे असेल तर त्या पलीकडच्या समुद्रामध्यें जमिनीचा जो एक त्रिकोणाकृति तुकडा दिसतो आहे त्यांतील एका कोपऱ्यांत काय चाललें आहे तें पाहा." तेव्हां तें पाहाण्यासाठीं सभेंतील सभासद व मरुद्गण गेले. तो तेथें इंग्लिश आणि बोअर यांच्यामध्यें चाललेली लढाई त्यांच्या दृष्टीस पडली. व माणसें माणसांचीं डोकीं उडवितांना त्यांनीं पाहिलीं. ख्रिस्त, महंमद वगैरे सर्व मंडळींच्या अंगावर शहारे आले; व "हें अघोर कर्म आतां बंद करा," म्हणून त्यांनीं पुष्कळ ओरडून सांगितलें. पण त्यांच्या सांगण्याकडे तेथें कोणीच लक्ष देईना. व तोफेच्या आवाजापुढें ख्रिस्ताच्या आवाजाचें मुळींच तेज पडेना. शिवाय तेथें रक्ताच्या पाटाचा आणि मेलेल्या माणसांच्या डोक्यांच्या ढिगाची इतकी दुर्गंधि येऊं लागली कीं, तेथें उभें राहाणेंच अशक्य झालें. तरी पण ख्रिस्त वगैरे, "लेकरांनो, भांडूं नका," असा उपदेश

करीत उभे होतेच. इतक्यांत अगदीं नवीन शोध करून काढलेला एक तोफेचा गोळा इतका उंच उडाला कीं, तो फुटून त्यांतील चाकू, कातऱ्या आपल्या अंगावर येऊन आपल्याला जखमा करतात कीं काय, अशी सर्वांना भीति वाटली. व त्यामुळें सर्व मरुद्‌गण वगैरे मंडळी धांवत धांवत माघारी आली. तेव्हां परमात्म्यानें त्यांना विचारिलें, "का झाली खात्री?" व त्यानंतर फिरून परमात्मा म्हणाला, "अहो, त्या प्रार्थनावरून या लोकांना पवित्र म्हणणें किती चुकीचें आहे हें आतां तुमच्या लक्षांत आलेंच आहे. या प्रार्थनांत कांहींच अर्थ नाहीं. हे लोक या प्रार्थना देवासाठीं करीत नाहींत, तर आपल्या राजांसाठीं करीत आहेत; भक्तीनें करीत नाहींत, तर भितीनें करीत आहेत. त्यांनीं दिवसांतून दोनदां संध्या करावी, किंवा तीनदां निमाज पढावा, किंवा आठवड्यांतून एकदां तरी प्रार्थना करावी म्हणून ठरविलेलें आहे. परंतु त्या ठरावाप्रमाणें हजारांतून एकजण वागत असेल तर शपथ! आणि तेच लोक आतां दिवसांतून दहा वेळ प्रार्थना करीत आहेत. तेव्हां अशा लोकांना भाविक कसें म्हणावें? शिवाय हे लोक प्रार्थनेसाठीं जमतात, तेव्हां तरी ते आपल्या पापाचीं चिन्हें आपल्यापासून दूर ठेवितात काय? नाहीं. प्रार्थना करण्यासाठीं जमलेल्या डाव्या बाजूच्या याच मेळ्याकडे पाहा! एकाच्या खिशांत चोरीचे पैसे आहेत. दुसऱ्याच्या जिभेवर असत्य भाषणाचे डाग पडलेले आहेत. तिसऱ्याच्या गालावर त्याच्या वेश्येनें घेतलेल्या चुंबनाचा छाप स्पष्ट दिसत आहे. त्या चौथ्याच्या तोंडाला शराबची दुर्गंधि येत आहे. त्या इसमाच्या हाताला निरपराधी माणसाच्या रक्ताचे डाग पडलेले आहेत. आणि त्याच्या पलीकडील इसमाच्या अंगावर लांचाच्या पैशांनीं विकत घेतलेला दुपेटा आहे. हे लोक देवाची प्रार्थना करणार होय! पातकाच्या सर्व चिन्हांनीं नखशिखांत नटलेले जे लोक त्यांची प्रार्थना कोण ऐकेल! यांच्या पातकांपसून देवांनाहि भय वाटल्यावांचून राहाणार नाहीं. आपल्या ह्या वरकरणी प्रार्थनांपासून देवाच्या घरीं कांहीं फायदा होणार नाहीं, हें या प्रार्थना करणारांपैकींहि पुष्कळजण समजून आहेत. पण त्यांना देवाच्या घरचा फायदा नकोच आहे. राजाच्या घरचा फायदा मिळाला म्हणजे त्यांचें काम झालें. त्यांच्या या प्रार्थना पदव्यांसाठीं आहेत. पण देवाच्या घरीं पदव्या कोठच्या? एखाद्या गलबताप्रमाणें वारा लागेल तशी पाठ फिरविणारे

हे तोंडपुजे लोक, आपल्या तोंडपुजेपणानें जसे राजांना फसवितात, तसे ते आपल्या प्रार्थनांनीं देवानांहि कदाचित् फसवूं पाहात असतील. पण राजांमध्यें आणि देवांमध्यें पुष्कळ अंतर आहे, हें त्यांनीं लक्षांत बाळगलें पाहिजे. बरें, इंग्रजांचा जय व्हावा अशी हे लोक प्रार्थना करतात, म्हणजे अर्थात् बोअर लोकांचा पराजय होऊन ते मरावे, अशी हे प्रार्थना करतात असें होतें. पण त्या बिचाऱ्या बोअर लोकांनीं मरावें अशी प्रार्थना करण्याइतकें त्यांनीं यांचें काय बरें वाईट केलें आहे? त्यांनीं यांच्यावर कधीं जबर कर बसविले आहेत? किंवा यांच्या बायकांवर बलात्कार केले आहेत? किंवा कधीं यांना गोळ्या घालून त्यांनीं मारिलें आहे? असें कांहीं एक नसतांना त्या बोअर लोकांनीं मरावें अशी प्रार्थना कांहीं मनुष्यांनीं देवापाशीं करावी, यांत या लोकांचा नीचपणा किती आहे तो दिसून येत नाहीं काय? मनुष्यानें राजनिष्ठ असलें पाहिजे. 'ना विष्णुः पृथिवीपतिः।' हें वचन मींच लिहून ठेविलेलें आहे. पण राजनिष्ठेबरोबरच दुसऱ्याहि कांहीं चांगल्या गोष्टी जगांत वास्तव्य करीत आहेत, हें मनुष्यांनीं विसरतां कामा नये. जगांतील मनुष्यांचें दुःख कसें कमी होईल याविषयीं विचार करीत आपण सर्व आज बसलों असतांना, येथें आपल्या पुढें 'बोअर लोक मरावे' म्हणून हे लोक प्रार्थना करीत आहेत यांना काय म्हणावें! लोकांना मारण्याचा धंदा देवानें पतकरला असें यांना कोणीं सांगितलें कोण जाणे. असो. असल्या ह्या मूर्खपणाच्या प्रार्थनांकडे आपण सर्वांनीं दुर्लक्ष करावें हेंच बरें!" असें परमात्म्यानें सांगितलें व तीच गोष्ट सर्वांना पसंत पडली. नंतर पूर्वीं हातीं घेतलेल्या मनुष्य दुःख-निवारणाच्या कामासाठीं फिरून केव्हां जमावयाचें, हें ठरवून झाल्यानंतर सभा बरखास्त झाली. सर्व सभासद अदृश्य झाले. ढगांच्या घातलेल्या बैठकी वाऱ्यानें काढून टाकल्या आणि आकाश नेहमींप्रमाणें स्वच्छ झालें.

# अनाथांवर दया : : : : १८

ट्रान्सव्हालमध्यें लढाई सुरू होऊन पांच महिने होत आले. इतक्या मुदतींत अदमासें इंग्रजांकडील दहा हजार आणि बोअर लोकांकडलि दहा हजार शिपाई मेले असतील. बोअर लोकांच्या बाजूचे शिपाई कदाचित् यापेक्षां कमी मेले असतील किंवा कैदी झाले असतील. परंतु अदमासानें दहा हजार संख्या खरी असें धरून आपण चाललों, तर या दहा हजारांचा काय अर्थ होतो? याचा अर्थ असा होतो कीं, दक्षिण आफ्रिकेंतील दहा हजार कुटुंबें आज अगदीं बसल्यासारखीं झालीं, दहा हजार ईश्वरानें निर्माण केलेले प्राणी मनुष्यरूपी राक्षसानें गिळून टाकिले. दहा हजार बोअर स्त्रिया विधवा झाल्या, दहा हजार घरांत दुःख आणि शोक यांच्या शिवाय आज दुसरा कसलाहि आवाज ऐकूं येत नाहीं, व प्रत्येकाला सरासरीनें दोन मुलें असें प्रमाण धरिलें तर आज दक्षिण आफ्रिकेमध्यें वीस हजार मुलें आपल्या बापांच्या मरणामुळें पोरकीं आणि अनाथ होऊन रडत बसलीं आहेत. इतका मोठा हा दुःखाचा समुद्र आफ्रिकेच्या दक्षिण भागामध्यें लढाईच्या योगानें चोहोंकडे पसरला आहे. प्लेग आणि दुष्काळ यांच्या योगानें हिंदुस्थानांत हल्लीं ठिकठिकाणीं अशाच प्रकारचे दुःखाचे समुद्र पसरत चालले आहेत. परंतु हिंदुस्थानासंबंधीं आनंदाची गोष्ट ही आहे कीं, येथील दुःखसमुद्र आटवून कोरडा करण्याला इंग्रजसरकार समर्थ आहे. पण हिंदुस्थान आणि दक्षिण आफ्रिका यांच्याशिवाय आणखीहि एका देशावर दुःखाच्या लाटा उसळत आहेत. व तो देश इंग्लंड हा होय. दक्षिण आफ्रिकेच्या सारखीच इंग्लंडची स्थिति झालेली आहे. याप्रमाणें दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान आणि इंग्लंड हे तीन देश प्रमुखत्वानें आज दुःखांत सांपडलेले आहेत. यांपैकीं हिंदुस्थान देश हा ईश्वरी

कोपामुळें दुःखात सांपडला आहे. आणि दक्षिण आफ्रिका व इंग्लंड हे मानवी कोपामुळें दुःखांत सांपडलेले आहेत. परंतु कोणी कोणत्याहि कारणानें दुःखांत सांपडलेला असो, त्याच्या दुःखाचें परिमार्जन करणें, या गोष्टीकडे दयाळु मनुष्याची स्वभावतःच प्रवृत्ति होते. कोणत्या कारणानें दुःख प्राप्त झालें आहे, याची पंचाईत दया करीत बसत नाहीं; तर कोणत्या रीतीनें हें दुःख नाहींसें होईल याचा विचार करणें, हें दयेचें काम आहे. कोणी कशामुळेंहि अनाथ होवो, पण अनाथ झाला कीं तो दयेच्या ताब्यांत आलाच. मग दया त्याला सोडणार नाहीं. व याच तत्त्वावर मनुष्याच्या मनाला दयेचा पाझर फुटत असतो. पण जेथं जेथें दुःखी माणसाबद्दल करुणा दाखविली जाते, तेथें तेथें ती खरोखर दयेपासूनच उत्पन्न झालेली असते, असें म्हणतां येत नाहीं. दयेबरोबर आणखीहि कित्येक गोष्टी त्यांत मिसळलेल्या असतात. दक्षिण आफ्रिकेतील लढाईत नवरे मेल्यामुळें झालेल्या विधवांसाठीं आणि बाप मेल्यामुळें झालेल्या पोरक्या पोरांसाठीं हिंदुस्थानांतील राजानीं इंग्लंडमध्यें जे पैसे पाठविले ते दयेनें तर खरेच. पण त्या दयेबरोबर आणखीहि कित्येक कारणें असलीं पाहिजेत, हें कोणासहि सांगावयास नको. त्याचप्रमाणें हिंदुस्थानातील दुष्काळपीडित लोकांना मदत करण्यासाठीं जो मॅन्शन हाऊस फंड गोळा होत आहे तोहि एकटी दया गोळा करीत आहे असें नाहीं, तर तिच्याबरोबर आणखीहि कित्येक हेतु खटपट करीत आहेत. परंतु कोणत्याहि कारणानें का होईना, आज हिंदुस्थान आणि इंग्लंड येथील अनाथांना कशी तरी मदत मिळत आहे हें खास. पण दक्षिण आफ्रिकेंतील अनाथ अजून अनाथच आहेत. जिचा नवरा मेल्याची तार येऊन महिना देखील झाला नसेल अशा इंग्रजी शिपायाच्या विधवेला पेन्शन मिळून ती आपल्या पुढल्या उद्योगाला लागली देखील असेल. पण बोअर शिपायाच्या विधवेच्या डोळयांतील अश्रू अजून तसेच वाहत असतील. इंग्लंडमधील पोरक्या पोराना च्यारिटी फंडांतून वगैरे पैसे मिळून ते कोठल्या तरी बोर्डिंग हाऊस-मधून खुशाल राहण्यास गेले असतील; परंतु बोअर शिपायांच्या पोरक्या पोरांच्या डोळयांपुढील त्यांच्या बापाची मूर्ति अजून जशीच्या तशीच कायम असेल. अशा प्रकारच्या या आफ्रिकेंतील स्थितीचें चित्र जर कोणी आपल्या डोळयांपुढें कल्पनासृष्टीनें निर्माण करील तर त्याच्या डोळयांतून अश्रू वाहूं

लागल्यावांचून कधीं राहाणार नाहींत. अशा स्थितींत तीं असतील, तर त्यांना आपण मदत करावी, असा विचार कोणाच्याहि मनांत येणें अगदीं साहजिक आहे. फ्रान्समध्यें अशा प्रकारच्या बोअर लोकांना मदत करण्याकरितां वर्गणी गोळा करण्याचा प्रयत्न चालला आहे, असें इंग्रजी पत्रांवरून समजतें. आयर्लंडमध्यें तर बोअर लोकांबद्दल विशेषच सहानुभूति असल्यामुळें तेथें त्यांना मदत करण्यासाठीं वर्गणी गोळा झाली तर त्यांत नवल नाहीं. पण खुद्द इंग्लंडमध्येंहि बोअर लोकांच्या वतीनें नुकतीच एक सभा भरविण्यांत आली होती, असें प्रसिद्ध झालें आहे.

पण अशा प्रकारची गोष्ट कोणी आपल्याकडे काढल्यास त्याजवर मुख्य आक्षेप हा येणार कीं, ही गोष्ट इंग्रजांना आवडणार नाहीं. पण असा आक्षेप काढणाराकडून एक चूक होत आहे ती अशी : बोअर लोकांच्या सैन्याला मदत करणें हें खरोखर इंग्रजांच्या विरुद्ध आहे. व तसें त्याच्या अंमलांतील कोणीं करूंहि नये. पण त्यांच्या शिपायांच्या विधवा आणि पोरकीं पोरें अशा अनाथ माणसांना कोणाच्या हातून कांहीं मदत झाल्यास त्याबद्दल इंग्रजांना विषाद वाटेल, असें मुळींच नाहीं. हिंदुस्थानाजवळ शिपाई आणि घोडे असतील तर इंग्लंड जेव्हां ट्रान्सवालशीं लढाई सुरू करील तेव्हां ते हिंदुस्थानानें इंग्लंडला द्यावे, हें इंपीरियल राजनिष्ठेचें पहिलें कर्तव्यकर्म आहे. पण हें इंपीरियल राजनिष्ठेचे पहिलें कर्तव्यकर्म केल्यानंतर जर हिंदुस्थानापाशीं पैसा असेल, तर तो अनाथदुःखनिवारणाकडे हिंदुस्थानानें खर्चूं नये, असें ती राजनिष्ठा कसें म्हणूं शकेल ? इंग्लंडांतील विधवांना आणि पोरक्या पोरांना मदत करण्यासाठीं हिंदुस्थानानें जे पैसे दिले ते राजनिष्ठेनें सांगितलें म्हणून दिले किंवा दयेनें सांगितलें म्हणून दिले ? याबाबतींत राजनिष्ठेचा कांहींच संबंध नाहीं. कारण इंग्लंडांतील एखाद्या सोजिराची विधवा किंवा त्याचा पोरका पोर यांपैकीं कोणीहि हिंदुस्थानचा राजा नाहीं. राजाला आपण कर देता. पण हिंदुस्थानांतील राजांनीं इंग्लंडांतलि विधवा-फंडाला जे पैसे दिले आहेत तो कर नव्हे, तर धर्म आहे. या गोष्टीवरून हें उघड होते कीं, विधवाफंडाला पैसे देण्यांत राजनिष्ठेचा कांहींएक संबंध नाहीं. तें सर्व दयेचें फल आहे. आणि हें जर खरें आहे तर अमुक्यावरच दया कर आणि अमुक्यावर करूं नको, असें सांगण्याचा अधिकार राजनिष्ठेच्या

मर्यादेच्या पलीकडचा आहे. राजनिष्ठेचा प्रदेश आणि दयेचा प्रदेश हे अगदीं भिन्न भिन्न आहेत. राजनिष्ठेची हद्द कायम राखून दयेनें दोन भराऱ्या जास्त मारल्या तरी तिला अडथळा करण्याचें राजनिष्ठेला कांहीं कारण नाहीं.

आतां इंग्रजी विधवांची आणि पोरक्या पोरांची हिंदुस्थानाला दया येते, ही गोष्ट हिंदुस्थाननें विधवाफंडाला पैसे दिले आहेत, यावरून स्पष्ट होते. पण इंग्रजी विधवांची आणि पोरक्या पोरांची दया येते ती त्या विधवा आणि तीं पोरें इंग्रजी आहेत म्हणून नव्हे; तर त्यांपैकीं कोणाचे नवरे मरून आणि कोणाचे बाप मरून तीं अनाथ झालीं आहेत, म्हणून त्यांची दया येते. व हें जर खरें आहे तर ज्या ज्या कोणी विधवा असतील आणि जीं जीं कोणीं पोरकीं पोरें झालीं असतील, मग तीं इंग्लिश असोत किंवा बोअर असोत, त्या सर्वांबद्दल सारखीच दया मनात उत्पन्न झाली पाहिजे. व अशा दृष्टीनें पाहिलें तर इंग्लंडांतील विधवाफंडाला मदत करणाऱ्या राजांनीं आणि महाराजांनीं ट्रान्सवालमधील विधवांना मदत कां करूं नये, हें समजत नाहीं. बोअर लोक हे इंग्रजांचे, व इंग्रजांमुळें आमचे शत्रू होत; पण ते मेल्यानंतर त्यांच्या अनाथ विधवा आणि त्यांचीं अनाथ मुलें यांच्याशीं वैर करण्याइतके नीच आम्हीं खास नाहीं. खुद्द इंग्रज त्यांच्याशीं वैर करणार नाहींत; मग आम्हीं कां बरें करावें ? इतके नीच आणि निष्ठुर आपण आहों काय ? ज. क्रांजेच्या बरोबर जीं बायकामुलें वगैरे होतीं त्यांना सुरक्षितपणें परत पोंचतीं केल्याबद्दल रॉबर्टसाहेबांची वाहवा व्हावी आणि बोअर लोक हे इंग्रजांचे शत्रू एवढ्याच कारणासाठीं बोअर विधवा आणि पोरकीं पोरें यांना मदत करण्याची दयेनें आपल्या मनांत उत्पन्न केलेली स्फूर्ति आपण जागच्या जागीं दाबून टाकावी, हें केवढें आश्चर्य आहे. रेडक्रॉस, म्हणजे तांबडे निशाण घेऊन जखमी लोकांना उचलून नेण्याकरितां किंवा औषध देण्याकरितां जर कोणी लढाईत गेला तर त्याला इजा न करण्याचा लढाईचा नियम आहे व या नियमाचा फायदा घेऊन पुष्कळ मिशनरी लोक लढाईमध्यें परोपकाराचीं कामें करण्यासाठीं जातात. अशा प्रकारचे बरेच रशियन लोक हल्लींच्या लढाईत गेले आहेत. आतां इंग्लंड आणि ट्रान्सव्हाल यांच्यामधील लढाईसंबंधानें पाहतां रशिया हा अगदीं तिऱ्हाईत आहे. तरी पण तो तिऱ्हाईतपणा रशियाचे कांहीं लोक रेडक्रॉस घेऊन लढाईत गेल्या

कारणानें यत्किंचित्‌हि नष्ट झालेला नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील कोणी लोकांनीं ट्रान्सव्हालांतील कांहीं विधवांना आणि पोरक्या पोरांना मदत केली तर त्यापासून हिंदुस्थानच्या राजनिष्ठपणाला कांहीं व्यत्यय येतो, असें होण्याचा मुळींच संभव नाहीं. ज्यांना लढाई करून एकमेकांचे जीव घ्यावे यांतच भूषण वाटत असेल त्यांनीं खुशाल तसें करावें. पण परोपकारासारखें पुण्य नाहीं असें ज्यांना वाटत असेल त्यांना त्या सत्कर्मांत कोणत्याहि मिषानें कोणींहि अडथळा करतां कामा नये, व करणारहि नाहीं. लम्स्‌डेनच्या घोडेस्वारांच्या पलटणीला हजारों रुपयांच्या रकमा देणें, इंग्रजी शिपायांच्या सामानाचे खटोर ओढण्यासाठीं घोडे देणें, व राबर्टस्‌ साहेबांनीं जय मिळविला म्हणजे आपण टाळ्या वाजविणें, हीं आपलीं कर्तव्यकर्में आहेतच. पण यांच्याबरोबरच अनाथांवर दया करणें हेंहि आपलें कर्तव्यकर्म आहे. व या सर्व कर्तव्य-कर्मांत आपण सारखेंच पुढें सरत जावें, हें आपल्याला भूषणास्पद आहे. लम्स्‌डेनला रुपये दिले किंवा ट्रान्सव्हालमध्यें घोडे पाठविले, तर तें इंग्रजांच्या भीतीसाठीं किंवा खुशामतीसाठीं केलें असें कदाचित्‌ कोणी म्हणेल. पण ट्रान्सव्हालांतील अनाथांच्या मदतीसाठीं कोणीं पैसे खर्चल्यास त्याजवर असले क्षुद्र आणि आपलपोटेपणाचे आक्षेप न येतां उलट खऱ्या दयेबद्दल त्याची कीर्ति होईल. शिवाय ट्रान्सव्हालच्या लढाईसाठीं इंग्लिशांना मदत करणें याला आपण राजनिष्ठा म्हणूं, स्वामिभक्ति म्हणूं, काय हवें तें चांगलें नांव देऊं. पण देवाच्या घरीं याला इतकें चांगलें नांव मिळेल किंवा नाहीं याची शंका आहे. तरी पण अनाथांवर आपण दया केली, तर त्याबद्दल देवाच्या घरीं आपल्याला पुण्य लागेल इतकेंच नव्हे, तर पृथ्वीवरील आपले देव जे इंग्लिश त्यांनाहि त्यापासून आनंदच होईल.

# सरटिफिकीट : : : : १९

शंभर वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत चाकरीचा पेशा पुष्कळ कमी होता. बहुतेक लोक शेतकीवर आणि इतर व्यापार धंद्यावर आपला चरितार्थ चालवीत असत. व त्या वेळच्या राजांनाहि हल्लींच्या इतके नौकर लागत नसत. अशा वेळच्या लोकांना सरटिफिकीट ह्या वस्तूची कल्पनाहि माहित नव्हती, तर मग किंमत कोठून माहित असणार ! सरटिफिकीट ही वस्तु इंग्रजांबरोबर हिंदुस्थानात आली. व इंग्रजी कारकीर्दीमध्यें सेव्यसेवकभावाचा जो अत्यंत अभ्युदय झाला, त्याच्याबरोबर सरटिफिकिटाचा चोहोंकडे झपाट्यानें प्रसार होऊं लागला. साहेबलोक हिंदुस्थानात आले आणि त्यांनीं येथील लोकांना चाकरीस ठेवलें. त्या चाकरींत पगार, बढती, पेन्शन वगैरे आमिषें होतींच; पण त्याशिवाय सरटिफिकिटाचेंहि एक आमिष त्यांनीं उत्पन्न केलें. या आमिषाची आजकाल लोकांना इतकी गोडी लागून राहिली आहे कीं, चाकरीचा फांस गळ्याला टोचूं लागला तरी सरटिफिकिटाच्या आमिषाची आशा नौकर लोकांच्या मनातून कधींहि नाहींशी होत नाहीं. एक वेळ पेन्शन मिळालें नाहीं तरी हरकत नाहीं, पण साहेबांची चांगली चाकरी केल्याबद्दल सरटिफिकीट मिळालें पाहिजे, अशी पुष्कळांची महत्त्वाकांक्षा असते. व साहेबाचें सरटिफिकीट मिळालें नाहीं तर इतकीं वर्षें चाकरी करून अखेरीस आपण आपला जन्म फुकट घालविला म्हणून कित्येक खरोखर रडत बसतात. एकाहि साहेबाचें सरटिफिकीट आपल्यापाशीं नाहीं, तेव्हां आतां आपल्याला या जगांत कोण थारा देणार, अशा विचारांनीं कित्येक अतिशय उदास आणि उद्विग्न होऊन जातात. एखादा साहेब बदलून जावयाचा असला तर त्याच्यापासून सरटिफिकीट घेऊन ठेवण्याविषयीं बाप आपल्या मुलाला मोठ्या आग्रहानें सांगत असतो. आणि चाकरी सोडण्याच्या आधीं साहेबाचें

सरटिफिकीट घेऊन ठेवण्याविषयीं बायको आपल्या नवऱ्याला सल्ला देत असते. अशा प्रकारचें सरटिफिकिटाचें विलक्षण माहात्म्य माजलें आहे. हें सराटिफिकीट मिळविण्याविषयीं जितकी आस्था असते, तितक्याच आस्थेनें तें जपून ठेविण्यात येत असतें. कोणी उत्तम लेखकाकडून त्याच्या प्रती करून ठेवितात. कोणी त्याच्या छापील प्रती काढवितात. कोणी तें सुंदर रीतीनें लिहून त्याच्या भोंवतीं सुंदर वेलबुट्टी काढितात. कोणी तें रुपेरी नळकंड्यात ठेवितात, आणि कोणी तें सोनेरी चौकटीच्या तसबिरींतून बसवून सहज सर्वांच्या नजरेस पडेल अशा ठिकाणीं ठेवितात. बहुतेक लोक आपल्या सराटिफिकिटाला बिलकूल विसंबत नाहींत. ते कोणत्याहि कामाकरितां बाहेर निघाले तरी साहेबाचें सरटिफिकीट त्यांच्या खिशांत असावयाचेंच. शिवाय सरटिफिकीट ही अशी काही अजब चीज अलीकडे झाली आहे कीं, लोकांना तिचा वीट म्हणून कधीं येत नाहीं. प्रत्येकाजवळ निदान पंधरा वीस साहेबाचीं सर्टिफिकिटें असतात. तरी पण आणखी असतीं तर बरें झालें असतें, असें त्याच्या मनाला वाटत असतेच. एक उमेदवार साहेबाकडे चाकरी मागण्यासाठीं परगावीं आगगाडीनें जात होता, परंतु सर्व सर्टिफिकिटें स्वतःच्याबरोबर घेणें जास्त भाड्याच्या भीतीस्तव शक्य नसल्यामुळें त्यानें आपल्या सर्टिफिकिटांचें ओझें गुड्स करून मालगाडीनें पाठविलें व आपण पॅसेंजर गाडीनें गेला. परंतु मालाची गाडी वेळेवर न आल्यामुळें साहेबाच्या हाताखालची जागा भरून गेली, आणि त्या बिचाऱ्या पासष्ट वर्षांच्या पेन्शनर उमेदवाराला आपल्या सर्टिफिकिटाचें गुड्स करून फिरून माघारें पाठवावें लागलें. अशी सर्टिफिकिटाची कित्येकांना अनावर आवड असते.

एकानें केलें म्हणजे दुसरा करतो आणि दुसऱ्याचें पाहून तिसरा करतो. व अशा रीतीनें बहुतेक लोक गतानुगतिक असल्यामुळें अनेक मूर्खपणाच्या कल्पना लोकांच्या हाडामांसांत खिळून जातात. साहेबांनीं सही केलेल्या सर्टिफिकिटांच्या चिटोऱ्याचे जे देव्हारे माजले आहेत तेहि अज्ञानेंच. पण या चिटोऱ्यांचा अर्थ काय, याचा कोणीच विचार करीत नाहीं. साऱ्या दिवसभर शेत नांगरून झालें म्हणजे शेतकरी आपल्या बैलाच्या मानेवरील जोखड काढून घेतो आणि त्या बैलाच्या पाठीवरून तो 'भले, शाबास!'

असें म्हणून थाप मारतो. त्यांत आणि या सर्टिफिकिटांत फारसा फरक आहे असें नाहीं. सर्टिफिकीट म्हणजे जन्मभर नोकरी करून पुढें आणखी नोकरी करण्याला निरुपयोगी झालेल्या बैलाच्या पाठीवर त्याच्या धन्यानें मारलेली थापच होय. आणखी दुसऱ्या एका अर्थानेंहि सर्टिफिकीट म्हणजे थापच होय. कारण त्यांत तथ्यांश बेताबाताचाच असतो. सर्टिफिकीट हें आपल्या कर्तबगारीपेक्षां आपल्या गुलामगिरीचेंच अधिक द्योतक आहे. आपलें सर्टिफिकीट आपण गुलाम आहों हें लोकांना आधीं सांगतें, आणि मग पाठीमागून आपले गुण सांगतें. मूर्खाला आपल्या गुणांचा गौरव सर्टिफिकिटात केला आहे असें वाटतें; पण हें सर्टिफिकिट म्हणजे आपल्या गुलामगिरीचा ताम्रपट असें शहाण्या माणसाला वाटून, तो तें हातांतसुद्धां धरीत नाहीं. गुलामगिरीचीं कामें करण्यात हा मनुष्य फार कुशल आहे असा ज्या सराटिफिकिटांचा मथितार्थ निघतो, तीं मोठ्या प्रौढीनें आणि फुशारकीनें लोकापुढें मांडून, "पाहा मी कसा उत्तम गुलाम आहें!" म्हणून त्यांची खात्री करण्याचा प्रयत्न करणें हें किती मूर्खपणाचें लक्षण आहे! कोणी जर त्या सर्टिफिकिटावर विश्वास ठेवीत नाहीं असें आढळलें, म्हणजे आपण गुलामगिरीचें काम उत्तम केलें हें कोणी कबूल करीत नाहीं असें आढळलें, तर "काय? मला गुलामगिरी चांगली साधली नाहीं असें म्हणतां? थाबा, मी उत्तम गुलाम होतों अशाबद्दल दुसऱ्या एका बड्या साहेबाकडून तुम्हांस सिद्ध करून देववितों," असें म्हणून दुसरें सरटिफिकीट पुढें मांडण्यांत येतें. असल्या कृतीला काय नांव द्यावें हें ठरविणें कठीण आहे. जें सरटिफिकीट म्हणजे आपल्या वंशपरंपरेच्या गुलामगिरीची जणूं काय सनदच तें घेऊन लोकापुढें नाचण्यांत आपल्याला लाज वाटली पाहिजे. 'तूं गुलाम आहेस' असें ज्यात लिहिलेलें आहे त्याच्या भोंवतीं आपण वेलबुट्ट्या काय काढाव्या! आणि त्याला सोनेरी तसबिरींत तरी काय बसवून ठेवावें! आपली गुलामगिरी लोकांपुढें मांडण्यात काय अर्थ आहे! गुलामगिरी ही वस्तु शेखी मिरविण्यासारखी नाहीं. ती झाकून ठेवण्यालाच योग्य होय. मान सांगावा जनांत आणि अपमान सांगावा मनांत, ह्या जुन्या म्हणींत नवीन लोकांनीं घेण्यासारखें पुष्कळ आहे. मित्रहो, हीं गुलामगिरीचीं सराटिफिकिटें तुम्ही झांकून ठेवा. तीं कोणाच्या नजरेस पडूं देऊं नका. त्यांना सोनेरी चौकटीच्या

तसबिरींतून काढून जेथें काळाकुट्ट काळोख असेल तेथें हजारों दडपणांखालीं दडपून ठेवा. किंवा जेथें त्यांना सहज कसर लागेल, किंवा बायकापोरें सहज नासून टाकतील, अशा कोठेंतरी त्याना पडूं द्या. किंवा त्याचे तुकडे तुकडे करून वाऱ्यावर फेंकून द्या. काहीं करा, पण हे गुलामगिरीचे शिक्के प्रमुखस्थानीं नकोत. कारण या सरटिफिकिटाना—या गुलामगिरीच्या कागदी अलंकारभूपणांना—तुम्ही इतके चाहता आणि इतका मान देतां, हें पाहून गुलामगिरी ही एक मोठी स्पृहणीय वस्तु आहे असा भलताच ग्रह पुढील पिढींत उत्पन्न करण्याला तुम्ही कारणीभूत व्हाल. उत्तम गुलामगिरीबद्दल तुम्हीं संपादन केलेलीं हीं मानपत्रें तुम्ही आपल्या मुलांपासून दडवून ठेवा. कारण, नाहीं तर आपला बाप गुलामगिरींत फार वाकबगार आहे असें त्यांना समजून येऊन ते तुम्हांला खचित कमी मान देऊं लागतील तसेंच या तुमच्या दास्यत्वकुशलतेची वार्ता तुमच्या स्त्रियांच्याहि कानावर जितकी न जाईल तितकी बरी. कारण, नाहीं तर त्यांतील वीरपत्नी या नांवाला शोभणाऱ्या अशा कित्येक स्त्रियांना आपल्या हातांनीं गुलामांना आलिंगन देण्याची खरोखर लाज वाटूं लागेल. याकरितां या सरटिफिकिटांचा गवगवा जितका कमी होईल व यांच्यावरची भक्ति जितकी कमी होईल तितकें फार चांगलें.

सरटिफिकीट या शब्दामध्यें हल्लीं ज्या कल्पनेचा मुख्यत्वेंकरून अंतर्भाव होतो, तिचा परिस्फोट एवढा वेळपर्यंत वर केला आहे. पण त्यात आणखी एका जबर कल्पनेचा अंतर्भाव होत आहे. दुसरा मला चांगलें म्हणेल तर मी चांगला, नाहींतर मी चांगला नव्हे, असा आपल्या सद्गुणांबद्दल आपला अविश्वास, हा सरटिफिकिटाच्या कल्पनेंत मोठा अवगुण आहे. 'बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः।' या कालिदासाच्या म्हणण्यांत बरेंचसें सौजन्य आणि थोडेसें तथ्य आहे खरें. पण सर्वस्वीं दुसऱ्याच्या शब्दावर आपल्या गुणाची किंमत अवलंबून ठेवणें हा एक प्रकारचा कमीपणाच आहे. आपण चांगले तेंच करावयाचें आणि दुसऱ्याच्या चांगलें म्हणण्याची अपेक्षा ठेवावयाची नाहीं, यांत जो एक प्रकारचा जोर आहे, तो साहेबानें चांगलें म्हटलें तरच चांगलें, या मतांत नाहीं. दुसऱ्याच्या सरटिफिकिटावर चालणारा मनुष्य काठीच्या आधारावर चालणाऱ्या मनुष्याप्रमाणें पंगू समजला पाहिजे. त्याला स्वतःच्या जोरावर चालण्याची धमक

मुळींच राहात नाहीं. मनुष्यानें हें लक्षात बाळगिलें पाहिजे कीं, दुसऱ्याचें सरटिफिकीट आपल्यास कितीसें उपयोगी पडणार आहे ? आपण आपल्या अंगच्या गुणांवरच भिस्त ठेवली पाहिजे. परमेश्वरानें जेव्हां आपणांस जन्मास घातलें, तेव्हांच त्यानें आपल्याला सरटिफिकीट देऊन ठेवलेलें आहे. परमेश्वरानें तें आपल्या चेहऱ्यावर लिहून ठेविलें आहे. आणि आपल्या डोळ्यांतील लहानशा बुबुळावर अतिशय विस्तीर्ण अक्षरांनीं परमेश्वरानें आपले सर्व गुण आणि अवगुण लिहून ठेवलेले आहेत. तीं आपलीं खरीं सरटिफिकिटें होत. आपलें सरटिफिकीट आपल्या मनगटांत आहे, आणि आपल्या चेहऱ्यावर आहे. तें सरटिफिकीट ज्याच्यापाशीं नाहीं त्याच्यापाशीं साहेबाच्या सहीचीं छप्पन चिटोरीं असूनहि त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. शिवाय हीं ईश्वरदत्त सरटिफिकिटें आपण जेथें जेथें जाऊं तेथें तेथें आपल्या बरोबर असतात. व आपण बोलण्याच्या आधीं तीं आपले गुण अवगुण लोकाना कळवितात. पण इतर सरटिफिकिटाची तशी स्थिति नाहीं. आपल्या सँडूहर्स्ट साहेबांचेंच उदाहरण घ्या ना. ते उत्तम राज्यकार्यधुरंधर म्हणून आपण त्यांचा पुतळा करून त्यांना सरटिफिकीट दिलें. पण तें दगडी सरटिफिकीट राहाणार हिंदुस्थानांत ! तेव्हा चांगल्या गव्हर्नरचें सरटिफिकीट जर सँडूहर्स्ट साहेबांच्या चेहऱ्यांत परमेश्वरानें लिहून ठेविलेलें नसेल तर या हिंदुस्थानातील दगडाचा त्यांना प्रसंग पडल्यास काहीं तरी उपयोग आहे काय ? एकाएकीं क्रांति झाली, किंवा उद्यांपासून मागील सर्व भेदाभेद मोडून टाकून जगाच्या व्यवहाराला पहिल्यापासून प्रारंभ करावयाचा असें ईश्वरानें मनांत आणिलें अशी कल्पना केली, तर मिनतवारीनें, हांजी-हांजीपणानें, धाकानें, दपटशहानें, किंवा भिडेनें मिळविलेल्या हल्लींच्या सरटिफिकिटांचा काय उपयोग होणार आहे ? सारांश, आपल्या पाणीदार डोळ्यांतील अक्कल आणि आपल्या पिळदार मनगटांतील जोर हें प्रत्येकाचें खरें सरटिफिकीट आहे. तें विसरून साहेबांच्या सहीचीं चिटोरीं तसबिरींत बसविण्यांत काय भूषण आहे ?

# असल्या उत्सवांची भीति कशाला पाहिजे? २०

पुण्याच्या नानाफडणीसांचा उत्सव सोमवारीं रात्रीं संपला. आणि मंगळवारीं सकाळीं रिकामटेकड्या लोकांच्या गप्पांना सुरुवात झाली. एकजण म्हणाला, "मी लेक्चरला गेलों होतों, तेथें माझ्या शेजारीं एक डिटेक्टिव्ह पोलीस बसला होता! व तो लेक्चरामधील कांहीं शब्द टिपून घेत होता." दुसरा एकजण सांगूं लागला कीं, "मोरोबादादाच्या दिवाणखान्यातील दुसऱ्या खांबाच्या सावलींत जो एक गृहस्थ पागोटें घालून बसला होता तो पुराण आणि कीर्तन ऐकण्यापेक्षां दुसऱ्या कांहीं तरी निराळ्या उद्देशानें आला असला पाहिजे, अशी त्याच्या मुद्रेवरून माझी खात्री झाली." तिसरा अतिशय गंभीर मुद्रेनें आणि अतिशय हळू स्वरानें आपल्या एका जिवलग मित्राच्या कानाशीं गुणगुणला, "माझा एक स्नेही पोलीसमध्यें आहे, तो मला विचारीत होता कीं, हा उत्सव कोणीं उपस्थित केला आणि मोरोबादादांच्या वाड्यांत उत्सवाला जागा कशी मिळाली?" अशा प्रकारच्या गप्पांनीं पोलीसाच्या आधीं हे गप्पा मारणारे गृहस्थच लोकांच्या मनांत एक प्रकारची भीति उत्पन्न करीत होते. आतां ह्या गप्पा जरी खोट्या असल्या तरी सरकारच्यासाठीं पोलीस चौकशी करीत असेल, हें कांहीं खोटें नव्हे. पण सरकारनें असल्या उत्सवांची इतकी धास्ती कां बाळगावी कोण जाणे. यापेक्षां सरकारला किंवा सरकारच्या पोलिसांना अधिक महत्त्वाचीं आणि अधिक लोकोपयोगी कांहीं कामें नाहींतच कीं काय? असल्या उत्सवांबद्दल सरकारनें साशंक कां व्हावें? यांत सरकारच्या गंभीर मनाच्या शांततेचा भंग करण्यासारखें काय आहे? आपल्या शेतातील धान्याचें संरक्षण करण्याकरितां शेतकरी लोक पेंढ्याचें बाहुलें तयार करितात व त्याला मडक्याचें डोकें

लावून त्याला एका काठीवर शेताच्या मध्यभागीं उभें करितात. त्याला पाहून अज्ञानी पांखरें हा खरोखरच मनुष्य आहे आणि आपण शेतांतील धान्य खाल्लें तर हा आपल्याला मारील असें मानून दूर उडून जातात. सरकारनें आपल्या कृतीनें आपण त्या पांखरांइतकेच अज्ञानी आहों, असें जगाला कधींहि दाखवूं नये, अशी आमची मनापासून इच्छा आहे. पेंढ्याचे हातपाय आणि मडक्याचीं डोकीं यांना काय भ्यावें ! ह्यांच्या हातून काय व्हावयाचें आहे ! हीं जीं हजारों बुजगावणीं प्रत्येक शेतांतून काठीवर उभीं केलीं जातात त्यांचे हातपाय पेंढ्याचे आणि डोकें मडक्याचें असलेलें सरकारला अजून समजलें नसेल, तर आमच्या सरकारासारखें अज्ञानी सरकार दुसरें कोणतेंहि नसेल. पण ही गोष्ट सरकारला जर समजली असेल तर ती समजूनहि हीं मडक्यांचीं डोकीं काय कल्पना काढतील आणि हे पेंढ्याचे हातपाय काय शौर्य गाजवितील अशी सरकारला भीति वाटत असेल, तर आमच्या सरकारासारखें भित्रें सरकार दुसरें कोणतेंहि नसेल, असें म्हणावें लागतें.

हे उत्सव लोक मजेखातर करितात. मनुष्य हा उत्सवप्रिय प्राणी आहे, असें जें सुधारकांचें मत आहे तें अगदीं खरें आहे. व जहाल पक्षाचे लोक बोलण्यांत सरकारच्या विरुद्ध जहाल गेले नसते, तर नेमस्त वर्गांतील सुधारक प्राणीहि आपल्या अंगची उत्सवप्रियता प्रकट करून क्षणभर मजा मारण्याकरितां दुसऱ्या पक्षाशीं सामील झाले असते. कारण सुंदर तसबिरा, फुलांच्या माळा, केळीचे खांब, अशोकाचे टहाळे, हंड्याझुंबरांचा प्रकाश, गुलाल, बुक्का, तंबुरा, टाळ, पेटी, खिरापत वगैरे गोष्टी दोन्ही पक्षांनाहि सारख्याच गोड लागणाऱ्या आहेत. असल्या सुखवस्तु उत्सवांवर सरकारनें आपली करडी नजर ठेवावी हें कांहीं चांगलें नाहीं. चार लोक एके ठिकाणीं जमतात, कांहीं इकडच्या तिकडच्या चार गप्पा टप्पा मारितात, आणि संध्याकाळीं जेवणाला उशीर झाला किंवा रात्रीं झोंप येऊं लागली कीं, ते आपआपल्या घरोघर जातात. याबद्दल त्यांच्यावर सरकारची वक्रदृष्टि ! सरकारच्या मनांत त्यांच्याबद्दल कांहीं पाप येत असेल. पण सरकारच्याबद्दल त्यांच्या मनांत कधींहि पाप येत नाहीं. अशा उत्सवांना लोक दोन्ही कान उघडे ठेवून जातात, त्यामुळे एका कानांतून जें कांहीं आंत शिरतें तें

दुसऱ्या कानानें पार बाहेर निघून जातें. त्यांतील एक थेंबहि हृदयाच्या बाजूला उतरत नाहीं. कारण, दोन्ही कान एकमेकांच्या समोरासमोर असल्यामुळें जवळची वाट टाकून हृदयाकडच्या आडवाटेला कोण कशाला जाईल ! तेव्हां सरकारनें आमच्या लोकांबद्दल भलभलत्या शंका मनांत बाळगणें चांगलें नाहीं. चार लोक एकत्र जमून हौस मौज करीत आहेत, खेळ खेळत आहेत, बाजाच्या पेट्या वाजवीत आहेत; ते वाजविनात बापडे ! त्यांच्या काळजीनें सरकारची झोंपमोड होण्याचें काय कारण आहे ? लहान मुली भातुकली खेळतात, शाळेंतलीं मुलें पंतोजीचें सोंग आणून शाळेचा खेळ खेळतात, नाटकवाले राजांचीं सोंगें आणून नाटकें करितात, एक पैशासाठीं दांत विचकणारा गारुडी ओंजळभर रुपये निर्माण करून जादूगिरीचा खेळ खेळतो, आणि हिंदुस्थानांतील लोक राष्ट्रीयसभा, सामाजिक परिषद, शिवाजी उत्सव, नानांची पुण्यतीथ, वगैरे देशाभिमानाचे खेळ खेळतात. पण या सगळ्या खेळांच्यामुळें सरकार आपली झोंपमोड करून घेऊं लागलें, तर तें जागरणानें अगदीं कृश होऊन जाईल; आणि या प्रत्येक खेळांत जर सरकार आपले गुप्त पोलिस पाठवूं लागेल, तर कर देणाऱ्या लोकांपेक्षां त्यांच्या करावर पोसल्या जाणाऱ्या निरुपयोगी गुप्त पोलिसांचीच संख्या अधिक वाढेल. या उत्सवाच्या मजलशींतून देशाभिमान भरलेला असेल असें जर सरकारला वाटत असलें तर तें अगदीं चुकीचें आहे. दुष्काळपीडितांना मदत करण्याकरितां नुकत्याच मुंबईस भरलेल्या फॅन्सीबाजारामध्यें पैसे ओतणाऱ्या गृहस्थांच्या मनात जितकी गरिबांबद्दल दया, तितकीच या उत्सवांतील लोकांच्या मनांत देशाभिमानबुद्धि असली पाहिजे. या गोष्टी सरकारला दुसऱ्या कोणी सांगितल्या पाहिजेत असें नाहीं. या उत्सवांतून देशाभिमान म्हणून जो दिसतो तो खरा देशाभिमान नव्हे. तीं देशाभिमानाची सांवली मात्र आहे. सांवलीला लहान मुलें भितात. आमच्या सरकारनें असल्या सांवलीला भिऊन दचकूं नये. पुनर्विवाहाचा प्रघात जारीनें सुरू होऊन हल्लीं जसें पाऊणशें वर्षांचे म्हातारे चवदा वर्षांच्या पोरींशीं लग्नें करितात, त्याप्रमाणें जेव्हां पाऊणशें वर्षांच्या म्हाताऱ्या चवदा वर्षांच्या पोरांशीं पुनर्विवाह लावतील, जेव्हां महाराचांभारांच्या घरीं ब्राह्मण रोटीचा आणि बेटीचा व्यवहार मनसोक्त करूं लागतील, व जेव्हां सुधारकचमूंतील योद्धे सुधारणेचे धवल

विजयध्वज घेऊन चोहोंकडे नाचूं लागतील, तेव्हा, म्हणजे सुमारें हजार दोन हजार वर्षांनीं, सुधारकवीर नेमस्त भाषणांनीं व मर्जीचा कल पाहून उच्चारलेल्या शब्दांनीं जो शिवाजीचा आणि नानांचा उत्सव करतील त्यात मात्र खरा देशाभिमान, खरी निरपेक्षता, खरें धैर्य, वगैरे गुणांचा विकास व्हावयाचा आहे. त्याच्याबद्दल मात्र सरकारनें संभाळून असावें, अशी आम्ही राजनिष्ठापूर्वक सूचना करितों. जर कोणत्या उत्सवाला भ्यावयाचें असेल, तर सरकारनें त्या सुधारणेच्या पायावर रचलेल्या उज्ज्वल, पण नेमस्त उत्सवाला भ्यावें. हल्लींच्या या देशाभिमानाच्या सावलीला भिण्याचें कांहीं कारण नाहीं.

शिवाय या उत्सवाला भिण्यासारखें या उत्सवामध्यें अजून सरकारच्या दृष्टोत्पत्तीस काय आलें आहे? नानांच्या कर्तबगारीची मुख्य रंगभूमि जें पुणें शहर तेथें—खुद्द त्या पुणें शहरांत–उत्सवाचा समारंभ चालला असतां ती गोष्ट ज्याच्या कानावर आली नाहीं किंवा आली असूनहि जे त्याबद्दल निष्काळजी होते असे हजारों लोक गेल्या सोमवारीं उत्सवाला न जातां रस्त्यानें भटकत फिरत नव्हते काय? मग इतक्यात सरकार कशाला भितें आहे? नानाचा वाडा किंवा बेलबागेचें देऊळ अशा सारखीं नानांचीं खुद्द ठिकाणें अस्तित्वांत असतां नानांचा उत्सव दुसऱ्या कोठें तरी इतर लोकांच्या जाग्यांत झाला नाहीं काय? मग इतक्यांतच सरकार भितें आहे म्हणतात, तें कशाला? नानाचें अन्न खाल्लेले; व नानाच्या वंशात उत्पन्न झालेले पुण्यांत कोणी नव्हते असें नाहीं, पण त्यांतुन कोणी उत्सवाला आले होते काय? किंवा तो उत्सव जहाल वाटला तर त्यानीं दुसरा नेमस्त उत्सव तरी केला काय? नानांच्या वंशात आणि नानांच्या अन्नावर वाढलेले लोकहि ज्या उत्सवाला आले नाहींत त्या उत्सवाला सरकारनें काय म्हणून भ्यावें? नानांच्या वेळच्या सरदारांचे वंशज पुण्यात नाहीं असें नाहीं; तसेंच ऐतिहासिक दृष्टया नानांची योग्यता ओळखणारे सुशिक्षित लोकहि पुण्यांत थोडेथोडके आहेत असें नाहीं. पण यापैकीं कोणाला तरी नानांच्या उत्सवासाठीं येण्याला बनलें होतें काय? नाहीं. तर मग एव्हाशींच सरकारनें याला का भ्यावें? पाचपन्नास पागोटीं आणि शें दोनशें टोप्या याच्यांत आमच्या सरकारला भेवडावण्यासारखें

कांहींएक नाहीं. व त्याला सरकारनें भिऊंहि नये. कोणतीहि देशाभिमानाची इमारत सुधारणेच्या भक्कम पायावर व नेमस्तपणानें उभी केलेली नसली तर ती ढासळणारच, हा आधीं सुधारकांचा सिद्धांत आहेच. त्यांतून याला सरदार, सुशिक्षित वगैरे लोकांचें पाठबळ नाहीं. व जे थोडसे लोक जमतात तेहि बहुतेक संध्याकाळीं फिरावयाला जावयाचें ते व्याख्यानाला येतात, आणि रात्रीं झोंप येत नाहीं म्हणून कथेला येतात. अशा प्रकारची स्थिति असतांना, सरकारनें उगीच या उत्सवांना भिण्याचा आव घालणें बरोबर नाहीं. या उत्सवांतून वास्तविक पाहतां असें काय आहे कीं, ज्यासाठीं सरकारला खरोखर भीति वाटली पाहिजे ?

शके १५७१ सालीं फाल्गुन वद्य २ ला देहूस तुकारामबुवा देहासहवर्तमान विमानांत बसून स्वर्गस्थ झाले. त्यानंतर दुसऱ्या वर्षी तुकारामबुवांची भक्तमंडळी एकत्र जमून त्यांनीं प्रतिवर्षी फाल्गुन वद्य २ ला त्यांची पुण्यतिथि करण्याचा प्रघात सुरू केला. तेव्हां देवांना कांहीं वर्षेपर्यंत अशी भीति पडली होती कीं, आतां या पुण्यतिथीच्या दिवशीं टाळ कुटून हे सगळे लोक आपल्या घाणेरड्या देहांसह स्वर्गांत येऊन आम्हांला गर्दी करतात कीं काय ? पण अनुभवानें ही देवांची भीति निराधार ठरली. लक्षावधि टाळकुटये शके १५७१ पासून शके १८२१ पर्यंत टाळांचा कीस काढीत आहेत आणि विण्यांच्या तारा तोंडांत आहेत. पण त्यांतून सदेह विमानांत बसून स्वर्गस्थ झालेला एकहि नाहीं. या गोष्टीपासून आमच्या सरकारनेंहि धडा शिकावा. त्यांनीं या राजकीय टाळकुट्यांना खुशाल टाळ कुटूं द्यावें. शिवाजीचा उत्सव करून शिवाजी उत्पन्न होणार नाहीं, किंवा नानांचा उत्सव करून नाना उत्पन्न होणार नाहींत. जो शिवाजीचा आणि नानांचा उत्सव करण्याला प्रवृत्त होतो, तो शिवाजीपेक्षां आणि नानांपेक्षां अर्थात् कमी प्रतीचा असला पाहिजे. शिवाजी उत्पन्न झाला त्यानें कोणत्या शिवाजीचा उत्सव केला होता ? किंवा नानांनीं आपल्या पूर्वींच्या कोणत्या नानांचा शतसांवत्सरिक उत्सव केला होता ? शिवाजी आणि नाना यांना त्यांचे उत्सव उत्पन्न करूं शकणार नाहींत. व ते उत्पन्न व्हावयाचेच असले तर सरकारचे गुप्त पोलिस त्यांचा प्रतिबंधहि करूं शकणार नाहींत. अशा स्थितींत भलत्याच गोष्टीबद्दल भलतीच भीति सरकारानें मनांत बाळगणें ठीक नव्हे.

हे उत्सव केवळ गमतीखातर आहेत. लहान मुलांना खेळण्याकरितां जसे रबराचे साप केलेले असतात, किंवा वाघ म्हणजे कसा असतो हें त्यांना माहीत होण्यासाठीं जसें त्यांच्या बुकात वाघाचें चित्र काढून दाखविलेलें असतें, तसे हे उत्सव होत. असल्या उत्सवानीं गडबडून जाण्याचें काय कारण आहे? लावीपक्षीण ज्या शेतांत राहिली होती त्या शेताचा मालक बहिर्दिशेला जाण्याकरिता सकाळचा बाहेर पडला म्हणजे शेताच्या बांधाभोंवतीं एक खेप घालून जात असे व "आता शेत कापावयाला झालें आहे," "आता आपल्या सोयऱ्याना बोलाविलें पाहिजे," असें तो जातां जाता म्हणत असे. पण ती लावीपक्षीणसुद्धां इतकी शहाणी होती कीं, त्या मालकाच्या त्या शिळोप्याच्या गप्पानीं ती मुळींच गडबडून न जातां, "तुम्ही स्वस्थ राहा," असा ती आपल्या पिलांना शांतपणानें उपदेश करीत असे; या लावीपक्षिणीपासून ज्यांना शहाणपण शिकता येण्यासारखें असेल त्यांनीं तें अवश्य शिकावें.

---

# इनकमटॅक्स आणि सोशिॲलिझम : : २१

इनकमटॅक्स म्हणजे प्राप्तीवरील कर हें अलीकडे अगदीं साधारण लोकांनासुद्धां माहीत झालेलें आहे. कारण साधारण खाऊन पिऊन बरा असून ज्याला इनकमटॅक्स द्यावा लागत नाहीं असा मनुष्य विरळाच आढळून येईल. प्राप्ती खरोखर फारशी मोठी असो किंवा नसो. प्राप्तीवरील कराच्या तडाख्यांतून बहुधा कोणी सुटलेला नाहीं. आतां इनकमटॅक्स म्हणजे काय हें ज्याप्रमाणें पुष्कळांना माहित झालेलें आहे त्याप्रमाणेंच त्याचा विनियोग

दुष्काळाकडे होत असतो, हेंहि पुष्कळांना माहित असलें पाहिजे. पण येथें प्रश्न असा उपस्थित होतो कीं, इनकमटॅक्सचेच पैसे दुष्काळाकडे लावण्याचें कारण काय असावें ? दुष्काळांत गरीब लोकांच्या पोटापाण्याची वगैरे सर्व तजवीज सरकार आपल्या शिरावर घेतें व त्याबद्दलचा सर्व पैसा सरकारच्या तिजोरींतून खर्च होतो. असें जर आहे, तर मग अमुक एक कराच्या योगानें सरकारच्या तिजोरींत येऊन पडलेला पैसाच दुष्काळाकडे खर्चावा असा जो निर्बंध केलेला दिसतो, त्यातील हेतु काय असावा ? इनकमटॅक्सचेच एक कोट रुपये दुष्काळासाठीं खर्चावे आणि मिठाच्या करापैकीं किंवा जमीनमहसुलापैकीं खर्चू नयेत अशी जी विशेष व्यवस्था ठरविण्यांत आलेली आहे, तिच्या मुळाशीं कांहीं विशेष कारण आहे काय ? रुपये म्हटले म्हणजे सर्व सारखेच. त्यांतून दुष्काळांतील लोकांना देण्यासाठीं इनकमटॅक्सच्या रुपयांनीं धान्य घेतलें तर तें जास्त येतें आणि मिठावरील किंवा दुसऱ्या एखाद्या कराच्या रुपयांतून धान्य घेतलें तर तें कमी येतें, असा प्रकार मुळींच नाहीं. असें जर आहे तर मग इनकमटॅक्स हा दुष्काळासाठींच होय, असें म्हणण्यांतील तात्पर्य काय ?

वरील प्रश्न फार महत्त्वाचा आहे व त्या प्रश्नाच्या मुळाशीं जें एक तत्त्व आहे, तें फार उदात्त, आणि अत्यंत लोकहितकारक असें आहे. या तत्त्वाकडे लक्ष पोहोंचवून हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानांत तें प्रचारांत आणण्याचा प्रयत्न चालविला आहे, याबद्दल तें स्तुतीस पात्र आहे. तें तत्त्व म्हणजे सोशिॲलिझमचें होय. मराठीमध्यें याला चांगलासा प्रतिशब्द देतां येणार नाहीं. तरी पण या शब्दांत काय अर्थ आहे याची कल्पना मराठी वाचकांस येणें फारसें कठीण नाहीं. सोशिॲलिझम म्हणजे काय याच्याबद्दल इंग्लिश, फ्रेंच, आणि जर्मन अशा पुष्कळ लेखकांनीं पुष्कळ व्याख्या केल्या आहेत. परंतु त्यांपैकीं जॅनेट याची व्याख्या आपल्या प्रस्तुतच्या स्थितीला विशेष जुळण्यासारखी आहे. जॅनेट म्हणतो :—

" We call socialism every doctrine which teaches that the state has a right to correct the inequality of wealth, which exists among men, and to legally establish the balance by taking from those, who have too much,

in order to give to those, who have not enough, and that in a permanant manner, and not in a particular case, a famine for instance, or some public calamity."

वरील उताऱ्यांतील भावार्थ असा आहे कीं, जगांत कोणी श्रीमंत असतात आणि कोणी गरीब असतात, हा जो संपत्तीच्या संबंधानें फरक असतो तो मोडून टाकणें इष्ट आहे; व ज्यांच्यापाशीं अतिशय संपत्ति असते त्यांच्या-पासून त्यांतील कांहीं भाग घेऊन, ज्यांना पोटालादेखील पुरेसें मिळत नाहीं त्यांना तो देऊन, सर्व लोकांमध्यें एक प्रकारची समता उत्पन्न करणें जरूर आहे; व या गोष्टी घडवून आणण्याचा हक्क राजाला आहे. अशा प्रकारचें मत ज्या पंथाकडून प्रतिपादिलें जातें त्याला सोशिॲलिझम असें म्हणतात. सोशिॲलिझमच्या व्याख्येंतील हा जो सारांश दिला आहे त्यावरून दुष्काळपीडिताच्या मदतीसाठीं इनकमटॅक्सचाच कां उपयोग करण्यांत येतो, या प्रश्नाचा थोडासा उलगडा झाल्यावांचून राहणार नाहीं. दुष्काळांत उपाशी मरणाऱ्या लोकांचें संगोपन करण्याची जबाबदारी वर निर्दिष्ट केलेल्या तत्त्वाप्रमाणें श्रीमंत लोकांवरच येऊन पडते. म्हणून त्यांच्या पैशातून कांहीं थोडासा भाग घेऊन तो गरीब लोकांच्या क्षुधेच्या शमनार्थ खर्च केला जावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. व अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे प्राप्तीवरील कराचाच या कामीं विनियोग व्हावा, हें अगदीं बरोबर आहे. दुसरा कोणताहि कर या कामाला योग्य नाहीं. उदाहरणार्थ, मिठावरील कर घ्या. मनुष्य श्रीमंत असो किंवा गरीब असो, त्याला मिठाची आवश्यकता ही आहेच. मिठावांचून कोणाचेंहि चालावयाचें नाहीं. म्हणजे याचा अर्थ असा कीं, श्रीमंत व गरीब या सर्व लोकांना मिठावरील कर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें कसा तरी द्यावा लागत आहे. या कराचा उपयोग दुष्काळा-कडे केला तर त्याचा अर्थ असा होईल कीं, गरीबांना पोसण्याचें काम गरीबांच्याच डोक्यावर लादण्यांत येतें. असें जर झालें तर याच्यासारखा दुसरा कोणताच अन्याय होणार नाहीं. व मिठावरील कराप्रमाणेंच इतर करांचीहि गोष्ट होणार आहे. म्हणून दुष्काळाच्या कामासाठीं इनकमटॅक्सची जी योजना झाली आहे, ती अगदीं यथायोग्य झाली आहे असें म्हटलें पाहिजे.

हें जें सोशिऑलिझमचें तत्त्व वर सांगितलें आहे, तें युरोपखंडामध्यें जरी अलीकडे विशेष प्रबल झालें असलें तरी आपल्यामध्येंहि तें तत्त्व पूर्वीपासून प्रचलित झालेलें आहे असें दिसतें. 'भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ।' या महाभारतांतील वचनांत असें सांगितलें आहे कीं, जे फक्त आपल्यासाठींच अन्न शिजवितात म्हणजे देव, धर्म, अनाथ, अतिथि, अभ्यागत, इत्यादिकांकडे त्या अन्नांतील कांहीं भागाचा विनियोग न करतां जे आपणच एकटे त्याजवर ताव मारितात, ते पापाचे वांटेकरी होतात. त्याचप्रमाणें श्रीमद्भागवतामध्यें पुढील श्लोक आढळतोः 'यावद्भ्रियेत जठरं तावत्स्वत्वं हि देहिनाम् । अधिकं योऽभिमन्येत स स्तेनो दंडमर्हति ॥' आपलें स्वतःचें पोट भरण्याला जितकें अवश्य पाहिजे आहे तितक्यावरच काय ती प्रत्येकाची वास्तविक सत्ता होय. त्यापेक्षां अधिक द्रव्यावर जर कोणी आपली सत्ता चालवील तर त्याच्यावर त्याची खरी सत्ता नाहीं. व ज्याच्यावर त्याची सत्ता नाहीं असें द्रव्य जर त्याच्यापाशीं असलें तर तें चोरीचे द्रव्य होय. व तें चोरीचें द्रव्य बाळगणारा एका दृष्टीनें चोर होय. व त्याला चोर म्हणून जी योग्य शिक्षा असेल ती मिळणें अवश्य आहे. या श्लोकांतील विचाराची मजल तर सोशिऑलिस्ट लोकांच्या विचाराच्या पलीकडे जाऊन युरोपखंडांतील याच पंथाच्या अनार्किस्ट वगैरे ज्या शाखा आहेत त्यांच्यापर्यंत येऊन थडकली आहे. राज्यांत लोकांना खावयाला मिळेनासें झालें म्हणजे दरवडे पडतात, बंडें उठतात आणि राज्यक्रांत्या होतात, हें सर्वांना माहीत आहेच. व वरील भागवतांतील श्लोकांत वर्णन केलेल्या चोरांना जी शिक्षा मिळणें योग्य म्हणून सांगितलें आहे, ती अशाच प्रकारची असली पाहिजे, असें दिसतें. परंतु अशी खडतर शिक्षा देण्याचे प्रसंग कोणावर केव्हांहि येऊं नयेत म्हणून आपल्यामध्यें गरीबांना दानधर्म करण्याचा प्रघात आपल्या पूर्वजांनीं पाडून दिला आहे. अशा प्रकारचें आपल्या समाजामध्यें सोशिऑलिझमला स्वरूप आलेलें आहे.

आपल्या इकडे आपण प्रत्येकजण यथाशक्ति गरीबांना दानधर्म करितों. परंतु इंग्लडमध्यें तशी चाल नाहीं. तिकडे गरीबांची संरक्षण करण्याची सर्व जबाबदारी राजा आपल्या शिरावर घेतो. व आपल्या प्रजेपासून Poor rates (गरीबांसाठीं कर) चे पैसे वसूल करून व Poor laws (गरीबांसाठीं कायदे)

पास करून घेऊन तेथील राजा आपल्या राज्यांतील गरीबांची सोय लावतो. याप्रमाणें हिंदुस्थान आणि इंग्लंड या दोन देशांतील गरीबांच्या संबंधानें मूळची व्यवस्था आहे. परंतु हल्लीं हिंदुस्थानांत जी राज्यपद्धति सुरू आहे तिजमुळें तेथील लोकावर दुबार ओझें पडत आहे. आपल्या वाडवडिलांनीं घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणें व आपल्या शास्त्रांनीं सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील लोक गरीबाना दानधर्म करीत आहेतच, पण त्याशिवाय हल्लीं हिंदुस्थानावर सुदैवानें परकीयांचें राज्य असल्यामुळें, इंग्रजसरकार इंग्लंडांतील Poor rates प्रमाणें आमच्या इकडे लोकांवर इनकमटॅक्स बसवून गरीबांना मदत करण्यासाठीं आम्हापासून पैसे वसूल करून घेत आहे. असो. आमच्यापासून दुबार पैसे गेल्याचें दुःख नाहीं. पण आमच्या पदरचे पैसे जाऊन दुष्काळासाठीं म्हणून काढलेल्या रेल्वेनें इंग्लंडांतील व्यापारी श्रीमंत न होतां हिंदुस्थानातील गरीबांचीं पोटें भरावीं म्हणजे झालें.

वरील एकंदर विवेचनावरून हे लक्षांत येईल कीं, सोशिॲलिझमच्या तत्त्वाप्रमाणें प्रत्येक श्रीमंतानें आपल्या प्राप्तीपैकीं कांहीं भाग गरीबांना द्यावा हें उचित आहे. व हा नियम हल्लीं हिंदुस्थानांतील सर्व लोकांना लागू करून त्यांच्यापासून इनकमटॅक्स वसूल केला जात आहे. पण येथें प्रश्न असा येतो कीं, गरीबांसाठीं जर श्रीमंत लोकांनीं आपल्या प्राप्तींतील कांहीं भाग द्यावा, तर त्या लोकांपेक्षां लक्षावधि पटीनें श्रीमंत अशा सरकारनेंहि कां देऊं नये? प्रजेनें तेवढा आपल्या उत्पन्नांतील वाटा गरीबांना द्यावा आणि सरकारनें देऊं नये, असें सोशिॲलिझमनें कोठें सांगितलें आहे? गरीबांचें दुःख निवारण करणें हें ईश्वरप्रतिपादित कर्तव्यकर्म आहे. ते लोकांनीं तेवढें करावें आणि सरकारनें करू नये, असें मुळींच नाहीं. हल्लीं आपलें सरकार जें कांहीं करीत आहे ते एवढेंच कीं, आपल्यापैकीं जे श्रीमंत असतील त्यांच्यापासून इनकमटॅक्स घेऊन तो आपल्यापैकीं जे गरीब लोक आहेत त्यांना वांटून देत आहे. परंतु डोळ्यांतलें पाणी काढून डोळ्याला लावणें किंवा अचळांतील दूध काढन अचळाला लावणें, हा कांहीं मोठासा प्रशस्त मार्ग नव्हे. सरकारनेंहि आपल्या प्राप्तीच्या मानानें आपला वांटा लोकांच्या इनकमटॅक्समध्यें भरीस घालून गरीबाना वांटला पाहिजे. परंतु सरकार तसें स्वतः करीत नाहीं व लोकांपासून मात्र इकनमटॅक्स वसूल करून घेतें. हें अगदीं गैरशिस्त आहे.

दुष्काळांत गरीबांसाठीं सरकारचे कांहीं पैसे खर्च होतात, हें खरें आहे. पण सरकार त्या पैशाला अगदीं निराळें नांव देतें. इतराप्रमाणें आम्हींहि इनकमटॅक्स दिला पाहिजे व तो आम्ही या रूपानें देतों, असें सरकार कधींहि म्हणत नाहीं. मात्र उलट सरकार अशी घमेंड मारीत असतें कीं, पाहा आम्ही किती उदार आहों ते! आमच्यासारखे दयाळु अंतःकरणाचे राजे तुम्हांला पूर्वीं कधीं मिळाले होते काय! आम्ही तुमच्या जीवितरक्षणासाठीं केवळ औदार्यबुद्धीनें कोट्यावधि रुपये खर्च करीत आहों! अशा प्रकारचे एखाद्या साहेबाच्या तोंडचे उद्‌गार ऐकिले म्हणजे पुष्कळ बावळट नेटिव लोकांना इंग्रजांबद्दल गहिंवर येतो. पण इंग्रजसरकार दुष्काळांत जे पैसे खर्च करितात तें त्यांचें औदार्य नव्हे, व तें त्यांच्या दयाळु अंतःकरणाचें चिन्हहि नव्हे. त्यांनीं इतरांप्रमाणें आधीं इनकमटॅक्स द्यावयास पाहिजे होता. आणि मग तो टॅक्स देऊन त्याशिवाय त्यांनीं आणखी पैसे दिले असते, तर तें त्यांचें औदार्य होय, असें आपल्याला म्हणतां आलें असतें. पण आपल्या सरकारची तशी कृति आहे कोठें? लोकांपासून सरकार एक रुपयाच्या प्राप्तीवर चार पै कर याप्रमाणें इनकमटॅक्स वसूल करतें. त्याच दरानें सरकारपासून इनकमटॅक्स वसूल केला गेला असता, तर दुष्काळामध्यें गरीब लोकांची किती तरी चैन झाली असती. आम्हांला दुष्काळासाठीं किती तरी रुपये खर्चावे लागतात अशी रड गाऊन त्यांतल्या त्यांत इळूच आपल्या औदार्याची स्तुति गाणाऱ्या सरकारचा नेहमीं इनकमटॅक्स न देतां, दुष्काळाच्या वेळीं दयाळु अंतःकरणानें एकदम घाऊक रक्कम खर्च करण्याच्या योगानें किती तरी फायदा होतो, हें पुढील आंकड्यांवरून अगदीं स्पष्ट दिसून येण्यासारखें आहे.

आपण आपल्या मुंबई इलाख्याचेंच उदाहरण घेऊ. इ० स० १८७७–७८ सालीं हिंदुस्थानांत भयंकर दुष्काळ पडला होता. व तेव्हांपासून लोकांकडून इनकमटॅक्स घेण्याला सुरुवात झालेली आहे. आतां त्याच वेळेपासून आपल्या मुंबईसरकारकडूनहि इनकमटॅक्स वसूल करण्यांत येऊं लागला अशी आपण कल्पना केली, तर १८९७ मध्यें दुसरा दुष्काळ पडून त्या फंडाची जरूर लागेपर्यंत वीस वर्षांच्या अवधींत एकट्या मुंबईसरकारच्या प्राप्तीवरील कराची बेरीज किती होते तें आपण पाहूं. १८९७–९८ सालचें मुंबई

सरकारचें उत्पन्न १४,४९,६२,५२६ रुपये झालें आहे. इतकेंच मागच्या एकोणीस वर्षांत झालें नसेल, म्हणून सरासरीनें दरसाल १४ कोट रुपये मुंबईसरकारचें उत्पन्न आपण अदमासानें धरूं. आतां १ रुपयाला ४ पै या दरानें १००० रुपयांवर २० रु. १३ आ. ४ पै इनकमटॅक्स बसतो. परंतु हिशेबाच्या सोयीसाठीं एक हजाराला २१ रु. असें प्रमाण धरलें तर १४ कोटी उत्पन्नावर २९,४०,००० इनकमटॅक्सची रक्कम बसते. व प्रत्येक वर्षाची इतकी रक्कम म्हणजे २० वर्षांत एकंदर मुंबईसरकारनें इन्कमटॅक्ससाठीं म्हणून द्यावयास पाहिजे अशी रक्कम ५ कोटी ८८ लक्ष रुपये होते व शिवाय वीस वर्षांचें चक्रवाढ व्याज आकारलें तर ही रक्कम ६ कोटींवर जाईल. आतां मुंबईसरकारनें सन १८९७ चे दुष्काळामध्यें औदार्यानें आणि सदय अंतःकरणानें काय खर्च केला आहे तो पाहूं. लोकलबोर्डें, म्युनिसिपालिट्या, इंडियन चॅरिटेबल फॅमिनफंड, वगैरेकडून जो खर्च झाला किंवा सरकारनें शेतकऱ्यांना कर्जाऊ आणि तगाईसाठीं म्हणून जे पैसे दिले त्यांचा येथें विचार करण्याचें कारण नाहीं. परंतु जे खुद्द मुंबईसरकारच्या तिजोरींतून खर्च झाले आणि जे परत वसूल होण्याचा संभव नाहीं अशाच पैशांचा आपल्याला येथें विचार कर्तव्य आहे. अशी रक्कम म्हटली म्हणजे फक्त १,२८,३०,७०९ रुपयांचीच सरकारच्या पदरची खर्च झालेली आहे. आतां याप्रमाणें दोन्ही बाजू लोकांच्यापुढें मांडल्याच्या योगानें मुंबईसरकारनें या दुष्काळाच्या व्यापारांत काय किफायत केली आहे, हें सहज कळून येईल. इतरांप्रमाणें इनकमटॅक्स देण्याला मुंबईसरकारहि पात्र असून तो न दिल्यामुळें त्यांनीं सुमारें सहा कोट रुपये वांचविले. व त्यांपैकीं दुष्काळाच्या वेळीं फक्त १,२८,३०,७०९ रुपये खर्च केले. सबब ४,७१,६९,२९१ रुपये हा सरकारचा निव्वळ फायदा झाला. व शिवाय औदार्याबद्दल आणि मऊ अंतःकरणाबद्दल दुधखुळ्या नेटिवांपुढें बढाई मारावयाला सांपडते ती निराळीच. हल्लींच्या दुष्काळाचे आंकडे अजून तयार नाहींत म्हणून ९७ सालच्या दुष्काळाचेच आंकडे घेऊन वरील हिशेब केला आहे. एकट्या मुंबई इलाख्याच्या सरकारला जर सुमारें पावणे पांच कोटी रुपयांचा फायदा गेल्या दुष्काळांत राहिला, तर पांच इलाख्यांवर राज्य करणाऱ्या हिंदुस्थानसरकारला अर्थात् पावणे चोवीस कोटींचा फायदा झाला असला पाहिजे !

यावरून हें उघड दिसून येतें कीं, सरकारनें औदार्य दाखविण्यापेक्षां आपलें इनकमटॅक्स देण्याचें कर्तव्यकर्मच केलें तर त्यांत गरीब लोकांचा अधिक फायदा आहे. पण आमच्या उदार सरकारला आपलें कर्तव्यकर्म करून स्वस्थ बसण्यापेक्षां आपल्या औदार्याबद्दल आपणच पोवाडे गाण्याची लज्जत लागली आहे, त्याला काय उपाय ?

---

पंडित पत्रकार व पुढारी यांनीं प्रशंसलेली

"सरस्वती" चीं अमूल्य

## प्रकाशनें

१ कारागृहाच्या भिंती—भाई ना. ग. गोरे मूल्य ३ रु.
२ भारतीय क्रांति आणि राष्ट्रसभा—
आचार्य शं. द. जावडेकर मूल्य १२ आ.
३ कॉंग्रेसचीं साठ वर्षें—श्री. रा. प्र. कानिटकर मूल्य ८ आ.
४ त्रिमंत्री—योजना ( भाग १ ला ) मूल्य १। रु.
५ पत्री—साने गुरुजी मूल्य ३॥ रु.
६ हिंदी रेल्वे कामगार—भाई वि. न. साने मूल्य १२ आ.
७ त्रिमंत्रि—योजना ( भाग २ रा ) मूल्य १। रु.

## —आगामी प्रकाशनें—

१ लोकमान्य टिळक व महात्मा गांधी—
आचार्य शं. द. जावडेकर
२ फ्राइडचीं पांच व्याख्यानें—भाई ना. ग. गोरे
३ भाई जयप्रकाश यांचीं स्वातंत्र्यवीरांस पत्रें—
संपादक भाई ना. ग. गोरे
४ सन्यत्सेन
५ राष्ट्रसभेचें वनपर्व—आचार्य शं. द. जावडेकर
६ सत्याग्रही-खंडकाव्य—साने गुरुजी

पुस्तकें मिळण्याचा पत्ता—

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

स. रा. देशपांडे
संचालक "सरस्वती"
२९१ शनिवार, पुणें १.

## अद्यावत् आणि आकर्षक छपाई—

* अगदीं लहान भेटकार्डापासून पुस्तकाचें कोणतेंहि काम.
* व्यापारी, बँका, लिमिटेड कंपन्या यांचीं सर्व तऱ्हेचीं लहानमोठीं कामें.
* डिझाइन्स, ब्लॉकमेकिंग, रूलिंग, बाइंडिंग इत्यादि मुद्रणाचीं सर्व कामें—

काळजीपूर्वक, वेळेवर, व्यवस्थित व योग्य दरांत केलीं जातात.

# आदर्श मुद्रणालय : ३९५।५ सदाशिव, पुणें २.

---

# शि. ल. करंदीकर यांचीं पुस्तकें—

| | | |
|---|---|---|
| १ | सावरकर चरित्र : कथन | [ दुसरी आवृत्ति छापत आहे ] |
| २ | टिळक-भारत ... ... ... | रु. ४ |
| ३ | पाकिस्तानचें संकट ... ... ... | रु. २ |
| ४ | जात्यावरच्या ओंव्या ... ... | रु. १॥ |
| ५ | मॅट्रिक मराठी गाईड ... ... | रु. २॥ |

[ १९४६-४८ ]

**—मिळण्याचें ठिकाण**

## आदर्श मुद्रणालय : ३९५।५ सदाशिव, पुणें २.

## य. गो. जोशी प्रकाशन, पुणें

# ❀ वाद-विवेचन-माला ❀

| | | |
|---|---|---|
| १. सुलभ समाजवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| २. फॅसीझम | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ३. साम्राज्यशाही | ना. गं. गोरे | १-०-० |
| ४. अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ५. लोकशाही | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ६. मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ७. विश्वकुटुंबवाद | ना. गं. गोरे | १-८-० |
| ८. ईश्वरवाद | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ९. गांधीवाद | आचार्य दांडेकर | १-८-० |
| १०. राष्ट्रवाद | कोल्हटकर | २-०-० |
| ११. जडवाद | तर्कतीर्थ जोशी | १-४-० |
| १२. हिंदुत्ववाद | ज. स. करंदीकर | २-८-० |
| १३. मार्क्सचा कॅपीटल सारग्रंथ | पां. वा. गाडगीळ | १०-०-० |

* या तेरा पुस्तकांत वाद-विवेचन-माला पूर्ण होते. *

—: सोल एजंट :—

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, गिरगांव, मुंबई**

ग्राहकांनीं व पुस्तकविक्रेत्यांनीं पुस्तकें महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई. यांजकडून परस्पर मागवावींत.

# भरपूर उजेडासाठीं प्रसिद्ध !




- भरपूर उजेड देतात
- जास्त वेळ टिकतात

**दि बरोडा बॅटरीज लिमिटेड,**
**गोया गेट, बडोदें**

**—सोल एजंट्स—**

**दि पनावा एजन्सीज लिमिटेड**

४२ फोर्बस् स्ट्रीट, **फोर्ट मुंबई नं. १.**


९

# * साहित्यांतील सुवर्णकण *

न. चिं. केळकर

**ज्ञानेश्वरी सर्वस्व**

ज्ञानेश्वरीचा भावार्थ, निवडक अवतरणें, विस्तृत विवेचन, कठीण शब्दांचा कोष, विषय सूचि. किं. ५ रु.

**गांवरान गीता**

श्रीभगवद्गीतेचा सुबोध परिचय किं. २

**फ्रेंच राज्यक्रांति** किं. २॥ रु.

**राज्यशास्त्र** किं. १॥ रु.

द. के. केळकर

**संस्कृति संगम**

वाढवून अद्ययावत् केलेली नवी आवृत्ति किं. ६ रु.

**काव्यालोचन**

सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति किं. ५ रु.

**साहित्यविहार** किं. ३ रु.

कमलाबाई देशपांडे

**स्मरण सांखळी** किं. ६ रु.

**हंसरा निर्माता आणि चिमण्या** किं. २ रु.

मनोहर ग्रंथमाला, टिळकरोड, पुणें २.

## पंडित पत्रकार व पुढारी यांनीं प्रशंसलेली
## "सरस्वती" चीं अमूल्य
## प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| १ कारागृहाच्या भिंती—भाई ना. ग. गोरे | | मूल्य ३ रु. |
| २ भारतीय क्रांति आणि राष्ट्रसभा— आचार्य शं. द. जावडेकर | | मूल्य १२ आ. |
| ३ काँग्रेसचीं साठ वर्षें—श्री. रा. प्र. कानिटकर | | मूल्य ८ आ. |
| ४ त्रिमंत्री—योजना ( भाग १ ला ) | | मूल्य १। रु. |
| ५ पत्री—साने गुरुजी | | मूल्य ३॥ रु. |
| ६ हिंदी रेल्वे कामगार—भाई वि. न. साने | | मूल्य १२ आ. |
| ७ त्रिमंत्रि—योजना ( भाग २ रा ) | | मूल्य १। रु. |

### —आगामी प्रकाशनें—

१ लोकमान्य टिळक व महात्मा गांधी—
आचार्य शं. द. जावडेकर

२ फ्राइडचीं पांच व्याख्यानें—भाई ना. ग. गोरे

३ भाई जयप्रकाश यांचीं स्वातंत्र्यवीरांस पत्रें—
संपादक भाई ना. ग. गोरे

४ सन्यत्सेन

५ राष्ट्रसभेचें वनपर्व—आचार्य शं. द. जावडेकर

६ सत्याग्रही-खंडकाव्य-साने गुरुजी

पुस्तकें मिळण्याचा पत्ता—

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

स. रा. देशपांडे
संचालक "सरस्वती"
२९१ शनिवार, पुणें १.




कंबरेंतील उसण, लचक किंवा इतर वातविकार **नरेंद्र** एम्ब्रोकेशन चोळल्यानें त्वरित बरे होतात. वयोमानाच्या वाढीबरोबरच हवामानांतील फरकही शरीराला जाणवूं लागतात. अशा वेळीं शरिराला **नरेंद्र एम्ब्रोकेशन** रगडून गरम पाण्यानें स्नान करा. पूर्ववत् उत्साह वाटूं लागेल. केमिस्ट व वाण्यांकडे मिळतें.

सोल एजंट, **हनुमान एजन्सी, परळ, मुंबई १२.**

# सावधगिरी

कॉलरा, अमांश सारखे साथीचे रोग हल्लीं **नेहमीचेच** झाले असून वेळेवर उपचार न झाल्यास रोगी दगावण्याची भीति असते. अशा वेळीं **जवेरियन जीवन मिक्श्चरचे** थोडे थेंब पाण्यांतून घेतल्यानें या रोगांपासून बचाव होतो. **कुटुंबांत नेहमीचेच** असणारे कैक किरकोळ विकार—उलटी, अपचन, सर्दी, पोट-दुखी, दाढदुखी, लहान मुलांच्या शौचाच्या तक्रारी, जंतूदंश, सूज वगैरे **जवेरियन जीवन मिक्श्चर** त्वरित बरें करते. लाखों कुटुंबांत आज **जवेरियन जीवन मिक्श्चर** निष्ठेनें वापरीत आहेत. डॉक्टरांच्या गैर-हजेरींत उपयोगी पडणारें हें औषध घरांत व प्रवासांत राखणें खात्रीनें सावधगिरीचें ठरतें. केमिस्ट व खेडोपाडीं वाण्याकडे मिळतें.

**एम्. एच्. जवेरीयन ॲण्ड कंपनी**

देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.

## य. गो. जोशी प्रकाशन, पुणें

# ❀ वाद-विवेचन-माला ❀

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सुलभ समाजवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| २. | फॅसीझम | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ३. | साम्राज्यशाही | ना. गं. गोरे | १-०-० |
| ४. | अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ५. | लोकशाही | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ६. | मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ७. | विश्वकुटुंबवाद | ना. गं. गोरे | १-८-० |
| ८. | ईश्वरवाद | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ९. | गांधीवाद | आचार्य दांडेकर | १-८-० |
| १०. | राष्ट्रवाद | कोल्हटकर | २-०-० |
| ११. | जडवाद | तर्कतीर्थ जोशी | १-४-० |
| १२. | हिंदुत्ववाद | ज. स. करंदीकर | २-८-० |
| १३. | मार्क्सचा कॅपीटल सारग्रंथ | पां. वा. गाडगीळ | १०-०-० |

* या तेरा पुस्तकांत वाद-विवेचन-माला पूर्ण होते. *

—: सोल एजंट :—

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, गिरगांव, मुंबई**

ग्राहकांनीं व पुस्तकविक्रेत्यांनीं पुस्तकें महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई. यांजकडून परस्पर मागवावींत.

# देवकरण नानजी इन्शुअरन्स कंपनी लि.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल, | रु. २०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व विक्री झालेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| आयुर्विम्याचें झालेलें एकंदर काम | रु. ७५,००,००० |
| लाईफ फंड | रु. ५०,३०,००० चे वर |

वजनदार आणि उत्साही व्यक्तींनीं

—एजन्सीसाठीं अर्ज करावेत—

## जिंदगी * आग * अकस्मात्

—हेड ऑफिस—

देवकरण नानजी बिल्डिंग्ज्, मुंबई नं. १.

# देवकरण नानजी इन्शुअरन्स कंपनी लि.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व विक्री झालेलें भांडवल | रु. १०,००,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टस

(१) प्राणलाल देवकरण नानजी जे. पी.
(२) चुनीलाल देवकरण नानजी,
(३) राजरत्न नानजी कालिदास मेहता, एम. बी. ई.
(४) माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
(५) कॅप्टन शिवसिंहजी ऑफ पोरबंदर.
(६) ललितचंद्र सी. डी. नानजी.
(७) तनुभाई डी. देसाई, बी. ए. एल्. एल्. बी.
(८) जयंतिलाल रतिलाल त्रिवेदी,
(९) लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर जे. पी.
(१०) विजयचंद्र एन. कंटोल,
(११) हिंमतलाल व. गांधी, मॅनेजिंग डिरेक्टर.

सुरेश के. देसाई, बी. ए. एलएल. बी., मॅनेजर

# आयुष्य—आग—अकस्मात्

सुविद्य आणि रसिक वाचकांचें आवडतें मासिक

# वाङ्मयशोभा

★

संपादकः—**मनोहर महादेव केळकर**, बी. ए,. एल्एल्. बी.

**ना**मांकित आणि नवोदित लेखकांच्या उत्कृष्ट वाङ्मयानें मराठी वाचकांना प्रमुदित करणारें हें मासिक **गेलीं सात वर्षें** अत्यंत नियमितपणें श्री. शारदेची सेवा करीत आहे. **वि**चार प्रवण करणारें उद्बोधक वाङ्मय आणि मनोवेधक ललित साहित्य या दोहोंचा मनोज्ञ संगम वाङ्मयशोभेंतच आढळेल.

**आ**कर्षक सजावट, सुंदर मुखपृष्ठ, मार्मिक व्यंगचित्रें आणि उत्कृष्ट छपाई हीं कांहीं वैशिष्ट्यें. वा. व. ५ रु. ट. ह. सह.

★

**वाङ्मयशोभा कार्यालय,**

**टिळकरोड, पुणें २.**

★

झाले बहु, होतील बहु ॥
आहेतहि बहु, परंतु यासम हा ॥
या सुप्रसिद्ध कव्युक्तीप्रमाणेंच जिच्यासंबंधीं आज सर्वत्र एक सूर निघत आहे अशी हिंदुस्थानांतील एकमेव आदर्श विमासंस्था म्हणजेच

## ट्रिनिटी म्यूच्युअल

**कारण**

जीवन विमाव्यवसाय पद्धतींत अत्यावश्यक असे अनेक उपक्रम करून बि
सृष्टींत मन्वंतर घडवून आणण्याच्या दृढनिश्चयानें जिनें विमाजगतांत
पदार्पण केलें व जीवन विमाव्यवसाय केवळ समाजसेवा आणि राष्ट्र-
हित साधण्याच्या दृष्टीनेंच करण्याचा जिनें विडा उचलला अशी
'एकमेवाद्वितीयं' या संज्ञेला पात्र झालेली जर कोणती
विमासंस्था असेल तर ती

ट्रिनिटी म्यूचुअल
अॅशुअरन्स · कंपनी · लिमिटेड.
प्रमुख कार्यालय —— कोट — मुंबई.

**हीच होय**

चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स — हेमन एस्. अलरेजा, B. Com. (Bom.), A. C. C. S. (Eng.

चेअरमन, मेडीकल डायरेक्टर्स — डॉ. के. एस्. म्हसकर, M. A. B. S. M D, D P. H. (Lon), D. T. M. H. (Cantod).

चेअरमन फील्ड डायरेक्टर्स — सा. रा. लाड,

मॅनेजिंग डायरेक्टर्स — एस. पी. नाडकर्णी, D. Com. M. C. (Bom), A. I. I. (Lon.).

प्रमुख कार्यालय ( सांवव चेंबर्स, ४० ए, सर फिरोजशा मेहता रोड )
कोट, मुंबई

सतत २५ वर्षें नांवाजलेले

तयार कपड्यांचे सर्वांत मोठे व्यापारी

# महिंद्रकर ब्रदर्स

**एकदां समक्ष भेटाच.**

बंबखान्याजवळ
बुधवार पेठ
पुणें २

पोर्तुगीज चर्च–
ट्रामनाक्याजवळ
गिरगांव, मुंबई ४

## २५ वर्षें सर्वतोमुखी असलेली

**वज्रे कृत डांग्या खोकल्यावर अनुभविक औषध**

डांग्या खोकला, कोल्हे खोकला, माकड खोकला असें देशपरत्वें म्हणत असलेल्या खोकल्यावर व इतर सर्व प्रकारच्या खोकल्यांवर उत्तम लागू पडतें.

हें किंचित सारक व पौष्टीक असल्यामुळें लहानांस फार मानवतें व गोड असल्यामुळें आवडतें.

**वज्रे कफनाशक गोळ्या, ऑफिस, मुंबई नं. ४.**



K.T.DONGRE & Co.
GIRGAON BOMBAY.
के. टी. डोंगरे कंपनी.
गिरगाव मुंबई

डोंगरे यांच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात



दम्या-
वरील
उपाय
आतां ठरून गेला.

पुरोहित श्वासहारी हा एकच असा दम्यावरील उपाय आहे कीं त्याची सुरुवात करतांच कफ सुटतो धाप कमी होते, शौचाची तक्रार उरत नाहीं, पचनक्रिया सुधारते, हळुहळू शक्ति भरून येऊन फुप्फुसें मजबूत होतात व दमा निखालस बरा होतो. दमा, धाप लागणें, पहांटेचा ठसका, कंठदाह करणारा खोकला वगैरेसाठीं पुरोहित श्वासहारी प्लेन (निळें पॅकिंग) व बद्धकोष्ट व आम्लपित्त बळावलेल्या दमेकऱ्यासाठीं पुरोहित श्वासहारी कंपाऊंड (लाल पॅकिंग) वापरावें. ३, ६ व १२ औंसी बाटल्यांतून अनुक्रमें रु. ३-६ रु. ५-१२ व रु. १०

दमा, श्वासविकार बरे करणारा एकच डॉक्टरी उपाय



पुरोहित श्वासहारी

# INDIA NEEDS TECHNICIANS

REI courses in Radio Electrical Engineering, Wireless Telegraphy, AMIEE., Air conditioning are advanced modern courses and designed to equip you for the numerous money-making opportunities open to Technicians.

Fresh sessions commence in **June each year.**

HUNDREDS ENROL EVERY YEAR.

**You also can Join after Matriculation**

## Radio Electric Institute

**Pioneers of Radio Education in INDIA.**

**LAMINGTON CHAMBERS., LAMINGTON ROAD, BOMBAY.**



## रामतीर्थ ब्राह्मी तेल

**स्पेशल नं. १.**

मेंदूचे ज्ञानतंतु बलवान होऊन सफेत केस काळे होतात व टक्कल पडलेल्या ठिकाणीं केस येतात.

खवडे नष्ट होतात. स्मरणशक्ति व दृष्टीची वाढ होऊन गाढ झोंप लागते. डोकेंदुखी थांबते. प्रत्येक ऋतूंत स्त्री-पुरुष आणि मुलें यांसाठीं अत्यंत फायदेशीर आहे लिखा आणि ऊवा यांचा नाश करितें.

मोठी बाटली रु. ३-८-० लहान रु. २-०-०

सर्वत्र मिळतें.

## श्रीरामतीर्थ योगाश्रम

४४८ सँढर्स्ट रोड, मुंबई ४.

# अमृतसिंधु

**अमृतसिंधु** :—अनेक अर्क मिश्रित असल्यानें कितीहि वर्षे ठेविलें तरी वाईट होत नाहीं. इतकेंच नव्हे पण अमृतसिंधु बाहेरूनहि लावण्याच्या कामीं आणि पोटांतहि देण्याच्या कामीं फारच नांवाजलेलें असल्यानें गव्हर्नमेंट, लोकलबोर्ड, म्युनिसिपालिटी, स्काउट, को-ऑपरेटिव्हसारख्या मोठमोठ्या संस्थेनें तसेंच विख्यात अधिकाऱ्यांनीहि वापरून प्रशंसापत्रें दिलीं आहेत.

**अमृतसिंधूचा गुणधर्म** :—जखम, डोळे, पोट, दात, कंबर, छाती, बरगड्या, सांध वगैरे दुखणें, उसण भरणें, मुका मार, ओकाऱ्या, जुलाब, अजीर्ण, थंडी, ताप, जंतविकार नाकांतून अगर कानांतून दुर्गंधयुक्त पू येणें. अर्ध डोकें दुखणें, डोळे येणें, विषारी जनावराच्या दंशावर, आणि गुरें, बकरी, कुत्रा, घोडा वगैरे पाळीव जनावराच्या कामीं जखमा, पोट फुगणें, पाय अगर शरीर सुजून येऊन त्यांत किडे वगैरे पडल्यास अमृतसिंधूनें तात्काळ गुण येतो.

**अमृतसिंधूचा उपयोग** :—जखम, डोकेंदुखी, छाती, कंबर, फांसळ्या, गुडघे दुखणें, उसण भरणें, मुका मार; तसेंच विंचू, उंदीर, कुत्रा वगैरे जनावरांच्या दंशावर अमृतसिंधूंत थोडा कापूस भिजवून तो जखमेवर ठेवून वरून पट्टी बांधावी. आणि इतर सर्व दुःखांवर थोडें थोडें चोळून लावावें.

**दीनबंधु फार्मसी लि.**, वरळीकर बिल्डिंग, मुंबई नं. ७.

## हिंवताप येतो म्हणून घाबरूं नका

# हिंवतापांतक

## तुम्हांला खात्रीनें बरें करील.

**१० तोळे बाटली किंमत १० आणे.**

दिवसांतून दोन वेळ दररोज, एक दिवसाआड, चातुर्थिक, पंधरा दिवसांनीं किंवा महिन्यानें येणाऱ्या सर्व प्रकारच्या तापांवर हें उत्तम आहे. यानें हिंवतापाची पाळी लवकर थांबते व हिंवतापामुळें होणारे सर्व विकार जाऊन शक्ति वाढते.

— इतर तीनशेंचेवर औषधाकरितां लिहा —

**आयुर्वेदीय औषधी–भांडार २८ शुक्रवार, पुणें २.**

# खाजाव

★

ग्लूकोज, व्हिटामिन व प्रोटीनयुक्त
खाजावचा खुराक रोज चालू ठेवा.

★

रक्तवधक **आंबावडी**

स्वादिष्ट **रुचिको**

****

आपल्या दुकानदारांकडे मागणी करा.

★

## फडके - प्रॉडक्टस्

पौष्टिक खाद्यपदार्थांचे कारखानदार ⁂ नागनाथपार, पुणे नं. २

★

# आम्ही मुदतीच्या ठेवी स्वीकारतों

शेअर कॅपिटलबरोबरच अधिक खेळतें भांडवल हाताशीं रहावें म्हणून आम्ही मुदतीच्या ठेवीहि स्वीकारतों. कंपनीची उभारणी भक्कम पायावर झालेली असल्यानें या कंपनींत मुदतीच्या ठेवी ठेवणें हें सुरक्षिततेच्या दृष्टीनें सर्वस्वीं युक्त ठरेल.

★

—व्याजाचे दर—

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | ४ टक्के |
| २ वर्षें | ४½ ,, |
| ३ वर्षें | ५ ,, |

जास्त माहितीकरितां लिहा. सर्व माहिती आनंदानें कळविण्यांत येईल.

**दि डेक्कन ॲग्रि० इंडस्ट्रीज लि० पुणें**

★




'आशा' फेस पॉवडरनें रसिक स्त्रियांत अत्यंत मान्यतेचें स्थान मिळविलें असून फेस पॉवडरप्रमाणेंच हेअर ऑईल्स, नखरंजकें इ. सौंदर्यसाधनें लोकप्रिय आहेत.

Asha
MATCHES THE WORLD'S BEST